# विचारसुवर्ण

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१९६



REFBK-0023968

श्री. संत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

26 OCT 1983

5 FEB 1984

19 MAR 1985

6 MAY 1984

संदर्भ निबंध २९९६
२३९६८
२०१८/८/३

श्रीमद्‌सद्‌गुरू आनंदमूर्तीमहाराज,

यांना विनीत भावाने श्रद्धापूर्वक

सादर समर्पित

समाधिस्थान :

मु. दहिबांव, पो. दाभोळे, ता. देवगड, जि. रत्नागिरी

—दत्ता (व) तार

REFBK-0023968

# हृद्‌गत

सध्या कथायुग चालू आहे. अनेक प्रकारच्या '**कथा**' लघु, दीर्घ, रहस्य, भय, विज्ञान, वीर, रुपक, आत्म, दलित, प्रेम, संत, शृंगार, राष्ट्र, हास्य, इतिहास, परमार्थ, बोध, आणि शेवटी रडकथाही आज पावलोपावली आढळून येतात.

कथासाहित्याची वाचकांच्या मनावर जबरदस्त मोहिनी आहे. म्हणजेच, कथाना भरपूर मागणी असते, म्हणून त्या लिहिल्या जातात. आधी त्या प्रकाशित होतात नियतकालिकांतून, नंतर त्यांचा संग्रह बनून त्या पुस्तकरुपात उपलब्ध होतात. तात्पर्य, असे लेखन चट्‌कन् प्रकाशात येते, प्रकाशित केले जाते.

प्रस्तुत पुस्तकातील लेखन वेगळ्या स्वरुपाचे आहे. दैनंदिन आयुष्यात, इहलोकीच्या जीवनात, काळ कंठीत असता, इष्ट काय अनिष्ट काय, स्वीकार्य–अनुकरणीय काय व वर्ज्य–त्याज्य काय, वगैरे बाबतचा ऊहापोह, तत्संबंधी मार्गदर्शन, व एतद्विषयक विचारमंथन यात आढळेल. प्रत्येक पृष्ठ स्वतंत्र. कोणचेही उघडावे, वेळेला तेवढेच वाचावे नि खिशात पुस्तक ठेवून त्यावर मनन करावे.

मागणी नसलेले, पण विचारप्रवर्तक, मार्गदर्शनपर, नि सद्वर्तनप्रेरक असे हे साहित्य अप्रकाशित राहू न देता उचलून धरावे, दाखवावे या कर्तव्यभावनेने भारावून जाऊन प्रकाशिकेने हा बुडीत खर्च करण्याचे धाडस केले आहे.

कोणी व्यक्ति, संस्था, विश्वस्तनिधिव्यवस्थापक, संस्कारसंस्थाचालक मदतीचा हात पुढे करतील, काही वाटा उचलण्यास तयार होतील तर त्यांचे स्वागतच होईल. हे समाजसंस्करणकार्य आहे. याला प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. कोणी दाता पुढे येईल. ?

राष्ट्रीय दिनगणना व इसवी दिनगणना यांची परस्पराशी पक्की सांगड ठरवलेली आहे. पण शक दिनगणनेचे तसे नाही. ती, क्षय वा अधिक मास तिथीची वृद्धि वा क्षय वगैरेमुळे पुढेमागे सरकते म्हणून शकगणनेप्रमाणे प्रचलित असणारे दिनविशेष शीर्षकावर जुजबी मानानेच त्यांच्यातले अंतर कायम राखून विशिष्ट दिनी नोंदले आहेत. इसवी गणनेप्रमाणे साजरे होणारे दिनविशेष पृष्ठांती इसवी गणनेवर दाखविले आहेत.

**– प्रकाशिका –**

(१।५।८३)

महाराष्ट्रदिन

# – अनुक्रमणिका –


| | राष्ट्रीय चैत्र | इसवी |
|---|---|---|
| १ | संकल्प दिन | 22 March |
| २ | स्वदोषदहन | 23 |
| ३ | स्वर्गप्राप्तिसाधने | 24 |
| ४ | ऐटदार चाल | 25 |
| ५ | महान् अभिलाषा | 26 |
| ६ | ज्ञानाचे मोल | 27 |
| ७ | प्रगतिकारी एकाग्रता | 28 |
| ८ | सवयीचे संवर्धन | 29 |
| ९ | विविधगुणी मौन | 30 |
| १० | अनिष्ट आत्ममग्नता | 31 |
| ११ | निष्पाप मन | 1 Apr. |
| १२ | योजनापूर्वक आखणी | 2 |
| १३ | पेरा इहलोकी, उगवेल परलोकी | 3 |
| १४ | आवश्यक बाबी | 4 |
| १५ | सिंहावलोकन | 5 |
| १६ | चारित्र्यदिन | 6 |
| १७ | ईश्वरी न्यायनिवाडा | 7 |
| १८ | नियंत्रण मनोव्यापारांवर | 8 |
| १९ | त्रीणि अद्वितीयानि | 9 |
| २० | वरदहस्त परमेश्वराचा | 10 |
| २१ | आरोग्यदायी सद्विचार | 11 |
| २२ | वागणुकीबाबत विनंति | 12 |
| २३ | पराक्रमी प्रेमभाव | 13 |
| २४ | खरा राम जीवनात | 14 |
| २५ | घातकी क्रोध | 15 |
| २६ | व्यवहारी सल्ला | 16 |
| २७ | आपले कल्याण आपल्याच हाती | 17 |
| २८ | पूर्वग्रहरहित तारतम्यशक्ति | 18 |
| २९ | सत्यप्राप्ति परिशीलनांती | 19 |
| ३० | निखालस आज्ञाधारकता | 20 |

| | राष्ट्रीय वैशाख | इसवी |
|---|---|---|
| १ | स्वयोग्यता जाणा. | 21 Apr. |
| २ | आशावादाची कास धरा. | 22 |
| ३ | मनोद्यानाची मशागत | 23 |
| ४ | मनोनियंत्रण | 24 |
| ५ | घ्या जास्त, द्या कमी | 25 |
| ६ | निराशेचे सावट | 26 |
| ७ | शय्या व्यायाम | 27 |
| ८ | थोडे परमार्थसाधन | 28 |
| ९ | हे टाळा, हे शिका | 29 |
| १० | भविष्यार्थ पूर्वतरतूद | 30 |
| ११ | थोर विचार, तदनुरुप आचार | 1 May |
| १२ | इमान सोडू नका | 2 |
| १३ | रामायणाचा नित्यपाठ | 3 |
| १४ | आनंदकंदप्राप्ति | 4 |
| १५ | शुचिर्भूत व्हा दररोज | 5 |
| १६ | गुणसंपन्न आचरण | 6 |
| १७ | घालायचा कित्ता, गिरवा पण | 7 |
| १८ | घाई ताण टाळा | 8 |
| १९ | टळेल निराशा राबता अहर्निश | 9 |
| २० | धर्मप्रवणता | 10 |
| २१ | झकास व्यक्तिमत्व | 11 |
| २२ | गाशा गुंडाळ, क्रोधा | 12 |
| २३ | वाचनभक्ति | 13 |
| २४ | लालन–पालन | 14 |
| २५ | रामलक्ष्मणी जोडी | 15 |
| २६ | अडगळ काढून टाका | 16 |
| २७ | शुभचिंतन | 17 |
| २८ | प्राचार्य श्री. अनुभवजी | 18 |
| २९ | कमकुवतपणा झटका | 19 |
| ३० | समर्पणी संप्रदाय | 20 |
| ३१ | छान शुभाकांक्षी मन:स्थिति | 21 |

| | राष्ट्रीय ज्येष्ठ | इसवी |
|---|---|---|
| १ | उद्योगहीनता | 22 May |
| २ | हेकटपणा सोडा | 23 |
| ३ | दैवी भलाई | 24 |
| ४ | नारदीय सूक्ते | 25 |
| ५ | टंगळमंगळ टाळा | 26 |
| ६ | असावे दिसावे ताठ | 27 |
| ७ | ओसरत नाही तीच | 28 |
| ८ | दूरदृष्टिपूर्ण दीर्घविचार | 29 |
| ९ | क्षुद्र नसते कोणतेच काम | 30 |
| १० | चाकोरी टाळा | 31 |
| ११ | शांत निस्ताण चित्त | 1 June |
| १२ | शिक्षण खरेखुरे तेच | 2 |
| १३ | शुभ दिनारंभ | 3 |
| १४ | पूर्वतयारी | 4 |
| १५ | भयानक कालापव्यय | 5 |
| १६ | कसोटी पाहणारी सचोटी | 6 |
| १७ | होतात दृढ उच्चारणाने | 7 |
| १८ | उपलब्ध आहे सारेच | 8 |
| १९ | अवगुणांवर मात | 9 |
| २० | व्यत्ययी व्यग्रता | 10 |
| २१ | ठेचेनंतरही मार्गक्रमण | 11 |
| २२ | इष्ट सवय | 12 |
| २३ | खास त्रिसूत्री | 13 |
| २४ | चिंतनांती बेतआखणी | 14 |
| २५ | लीनता, अविरोध, लवचिकपणा | 15 |
| २६ | वृत्तींतील धरसोड | 16 |
| २७ | दुर्दम्यतेने कार्यपूर्ति | 17 |
| २८ | डोळचांत तेल | 18 |
| २९ | हसावे साडेसातीतही | 19 |
| ३० | घातक वाचाळता | 20 |
| ३१ | ढळू द्या एकाग्रता | 21 |

| | राष्ट्रीय आषाढ | इसवी |
|---|---|---|
| १ | घातक घाई | 22 June |
| २ | बंधुद्वय | 23 |
| ३ | नित्य मितव्यायाम | 24 |
| ४ | भर विचारांपेक्षा आचारांवर | 25 |
| ५ | गुणग्राहकता | 26 |
| ६ | खोल चिंतन, सुदीर्घ मनन | 27 |
| ७ | पाऊल, पुढेच पडण्यासाठी | 28 |
| ८ | ग्रंथराजाचे मार्गदर्शन | 29 |
| ९ | डावा व्यवसाय, छंदच उजवा | 30 |
| १० | ज्ञानार्जन कष्टसाध्यच | 1 July |
| ११ | ऐहिकाच्या पलीकडे | 2 |
| १२ | आढावा व साफसफाई | 3 |
| १३ | शाबासकीसाठी नको | 4 |
| १४ | नियंत्रण वृत्तीवर | 5 |
| १५ | शीलचारित्र्यघडण | 6 |
| १६ | करावे सत्पात्री दान | 7 |
| १७ | निष्ठुर निवाडा | 8 |
| १८ | बाह्य हे अंतस्‌चे प्रतिबिंब | 9 |
| १९ | लागट बोलणे | 10 |
| २० | प्रगतिपथावर अग्रसर | 11 |
| २१ | चिकाटीची कार्यमग्नता | 12 |
| २२ | थोरवी विचारवैभवाची | 13 |
| २३ | जीवनमार्गक्रमण | 14 |
| २४ | एकांतसेवन | 15 |
| २५ | भिस्त स्वकर्तृत्वावर | 16 |
| २६ | समग्र स्वविश्लेषण | 17 |
| २७ | ठेवा कडक नजर | 18 |
| २८ | कालव्यय | 19 |
| २९ | सुदैवच उगाळावे | 20 |
| ३० | मन:शक्तींना राबवा | 21 |
| ३१ | ठरवा नेम घेण्याचे | 22 |

| | राष्ट्रीय श्रावण | इसवी |
|---|---|---|
| १ | अंधश्रद्धा सोडा | 23 July |
| २ | उद्दिष्टचयन | 24 |
| ३ | गुणत्रयी | 25 |
| ४ | गुरुमाहात्म्य | 26 |
| ५ | थोडे सल्ले | 27 |
| ६ | दोषांची वेचणी | 28 |
| ७ | अंतरंग सुधारा | 29 |
| ८ | विधायक सुविचार | 30 |
| ९ | डोंगर उल्लंघ्य | 31 |
| १० | निश्चय पालन | 1 August |
| ११ | कार्यासक्तता | 2 |
| १२ | सुशब्दशतनाम (प्रथमार्ध) | 3 |
| १३ | सुशब्दशतनाम (द्वितीयार्ध) | 4 |
| १४ | ध्यानमग्नता | 5 |
| १५ | धाव ! नियतीकडे | 6 |
| १६ | द्योतक कर्तृत्वाचे | 7 |
| १७ | वाचनाचे वेड | 8 |
| १८ | जीवन समर्पित | 9 |
| १९ | वृत्तीत सदानंद | 10 |
| २० | ज्ञान व आचरण | 11 |
| २१ | श्रद्धेनेच मनुष्या | 12 |
| २२ | गठबंधन भगवंताशी | 13 |
| २३ | सक्रिय निष्क्रियता | 14 |
| २४ | अंगी मुरवा | 15 |
| २५ | मनोविकार | 16 |
| २६ | कृतिप्रवणता | 17 |
| २७ | विचारवैभववर्धन | 18 |
| २८ | घोर सत्याचा | 19 |
| २९ | गुणदोषविश्लेषण | 20 |
| ३० | क्षेम सद्भावांनी | 21 |
| ३१ | सद्विचारी मनोवृत्ति | 22 |

| राष्ट्रीय भाद्रपद | | इसवी |
|---|---|---|
| १ | कर्तृत्वाची वल्ही | 23 August |
| २ | उद्योगमग्नता | 24 |
| ३ | दातृत्व | 25 |
| ४ | शद्बमाहात्म्य | 26 |
| ५ | उमेदवारी | 27 |
| ६ | बचत | 28 |
| ७ | नीरवता | 29 |
| ८ | जबाबदारी | 30 |
| ९ | उल्हासमयता | 31 |
| १० | यशाची पायरी | 1 Sept. |
| ११ | भूक भागवा | 2 |
| १२ | योग्यता+प्रयत्न | 3 |
| १३ | ढोवळपणे आश्रम | 4 |
| १४ | हाडाचा शिक्षक | 5 |
| १५ | सुखसंतोष | 6 |
| १६ | जीवननौका | 7 |
| १७ | खरी मत्ता | 8 |
| १८ | फायदा अनुद्विग्नतेचा | 9 |
| १९ | दोषनिरसन | 10 |
| २० | धडाडी | 11 |
| २१ | मनोबलवर्धन | 12 |
| २२ | विघ्नांवर विजय | 13 |
| २३ | अंकुरी कुठार | 14 |
| २४ | प्रेरक प्रश्न | 15 |
| २५ | प्रगति साधनेने | 16 |
| २६ | गुणसाधना | 17 |
| २७ | जोडा साधेपणा | 18 |
| २८ | नीरव एकांतसेवन | 19 |
| २९ | गतकाळाचा शोक वृथा | 20 |
| ३० | हवा महाप्रयत्न | 21 |
| ३१ | साधनशुचिता | 22 |

| | राष्ट्रीय आश्विन | इसवी |
|---|---|---|
| १ | स्फुरणदायी विघ्नविसर्जन | 23 Sept. |
| २ | त्रागा त्याज्यच | 24 |
| ३ | आगळे असा, एकांडे नसा | 25 |
| ४ | उद्योग व आकांक्षा | 26 |
| ५ | बेलगाम वाणी | 27 |
| ६ | श्रीपदी लीन | 28 |
| ७ | प्या खूप पाणी | 29 |
| ८ | छडा दुर्गुणांचा | 30 |
| ९ | छाप पाडा | 1 Oct. |
| १० | आत्मसुधार | 2 |
| ११ | सदैव बरोबरच | 3 |
| १२ | शिथिलता हवी | 4 |
| १३ | टाळी लागू द्या | 5 |
| १४ | आरंभ आताच | 6 |
| १५ | रास्त मूल्यांकन | 7 |
| १६ | निष्काम कर्मयोग | 8 |
| १७ | तुल्यबलता | 9 |
| १८ | सुसंस्कारिता | 10 |
| १९ | झाला निर्धार | 11 |
| २० | हातचा वर्तमानच | 12 |
| २१ | तयार ठेवा यादी | 13 |
| २२ | घडवा चारित्र्य | 14 |
| २३ | ठेवा श्रद्धा | 15 |
| २४ | मनोराज्यावर सत्ता | 16 |
| २५ | आणीबाणीतही | 17 |
| २६ | दाखवा मौलिकता | 18 |
| २७ | डावलू नका | 19 |
| २८ | राहणी सुसंस्कृत | 20 |
| २९ | खटाटोप अविरत | 21 |
| ३० | दीर्घश्वसन | 22 |

| राष्ट्रीय कार्तिक | | इसवी |
|---|---|---|
| १ | ऊठ, उपद्रव सोस | 23 Oct. |
| २ | एकमार्गी साधेपणा | 24 |
| ३ | औचित्यपूर्ण निवड | 25 |
| ४ | ऊर्जित काल | 26 |
| ५ | श्रेष्ठ गुण | 27 |
| ६ | औदासिन्य श्रेयस्कर | 28 |
| ७ | फल विधायक टीकेचे | 29 |
| ८ | ईर्ष्या कार्यसिद्धीची | 30 |
| ९ | अंती, भल्या मिळे भला | 31 |
| १० | क्षमाशील दिलदारी | 1 Nov. |
| ११ | दौर्बल्य घालवा | 2 |
| १२ | झाडा मनोमालिन्य | 3 |
| १३ | ग्रहणशील मन | 4 |
| १४ | लवचिक मनोधारणा | 5 |
| १५ | धावती भेट नको | 6 |
| १६ | मनाची ठेवण | 7 |
| १७ | घोर प्रतिज्ञा | 8 |
| १८ | मनोराज्य | 9 |
| १९ | सदामहान् आज | 10 |
| २० | वारशाचे सार्थक | 11 |
| २१ | प्रगतीच्या दिशेने | 12 |
| २२ | ईश्वरनिष्ठा | 13 |
| २३ | औचित्य बालदिनाचे | 14 |
| २४ | ऊर्मि वाटचालीची | 15 |
| २५ | शरण भगवंतासीं | 16 |
| २६ | श्रवणभक्ति | 17 |
| २७ | उपवासाचे व्रत | 18 |
| २८ | प्रियदर्शिनी दिन | 19 |
| २९ | गाजावाजा नको | 20 |
| ३० | खात्री अस्तित्वाची | 21 |

| | राष्ट्रीय मार्गशीर्ष | इसवी |
|---|---|---|
| १ | पवित्र विचारसृष्टि | 22 Nov. |
| २ | खराखुरा साधेपणा | 23 |
| ३ | थकव्याचे थोतांड | 24 |
| ४ | हकालपट्टी पूर्वदुर्ग्रहांची | 25 |
| ५ | स्वोदाहरणाचा प्रभाव | 26 |
| ६ | परिश्रम | 27 |
| ७ | विनाशक वटवट | 28 |
| ८ | चोखंदळ वाचन | 29 |
| ९ | फावणारा बलसंचय | 30 |
| १० | भलाई | 1 Dec. |
| ११ | निवड उद्दिष्टाची | 2 |
| १२ | क्षमतापूर्ण आत्मविश्वास | 3 |
| १३ | खिळवा नजर | 4 |
| १४ | ज्ञाननिर्मिति | 5 |
| १५ | जन्म सत्यशोधनार्थ | 6 |
| १६ | जोडा सान्निध्य | 7 |
| १७ | ठपक्याविना आत्मपरीक्षण | 8 |
| १८ | कित्ता घालून द्या | 9 |
| १९ | खासे जीवनपुस्तक | 10 |
| २० | उपेक्षणीय चिंता | 11 |
| २१ | विचारधन | 12 |
| २२ | व्यष्टीतून समष्टीत | 13 |
| २३ | प्रामाणिकता व भलाई | 14 |
| २४ | वर्ण गुणद्योतक | 15 |
| २५ | निष्कारण बाऊ | 16 |
| २६ | फारच महान् | 17 |
| २७ | गीताकारास स्वसमर्पण | 18 |
| २८ | भक्तिभावी प्रार्थना | 19 |
| २९ | खिलाडूवृत्ति | 20 |
| ३० | श्रीपादवल्लभ, नाहीत दुर्लभ | 21 |

| राष्ट्रीय पौष | | इसवी |
|---|---|---|
| १ | अंबराचे अध्ययन | 22 Dec |
| २ | ईशदत्त वक्तृत्व | 23 |
| ३ | मोठी मिळकत | 24 |
| ४ | जन्म–सार्थक्य | 25 |
| ५ | बोधवचनरत्ने | 26 |
| ६ | एकच पण धड | 27 |
| ७ | ज्ञानदाते ग्रंथ | 28 |
| ८ | महागडी चिंता | 29 |
| ९ | घ्या खबरदारी | 30 |
| १० | जोड कार्यसिद्धीसाठी | 31 |
| ११ | ईशस्वरुप पुष्प | 1 Jan. |
| १२ | थोरपणा धर्माचरणात | 2 |
| १३ | कृतार्थता देण्यात | 3 |
| १४ | श्रीमंतीविनाही यश | 4 |
| १५ | जीवन व विचार | 5 |
| १६ | जग ही प्रशाला | 6 |
| १७ | निर्धारपूर्वक कृति | 7 |
| १८ | राबा चिकाटीने | 8 |
| १९ | धीरगंभीर वृक्षराज | 9 |
| २० | पटवणुकीचे धोरण | 10 |
| २१ | चिकित्सक आशावाद | 11 |
| २२ | शिल्पकार चिंतन | 12 |
| २३ | विचारानुसारी शरीरबल | 13 |
| २४ | टिकाऊ मैत्री | 14 |
| २५ | हवेहवेसे गुण | 15 |
| २६ | अष्टपैलू जीवन | 16 |
| २७ | अतिरेक वर्ज्य | 17 |
| २८ | यशोलाभ कष्टानंतरच | 18 |
| २९ | क्षणिक उसळी अनिष्ट | 19 |
| ३० | स्वयंसूचन | 20 |

| राष्ट्रीय माघ | | इसवी |
|---|---|---|
| १ | स्थानप्राप्ति | 21 Jan. |
| २ | घडी सुवर्णाची | 22 |
| ३ | पुढारीपणाचे पथ्य | 23 |
| ४ | कसोटीचे प्रसंग | 24 |
| ५ | विवेकी प्रार्थना | 25 |
| ६ | अबाधित स्वातंत्र्य | 26 |
| ७ | उपहास-विरोध-स्वीकार | 27 |
| ८ | सदभिरुचिपूर्ण वाचन | 28 |
| ९ | वक्तृत्वपथ्ये | 29 |
| १० | प्रभुपदी आत्मसमर्पण | 30 |
| ११ | हाकेला धाव | 31 |
| १२ | परमेश्वरी निर्बंध | 1 Feb. |
| १३ | योग्य वेळ | 2 |
| १४ | सुविचारसाधना | 3 |
| १५ | भारदस्तपणा | 4 |
| १६ | भगवंती आंदण | 5 |
| १७ | न्यायाधीश ? | 6 |
| १८ | रजतमसत्त्व | 7 |
| १९ | दुःखविनाश | 8 |
| २० | घातक तण | 9 |
| २१ | ढीग उपसा | 10 |
| २२ | विवेकी मते | 11 |
| २३ | व्यक्तित्व पालट | 12 |
| २४ | खास नोंद | 13 |
| २५ | आत्मनिष्ठ श्रद्धा | 14 |
| २६ | श्रवण व कथन | 15 |
| २७ | यशोदायी मार्ग | 16 |
| २८ | आंतला आवाज | 17 |
| २९ | इच्छांचा विधि-निषेध | 18 |
| ३० | सहाय्य ईश्वराचे | 19 |

| राष्ट्रीय फाल्गुन | | इसवी |
|---|---|---|
| १ | चारित्र्यघडण | 20 Feb. |
| २ | निवडक निश्चय | 21 |
| ३ | जुळी भावंडे | 22 |
| ४ | सहनशीलता | 23 |
| ५ | कार्य सिद्ध कशाने? | 24 |
| ६ | प्रभूचे प्रतिबिंब | 25 |
| ७ | हिंदुत्व–१ | 26 |
| ८ | हिंदुत्व–२ | 27 |
| ९ | साधेपणा | 28 |
| १० | ध्रुवदृष्टि | 1 Mar. |
| ११ | स्वतंत्र बाणा | 2 |
| १२ | महति सत्यसाधनेची | 3 |
| १३ | शब्दाध्ययन | 4 |
| १४ | समतोलवृत्ति | 5 |
| १५ | बेतशीर व्यय | 6 |
| १६ | नित्य प्रार्थना | 7 |
| १७ | प्रेरक पर्याय | 8 |
| १८ | ठायींच्या शक्ति | 9 |
| १९ | दृढ विश्वास | 10 |
| २० | लाभली अक्कल | 11 |
| २१ | सामर्थ्यसाधना | 12 |
| २२ | अचल निर्धार | 13 |
| २३ | परमतसहिष्णुता | 14 |
| २४ | कौटुंबिक वर्तणूक | 15 |
| २५ | समाजसेवाव्रत | 16 |
| २६ | थेट बत्तीस चर्वणे | 17 |
| २७ | रामबाण इलाज | 18 |
| २८ | लाभ अपयशाचा | 19 |
| २९ | बाह्यांगमहत्त्व | 20 |
| ३० | ताळेबंद | 21 |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९६
क्र. २३९६६
विषय २०।११।८३
शाखा (स्थल प्रत)

# राष्ट्रीय चैत्र १
# संकल्प दिन

नागरिकांत राष्ट्रीय वृत्ति जोपासण्याची जबाबदारी अपली सर्वांची आहे आणि ती सर्वजण मिळून पार पाडू, असा दृढ संकल्प नववर्षाच्या प्रथम दिनी प्रत्येकाने सोडायला हवा. सर्वोच्च महत्त्वाच्या विशेष बाबींवर आज लक्ष एकाग्र करा. आपले महत्तम ध्येय कृतींत उतरविण्याची आज मुहुर्तमेढ रोवा. आजपासून विशाल वृत्तीने व उमद्या उमेदीने जीवन जगण्याचे ठरवा. आपले पूर्व-नियोजित कार्य उत्कृष्टपणे पार पाडा. पुढे नव्या महत्तर कार्याला हात घालायला मिळणे नि त्याप्रीत्यर्थ विस्तृत क्षेत्र लाभणे हेच चालू कार्याच्या पूर्तीचे परम पारितोषिक होय प्रगतीच्या वाटेत आड येणाऱ्या तुमच्या फालतू दुष्ट सवयीसुद्धा प्रयत्नपूर्वक घालवून टाका. आपल्या विचार धारणेचे सूक्ष्म विश्लेषण करुन तद्वारा आलेली आत्मसुधाराची प्रत्येक संधी दक्षतेने साधा. स्वतःचे मनोव्यापार विधायक विचारांच्या उच्च पातळीवर राखा. चाललेला काल व लाभलेली संधी यांची बहुमूल्यता चाणाक्षपणे ओळखा आणि त्यायोगे आजच्या दिवशी तुमचे पाऊल अस्सल व शाश्वत सिद्धीच्या दिशेने पडू द्या.

यशःप्राप्ति हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि प्रत्येकाने तो मिळवलाच पाहिजे तुमच्या जीवनाकाशांत दुर्दैवाचे ढग दाटले तरी हातपाय गाळू नका, मानहानीचे मेघ कोंदले तरी खचू नका. तुमचे मानसाकाश चिंतेच्या अभ्रांनी, काळज्यांच्या घनांनीं काळवंडले तरी धीर सोडू नका. या सर्व काळाकुट्ट ढगानाही रुपेरी झालर आढळतेच. या झालरीवर लक्ष केंद्रीत करा. तुमच्या कार्याच्या झपाटयाच्या प्रमत्त प्रभंजनाने हे सारे ढग उधळून लावीन असा आज संकल्प करा.

**MARCH 22**

# राष्ट्रीय चैत्र २

## (फा. शु. १५, होळी पौर्णिमा)

# स्वदोषदहन

तुम्हाला तुमच्याठिकाणी कुठलाही दोष आढळून येताक्षणीच त्याचे समूळ उच्चाटन करण्याची काळजी घेणे ही स्वतःच्या चारित्र्य संवर्धनासंबंधी विशेषत्वाने लक्षात ठेवण्याची अशी बाब आहे. आढळलेल्या दोषाच्या अस्तित्वाची कबूली देणे हे त्याच्या उच्चाटनाच्या दिशेने योग्य तऱ्हेने टाकलेले पहिले पाऊल होय. दोष व उणीवा यांची पाळेमुळे जर खोलवर रुजली असतील तर ती तितक्याच नेटाने उपटून टाकली पाहिजेत. आपल्या दोषांकडे निर्भयपणे पाहण्यास शिका. आपल्या अवगुणांचे तुमच्या जीवनावर प्रभुत्व जमू देऊ नका. ध्येये ही उत्तेजना देणारी म्हणून मौल्यवान आहेत खरी, पण खरोखर पाहता ज्या प्रमाणात ती ध्येये सिध्द होतील त्या प्रमाणात त्यांची खरी व शाश्वत मूल्ये ठरतील. स्वदोष-दहन केलेत तरच ध्येये साध्य करता येतील, आणि मगच ती मौल्यवान ठरतील, दोषैकदृष्टी इतरांच्या बाबतीत असेल तर तो निश्चितपणे अवगुणच आहे. पण स्वतःच्या बाबतीत जर ती बाळगता आली तर ती एक इष्ट सद्‌गुण ठरते हे ध्यानात घ्या. तेव्हा आज स्वदोषांची होळी पेटवून देऊन ही हुताशनी साजरी करा.

★

MARCH 23

# राष्ट्रीय चैत्र ३

## (फा. व. २, तुकाराम बीज)

# स्वर्गप्राप्तिसाधनें

सामर्थ्यशाली व सत्याचरणी बनणे, इतरांची उदारमुखे कौतुक प्रशंसा करणें, शत्रुमानसींही सद्धेतुच पाहणें, फलाकांक्षा न ठेवता निरिच्छपणे दान देणे, विनम्रता-सहनशीलता व आत्मसंयमन अंगी बाणवणे, काळ व संधी उत्कृष्टपणे वापरुन दाखविणे, मनाची पवित्रता अबाधीत राखून इतरांच्या मूल्यांकनांत औदार्य वापरणे, पीडितांसाठी चिकित्सक व न्याय्य सहानुभूती बाळगणे, धीरगंभीरता व अविरोध यांची अभ्यासपूर्वक वाढ करणे, जिभेला लगाम घालून कर्णांना श्रवणप्रियतेची आवड लावणे, विचार-वासना-वर्तणूक यांना उच्च पातळीवर राखणे, भलाई-कृतज्ञता-परमेश्वरप्रीती यांची जोपासना करणे, सत्यशीलता व सचोटी यांची कास धरणें, महान् आकांक्षा बाळगून उल्हासपूर्वक कष्ट करीत परमेश्वरी प्रेरणेवर दृढ श्रद्धा ठेवणे, कार्यमग्न राहून सर्वांभूती प्रीति बाळगीत परसेवा साधून नामजपांत लीन राहणें, ही सारी स्वर्गमार्गावरील सफरीची सहाय्यक साधने समजावीत. भक्त शिरोमणि तुकाराममहाराजांनी ही ज्ञानबाची मेख ओळखून या साऱ्या साधनांचा आपल्या जीवनांत प्रत्यही अवलंब केला. म्हणूनच त्यांना याचि देहीं, याचि डोळां, सदेह स्वर्गप्राप्ती साधली.

卐

**MARCH 24**

# राष्ट्रीय चैत्र ४

## (फा. व. ३, शिवछत्रपती जयंती)

# ऐटदार चाल

उभे असाल तेव्हां रूबाबदारपणें उभे राहण्याची, चालत असाल तर तडफदारपणे पावले टाकण्याची, नव्हे- नुसते बसलेले असलात तरी ताठपणे बसण्याची संवय जडवून घ्या. पाठीचा कणा सरळ ताठ ठेवायचा आहे याचा मनाला सतत ध्यास रहायला हवा. ओथंबलेले, झुकलेले, पाघळलेले असण्याची सर्वसामान्य खोड पार टाकून द्या. पाठीचा कणा कायम ताठ ठेवण्याची सतत दक्षता पाळलीत तर शरीरावयवांना आपआपली कार्ये मोकळेपणाने, नैसर्गिकपणाने सहजगत्या करता येतात. शिवाय वावरतांना शरीर ताठ दिसण्यानें व्यक्तिमत्व आत्मविश्वासपूर्ण व ऐटदार प्रतीत होते. शरीराला सहजगत्याच झोकदारपणे वावरण्याचा अंगभूत सराव होऊ द्या. हनुवटी, डोळे, समोर नीट नाकाच्या रेषेत धरलेले, खांदे मागे ओढलेले, छाती पुढे काढलेली, असे चाला जोडीने दीर्घश्वसनाची संवय अंगी मुरवून घ्या. वृत्तींतही मवाळ शामळूपणा नको. शिवछत्रपतींच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे सारभूत रहस्य त्यांची ऐटदार, तडफदार चाल हेच होते. भेदक तीक्ष्ण दृष्टीची या ताठ चालीला जोड मिळताच सारें त्यांच्यासमोर आपोआप झुकत. हा मुद्दा तुम्हांला पटताच तुम्हीही बसाल, उठाल, उभे रहाल, चालाल ते सारे कसे ताठपणाने. आशावादी विचारसरणीचाही शरीरावर पोषक परिणाम घडतो. तिच्यामुळेही तुमची चाल मर्दानी बनेल.

MARCH 25

## राष्ट्रीय चैत्र ५

# महान् अभिलाषा

कांही महान, टिकाऊ आणि सुरेख असे कार्य आपल्या हातून घडावे अशी एक सुप्त प्रबळ अभिलाषा, दुर्दम्य आकांक्षा वा उसळता चेव प्रत्येकाच्या मनात खोल कुठेतरी दडून बसलेला असतोच. आतून मिळत असलेल्या या अदृश्य सूचनेने मनाला लागलेली रुखरुख म्हणजे तुम्हापुढे ठेवलेले जणू एक आवाहनच असते. सामान्यतेच्या तुच्छ पातळीवरुन उंच उठून जवळच्या सामर्थ्याचा कर्तृत्वाचा नि कुवतीचा, काही महान कार्यार्थ व्यय करण्याचे आवाहन. आतल्या दैवी आवाजाचे आव्हान, त्याची आज्ञा, एकदा का तुमच्या मन:कर्णावर पडली की सामान्य पातळीचे प्रयत्न करुन तुम्हाला समाधान कसे ते वाटणारच नाही. मग तुमची दृष्टी एखाद्या ध्येयध्रुवावर खिळुन राहील, तुमच्यातले राखीव उदात्त शक्तिसामर्थ्य प्रकट होईल, आणि परमेश्वराने तुमच्यावर व्यक्तिश: टाकलेल्या जबाबदारीची जाणीव तुमच्या हृदयात उसळून उद्भवेल. त्या महान आदिशक्तिने तुम्हाठायी शक्तिसार्थ्याचे ईश्वरी देणे बहाल ठेवलेले आहे. त्याचा उचित वापर करा. तसे करण्याची प्रबळ प्रेरणा प्रकटली की तुमच्याहातून अघटित कार्येही पार पडतील.

☆

**MARCH 26**

# राष्ट्रीय चैत्र ६

# ज्ञानाचें मोल

तुम्ही आपल्या कार्यप्रवृत्तींचा यथोचित वापर करीत राहिलात तरच तुमची बौद्धीक विचक्षणाक्षमता उत्तरोत्तर वृद्धिगत होत जाईल. काबाडकष्ट करुन आणि अहोरात्र झटून प्राप्त केलेले ज्ञान ही तुमची सर्वांत उपयुक्त व चिरशाश्वत अशी मालमत्ता होय. अंगमेहनत व सततोद्योग यांचे मोल देऊन जेंव्हा तुम्ही ज्ञानार्जन करता तेव्हाच यथार्थतेने त्याची खरी किंमत तुम्हाला जाणवते. शिक्षक, अध्यापक, मार्गदर्शक, गुरुजी हे सारेही, ज्ञानमहात्म्य पटवून देतात तुम्हाला, नाही असे नाही. पण विद्यार्थ्याने स्वतः जिवापाड राबल्याखेरीज त्याच्यातील ज्ञानार्जनप्रवृत्ति सर्वांशाने विकसित होऊं शकतच नाही. थोडी आवाक्याबाहेरील कार्ये स्वतः होऊन अंगावर घेतल्याखेरीज मानसिक विकास, संस्करण साधणार नाहीत. तुमच्या वैयक्तिक अथक प्रयत्नांवरच मुख्यत्वेकरुन तुमची मानसिक प्रगति बव्हंशाने अवलंबून राहणार. विद्यार्थ्याला उचित अशी ज्ञानाकांक्षा तुम्ही जीवनभर मंदावू देऊं नका. ज्ञानपिपासू मन सर्वदा, सतत, सर्वकाळ कांहीना कांही ज्ञानलालसा उराशी बाळगील आणि ती भागवीलही. मनाचा ज्ञानयज्ञ अहर्निश चालू रहावा. नव्या नव्या ज्ञानाची आहुति त्यांत नित्य पडत असावी. हे एक प्रकारचे अग्निहोत्रच समजावे. अखंड ज्ञानयज्ञाचे, अविरत ज्ञानसाधनेचे महत्व कांही आगळेच असते.

**MARCH 27**

# राष्ट्रीय चैत्र ७

## (फा. व. ६, एकनाथ षष्ठी)

# प्रगतीकारी एकाग्रता

उच्च उद्दीष्टें दृष्टीसमोर ठेवणाऱ्या नरवरांजवळ एकाग्रता साधण्याचे सर्वश्रेष्ट सामर्थ्य अपूर्वतेने विद्यमान असते. जवळच्या साऱ्या मनःशक्ती स्थिरपणे व अबाधितपणे एकावेळी एकाच विषयावर एकवटण्याची कुवत असणे हे असामान्य मनोबल जवळ असण्याचे लक्षण होय. कार्यसिद्धी साधण्याचे ते अद्वितीय साधन होय. नियमितपणे व जाणीवपूर्वकतेने सराव चालू ठेवण्याने मन एकाग्र करणे साधते. मन चंचलपणे सैरावैरा सुटते आहे असे ध्यानांत येताक्षणीच आगंतुक विचाराला प्रथम गचांडी मारून हाकलून द्या. आणि मनाला इष्ट विचाराकडे प्रयत्नपूर्वक वळवा. अशा प्रकारे मनाला पुनः पुनः वेसण घालीत राहण्याने त्याचा अवखळपणा नाठाळपणा कमी होऊन ते हळूहळू वठणीवर येते. मनाचे भरकटणे व स्वप्नसृष्टीत निष्कार्यपणे तरंगत राहणे हे दोन्ही प्रकार सुसंस्कार व प्रगती ह्यांच्या बाबतीत शत्रुवत बाधक विघातक ठरतात. तेव्हां याविषयी डोळ्यात तेल घालून सावध राहिले पाहिजे. हाती घेतल्या कार्यात तनमनपूर्वक एकाग्र राहिले की चंचल पळपुट्या विचारांची उठाबस होणारच कशी? एकाग्रता साधनेने मनोबल झपाट्याने वाढत जाते. भरपूर मानसिक वाढ आणि वैयक्तिक प्रगती यासाठी एकाग्रता साधता येणे फार आवश्यक आहे.

**MARCH 28**

# संवयीचे संवर्धन

जीवन खरोखरच भव्य नि उदात्त व्हायला हवे असेल तर त्यासाठी आवश्यक अशा सर्वश्रेष्ठ सवयी प्रयत्नपूर्वक तुम्ही जडवून घ्यायला हव्यात. पुष्कळ सवयी तुम्हाला नकळतच लागतात पण त्यांचे, जीवनांत मिळणाऱ्या यशापयशावर, खूपच बरेवाईट परिणाम होत असतात. म्हणून तुम्ही, या सवयी लागण्याच्या बाबतींत व लावून घेण्याच्या पद्धतीत, खूप तत्पर, जागरुक, दक्ष रहायला हवे. या दृष्टीने प्रत्येक दिवशी लाभणारी संधी तुमच्या हातून वाया दवडली जात नाही ना, हे तुम्ही लक्षपूर्वक तपासत चला. संवय ही एखाद्या जाडया मजबूत दोरखंडाप्रमाणे असते. तो कसा सुतासुताने, सुंभासुंभाने पीळ पडत बनत जातो. प्रत्येक सुत, सुंभ तसे एकएकटे कमकुवत असते. पण संपूर्ण बनून तयार झाल्यावर दोरखंड केवढा भक्कम नि चिवट होतो! संवयही तशीच अंशाअंशाने जडत जाते, पण मग सोडता मात्र सुटत नाही. म्हणून नको असणारी, घातक ठरुं शकणारी प्रत्येक संवय, ती, लागण्याच्या प्राथमिक अवस्थेतच असताना तिचा नायनाट करा. ज्या संवयींनी मन विशाल व उमदे बनेल त्यांचा योजनाबद्ध पाठपुरावा करा. व्यवसाय कोणताही असो, परिस्थिती कशीही असो, आयुर्मान कितीही असो, उच्चतम प्रतिष्ठेने जगण्याची संवय जडवून घ्या. स्वसंवयींचे नीट पृथक्करण- विश्लेषण करा. अनिष्ट घालवा, इष्ट जडवा. त्यांतूनच चारित्र्य घडायचे असते.

●

# राष्ट्रीय चैत्र ९

# विविधगुणी मौन

उत्साही माणसाला स्वतःच्या उसळत्या चैतन्यप्रवाहाला घालता येण्याजोगा मौन हा एक मजबूत बांध आहे. तसेच मनश्चक्षूंना दूरचे नीटसे स्पष्ट दिसत नसल्यास त्यांच्यात घालण्याचे ते एक गुणकारी अंजन आहे. जेव्हा तुम्ही मौन धारण करता, तेव्हा तुमच्या मानसमंदिरात पवित्र व गूढ विचार वावरुं लागतात. विश्वविचारांच्या काळज्यांच्या कोठड्यांना कुलुपें लावून तुम्ही जेव्हा स्वतःच्या मनोमंदिराच्या गाभाऱ्यांत ध्यानस्थ बसता तेव्हा तुमचा जगत्कल्याणाच्या उगमांशी निकटचा संबंध जुळतो. ईश्वराने तुम्हाला बहाल केलेल्या नानाविध शक्तींविषयी तुम्ही सखोल मनन चिंतन करुं लागता ज्या तुमच्या आयुष्याच्या एकाकी रोपट्याची तुम्ही मनोभावे मशागत जोपासना करीत आहां त्याला, मौनापायी उद्‌भवणाऱ्या आळशी समाधानाच्या सोसाट्यानें, उन्मळून पडूं देऊं नका. तुमच्या खळखळत्या वाहत्या चैतन्यप्रवाहाला मौनाचा बांध पडताच तुमचे चैतन्यसंचय विस्तृत व सखोल होतील. मात्र सबंधच जीवन मौनवृत्तीने घालवायचा बेत न करता आयुष्य सक्रीयतेने व्यतीत करा. कर्तव्यपराङ्‌मुखता व एकलकोंडेपणा या जोडगोळीला तुम्ही बिलकुल जवळ थारा देऊं नका. मधून मधून कांही काल मौन एकांतवासात कंठल्यानंतर परत ताज्या दमाने जीवनव्यवहारात तुम्ही सहभागी व्हायलाच पाहिजे. एकंदरीत समाजाबद्दल सहानुभूति बाळगुन त्याला मदतीचा हात देणे हे तुमचे कर्तव्य आहे. मौनाची सोईस्कर सबब सांगून ते कर्तव्य मात्र टाळू नका.

## MARCH 30

राष्ट्रीय चैत्र १०

# अनिष्ट आत्ममग्नता

मधूनच एखादे वेळी हातातल्या चालु कामावरुन दृष्टी जरा ढळवा आणि ती आसमंतातील परमेश्वररचित सुंदर सृष्टीवरुन फिरवीत पार दूर क्षितिजाच्यापर्यंत पोचवा. पसरलेल्या विलोभनीय नीलाकाशात तिला स्वच्छंद अवगाहन करुं द्या. जमल्यास जोडीने आत्म्यालाही अनंतांत भरारी मारण्यास सोडा. सभोवतालच्या चराचरांत मुक्त विहार करण्यास मनाला मोकळे करा. ह्या अनिर्बंध मनोविहारामुळे तुमच्या आत्म्याला टवटवी चढेल. तुम्हाला खूप खूप उपयुक्त अशा कल्पना सुचतील. आता तुम्ही हातातल्या कामाकडे पुन्हा नव्या हुरुपाने व धीरगंभीरपणे वळू शकता. लक्ष एकवटून काम चालू असता जरा मधेच कल्पनेला स्वैर सोडल्याने ताण मोकळा होऊन मनावरील भार थोडावेळ हलका पडतो· भोवतीच्या जगाशी सहानुभूतिपूर्ण संपर्क राहूच शकणार नाही इतक्या प्रमाणात तुम्ही आपल्या कामात मग्न राहु नका. एकाग्रता हवी हे जरी खरे असले तर भोवतालच्या जगाचे भानही रहावयास हवेच. मनात भरपूर कळकळ असू द्या, स्वतः मनाने भरभक्कम असा, सत्वशील प्रामाणिक रहा, म्हणजे तुमचे स्वत्व तुम्हाला गवसेल. मात्र त्यानंतर तुम्ही स्वतःतच बुडलेले राहू नका.

●

MARCH 31

राष्ट्रीय चैत्र ११

# निष्पाप मन— सरळमार्गी जीवन

तुमची विचार पद्धति जर सुसंगत, सुस्वभावी व सुसंगवादी असेल तर तुमचें जीवनही तसेच बनू शकेल. तर्कदुष्ट, विध्वंसक, कुमार्गी विचार कल्पनांना तुमच्या मनाची कवाडे बंद ठेवून त्यांना मज्जाव करा. अनिष्ट वृत्तींना तुमचे मन अनुलंघ्य राहू द्या. विचार सर्वांगसुंदर बनले की जीवनही आकर्षक होईल नि वाटेलही. भोवतालचे जग मोहक आहे. त्यांतील निवडक उत्कृष्ट भागावरच तुम्ही चोखंदळपणे आपले लक्ष केंद्रित करा. तुम्ही आपल्या मनाचे पावित्र्य जर टिकविलेत तर जीवनही विशुद्ध राहील. निष्पाप मनाला सारे कसे निरागसच भासते. शिवाय मनाचें पावित्र्य, शरीरही निकोप राखते. आवडीनिवडी, इच्छा-आकांक्षा व संवयी-सवडी साध्यासुध्या राखल्याने जीवनही साधे, सरळमार्गी, सुटसुटीत बनते. अशा जीवनाला कसल्याही प्रकारच्या निराशेचा स्पर्शही होत नाही. ईश्वराच्या सत्यस्वरुपाचे नित्य मनन चिंतन चालू ठेवून जीवन नेकीचे बनवा. स्वतःच्याच सद्सद्विवेक बुद्धीच्या आज्ञेचें कदापि उल्लंघन करु नका.

APRIL 1

# योजनापूर्वक आंखणी

रात्री निद्रावश होण्यापूर्वी दुसऱ्या दिवशी पार पाडावयाच्या सर्व महत्वाच्या कार्यासंबंधी मनाशी निश्चित योजना ठरवा, ज्यावेळी तुमच्याजवळ अशा तऱ्हेची कार्याबाबत निश्चित व सुस्पष्ट रुपरेषा तयार असते व तदनुषंगानें कार्ये पार पाडण्याचा तुमचा मनाशी दृढनिश्चय असतो तेव्हा तुम्हांला तुलनात्मकरीत्या असे आढळेल की कमी वेळांत कमी शक्तिव्ययाने अधिक कार्यसिद्धी पदरांत पडलेली आहे. केलेली योजना, मनाची चलबिचल होऊं न देता, आंखणीबरहुकूम पार पाडणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. सर्व साधकबाधक गोष्टींचा तुम्ही साकल्यानें व बुद्धिपूर्वक विचार करुन, आपली योजना घडविलेली असल्यावर तिची अढळपणें कास धरली पाहिजे. आपल्या कार्याठायी दृढनिश्चय, खंबीरपणा, व अचल श्रद्धा असू द्या, म्हणजे प्रत्येक दिवशीं दृष्य ठाशीव कार्यनिष्पत्ति हाती लागेल लहान लहान कार्यांचे बिंदु एकत्र होऊनच मोठा कार्यसागर बनत असतो. कार्याकांक्षा मनांत दृढमूल झाली की कार्यसिद्धी लाभणारच असा दृढ विश्वास मनाशी अवश्य बाळगावा-

☆

APRIL 2

# राष्ट्रीय चैत्र १३

# पेरा इहलोकीं, उगवेल परलोकीं

कित्येक मी मी म्हणणारे शहाणे, कळून सवरून, जाणून बूजून ऐहिक सुखदौलत भोगण्यासाठी आत्म्याचा लिलांव मांडतात, शाश्वताची कास सोडून नश्वराचा ध्यास धरतात, आणि परलौकीक लाभाला मुकतात. इहवादी व्यक्तीचे जीवन फुलाप्रमाणे क्षणभंगुर अल्पकालीन ठरते. तरीही कित्येकजण आपली सारी शक्ती, संपूर्ण कर्तृत्व, समग्र सामर्थ्य, भौतिक मिळकत प्राप्त व्हावी एतदर्थ पणाला लावतात, अवघे जीवन त्यासाठी वेचतात. त्यांचे पारलौकीक कल्याण-साधनेकडे पूर्ण दुर्लक्ष होते. भगवंताने पार्थाला निक्षून दिलेली ताकीद ते दृष्टीआड होऊ देतात, ' मला स्मरून सारी कर्मे निष्कामपणे कर, जीवन कर्तव्य एकनिष्ठेने पार पाड, सारे काही मलाच अर्पण कर, ' ही भगवंताची आज्ञा झुगारतात, या ताकीदीची अवज्ञा करुन स्वार्थ-साधनेत तल्लीन होतात, त्यांचे समाजसेवेचे व्रत सुटते. तेव्हां वेळ टळून जाण्याआधीच सावध व्हा. तनमनधन वेंचून, ऐहिक भोगलाल-सेकडे पाठ फिरवून प्रत्येकाने दरिद्रनारायणाची भक्ति म्हणजे सेवा करावी, दीनदलितांना हात द्यावा, दुबळ्या पांगळ्याना मदत पोच-वावी. तेव्हांच भगवंत आपल्या अशा भक्तांचा उद्धार करतात. इह-लोकी राबून देह झिजवा आणि परलोकी परमसौख्याचे वाटेकरी होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्ति मिळवा.

⁂

# राष्ट्रीय चैत्र १४

## (गुड फ्रायडे)

# आवश्यक बाबींवर प्रमाणशीर कालव्यय

आपल्याला अतिशय जरुरीच्या व खास महत्वाच्या कोणत्या गोष्टी आज करावयाच्या आहेत हे प्रत्येक दिवशी सुरवातीलाच तुम्ही काळजीपूर्वक ठरवा. मग त्यांच्यावरच त्यादिवशी पूर्ण लक्ष ठेवा. ही सवय अंगवळणी पडल्यावर तुम्हांला मानसिक शांतता-समाधान दोन्ही अधिक लाभतील. दिवसाचा थोडा वेळच आपण प्रत्यक्ष काम असे करतो. केव्हां केव्हां एखाद्या दिवसासाठी आंखून ठेवलेले बेत तडीस जात नाहीत. यावर उपाय म्हणून बराचसा विचार करुन आपले बेत जास्त काळजीपूर्वक ठरवा. असे केल्याने दर दिवशी कांहीना कांही जास्त प्रमाणात, अधिकाधिक कामे आपण पार पाडीत चाललो आहे असे तुम्हाला आढळून येऊं लागेल. आपले आयुष्य किती महत्वाचे मोलाचे पण तितकेच तुटपुंजे नि तोकडे आहे याची मनाशी सदैव जाणीव बाळगा. आपल्या विचारांचा ओघ योग्य बाबीकडे वळविण्यास शिका म्हणजे कालव्यय सुयोग्यपणे होऊ शकेल शिवाय क्षुल्लक गोष्टीसंबंधीच्या चिंतेच्या अडोअडचणीच्या प्रदेशांतून त्या विचारप्रवाहाला वाट काढून देण्यात तुमचा वेळही वाया जाणार नाही. दिवसातील प्रमाणशील काल आवश्यक बाबीवर खर्च करण्याचे कसब तुम्हाला एकदा साधले कीं तुमच्या भावी जीवनचित्राची सुव्यवस्थित रुपरेषा ठरविण्यात तुम्हाला उत्तरोत्तर कल्पनातीत यश लाभत जाईल.

卐

**APRIL 4**

# राष्ट्रीय चैत्र १५

# सिंहावलोकन

आज चालू वर्षाचा अंतिम दिवस– आढावा घेण्याचा, ताळेबंद बघण्याचा, सिंहावलोकनाचा. वर्षारंभी काय काय योजले होते ते सर्व घडविण्याच्या दिशेने मध्ये किती पावले पडली, व आज अखेरीला केवढे यश पदरात पडले ह्याचा हिशोब पाहणे आज खूप उपयुक्त होईल. इच्छित उद्दिष्टे साधण्यासाठी आपण काय साधने वापरली, कोणत्या पद्धती अवलंबिल्या आणि अन्यान्य प्रसंगी यश-अपयश कसे, किती वाटचाला आले या बद्दल मनापासुन आज विचार करा. अशा प्रकारे गतकालावर दृष्टीक्षेप टाकला असता त्यावेळी यशप्रात्यर्थ आपल्याला जास्त योग्य असे निर्णय घेता आले असते, अधिक उदारमनस्कता दाखवायला हवी होती किंवा विशेष चाणाक्षपणा आपण का वापरू शकलो नाही असे वाटायला लावणारे प्रसंग आज तुमच्या दृष्टोत्पत्तीस येतील. म्हणजे मग एकीकडे झाल्या प्रगतीबद्दल कृतकृत्यतेची भावना मिळाल्या यशाबद्दल आनंदोर्मि हृदयांत प्रादुर्भूत झाल्या असतानाच दुसरीकडे कठोर आत्मपरीक्षणानंतर या वर्षानें तुम्हाला शिकविलेले धडे तुमच्या ध्यानात येतील. आता अधिक शहाणे बनून येते वर्ष स्वत:साठी व इतरांप्रीत्यर्थ, जास्त सुखाचे, सुयशाचे, समृद्धीचे बनविण्याची मनोमन प्रतिज्ञा करा.

*

**APRIL 5**

## राष्ट्रीय चैत्र १६

## (गुढी पाडवा)

# चारित्र्यदिन

गुढीपाडव्याचा शुभ प्रारंभ, स्पष्ट उद्दीष्टाच्या काठीवर दृढ निर्धाराचे रेशमी वस्त्र बांधून त्यावर परम श्रद्धेचा रौप्य गडू ठेवून नूतन सकल्पाची गुढी उभारुन करा. कुशल राष्ट्रसंघटक डॉ. हेडगेवार याना सादर प्रणाम. राष्ट्र हे आपले उपास्य दैवत ही त्यांची शिकवण. राष्ट्राची सेवा ही खरी उपासना. आपण आपले सारे कार्यव्यवहार शुद्ध ठेवले तर जनतेचा आपल्यावर विश्वास जडेल. शुद्ध चारित्र्याची आपल्या देशांत विशेष प्रतिष्ठा आहे. म्हणून ते निष्कलंक राखण्याचा आटापिटा करायला हवा, तरच प्रबळ होत चाललेल्या हुकुमशाही प्रवृत्तीला आळा घालता येईल. राष्ट्राची अस्मिता टिकविण्यासाठी समाज संघटीत करायला हवा. त्याची लांगूलचालनाची खोड मोडून टाकून त्याला स्वयंसिद्ध, आत्मविश्वासू स्वाभिमानी बनवायला हवा. विदेशी शक्ति राष्ट्रांत विघटना घडवून आणण्यासाठी उद्युक्त झाल्या आहेत. अशा या संकटकाळात समाजात एकीकरण घडवून नागरिकांत राष्ट्रीय वृत्ति जोपासली जाईल याची आपण खबरदारी घेऊ या. देशांत राष्ट्रीय एकात्मतेचे, परस्परस्नेहाचे निरोगी वातावरण कसे पसरेल याचा आपण सतत ध्यास बाळगूं या. राष्ट्रांत नवचैतन्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा आजच्या मंगल दिनी आपण प्रत्येकाने घेऊं या.

**APRIL 6**

# राष्ट्रीय चैत्र १७

# ईश्वरी न्यायनिवाडा

जरी तुमच्याबद्दल अन्यायामुळे चुकीचे गैरसमज पसरलेले असल्याचे तुम्हांला आढळून आले तरी तुम्ही स्वत: सचोटीची नेकीची कास सोडू नका. समाजाच्या हल्ल्यांना पुऱ्या पडतील अशाच या दोन्ही खंद्या वीरांगना आहेत. परमेश्वरी न्यायनिवाड्याच्या नांगराचा तुम्हांला भक्कम आधार असतांना तुमची जीवननौका गैरसमजांच्या वादळी तूफानांतही न डळमळता निभावून जाईल. प्रभूशी प्रतारणा न करता त्याच्या सृष्टीसंचालनाबद्दल सदैव कृतज्ञताबुद्धि मनांत बाळगा. अष्टौप्रहर पावलोपावली त्याचे स्मरण करा. जोपर्यंत तुमची परमेश्वरनिष्ठा अविचलित आहे तोपर्यंत लोकछळाने तुमचे काडीमात्र नुकसान होऊं शकत नाही. उलट आपल्या सहृदय न्यायप्रियतेने तो मत्स्यभगवान जगन्नियंता तुमचे मनोबल द्विगुणित करील, तुम्हांला भरपूर सहाय्य देईल, आणि तुमचा पाठपुरावा करुन तुमची बाजू उचलून धरील. त्याचे न्यायदान परिपूर्ण असते, सर्वसाक्षित्व अबाधित असते, कायदेकानू अपरिवर्तनीय असतात, त्याच्या निवाडेवजा आज्ञा स्पष्ट असतात. आज व रोज सत्यावलंबनाच्या ध्रुवताऱ्यावर नजर खिळवून तुम्ही आपल्या जीवननौकेच्या सुकाणूचे मत्स्यभगवानाचे स्मरण करीत संचालन करा. म्हणजे नियतीने तुमच्या नशिबांत योजलेले सारे साकार होऊन तुम्ही कुशल नावाडी असल्याचे सिद्ध होईल.

**APRIL 7**

## राष्ट्रीय चैत्र १८

## (चैत्र शु. ३, गौरी तृतीया)

# नियंत्रण मनोव्यापारांवर

नव्या चांगल्या संवयी जडवून घेतल्याने कार्यांची नवी क्षितिजे दृग्गोचर होऊं शकतात. तशा कित्येक संवयी तुमच्या नकळत बभ्रा न होता तुम्हाला लागत असतातच. त्यांच्याबरच तर तुम्हाला लाभावयाचे यश व सौख्य अवलंबून असतात. तेव्हा आपल्या विचारांना भरकटू जाऊ देऊन पातळीच्या खाली न घसरु देता, त्यांनी आपल्या अंगी सुयोग्य संवयी बाणवाव्या व आपल्याला रास्त जीवनमार्गावर ठेवावे, एतदर्थ जागरुकतेने दक्ष रहा. धैर्य, श्रद्धा, शालीनता, निष्ठा, संयम व सचोटी या सद्‌गुणांचे मोल जाणून ते आपल्या अंगी, इतरांसाठी वापरता यावे म्हणून उतरवा. त्यांच्यामुळे तुमच्या दैनंदिन जीवनव्यवहाराना जास्त बळ लाभेल. महान साध्यांसाठी तुमची मानसिक शक्तिसामर्थ्ये मोठ्या प्रमाणांत वापरा. आदर्शपणे जीवन यापन केल्याने साधेपणा, शांति, समतोल, आत्मविश्वास, समाधान यांची मनी निपज होते. जे काही तुम्ही योजता, ज्याच्यासाठी प्रयत्नशील राहता आणि जे शेवटी साध्य करता, त्या सगळ्याची कारकशक्ति म्हणजे तुमचे विचार. आणि ते उद्भवतात मनात. तेव्हा मनोव्यापारांवर नियंत्रण ठेवून तुमच्या मनोराज्यांत सर्वत्र आबादी आबाद आहे की नाही यावर कडक नजर असू द्या.

**APRIL 8**

## राष्ट्रीय चैत्र १९

# त्रीणि अद्वितीयानि

कल्याण हे सर्वसमावेशक आहे. ते अमक्याला नाही हे संभवत नाही. तुम्हां आम्हां सगळ्यांचेच ते असते. त्याचप्रमाणे ते कोणा एकालाच बळकावितांही येत नाही. त्याला मर्यादा घालता येत नाही कां त्याला दुबळे बनविता येत नाही. असे हे कल्याण स्वयंभू आहे. शिव हे अनंत असल्यामुळे संपविता येत नाही किंवा त्याला वाढविताही येत नाही. शिव ही देवाने दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी आहे. शिवाच्या प्रभावानेंच तुमच्या मनांत प्रेम, आपुलकी, जिव्हाळा यांचा उदय होतो. स्वत: भगवंतच शिवस्वरुप आहेत. म्हणून सारे शिव भगवंतजन्य आहे. शिवाचा उल्लेख म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचाच नामजप असतो. पुण्य हा चिंता, धास्ती, निराशा, क्रोध, मोह, या साऱ्या विषांवर अमोघ उतारा आहे. पापी दुष्ट विचारांची हकालपट्टी करुन पुण्यवंत विचारांचे स्वागत करा. पुण्यकर्म हे काही केवळ वेचकच प्रसंगी करावयाचे नसते. पुण्याचा प्रयोग फक्त निवडक निमित्तांसाठीच असत नाही. ती सदासर्वकाळ वापरता येण्याजोगी सदा उपलब्ध अशी महत शक्ति आहे. तेव्हां ‘ कल्याणम् ’, ‘ शिवम् ’ , ‘ पुण्यम् ’ , या तीन अद्वितीय वस्तूंशी घनिष्ठ सख्यसंबंध जोडा. अशाने तुमचे प्रत्यक्ष परमेश्वराशीच नाते जुळेल; आणि ‘ पापम् ’ च्या कचाट्यांतून सोडवणूक होईल. इतरांचे कल्याण ’ साधल्याने स्वतःच्या पापाचे शमन ोते. दुसऱ्यांचे ‘¦ शव ’ चिंतल्यानेही पापशमन साधते. हातून नकळत घडलेल्या पापाचेंही शमन घडले पाहिजे.

– ० –

**APRIL 9**

## राष्ट्रीय चैत्र २०

## (चैत्र शु. ५, श्रीआनंदमूर्ती पुण्यतिथि)

# वरदहस्त परमेश्वराचा

तुमच्याठायी वसणारे संतोष-समाधान देवाची देणगी आहेत. ते तुमचे स्वतःचे कसब नव्हे. तुम्ही करीत असलेल्या प्रत्येक कृतीची प्रेरणा ही देवानेच तुमच्या मनांत उत्पन्न केलेली असते. तेंही तुमचे स्वतःचे कर्तृत्व नसते. भगवंतांनी अर्जुनाला अकराव्या अध्यायांत सांगितले, ' हे सव्यसाचिन प्रत्यक्ष कार्ये मीच उरकलेली असतात. तू फक्त दर्शनी निमित्त व्हायचे आहेस. तेव्हां स्वतःची अक्कल न पाजळता भगवंताच्या इच्छेप्रमाणे चाला. भगवंत सर्वव्यापी आहेत. त्यामुळे तुम्हांला त्यांचे सतत साहचर्य लाभलेले असते.' सर्वांशी सदा मित्रत्वाच्या भावनेने, करुणा बुद्धीने वागा. ममत्वहीन निरहंकारी वृत्तीने जीवन व्यवहार चालवा. व समदुःख-सुखक्षमी बना, असे त्यांनी बाराव्या अध्यायांत उपदेशिले आहे. पुढे कुमारिलभट्टाने या उपदेशावर भाष्य करताना कर्ममार्गावर जोर देऊन धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारी पुरुषार्थांचा समान प्रमाणांत अवलंब व्हावा असे निक्षून सांगितले. त्याची ही व्यवहार्य मसलत आजच्या जमान्यांतही पूर्ण पणे लागू पडणारी असल्याने शिरोधार्य मानायला हवी. तेव्हां भगवंतांचा वरदहस्त आपल्या शिरावर कायमचा आहे या विश्वासाने प्रत्येक कार्यांत धडाडीने उडी घ्या. तुम्हांला मुळीच नामोहरम व्हावे लागणार नाही.

# राष्ट्रीय चैत्र २१

# आरोग्यदायी सद्विचार

उचित विचारसरणी आणि तदनुषंगिक सुयोग्य संवयी यांच्यावर प्रामुख्याने प्रत्येकाची प्रकृति निरोगी राहणे, अवलंबून असते. जितक्या दक्षतेने अगदी डोळ्यांत तेल घालून आपण आपल्या घराचे चोर दरवडेखोरापासून संरक्षण करतो तितक्याच आस्थेने विध्वंसक गैरविचारांपासून आपल्या मनाचे रक्षण केले पाहिजे. तुम्ही आपल्या विचारतारुचें सुकाणु नीट निपुणतेने संभाळू शकता आहा असे सिद्ध झाले कीं एका अदृष्य उपकारक शक्तीचे सहकार्याचे वारे सुटून तुम्हाला मदत मिळू लागते. तब्येत उत्तम राहावयास तुम्ही स्वतः सुस्वभावी असायला हवे. आणि सुस्वभाव हा तर हृदयाचा सहजधर्म आहे. समतोल विचारधारा शरीराला सबल करते, चेतना देते, सुदृढ बनविते. समाधान, पवित्र वृत्ती आणि सचोटी ही उत्तम आरोग्याची प्रधान पायाभूत तत्वे होत. सदाचाराचे फळ तात्काळ निश्चित व समाधानकारक असेच असते. सत्य, स्वमान व न्याय या तत्वांची कास कधीही सोडू नका. निरोगी व आदर्श जीवन घडविणारी, निपजविणारी महान शक्ति आहे एकच. ती म्हणजे सत्प्रवृत्त विचार सरणी. तिचा अवलंब केल्याने आपण व्याधींच्या कचाटयांत सांपडणार नाही.

卐

APRIL 11

# राष्ट्रीय चैत्र २२

# वागणुकीबाबत विनंति

भोवतालच्या आधीच्या मंडळींना पदोपदी लागलेल्या ठेचांपासून, नंतरचे तुम्ही स्वत मोलाचे शहाणपण पदरी पाडू शकता सध्या सर्वत्र अहंविशेषता, मत्सर, हेवा, चिडखोरपणा, संकुचितता, गर्व, उद्धटपणा, पूर्वग्रहदूषितता व 'हम करे सो कायदा' प्रवृत्ति बोकाळलेली आहेत. वागणुकीची ही विपर्यस्त ढब आहे. ही सव घातक विध्वंसक प्रवृत्ति लक्षणे होत. त्यांच्यामुळे अनिष्ट परिणाम घडतात, अराजक माजते. तेव्हां हे सारे दुर्गुण तुमच्या वागणुकीत, स्वभावात शिरकाव करुन घेणार नाहीत आणि एक अवांच्छनीय ढब टळेल. याबद्दल तुम्ही विशेष जागरुक रहा. कांही खास पथ्ये पाळा. आवश्यक ते उपाय योजा. उच्च विचारसरणी व आदर्श वागणूक तुमच्याठायी जसजशी विकसत जातील, वागणुकीची ढब सुधारत जाईल, तसतसे तुम्ही सर्वसामान्य गैरसमजुती, स्वभावातल्या खोडया-नावडी, विसंवाद-मतभेद यांच्यावर मात करीत जाल. आपलेंच कसे बरोबर आहे, आपण किती न्यायाने समजुतीने वागत आहो हे इतरांच्या नजरेस आणून देण्याचा अट्टाहास करण्याच्या खटाटोपांत तुम्ही कधी न पडावे हे बरे. त्यापेक्षा तुमच्या कृति, तुमचे जीवन, ह्यांचाच इतरांवर छाप-प्रभाव पडू द्या. तुमची योग्यता सर्वांच्या नजरेस आपसुक येऊ द्या. इतरांच्या दोष उणीवांबद्दल त्यांची निर्भत्सना करण्याची घाई केव्हांही करुं नका उलट त्यांवर पांघरुण घालून उदार मनाने व क्षमाशील वृत्तीने त्यांना सावरुन घ्या, त्यांना सुधारण्याची संधि द्या. वागणुकीत अशी उदारमनस्क, क्षमाशील, सहानुभुतिमय ढब भिनली कीं जीवन सफल होईलच.

\+ + +

## APRIL 12

# राष्ट्रीय चैत्र २३

# पराक्रमी प्रेमभाव

सुखस्वास्थ्यसंपादनाची गुरुकिल्ली मी आहे. जवानीतला जोम मीच आणि वृद्धावस्थेतले सांत्वन पण मीच. मी सदाविद्यमान अजेय आणि शाश्वत असतो. गुन्हेगारी, दारिद्र्य, क्रौर्य व भय या सर्व विषांवरचा मी एकमेव उतारा आहे. जुलुमजबरदस्ती रोगराई व भयनिराशा यावर मी विजय मिळवून देतो. पापाचरण द्वेष व अन्याय यांचे मी निर्मूलन करतो. सत्यव्रतीपणा, नेकी व सचोटी यांच्या हातात हात घालून मी वावरतो. जगांतील न्यूनता, शत्रुत्व व दुःखशोक यांच्यावरचा रामबाण उपायही मीच. मंदिरे, समाध्या व स्मारके मीच उभारतो. कवि, उपदेशक व भविष्यवादी यांना मी मार्गदर्शन करतो. उदात्त संगीत, नजरवेधी चित्रे आणि भव्य वास्तु मीच निर्माण करवूं शकतो. श्रद्धा, निष्ठा, दया, करुणा, दानशूरता यांचा मी सदातत्पर सेवक होय. परमेश्वरी कायदेकानूंची अंमलबजावणी माझ्यामुळेच साधते. जगांत कोणीच माझ्या तोडीस उभे राहूं धजत नाही. ओळखलेत मला? मी आहे सर्वसत्ताधीश, सर्वगामी, सर्वसाक्षी प्रेमभाव. मला स्वतःत सामावून घ्या, माझा अवलंब करा, माझा व्यवहार करा आणि मग पहा माझी करामत.

★

APRIL 13

# राष्ट्रीय चैत्र २४

## (चैत्र शु. ९, राम नवमी)

# खरा राम जीवनांत तरच, जर-

खरा राम जीवनांत तरच वाटणार जर तुमचे रोजच्या रोज आत्मिक बल वाढत गेले आणि मनोवांच्छिते साध्य होत चालली. खरा राम जीवनांत तरच असतो जर तुम्ही स्वभावाच्या उमदेपणांत आणि माधुर्यात नित्यशः भर घालू शकत असलात. खरा राम जीवनात तेव्हाच येतो जेव्हा तुम्ही दर दिनी इतरांच्या यथाशक्ति उपयोगी पडत जाता. खरा राम जीवनात तिथेच आढळतो जिथे तुम्ही प्रत्येक जबाबदारीला, उपकृततेला, प्रसंगाला विश्वासाने व अचल श्रद्धेने पुरे पडता. जीवनांत खरा राम तेव्हाच जाणवतो जेव्हा नेकी व सचोटीच्या दिशेने तुमचे पाऊल नेमके पुढेच पडते. जीवनांत खरा राम, विद्यमान पापशोक दैन्यमय दुनियेतही, तरतरी, तजेला, ताठरपणा धारण करुन वावरु शकणाऱ्यालाच गवसतो. परमेश्वराशी तुमची काही जास्त जवळीक होत चालली आहे, ' पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा, ' या भावनेमूळे तुम्ही सारा भार पूर्ण श्रध्देने उत्तरोत्तर त्याच्यावर ठेवीत चालला आहात, आणि त्याचे मार्गदर्शन व संरक्षण याची शाश्वत हमी तुम्हाला लाभली आहे अशाबद्दलची काही विराट जाणीव जर तुमच्या हृदयात प्रत्यही वृध्दिगत होत गेली तरच मग आहे म्हणावयाचा खरा राम जीवनांत तुमच्या.

## APRIL 14

# घातकी क्रोध

क्रोधांत विवेकाला स्थान नसते, मन चिडलेले असते. अशा स्थितींत चुकूनही पत्र लिहू नका. समजा, उफाळून वर आलेल्या क्रोधाला वाट देण्यासाठी किंवा आपला सात्त्विक संताप व्यक्त व्हावा एतदर्थ तुम्ही त्या भरांत पत्र लिहिलेतच तरी ते निदान चोवीस तास पोस्टांत न टाकता स्वतःपाशीच ठेवा. झाल्या हकीकतीवर एवढ्या अवधींत शांतपणे मनन होऊ शकेल आणि मग तो मजकूर तुम्हांलाच अयोग्य वाटेल, तुम्ही ते पत्र फाडूनही टाकाल. कांही झाले तरी क्रोध येणे हा एक प्रकारच्या कमकुवतपणाचाच परिणाम असतो. आणि क्रोधवश स्थितीत लिहिलेले पत्र म्हणजे स्वतःच्या अशक्तपणाची दिलेली लेखी कबूलीच, तुमच्या विरुद्ध तुम्हीच निर्माण करुन ठेवलेली कायमची साक्ष. म्हणून असे चिडून रागावून एकही पत्र कधीही लिहू नका म्हणजे तसले पत्र लिहून टाकले गेल्यावर तें दुसऱ्यांच्या हातांत राहणार म्हणून पश्चात्ताप करण्याची पाळी तुमच्यावर कधीही ओढवणार नाही. तसेच राग उसळलेला असताना कांहीही न बोलण्याचेही पथ्य अवश्य पाळा उडवलेला पतंग दोरी हातांत असेपर्यंत केव्हांही परत मागे घेता येतो. पण रागांत उच्चारलेला शब्द म्हणजे दोरा तुटलेला पतंग. तो भरकटतच जाणार. म्हणून आधी खूप विचार करा, मग थोडकेसेच बोला.

**APRIL 15**

# राष्ट्रीय चैत्र २६

# व्यवहारी सल्ला

काम करताना उत्साह पुरेसा असावा, उत्सुकता जागृत हवी, वृत्ती उल्लासी व चेहेरा हंसतमुख असावा, मन परमतसहिष्णु असावे. सुवर्णमध्य साधणें हें जीवनाचे सूत्र व्हावे. दिवसाकाठी कांही वेळ मनोरंजनांत घालवावा. आवर्जून विवक्षित वेळा दीर्घ श्वसन चालवावे. कामाची करण्याची तऱ्हा व्यवस्थापूर्ण पध्दतशीर अशी असावी. इतरांना रास्त मार्गावर नेण्याचा, व जग सुधारण्याचा अट्टाहास न करावा. आपल्या आदर्शाने इतरांच्या जीवनावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न असावा. दिवसासाठी निश्चित व आंखलेला असा कार्यक्रम असावा. पावलांबोटांनी उगीचच ताल धरणें, डुलत राहणें, घसा खांकरणे, या सारख्या व्यर्थ व उपद्रवी संवयी टाळाव्या. मनांत सदा विशुद्ध उत्साहवर्धक विधायक विचार चालवावेत. अनपेक्षित व त्रासदायक घटनांना तोंड देण्याची कायम तयारी ठेवावी. निर्भयपणा दाखवितांना उद्दामपणें उर्मटपणें वागू नये. योग्य चीज न झालें, न्याय्य कौतुक वाटणीला न आलें, तरी उमेद सोडून खचून जाऊं नये. अन्यायाचें पारिपत्य करण्यासाठीसुद्धा दुष्टपणानें वागू नये. पैशाचा हव्यास सर्व दु.खाचे मूळ. तो धरुं नये. अखंडित निर्भेळ सुखाची हाव नसावी. मधून मधून दुःख भोगण्यास सिद्ध असावे. जिभेला बेलगाम न सोडावे. एकंदरीने सर्व वळण हितकारी असावे म्हणजे तुमच्या हातून प्रयत्नाविना सत्कृत्येंच घडतील. कारण त्यासाठी आवश्यक तें सामर्थ्य तुमच्यांतच विद्यमान आहे.

**APRIL 16**

## राष्ट्रीय चैत्र २७

# आपले कल्याण आपल्याच हाती

प्राप्त परिस्थितीतले व भविष्य काळातलेही स्वतःचे कल्याण साधून घेणे बव्हंशी तुमच्या स्वतःच्या हातींच आहे. अन्य कोणी मदतीचा हात देईल अशी आशा ठेवू नका. तुमच्यासाठी इतर मंडळी स्वतःचे वजन खर्च करतील आणि त्यामुळे तुमचे जीवन सुधारेल वा तुमच्याहातून अधिक जास्त काही पार पडेल असे मुळीच मानू नका जीवन यशस्वी होण्यासाठीं लागणाऱ्या सर्व बाबी– कर्तृत्व, हुशारी, कल्पकता, हिंमत, शक्तीभांडार तुमच्या अंगीच वसत आहेत हे लक्षात घ्या. तुमच्यातला जोम हा देवदत्त असला तरी आता तो तुमचा स्वतःचाच झालेला आहे आणि म्हणून त्याचा ठाव काढून त्याची जोपासना करुन त्याचा भरपूर वापर करणे फार अगत्याचे आहे. स्वतःजवळ विविध तऱ्हेची किती कसबे आहेत हे महत्वाचे नसून तुम्हाला लाभलेली अक्कलहुशारी, कल्पकता, तुम्ही कितपत सत्कारणी लावता यावर विशेष भर द्यायला हवा. ही चेतनादायी कल्पकता तुमचे मनोबल वाढवील, तुमचे दैनंदिन जीवन हेतुपूर्ण बनवील आणि अंततोगत्वा या जगात स्वतःला साजेसे स्थान प्राप्त करण्यात ती तुम्हाला मार्गदर्शन करील, सहाय्य देईल.

☆

APRIL 17

## राष्ट्रीय चैत्र २८

# पूर्वग्रहरहित तारतम्यशक्ति

पूर्वग्रहांनी पछाडले न जाण्याचा आटोकाट प्रयत्न करा. पूर्वग्रहांच्या आहारी जाताच सत्य व ज्ञान यांचे दरवाजे बंद होतात. मानसिक विकास व आत्मबलसंवर्धन यांना लागणारी ती एक अदृश्य पोखरती कीड आहे, पूर्वग्रहदूषित व्यक्तिची मते साहजिकपणेच अन्याय्य व बिनबुडाची असतात. आपले विचार व कल्पना शुद्ध व स्पष्ट करुन घेण्यासाठी, आणि आपल्या निर्णयांची योग्यायोग्यता पडताळून पाहण्यासाठी आपल्या विचारांना, निर्णयांना दुसऱ्यांच्या मतांच्या कलांच्या संपर्कात संघर्षात येऊं दिले पाहिजे. स्वतः दत्तगुरुंनी मुंगीपासून हत्तीपर्यंतच्या अन्यान्य चोविसांना आपले गुरु मानले होते, हे ध्यानी आणून, भेटणाऱ्या प्रत्येकापासून काहीना काही शिकायला मिळेल असे मानणे खूपच हितावह असते. इतरांच्यातले दोष, दुर्गुण, यांची कुसळे शोधण्यापेक्षा स्वतःच्या वर्तनातील, स्वभावातील विसंगतीची मुसळे आधी पहाणे जास्त उपयुक्त ठरेल. सभोवतालच्याना सुधारण्याची उठाठेव करण्याआधी स्वतःला निर्दोष बनविण्याची खटपट करणे जास्त महत्वाचे मानावे. लाभले आहे तेच सुख असे मानणाऱ्याला समाधानप्राप्ति साधते, जमते. नेकी व न्याय यांना परखणारी तारतम्यशक्ति म्हणजेच बुद्धिमत्ता, विद्वत्ता, शहाणपणा. तेव्हा हे शहाणपण मिळवण्यासाठी कायावाचामन एक समस्यावच्छेदेकरुन वेचत रहा.

**APRIL 18**

## राष्ट्रीय चैत्र २९

# सत्यप्राप्ति परिशीलनांती

सत्याची प्रांजळपणे आस धरली तरच त्याचे इंद्रियगोचर असे आकलन होण्याची शक्यता असते. सत्य सर्वस्वाने आपलेसे होण्यासाठी सत्याची समज यायला हवी, व जीवनांत ते वापरता येण्याजोगे असायला हवे. विचार चुकीच्या दिशेने वाहूं लागले की जगांत पाप, विनाश, साथी, रोगराई, दुर्दैव, अपयश यांचे फावते हे तुम्हांला जेव्हा पटते तेव्हाच सत्याचे खरे मोल व योग्य महत्ता तुम्हाला नीटपणे जाणवून येते. सत्याची सतत कास धरता येण्यासाठी त्याचे सखोल अध्ययन व सांगोपांग परिशीलन केले तरच ते नीट हातांत गवसून त्याला आपल्या अंकित ठेवता येते. जगद्वंद्य सर्वश्रेष्ठ संशोधक आल्बर्ट आईन्स्टीनने एक थोर वैश्विक सत्य अशाच प्रकारच्या अध्ययन-चिंतनांती शोधून काढून त्यावर प्रभुत्व मिळवून ते जगापुढे ठेवले. त्याने ते अर्थात् फक्त सिध्दान्तस्वरुपातच मांडले. अशाप्रकारे केवळ सिध्दान्त-अवस्थेतले सत्य सर्वांना पुरेसे अर्थपूर्ण वाटणे कठीण पडते. सत्य तसे वाटायला ते दैनंदिन जीवनांत एक व्यवहार्य व वैयक्तिक महत्वाची शक्ति ठरते हे अनुभवास यायला हवे. सत्याच्या मूलभूत स्वरुपाचे सखोल अध्ययन साधल्याने होणारे अननुभूत समाधान आणि मिळणारा शाश्वत लाभ दोन्ही केवळ अपूर्व असतात. कोणत्याही प्रकारच्या ऐहिक मालमत्तेहून सत्य हे अधिक मूल्यवान्, जास्त अर्थवाही व विशेष लाभदायक ठरते. कारण ते चिरशाश्वत, सनातन, अनाद्यनंत असे असते.

**(आईन्स्टीन पुण्यतिथि)**

**APRIL 19**

## राष्ट्रीय चैत्र ३०

## (चैत्र शु. १५, हनुमान जयंति)

# निखालस आज्ञाधारकता

जो आज्ञा पाळूं शकतो त्यालाच हुकूम चालविता येईल. आज आज्ञाधारकता अंगी असण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आजच्या स्वतंत्र संमृद्ध, पुढारलेल्या राष्ट्रांत लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य प्रस्थापित असताही तेथील नागरिकांच्या रोमारोमांत आज्ञाधारकता भिनलेली आहे. इथें आपण मात्र अहंगडाने पछाडलो आहोत. धडाडी, धैर्य, धाडस यांच्या जोडीनेच कार्यसिद्धचर्थ आज्ञाधारकतेचीही तितकीच गरज असते. त्याविना राष्ट्राचा, नव्हे व्यक्तीचाही विकास खुंटतो आपल्यांत आज्ञापालनाची वृत्ति फार फार कमी आहे. प्रत्येकाला नेता, पुढारी, अग्रणी बनायचे आहे. पण मग अनुयायी कोण? 'महाबली, वज्रपुच्छ' मारुतिरायांनी याबाबत आदर्श कित्ता घालून दिलेला आहे. रामप्रभूंचे ते निःसीम उपासक, दास, अनुयायी होते. त्यांची आज्ञा निखालसपणे शिरोधार्य मानली त्यांनी. 'ब्रह्मांडाभोवते वेढे' घालण्याचे सामर्थ्य असूनही या कपिने 'राम'दास म्हणून वागण्यांत धन्यता मानली. या आज्ञाधारकतेमुळेच ते बलभीम, चिरंजीव, राष्ट्रवीर मानले गेले. आज आज्ञा उत्तम प्रकारे पाळून दाखवा तरच उद्या तुम्हांलाही आज्ञा देण्याची, जबाबदारी पेलता येईल. अर्थात् आज्ञाधारकता म्हणजे केवळ सांगकामेपणा नव्हे. आज्ञापालन करताना स्वकर्तृत्वावरील विश्वास गमविण्याचे मुळीच कारण नाही. तेंव्हां सांगितले काम कुरकुरीविना पार पाडीत जाऊन आज्ञाधारकतेची जोपासना करा.

卐

**APRIL 20**

# राष्ट्रीय वैशाख 9

## (चैत्र व. १, शिवछत्रपती पुण्यतिथि)

# स्वयोग्यता जाणा

स्वतःच्या व्यक्तिगत मोठेपणाची व योग्यतेची पुरेशी जाणीव मनांत सतत वागविणें हें तुमचे परमश्रेष्ठ कर्तव्य होय. विशेष प्रभाव पाडण्यासाठी व सुयश प्राप्त करण्याकरता स्वतःचा आत्माभिमान व आत्मसम्मान जागृत ठेवणे ही अत्याअवश्यक बाब ठरते. शिवाजीला सरत्या बालवयातच ही जाणीव होऊं शकली. भोवती मोगलांच्या समोर 'जी हुजूर' करण्याचे वातावरण, पण ते भेदू शकणारी स्वातंत्र्योर्मि त्यांच्या हृदयात प्रगटली. प्रखर आत्माभिमानाच्या जागृत जाणीवेमुळे त्यांनी स्वराज्यस्थापनेचे कंकण हाती बांधले. राज्यसंस्थापक बनण्याची स्वयोग्यता ते जाणू शकले. व म्हणून महाराष्ट्र म्लेंछमय होण्याचे टळले. जगात स्वतःयोग्य असे स्थान प्राप्त होण्यासाठो प्रत्येकाने, अहमन्यतेचा शिक्का पडण्याचा धोका पत्करुनही, आत्मभिमानाची जाणीव पूर्वक जोपासना केल्याशिवाय भागणार नाही. आतमादर, स्वावलंबन हे गुण तुमच्या अंगी जसजसे विकसित होत जातील तसतसा, आपण आपले, जीवन उत्तरोत्तर जास्त चरितार्थतेने जगू लागलो आहोत, याचा अनुभव हळूहळू वाढीस लागेल. आपल्याला लाभलेल्या व्यक्तिगत गुणवत्तेच्या देणगीचे जसजसे तुम्हाला आकलन होत जाईल तसतशी दैवी योजनेप्रमाणे संभव होऊं शकणारे असे आदर्श जीवन जगण्याची इच्छा, तुमच्या मनांत उत्तरोत्तर आधिकाधिक प्रबळ होत जाईल.

**APRIL 21**

# आशावादाची कास धरा

विधायक दृष्टिकोनांतून व आशावादी वृत्तीने तुमची विचारसरणी चालायला हवी जर कुठे काही विघडते आहे असे भासू लागले तुम्हांला, तर लगेच मोकळ्या जागेत एखादी चक्कर टाका, दीर्घ-श्वसन सुरु करा आणि मनांत आकांक्षा, समृद्धि, सामर्थ्य अशासारख्या उत्तेजक प्रेरक विषयांवर चिंतन करा. हसतमुख, खेळकर मंडळींत जाऊन मिसळा, पराक्रमावद्दलची प्रेरणादायी पुस्तके वाचा. जीवनांत उत्कृष्ट व सर्वोच्च अशा बाबींवर लक्ष केंद्रित ठेवा. स्वत: एक चाणाक्ष आशावादी बनण्याचा निर्धार करा. आरोग्य, आनंद, अभिवृद्धि या प्रामुख्याने मानसिक वृत्ति आहेत. कायम सुयोग्य अशा विषयांचे वैचारिक चिंतन चालविल्याने जीवनांत अततोगत्वा इष्ट परिस्थिति निर्माण होऊ शकते. योग्य विचार प्रवाहांचा उगम होतो परमेश्वराच्याच पायाशी. आवश्यक व इष्ट अशा मार्गदर्शनासाठी त्या प्रभुपायीं नजर खिळवून ठेवा आणि बघा मग ध्येयसाधनेची वाट तुम्हांला दृग्गोचर होऊं लागते कीं नाही ते. ती दिसल्यावर मग विलंब कशाला करावयाचा? होऊं द्या सुरु तुमची वाटचाल याच क्षणी. जगन्नियंता तुमची पाठराखण करील याबद्दल खात्री बाळगा. प्रगतिमार्गावर पाऊल टाकण्यास आताचाच मुहुर्त उत्तम आहे.

* * *

**APRIL 22**

## राष्ट्रीय वैशाख ३

# मनोद्यानाची मशागत

जेव्हा आपल्याला आपला बगीचा उत्कृष्ट अवस्थेत राखावयाचा असतो तेव्हा आपण सर्वत्र वावरून दृष्टोत्पत्तीस येणारी तणें, रानझुडुपे, फालतू उगवण या साऱ्या अनावश्यक प्रकारांना मुळापासून उपटून टाकतो, पालापाचोळा झाडून काढून गोळा करुन फेकून देतो. असे जर कोणी म्हणत बसेल की या साऱ्या रानाची वाढ कशी, कशातून व कशासाठी होते, त्यात प्रकार किती आहेत, नावे काय आहेत यांची आधी पुस्तकांतून सांगोपांग माहिती मिळवीन व मग निर्मुलनाचे काम हाती घेईन तर तो ठरेल अतिसावधपणा, अति शहाणपणा. ह्यात अशा सैद्धान्तिक अध्ययनाची काडीमात्र गरज नाही. कंबर मोडून सारे रान उपटून काढून फेकून देण्याच्या प्रत्यक्ष कामाला हात घालायला हवा. बगीचा झपाटयाने रानमुक्त करणे तातडीचे. तसेच आहे मनोद्यानाच्या मशागतीचे, मनोद्यान जर देखणे बनवायचे असेल तर अवगुणतणे उपटली पाहिजेत. अहंता मत्सर अविवेक धास्ती अशी रानझुडपे उखडली पाहिजेत, तिरस्कार स्वार्थ वगैरे फालतू उगवणीची विल्हेवाट लावली पाहिजे. हे सारे आटोपल्यावर मग काळजीपूर्वक चोखंदळपणे दयाभाव परोपकार वृत्ती प्रेम पावित्र्य विनय शालीनता आदर सचोटी अशा निवडक रोपांची सद्वर्तनाचे खतपाणी देऊन जोपासना चालवली पाहिजे. अशा प्रकारे घाम गाळीत नित्य राबलात तर तुमचे मनोद्यान बहरेल, सुगंधाने दरवळेल. आणि त्यामुळे तुमचे जीवन उल्हासमय बनेल.

☆

# राष्ट्रीय वैशाख ४

# मनोनियंत्रण

मनुष्य निसर्गत: वास्तविक एक द्रष्टा असतो पण, ऐहिकाच्यांतच फक्त, गुंतलेल्या माणसाला सगळचाचे केवळ बाह्य स्वरुपच आकलन होते. उलट आध्यात्मिक वृत्तीच्या माणसाला मात्र त्याचे अंतरंग दर्शन मार्मिकपणे घडते, संभ्रमांत पडलेल्याला मात्र हे दुराप्रास्त. मनाचा हा संभ्रम ही फसवणुक नष्ट करण्याचा मार्ग तसा साधासुधा आहे. मनोनियंत्रण करण्यात पुष्कळांना अनेकदा अपयश येते, कारण ते खोलात शिरुन मनाची व्यापारपद्धति समजून घेत नाहीत. एकदम मनाचे विचार-विकार ते थांबवायला बघतात. त्यामुळे मन उलट अधिकच बेलगाम सुटते. मनाला घिसाडघाईने दडपण्याचा अट्टाहास निरर्थक. मनांत, कोणते विचार उद्भवतात, विकार बळावतात, यांचे आधी बारकाईने निरिक्षण-अध्ययन करावें लागते. तेही तटस्थपणें, त्रयस्तवृत्तीनें करता यायला हवे. मग क्रमाक्रमानें मनाला चुचकारीत, गोंजारीत, त्याची झालेली फसवणुक उलगडून दाखवीत, हळूहळू अध्यात्मीक विचारांकडे वळविता येऊं शकेल तरच व्यक्ति वर्णीय, जातीय, भौगोलिक संकुचितपणांतून मुक्त होईल. अशातऱ्हेने मन ' अहंतेच्या ' बंधनांतून मुक्त झाल्यावर मायेच्या फसवणुकींतून सुटल्यावर मग जीवात्मा पुढेमागे विश्वात्म्याशी एकरुप होऊं शकतो. " परमपूजनीय माताजी पाँडीचेरीतील अरविंदाश्रमांत अशा स्वरुपाची, धाटणीची, निरुपणे सर्वांसमोर सांगत. १९१४ साली एप्रीलच्या २४ तारखेलाच वयाच्या ३६ व्या वर्षी त्या भारतात स्थाईक झाल्या. त्यांना आज नम्र वंदन.

卐

**APRIL 24**

# घ्या जास्त, द्या कमी

दुसऱ्यांना उपदेश करणे फार सोपें असते. पण त्यानुसार स्वत: आचरण ठेवणे मात्र खूपच कठीण असते. जीवनाला सुयोग्य वळण कसे लावावे यासंबंधी इतराना भरीव सल्ला द्यावा, जीवनांत कसें वागणे उपकारक ठरते व काय करणें अपकारक होते याबाबतींत दुसऱ्याना उपदेश करावा असा सर्वांचा नैसर्गीक कल असतो. वास्तवीकपणें त्यांची खरी गरज स्वत:लाच असते. सल्ला इतरांचा मिळवावा, मार्गदर्शन इतरांकडून घ्यावे हे जास्त बरे. दुसऱ्यांवर छाप पाडण्यासाठी मोठेपणाचा आव आणून स्वतःची टिमकी बडवीत लोकांनी कसे वागावे याचा उपदेश करण्यात कालाचा अपव्यय करण्यापेक्षां तो सर्व काळ, आत्मपरीक्षण आत्मसुधार व आत्मनियमन साधण्यासाठी, वापरणे वेचणे हे कितीतरी पटीने जास्त हितावह होय. आपणा सर्वांचाच क्रमश: विकास होत असतो. दुसऱ्याना करावासा वाटणारा उपदेश प्रथम आपल्या अंगी बाणवून तदनुसार स्वतःची वर्तणुक ठेवणे अतिशय अगत्याचे आहे. जग सुधारण्याची सुरसुरी येऊ लागली कीं प्रथम तो आदर्श स्वत:-च्याच उदाहरणाने इतरांपुढे ठेवावा. सर्वांना बोधामृत पाजीत राहण्यापेक्षा वा इतरांना ताकीद देत सुटण्यापेक्षां स्वत: तसा कित्ता घालून देणे केव्हांही जास्त परिणामकारक ठरत असते.

●

## राष्ट्रीय वैशाख ६

# निराशेचे सांवट

अनेकदा तुमची मानसिक कसोटी पाहिली जाण्याची वेळ येते. त्यावेळी आपण चोखाळण्याविषयीच्या मार्गासंबंधी आपल्याला योग्य निर्णय घेता आला पाहिजे. निरुत्साहाची एक प्रकारची काळी छाया मनावर पसरते, जीवनक्रम डबघाईला आलासा वाटतो. निराशेने मन विषण्ण होते. तुम्ही अशावेळी जरा ढिलाई दाखवा की निराशेने डबघाईने तुमच्यावर मात केलीच म्हणून समजा. शांतपणे व तर्कशुद्धपणे, घेरणाऱ्या त्या निराशेचे, वेढणाऱ्या डबघाईचे तुम्ही नीट विश्लेषण करा म्हणजे मग तुम्ही तिला काटशह देऊ शकाल. अनिष्ट विचारसरणीमुळेच तर नैराश्य, डबघाई निरुत्साह तुमच्यावर सत्ता गाजवू पाहतात. मग योग्य विचारसरणी तुम्हांला त्यांच्या तावडीतून सोडवू शकणारच. निराशेच्या डबघाईच्या कारणाबद्दल भरपूर मनन-चिंतन करा. म्हणजे तुम्हाला तिचे नीट पृथक्करण करणे जमेल, कार्यकारणभाव मनांत परिपक्व होईल, आणि निवारणाचा मार्ग सापडेल. अनिष्ट विचाराना मनांत थाराही न दिल्यानेच तुमचे अंतिम हित साधणार आहे. हे नीट उमगुन घ्या. पुन्हा चिकाटीने व दीर्घ प्रयत्नांनी इष्ट विचारच मनांत राबविल्याने तुम्ही तुमचे मनोव्यापार आणि स्वतःची डबघाईची परिस्थितिही स्वतःच्या कह्यांत राखू शकणार आहात. मग निराशेचे सांवट तुमच्याकडे फिरकणारही नाही. जीवनांत तात्पुरती आलेली डबघाई तुम्हाला हताश करणार नाही.

≈

APRIL 26

# राष्ट्रीय वैशाख ७

# शय्या व्यायाम

सुप्रभाती जागृति येताच शय्यात्याग करण्यापूर्वीच शरीर ताणणारे व्यायाम करण्याची हितावह सवय सर्वांनी लावून घ्यायला हवी. ते सोपे व्यायामप्रकार पुढीलप्रमाणे —

१) उताणे निजा. डावा हात डोक्यावरुन पलीकडे लांब सहा वेळा ताणा. उजवा हातहीं तसाच सहा वेळा ताणा. असे क्रमाने सहादा करा.

२) दोन्ही हात तसेच डोक्यावर ताणलेले ठेवून डावा गुडघा वाकवून पोटाजवळ आणा. मग उजवा गुडघा. असे सहा वेळा करा.

३) दोन्ही हात आता दोन्ही बाजूंवर लांब ताणून ठेवा. डावा पाय न वाकविता उंच पोटाच्या काटकोनांत उचला. मग उजवा. त्यानंतर दोन्ही पाय उचला. अशा प्रकारे सहादा व्यायाय करा.

४) उजव्या कुशीवर वळा. आता डावा हात व डावा पाय सरळ वर उचला. मग डाव्या कुशीवर वळून उजवे हात-पाय वर उचला.

५) आता उपडे पोटावर निजा. डावा पाय दुमडून बुडाकडे घ्या. मग उजवा घ्या. असे क्रमाने सहा वेळा केल्यावर दोन्ही पाय एकदम दुमडुन धरा हेही सहा वेळा करायला पाहिजे.

६) उपडेच राहून पाठीवर हात एकमेकांत पकडून धरा. आता डोके शक्य तेवढे वर उचलून धरा. असे सहा वेळा करा.

७) उपडयाच स्थितींत हात खांद्यावरुन मागे नेऊन दुमडलेल्या पायांचे अंगठे पकडा. हे बनलेले धनुष्य शक्य तेवढे ताणा.

शय्या सोडण्यापूर्वी सकाळी हे व्यायाम केल्याने पुढे शौच-मुखमार्जन आटोपल्यावर करावयाच्या जोरकस व्यायामासाठी शरीराची पूर्वतयारी होते.

**APRIL 27**

राष्ट्रीय वैशाख ८

# थोडे परमार्थसाधन

आपले कर्तव्य करीत आजचे ऐहिक जीवन जगत असताना पारलौकिक जीवनाचाही थोडा विचार सुचणे आवश्यक आहे. परलोक वा परमार्थ साधण्यासाठी नामसाधन हा सर्वोत्कृष्ट उपाय होय. त्याने प्रपंच सुखाचा होऊन जन्माचे सार्थक होते. नाम अकर्तेपणाने घेत असतांनाही त्यांत दृढभाव ओतला गेला पाहिजे. मग नाम घेण्यास काहीही आड येऊं शकणार नाही. नामजपाने हळूहळू देहबुद्धीचे विस्मरण साधूं शकते, वासनेचा क्षय होऊं लागतो, अखंड समाधान पदरी पडते. नामाचे श्रेष्ठत्व त्रिकालाबाधित आहे. तेच आपल्याला मायेच्या तावडींतून सोडवूं शकणार आहे. नामसंकीर्तनाने जीवन आनंदमय होत जाते. कर्तव्याला जसे चुकूं नये तसे रामनामालाही विसरूं नये. नियमितपणें नाम घेत गेल्याने हळूहळू अभिमान गळत जातो. मात्र नाम निर्हेतुकपणे घेतले जाणे आवश्यक आहे, आणि तेही दृढनिश्चयपूर्वक. एकदा हे नामाचे प्रेम जडले की साधकाच्या आनंदाला पारावार उरत नाही. देहाने प्रपंच्याच्या गोष्टी केल्या जात असता मनाने परमेश्वराच्या ठायीं स्थिर असावे. नित्य नेमानें, ठराविक वेळी व ठराविक स्थळीं नामाचे साधन करीत गेल्यानें ते जास्त परिणामकारक होते. हें साधन निरपवादपणें सगळयांना करुन पाहता येण्याजोगे आहे. नीतिधर्मपूर्ण आचरण, शास्त्रशुद्ध वर्तन, भगवंताचे नामस्मरण व शुद्ध अंतःकरण यांच्या जोरावर साधक शेवटपर्यंत पोहोचूं शकतोच. ‘साधनेचा सहवास। सोडवी प्रपंचाचा फास ॥’ हा अनुभव येऊ शकतो. म्हणून तर एकमताने ‘नाम हेच एक साधन। सांगताती सर्व संतजन ॥’

APRIL 28

## राष्ट्रीय वैशाख १

# हे टाळा     हे शिका

| हे टाळा | हे शिका |
|---|---|
| विरोधखंडन न करणें, न खिजविणें | प्रशंसा करावी, दुजोरा द्यावा, |
| वितंडवाद न घालणें, बढाया न मारणें | सेवा करावी आदर दाखवावा, |
| बोलणाऱ्याला न अडविणें, वर्म न काढणे, | सहमत व्हावे, चीज करावे |
| कंड्या न पिकविणे, न कुरकुरणें, | सहानुभुति दाखवावी, खूषकरावे, |
| शत्रुत्व न करणे, अवमान न करणे, | प्रोत्साहन द्यावे, क्षमा करावी, |
| भांडाभांडी न करणें, निंदा न करणें, | पसंती दर्शवावी, मान राखावा, |
| उपरोधानें न बोलणें, बालंट न घेणें, | दान करावें, मान तुकवावी, |
| प्रतिकृत्य न करणें, कलागती न लावणे, | देवघेव चालवावी, संमति द्यावी, |
| अवमुल्यन न करणे, बेअब्रु न करणे, | सहभागी व्हावे, गौरव करावा, |
| कपटाने न वागणे, टोमणे न मारणे, | इतराना चेतवावे, मैत्री-जोडावी, |
| चिडखोरपणा न करणे, | संतोष द्यावा, जमवून घ्यावे, |
| निर्भत्सना न करणे | कौतुक करावे, मदत द्यावी, |
| अतिशयोक्ति न वापरणें, | शिफारस करावी, संरक्षण द्यावे, |
| अडवणुक न करणे, | सांत्वन द्यावे, समर्थन करावे, |
| बळजबरी न करणे, | स्तुति करावी, मान्यता दर्शवावी, |
| दोषारोप न करणे, | दुःख हलकें करावे, |
| तोंडास तोंड न देणे, | फायदा करुन द्यावा, |
| अडचणींत न पाडणे, | उत्साह वाढवावा, |
| दुःस्वासाने न बोलणे, | स्फुर्ति भरवावी, |
| गैरसमजुतींत न घालणें, | चेव चढवावा, |

ह्या वर्ज्य बाबींचे पथ्य पाळा. ह्या आवश्यक बाबींचा सराव करा. म्हणजे जीवन सफल, सुमधुर, सार्थक होईल.

**APRIL 29**

## राष्ट्रीय वैशाख १०

# भविष्यार्थ पूर्वतरतूद

कुठलाही बेत जर दूरदृष्टी, सावधगिरी धोरण बाळगुन आंखला, तर अपव्यय घाईगर्दी नि गैरसोय हो सर्व टळतात. जेव्हां तुम्हाला एखादे काम हातावेगळे करावयाचे असते, ठरली वेळ साधावयाची असते, दिला शद्ब पुरा करावयाचा असतो, काही सेवा-कार्य पार पाडावयाचे असते, तेव्हां पुरेसा वेळ घेऊन त्यासाठी भर-पूर पूर्वतयारी करीत चला. अनपेक्षित कारणामुळे विलंब होतो वा ठरलेले न घडल्याने निराशा पदरीं येते अशासारख्या सर्व संभवा-साठी पुरेशी तरतूद करुन ठेवलेली हवी. व्यवस्थेशीरपणें बेत वा योजना न आंखल्यामुळे गोंधळ-घाई वा बावरलेपणा अनेकांच्या वांटणीला येतो. परिणामत: पुष्कळांना मानसिक अस्वस्थता भोगावो लागते. कांही नीटपणे करता येण्यास लागणारा अवधीच पुष्कळजण मधे ठेवीत नाहीत. कोणी खूप बाबतीत दैवावर हवाला ठेवतात कांहींना तर तास हा किती छोटा असतो याचा अंदाजच नसतो. धांदरटपणा, बावरली वृत्ति व उत्तेजित अवस्था यांच्या तिहेरी माऱ्यांत सांपडून केलेले काम मनाजोगते होणारच कसे ? मनाची स्थिरता, समतोलपणा व नियंत्रणबद्धता न गमावणारी मंडळीच काम उत्तम प्रकारे तडीस नेऊं शकतात. त्यांच्याजवळ पुरेसे कर्तृत्व व भरपूर निपुणता नीट जमवून साठवून ठेवलेली असतात. ही दोन्ही योग्य वेळीं, योग्य प्रकारे, व योग्य त्या प्रमाणांत वापरुन त्यांना आपला कार्यभाग उत्तम प्रकारे साधता येतो.

APRIL 30

# राष्ट्रीय वैशाख ११

# थोर विचार, तदनुरुप आचार

एकनिष्ठा, प्रेमभाव व सेवावृत्ति यांचा सर्वत्र बोलबाला असतो. पण हे सारे सद्‌गुण तुमच्या दैनंदिन व्यवहारात, कृतींत प्रत्यक्षपणे कितपत उतरलेले आढळतात यावर, तुम्हांला त्यांचा खरा अर्थ कितीसा आकलन झालेला आहे, हे सिद्ध होत असते. त्या दृष्टीने मनन-चिंतन करता यावे म्हणून प्रतिदिनी काही वेळ तत्प्रीत्यर्थ राखून ठेवण्याचे ठरवा. प्रत्येकजण तसा कामगारच. तेव्हां या कामगारदिनी, 'आम्ही आपल्या सर्व वेळाचा केवळ राष्ट्रहितैक-दृष्टीनेंच सर्वथा वापर करुं' अशी प्रतिज्ञा तुम्हा प्रत्येकानें करायला हवी. आपल्याशी असलेल्या अकलेचा विधायक कार्यार्थच उचित वापर आपण करतो कीं नाही व आलेली संधी नीटपणे साधतो की नाही याचा व्यासंगी आढावा तुम्हांला घेता यायला हवा. असा आढावा घेत जाण्याचा प्रारंभ करायला आजचा महाराष्ट्रराज्य-स्थापनेचा दिन मोठा शुभ आहे. महान् शीलचारित्र्य म्हणजे काही सद्‌गुणांची नुसती सूचि नसते. तर नित्य जीवनांतला तुमचा दैनंदिन व्यवहार, तुमचे हेतु, तुमची वर्तणुक आणि या सर्वांहून तुमच्या-हातून मेहनतपूर्वक पार पडणारे उद्योग या सर्वांतून जाणवणारी तुमची सक्रीय थोरवी असते. दुसऱ्याची सेवा करण्याची सुवर्णसंधी केव्हा लाभते यावर काकदृष्टीने टपून बसण्याची मानसिक दक्षता हीही हिचाच एक पैलू आहे. प्रशंसा, फलप्राप्तीची अपेक्षा न ठेवता वेळेला अंगावर पडलेले सेवाकार्य आनंदाने व तत्परतेने पार पाडावे थोर विचार, तद्नुरुप आचार म्हणजेच महान् जीवन. आपले जीवन असे महान बनविण्याचा दृढ संकल्प आजच्या महाराष्ट्र राज्यस्थापना दिनी जरुर सोडा.

**(महाराष्ट्र राज्यदिन)**

**MAY 1**

# इमान सोडू नका

तुमच्या अग्रक्रमी आकांक्षा व उच्चतम उद्दिष्टे यांच्या बाबतचे तुमचे इमान कधीच सुटता कामा नये. अर्थ हा की तुम्ही स्वतः-देखील पूर्ण इमानाने वागले पाहिजे. तुम्ही बाह्यरंगी आपल्या मतांबद्दल काय ठाम विधाने करता यापेक्षा अंतरंगी तुमच्या काय विचार चालतात यावर तुमचे जगातील खरोखरी स्थान काय ते ठरत असते. तुमच्या अंतर्तम मनांतील उच्च ध्येय गाठण्याची धैर्याने पराकाष्ठा चालू ठेवा. आपोआपच मग भोवतालची मंडळी तुमच्या मतांचा पाठपुरावा करु लागतील. सत्यात मोठी शक्ति सामावलेली आहे, ती अमोघ शक्ति तुमच्या अधीन राहु शकते व ती तुम्हाला वापरावयासही उपलब्ध असते. ज्याप्रमाणात ती तुम्ही वापरुन दाखवाल त्याप्रमाणात तुम्ही स्वतः आत्मविश्वासू समर्थ व उदात्त बनाल. जसजसे मानसिक व आध्यात्मिक शक्तिचा विकास साधून तुम्ही त्यांचा संचय वाढवीत जाल तसतसे तुम्ही आपल्या जबाबदाऱ्या संभाळून, कसोटीच्या प्रसंगाना तोंड देत, जीवनाचे देणे फेडण्यास जास्त समर्थ व सुयोग्य बनून तयार राहु शकाल. याहूनही महत्वाची गोष्ट ही की स्वतःला अपरिहार्यपणे जडणाऱ्या सवयीबाबत फार चोखंदळ रहा. कारण अशा सवयींचे मिळूनच तुमचे चारित्र्य-शील-स्वभाव बनत असतात, म्हणजेंच पर्यायाने तुमचे दैव घडत ठरत असते.

* * *

MAY 2

## राष्ट्रीय वैशाख १३

# रामायणाचा नित्यपाठ

विवक्षित इष्ट विचारांच्या पुनरावृत्तींतूनच तुमच्या आयुष्याची जडणघडण बनत असते. उत्तम जीवन म्हणजे जणूं कांहीं उत्तम विचारांची जंत्री. ज्या प्रमाणांत तुम्ही उत्तम विचारांचे गुणन-संवर्धन कराल तितके तुमचे जीवनही सुधारत-सावरत जाईल. उत्तम विचारांची परिणति आरोग्य व सौख्य लाभण्यांत होते. जेवढे म्हणून सत्य-शिव-कल्याणप्रद ते सारे रामप्रभू पुरवितात. म्हणून त्यांनाच शरण जावे. दिवसाकाठी एकदा नेमानें जर रामायणाचा पाठ करण्याची पद्धत ठेवलीत तर आचारधर्माला उपयुक्त अशी कितीतरी सामुग्री व मार्गदर्शन त्यांत तुम्हांला आढळून येईल. सत्यधर्माचे पालन कसें करावयाचे, जीवन वैयक्तिकपणे नव्हे तर समाजमान्यतेने कां कंठावयाचे, एकवचनीपणाचा बाणा कशासाठी अंगिकारावयाचा वगैरे विचार रामायणाच्या अध्ययनामुळे स्पष्ट होतात. रामप्रभूंच्या आदर्शापासून तुम्हांला विचारमंथनात, योजना-आंखणींत व उद्दिष्ट-चयनांत उत्तम मार्गदर्शन मिळत राहील. त्या सीतापतीचे भांडार अपार व ओतप्रोत आहे. ते लुटले जाण्यासाठी त्याने ते कायम खुले ठेवलेले आहे. जा आणि हवे ते, हवे तेवढे व हवें तेव्हा घेऊन येत चला. जो रामप्रभूंच्या पदी अंतःकरणापासून लीन होतो त्याच्या आयुष्याचे सोनेच होणार हे निर्विवाद व अपवादरहित सत्य आहे.

MAY 3

# आनंदकंदप्राप्ति

आनंदकंदाचा लाभ करुन घेणे ही एक स्वाभाविक व सुयोग्य महत्त्वाकांक्षा होय. पण हे सुखनिधान अफाट दौलत-संपत्ति-संचयांत, आकंठ विषयोपभोगांत वा अखंडित ऐषोआरामचैनींत गवसेल ही कल्पना भ्रामक आहे. खरा सुखकर आनंद वैराग्यवृत्तींत, संयमांत, नेमस्तपणांत व साधेपणांत सामावलेला असतो, आणि अंगीही लागतो तो. शुद्ध सद्सद्विवेकबुद्धि, पवित्र हृदय व परलोकाकांक्षी आत्मा ह्या परम सुखसमाधान मिळण्यासाठी लागणाऱ्या नितांत आवश्यक बाबी होत. परमेश्वरी विधिनिषेधाप्रमाणे वर्तणुक राखणे ही तर सुखप्राप्तीची गुरुकिल्ली आहे. जर तुम्हांला खरोखर सुखी व्हायचे असेल तर तुम्ही आपली राहणी विशुद्ध ठेवायला हवी, प्राप्त सौभाग्याबद्दल कृतज्ञता बाळगायला हवी आणि सद्‌गुणी जीवनपद्धति हीच सुखकारक असे मानायला हवे. सद्‌गुणी शहाणे असतात, शहाणे सद्वर्तनी असतात आणि सद्वर्तनीच सुखी होतात हे त्रिकालाबाधित सत्य आहे. सुखसमाधान हे देवदत्त असते. उलट दुःख-असमाधान ही मनुष्यनिर्मित असतात. तेव्हां आनंदकंद प्राप्त करुन घेणे सर्वस्वी तुमच्याच हातीं आहे. तो मिळविल्याशिवाय राहू नकाच.

राष्ट्रीय वैशाख १५

# शुचिर्भूत व्हा दररोज

मनानें व शरीरानेंही आपण शुचिर्भूत आहो ही जाणीव तुमचा आत्मविश्वास द्विगुणित करते. आपले संपूर्ण बाह्यांग तुम्ही रोजच्या रोज स्वच्छ करीत चला. आल्हाद देईल इतपत पाणी गरम असावे. स्नानाच्या ब्रशाने सर्वांग घासून रंध्र नि रंध्र मोकळे करावे. मळ सुटण्यासाठी साबण वापरण्यास हरकत नाहीं पण हॉटेली पोऱ्या कपबशी बादलींत बुचकळून काढतो तद्वत अंग टबांतून विसळून काढूं नका. स्नान संपवा मात्र गार पाण्यानेंच. दोन्ही हातांनी अंग नीट रगडुन काढलेले असावे. अशाने बाहूंना सहजीच व्यायामही घडतो. सौख्यप्राप्तीसाठी शरीराची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. सचैल स्नान करुन शूचिर्भूत झाल्याने वेगळाच आनंद व अननुभूत तरतरी दोन्ही लाभतात. आत्मशुद्धि व शरीरशुद्धि दोन्हीच्या बाबतीत दक्ष असणे तुमचे प्रथम कर्तव्य ठरते. स्वआरोग्य व कल्याणकारी प्रवृत्ती ह्यांचे परस्परांशी अविभाज्य नाते असते. शुद्ध स्वच्छ शरीरांतलाच आत्मा पवित्र बनू शकतो. जीवनव्यवहार सुरळीतपणे सुखात चालण्यासाठी व कल्याणप्राप्ति व्हावी म्हणून शुचिर्भुत काया व निर्मळ आत्मा या दोन्हीचीही फार गरज असते.

卐

MAY 5

# गुणसंपन्न आचरण

आपली आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी तुम्ही कायावाचामने-करुन त्या भगवंताला शरण गेले पाहिजे, आणि त्याच्या आदेशानुसार मार्गदर्शनानुसार, सिद्धांतानुसार आपले जीवन व्यतीत करण्याचा निर्धार केला पाहिजे. एखादे कार्य पार पाडण्यास जरा गैर वाजवी वेळ लागत आहे असे आढळून आले तरी उमेद न सोडता चिकाटीने–सातत्याने–मेहनतीने कार्य चालूच ठेवावयास हवे. कार्यमग्नता हा सर्व चिंतांतून व उपाधींतून मुक्त होण्याचा खात्रीशीर इलाज असतो. अंगी बाणविण्याजोगे काही विशेष सद्‌गुण आहेत. कार्यसाफल्यार्थ त्याची नक्कीच मदत होते. त्यांच्याविषयी मनाशी चिकित्सा करा, ते आपल्याठायी विकसित करण्याचा अहर्निश प्रयत्न करा, दैनंदिन जीवनात त्यांचा वापरही करा. ते गुण कोणते ते पहा दानशूरता, करुणामयता, भक्ति, धैर्य, श्रद्धा, शालीनता, सचोटी, न्यायप्रियता, दयाळूपणा, सहनशीलता, प्रेमळपणा, उमदेपणा, धार्मिकता, आदरभाव, पावित्र्य, नेकी, पश्चात्ताप, आत्मनियंत्रण, निःस्वार्थीपणा, कळकळ, सत्यप्रियता, सहानुभूती, मनोनिग्रह, समभाव. हे सारे गुण तुमच्या आचरणात उतरलेले दिसतील तर तुमचे जीवन सफल, सुखी, कृतार्थ असे होईल.

☆

## राष्ट्रीय वैशाख १७
## (वैशाख शु. २, डॉ. आंबेडकर जयंति)

# घालायचा कित्ता गिरवा पण

उत्तम व्यक्ति कशी असावी याबाबतचा जो आदर्श असेल तुमच्या मनःश्चक्षूंसमोर, तशी व्यक्ती आधी तुम्ही स्वतःच बनले पाहिजे, आदर्श मनुष्य मनमिळाऊ सुशील, दिलदार, सहानुभूतिपूर्ण, सत्वशील, धोरणी असा असतो. त्याची वृत्ति आशावादी आणि सुखशोधक असते. त्याला समजही छान असते. अशा व्यक्तींच्या वागणुकीचे निरीक्षण करुन तिचा कित्ता तुम्ही आधी गिरवायला हवा. त्याच्यासारखी दयाळू, परमतसहिष्णु, सहनशील वृत्ति तुम्हांला तुमच्या स्वभावांत उतरविणे, त्यावर नीट लक्ष केंद्रित करता आल्यास, तुम्हांला सहज साधेल. माणसानें कसे नसावे याचेंही एखादे उदाहरण तुमच्या नजरेपुढे असणारच. तो सुस्त प्रकृतीचा, निंदानालस्तीप्रिय दयामायाहीन, आडमुठा, कांगावखोर, हेकट असा असतो. यांतला एकही दुर्गुण तुमच्यापाशी नसल्यानें त्याचे तुमचे कधीच जमत नाहीं. त्याचा तुम्हांला तिरस्कार वाटतो. दुसऱ्यांच्या ज्या आवडीनिवडी, जशा संवयी, जे सराव, जो आचार वा विचार, तुम्हां स्वतःला कौतुकास्पद, प्रशंसनीय, अनुकरणीय, आदर्शभूत वाटतात, ते सगळेच्या सगळे आपल्या ठायीं जोपासणे, तुम्हाला मुळीच दुरापास्त नाहीं. जशा व्यक्तींशी आपली गांठ पडावी असे राहून राहून तुम्हांला वाटते, तशी व्यक्ती तुम्ही स्वतःच असणार. असायला हवे, कारण तरच तशी व्यक्ति तुमच्याकडे आकृष्ट होईल. पहा बुवा, तुम्ही स्वतः तसे नसल्यास, आधी तसे बना कसे, डॉक्टरांना हे साधले होते.

MAY 7

# राष्ट्रीय वैशाख १८

## (वैशाख शु. २, श्री शिव छत्रपति जयंति)

# घाई ताण टाळा

कोणतेही काम न गोंधळता, स्थिरपणाने, आत्मविश्वासानें कसें करावे, वेळप्रसंगी - सर्व शरीर, सारी इंद्रिये, वृत्ति संपूर्णपणे, कशी शिथिल सोडावी हे शिकल्याशिवाय येणार नाही. शांतवृत्ति, दूरदर्शित्व, निश्चयीपणा व आत्मनियंत्रण या गुणांची आवर्जून जोपासना केली पाहिजे. गैरवाजवी घाईगडबड नि निरर्थक ताण–दाब प्रयत्नपूर्वक टाळावे. सगळीकडे योग्य भूमिकेंतून, रास्त दृष्टिकोनांतुन पहायला शिकावे. आपल्याला कोणती कामे करावयाची आहेत, ती कितपत पेलणारी आहेत, याचे नीट विचार-पूर्वक निदान करा. कशालाही अवास्तव भाव वा फाजील किंमत देऊं नका. सर्व कांही कसे शांत समतोल वृत्तीने धीरगंभीर पद्धतीने होत राहिले पाहिजे. एखाद्या स्वभाववैगुण्यामुळे वा गैरकार्य-प्रणालीमुळे तुमची प्रगति अवरुद्ध होत असेल किंवा यशप्राप्ति दुरापास्त ठरत असेल तर त्या वैगुण्याचो नीट चिकित्सा करा. त्याच्याशी दोन हात करुन त्यावर मात करण्यासाठी कंबर कसा. त्याचे निरसन करण्यासाठी खास प्रयत्न करा. स्वभाववृत्तीचें विकसन-आचार पद्धतींत सुधारणा, व्हायला हवी असतील तर चोखंदळपणे अवगुणांचा नायनाट होणे, उणीवांची भरपाई होणे अत्यावश्यक असते. यासाठीं घाई न करता संथपणें, ताण पाडून न घेता सहजपणें, प्रत्येक गोष्ट पार पाडा, बिकट प्रसंगी भवानीमातेचे ध्यान लाबण्याच्या रिवाजामुळे शिवप्रभूंना ताणमुक्त राहून, घाईगोंधळ न होता सारे नीट पार पाडणे जमे.

MAY 8

# राष्ट्रीय वैशाख १९

## (वैशाख शु. ३, अक्षय्य तृतीया, परशुराम जयंती)

# टळेल निराशा राबता अहर्निश

तुम्हांला आपला जन्म सार्थकी लावण्यासाठी करायला हवे अथक परिश्रम, पाळायला हवी शिस्त आणि ठेवायला हवे स्वचक्षुंपुढे उच्च उद्दीष्ट वर्षाच्या इनमीनसाडेतीन उत्कृष्ट मुहुर्तांपैकी आजच्या या अक्षय्यतृतीयेच्या अर्ध्या मुहूर्तावर असे उद्दीष्ट निवडा. आता-पर्यंत होऊन गेलेल्या सर्व कर्तबगार व्यक्तींनी जीवनभर अखंडीतपणे कष्ट उपसले. त्यांची नजर केवढा फायदा होईल यावर कधीही नव्हती. ती होती कार्याच्या अंतिम गुणवत्तेवर. दिशाविहीन कार्य-सिद्धिशुन्य जीवन सफल मानता येणार नाही कारण ते ठरणार केवळ घाण्याची चाकोरी. आळशीपणाचा शरीरात शिरकाव होताच बेपर्वाईची वाळवी शरीराला लागलीच, हे समजावे. सुखी होण्या-साठी चालू हवी सतत मेहनत. आपण एखादे कार्य यथासांग, यथा-शक्ति व यथामति पार पाडले आहे याबद्दलचे स्वतःला वाटणारें समाधान हेच त्या कार्यपूर्तीचे फल. उपयुक्त, जनसेवाकार्य करण्याची संधि अनेकदा उपस्थित होते. भगवान परशुरामांनी मदांध क्षत्रीयांना एकवीस वेळा अद्दल घडवून 'त्राहि नः' झालेल्या जनांची अशी निष्काम सेवा केली व ते त्यायोगे चिरंजीव झाले. खरी इच्छा असेल तर अशी जनसेवासंधि तुम्हालाही लाभणार व निराशा टळणार. पण महत्व आहे ते अशी संधि मिळताच ती लगेच साधण्याला, उद्दीष्ट पूर्तीसाठी कार्यार्थ अहर्निश राबण्याला.

– ० –

MAY 9

## राष्ट्रीय वैशाख २०

# धर्मप्रवणता

भारतराष्ट्राचा आत्मा त्याच्या धर्मप्रवणतेंत आहे. अनेक परकीय सत्ता इथे शासन चालवून नामशेष झाल्या. पण भारतराष्ट्र अजून अमरपणे अस्तित्वांत आहे. जगभरचे विविध नागरिक आपआपल्या अन्यान्य राष्ट्रवृत्तींना जोपासतात, खतपाणी घालतात, फोफावूं देतात. त्याना त्या त्याज्य वाटत नाहीत. मग आपल्यालाच आपल्या राष्ट्रीय धर्मप्रवृत्तीची लाज, खंत, शरम का वाटावी? हजारो कोस वहात आलेली नदी आता परत उगमाकडे परतविता येईल कधी? इतरांच्या खोडसाळ चिथावणीच्या भरीला पडून आपण उपजत स्वभाव, नैसर्गिक प्रवृत्ति सोडून देऊन काल्पनिक, भ्रामक, फसव्या निधार्मिकतेचे देव्हारे माजवणार का? म्हणजेच अधार्मिकतेचे पाप मांथीं घेणार कां? असे मार्गभ्रष्ट, धर्मशुन्य झाल्यास आपणच नष्ट होऊं. तें टळावे म्हणून दुर्बलतेच्या मोहनिद्रेतून खडबडून जागे होऊं या. आपल्या थोर पूर्वज ऋषींनी सर्वांना आवाहन केलेलेच आहे - उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधन, ' आपण दुबळे नव्हतो. मग आज ही मरगळ कशासाठी? आत्मशक्ति जागृत होऊ द्या. तुमच्यातले अंतर्भूत देवत्व उफाळून वर येऊं द्या. तुमच्या उपजत स्वाभाविक धर्मप्रवण वृत्तींना मुरड घालण्याच्या अट्टाहासानें अपरिमित हानि झाली आहे. आपण भारतवासीयांनी आपले शैथिल्य झाडून टाकायला हवे. आपण आपल्या नैसर्गिक मनोधर्माची कास धरताच आपण पूर्ववत् शक्तिसंपन्न होऊन भारतमातेला पूर्ववैभव पुनश्च प्राप्त होईल.

MAY 10

राष्ट्रीय वैशाख २१

# झकास व्यक्तिमत्व

निवडलेल्या, पत्करलेल्या, किंवा गळचात पडलेल्याही जीवन-व्यवसायात यशस्वी होण्यात प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग खूप महत्त्वाचा ठरतो मोहक प्रभावी व्यक्तिमत्त्वाकडे मित्र आपसूक ओढले जातात, मैत्री शाश्वत होते, सर्वांनाच त्याचे सहाय्य, मार्गदर्शन हवे असते. व्यवसायक्षेत्रांत त्याचा अधिकार, दबदबा मानला जातो. सार्वजनिक क्षेत्रात असे व्यक्तिमत्व अद्वितीय गणले जाते असे व्यक्तिमत्व असणाऱ्याच्या रुपेरी आवाजात गांभीर्य, औदार्य, माधुर्य, तीनही प्रतीत होतात. त्याच्या चालचलणुकींत दाक्षिण्य सदयता वागणुकींत समजूतदारपणा, वृत्तीत मनमिळाऊपणा बोलण्यात मितभाषित्ता, अभिरुचींत भारदास्तपणा, स्वभावात उमदेपणा, निःस्वार्थीपणा, उदारपणा असतात. नासिकेवरचा तरतरीतपणा, नजरेतील पाणीदारपणा, चेहेऱ्यावरील बुद्धिमत्तेची झांक हनुवटीवरचा करारीपणा, चालीतील ऐटदार मर्दानी रुबाब, पराक्रमाची जरब, वागणुकींतील अदब, या सर्व बाबींमुळे छत्रपति शिवरायांचे व्यक्तिमत्व इतके प्रभावी ठरले. इत्यर्थ हाच की जीवनांत यशस्वी ठरण्यांत व्यक्तिमत्वातील प्रभावीपणा फार महत्वाचा सिद्ध होतो. अशा व्यक्तिमत्वाचा नेताच अनुयायी मिळवतो, त्यांच्यावर छाप पाडतो मोहिनी घालतो, त्यांना अंकित करतो.

राष्ट्रीय वैशाख २२

# गाशा गुंडाळ, क्रोधा

तुमच्या कपाळावर आठींचा आविर्भाव येण्यापूर्वीच एखादा मधुर वेगळा विचार मनात सुचू द्या. आणि आठी अगोदर लुप्त होऊं द्या. मनःस्तापाने बोलता बोलतां आवाज लागतोसे होण्याआधीच वेळेवर लगाम खेचा नि पट्टी उतरवा. आवेशात संतापाने मुठी वळू लागण्यापूर्वीच त्या उघडच्या धरा आणि हात बाजूला खाली लोंबकळू द्या. कांहीशा कठोरपणे, टाकून बोलावेसे वाटुं लागताच संयम साधा व कांही गोड शद्व आठवून ते वापरा. परिणाम कसा हितकर होतो ते एकदा अजमावून बघाच. संताप–क्रोध अनावर होणे हे कमकुवतपणाचे लक्षण होय. त्यानें समाधान तर लाभत नाहीच पण ईप्सितही साधत नाही, वर नुकसान पदरी पडते ते वेगळेच. कोणत्याही प्रसंगी, कसल्याही परिस्थितींत, तोल सुटून भडकण्यातला मूर्खपणा आणि तोटा एकदा कां तुम्हाला पटला कीं तुम्ही क्रोध अनावर होऊं देणारच नाही. सारांश, कांहीही बोलायला तोंड उघडण्यापूर्वी विवेकपूर्ण विचार करणे नि क्रोध-भावनेवर ताबा टिकविणे हा नियम जर तुम्ही आजीव पाळलात तर जीवनांत पश्चात्तापाची पाळी पडणार नाही. स्वतःच्या मनोविकारावर ताबा ठेवता आल्यानेच प्राप्त परिस्थितीवर तुम्ही प्रभुत्व पावाल.

MAY 12

## राष्ट्रीय वैशाख २३

# वाचन भक्ति

जर तुम्हाला वाचनाची खरी मनापासून आवड असेल तर तुम्हांला तुमचा वेळ कधीच कंटाळवाणा होणार नाही. नाउमेदीने घेरलेले असतांना, शोकांत बुडायला झालेले असतांना, वा अडचणींनी भंडावलेले असताना, सुटकेचा रामबाण उपाय म्हणजे एखाद उत्कृष्ट पुस्तक. तुम्हांला ते दिलासा देते, टवटवी आणते, स्फूर्तियुक्त बनविते. पुस्तके म्हणजे तुम्हांला अखंड सोबत देणारे सन्मित्र, तुमच्या सेवेसाठी सदासिद्ध राहणारे सहाय्यक. अर्थात वाचलेल्यांतल्या किती भागाचे आकलन झालें, किती भाग पचला, कृतींत उतरला, यालाही महत्त्व आहेच. केवळ, ' इकडून तिकडे गेले वारे ' अशीच गत झाली तर वाचनवेड तसे व्यर्थ ठरणार. अधाशासारखी अनेक पुस्तकें वाचून डोळ्यावेगळी केली पण ज्ञानांत भर पडलीच नाहीं, सुसंस्कार घडलेच नाहींत, तरी सारे कुचकामीच. शिस्त, रीत, निर्णयशक्ति, ही तीन एखाद्या धंद्याच्या यशस्वी व्यवस्थापनांत खूपच महत्त्वाचीं मानावी लागतात. हीच तिन्ही ग्रंथांच्या निवडींत व वाचनांतही तशीच महत्त्वाचीं असतात. साहित्यिक उच्च अभिरुचीची, वाचनभक्तीची जागा दुसरें कांहीच कधीही घेऊं शकणार नाहीं. जगांतल्या श्रेष्ठ ग्रंथराजांपैकी कांहीं निवडक दहाबारा जवळ असणे, यासारखी महान् व शाश्वत दौलत अन्य नाही.

卐

MAY 13

# राष्ट्रीय वैशाख २४

# लालन—पालन

आजचा बालक उद्याचा नागरिक. वर्तमानांत केलेली ही राष्ट्राची गुंतवणूक भविष्यांत दामचौपट होणारी. म्हणून बालकाचे लालनपालन घरोघरी जबाबदारीने, दूरदृष्टीने, सावधानतेने होणं अगत्याचे ठरते. त्याच्या मनावर कोवळेपणांतच सुसंस्कार होणं अत्यावश्यक आहे. त्याला वागवितांना खूपच काळजी घ्यायला हवी. मुलाला जर सदैव घालून-पाडून लागट बोलणी बसली तर मोठेपणी हा माणूस दोषैकदृष्टी ठेवूनच वागणार. बालपणांत जर मूल वैर-भावानें वाढविले गेले असेल तर हा तरुण पुढे भांडकुदळ बनून हमरीतुमरीवर येत सुटणार. लहानवयांत जर मुलाच्या वांटणीला छीथू-उपहास आली तर तरुणपणीं तो बुजरा, शामळू निपजणार. मत्सर, हेवा यांचा शिकार बनलेलें बालक मोठेपणीं अपराधी वृत्तीनेंच वावरणार. हें सर्व टळेल याबद्दल पालकांनी दक्षता बाळगली पाहिजे. बालकाला सहनशीलतेनें वागवा, तरुण सोशिक बनेल. त्याला प्रोत्साहन मिळू द्या, तरुण आत्मविश्वासपूर्ण होणारच. त्याचें कौतुक करा, तो गुणग्राहक ठरेल. बालकाशी गैरव्यवहार होऊं देऊं नका, तो मोठेपणी न्यायानेंच वागेल. त्याला पुरेसा सुरक्षितपणा लाभूं द्या, वाटूं द्या, तरुण विश्वास इमानी असा घडेल. बालकाला वेळोवेळी शाबासकी मिळूं द्या, तो मोठेपणी स्वतःची व्यर्थ निर्भर्त्सना करणार नाही. बालकाच्या वाटणीला योग्य महत्त्व व प्रमाणशीर प्रेम आलें तर हा तरुण सर्वांवर माया करील, सर्वांना जीव लावील, त्याला अवघें जग प्रेममय भासेल, दिसेल, वाटेल.

★

MAY 14

## राष्ट्रीय वैशाख २५

# रामलक्ष्मणी जोडी

पूर्वी विश्वामित्र ऋषींनी राक्षसी उपद्रवांवर रामलक्ष्मणांच्या सहाय्यानें मात करुन यज्ञशंभरी गांठली होती. हल्लीही, चाळीसाव्या वर्षी मरणासन्न झालेल्या एका गृहस्थानी, अशाच एका रामलक्ष्मणी जोडीच्या मदतीनें मृत्युवर मात करुन शंभरी गांठली. ही रामलक्ष्मणी जोडी होती - नेमस्तपणा व नियमितपणा ह्यांची. ह्या दोन गुणांना जीवनाची आधारभूत तत्वे बनविण्याचा त्याना मिळालेला सल्ला त्यानी शिरोधार्य मानला. आहार, निद्रा, व्यायाम व संपूर्ण दिनचर्याच ह्यांच्या बाबतींत त्यानी नेमस्तपणाने व नियमितपणानें वागण्यास प्रारंभ केला. हळूहळू त्यांची कळा पालटली, प्रकृति सुधारली, शक्ति वाढली, तब्येत दणकट झाली. मग ज्या वयांत, सर्वसाधारणपणे मंडळी चंबूगबाळे उचलण्याच्या परिस्थितीत असतात त्यावेळी हे गृहस्थ योजना आंखून नवे उपक्रम हाती घेऊं शकत राहिले. नियमितपणाची व नेमस्तपणाची संवय एकदा का पक्की जडली कीं तुमचा जोम वाढतो, सामर्थ्य वृद्धींगत होते, मनाला नवे बल प्राप्त होते, विचारात सूस्पष्टता येते. आता आपले जीवन जास्त हेतुपूर्ण, अधिक उपयुक्त, व वाढत्या कर्तृत्वाचे बनत चालले असल्याची तुम्हाला जाणीव होऊं लागेल. सर्वोत्कृष्ट फलप्राप्ति पदरांत पडण्यासाठी, जीवनाच्या प्रत्येक पैलूत, नियमीतपणा व नेमस्तपणा हे नियम पाळणे अत्यावश्यक आहे.

MAY 15

# अडगळ काढून टाका

विविध वस्तु जमविताना उच्च अभिरुचि व चोखंदळपणा वापरुन त्यांची निवड करा. त्यांचे मूल्य व त्यांची योग्यता ठरवितांना मार्मिक दृष्टीकोण वापरा. तुम्हाला उपयोगी न पडणाऱ्या व गरज नसलेल्या वस्तु केवळ इतरांनी भर भरली म्हणून घेऊ नकाच. कारण त्या फक्त अडगळीत भर घालतील. वस्तु किती घेतल्या ही दृष्टी नसावी तर त्या किती छान संग्रहणीय आहेत यावर भर ठेवावा. नको असलेली निरुपयोगी वस्तु कितीही स्वस्त वाटली घेताना, तरी ती अंती महागच ठरणार. गरजेपेक्षा जास्त घ्यायचे तर अवश्यच टाळा. संग्रहीत वस्तूंची अधूनमधून तपासणी करुन त्यांचा आढावा घेण्याची पद्धत पाडा. आता निरुपयोगी ठरलेल्या वस्तूंची सरळ हकालपट्टी करा. वस्तु नुसत्याच जमवून ठेवणे वेडगळपणाचे. त्या वापरांत ठेवा. तुमच्या व्यक्तिवैशिष्टयाच्या निदर्शक अशाच वस्तु जमविण्यांत खरे स्वारस्य, वस्तु घेत सुटण्याच्या छंदाच्या आहारी न जाता निवडताना संयम पाळा, चाणाक्षपणा दाखवा. वस्तु तुमच्यासाठी आहेत, तुम्ही त्यांच्यासाठी नव्हेत, हे सूत्र सुटू देऊ नका. संख्येच्या भरीला न पडता गुणवत्तेला महत्त्व द्या. फापटपसारा होऊ दिल्याने काम निष्कारण वाढते, जबाबदारी उगीच वाढते, वाटणारी काळजी सुखासुखी वाढते. गरजेपेक्षा जास्त वस्तु घेणे म्हणजे उधळपट्टी तीही टाकाऊ मालावर. फालतू मालाचा भार वाढवू नका वारंवार तपासत राहून अडगळ टाकीत चला.

# शुभचिंतन

मनोमन शुभचिंतन चालविता येणे ही एक फार मोठी व मूल्यवान पूंजी आहे. मनांत तुम्ही कसलें विचार वागविता, तुमच्या मनाची ठेवण कशा प्रकारची आहे, हे तुमच्या वर्तणुकीवरुन लोकांच्या ध्यानीं तेव्हांच येते. तुमचे अंतस्थ विचार वा भावना दुसऱ्यांत संक्रमित होण्यास त्यांचा प्रत्यक्ष वाणीनेंच उच्चार व्हावा लागतो असे मुळीच नाही. लोकांना स्वतःकडे आकर्षित करणारी व त्यांच्या मनात तुमच्याबद्दल शुभ विचारांचा प्रादुर्भाव करविणारी एक मूक परंतु अर्थवाही अद्‌भुत अशी शक्ति तुमच्यांत वसत असते. ती म्हणजे, तुम्ही बाळगीत असलेले इतरांबद्दलचे शुभविचार. मानसिक शुभेच्छा, या परस्परांच्या नेहमीच प्रत्ययास येतात. तुम्ही इतरांकडे जे शुभविचार प्रवर्तित करता ते सारे गुणीत होऊन पुन्हा तुमच्याकडे परत येतात. या प्रवर्तमान विचारांच्या गुणवत्तेवरुन तुमच्या स्वतःच्या स्वभावाची गुणवत्ता ठरत असते. मनांत शक्य तितके अधिकांत अधिक आनंदी व शुभंकर विचार वागविण्याचे दैनंदिन उद्दिष्ट तुम्ही डोळ्यांसमोर ठेवा, त्या दिशेने आटोकाट प्रयत्न करा; म्हणजे तुमचे जीवन सार्थ, सघन व साभिप्राय होत जाईल, आणि भोवतालची मंडळी तुमच्या सहवासाने, परिचयाने, वर्तणुकीनें तुमच्यावर भाळून जातील. यामुळे तुमचे व भोवतालच्यांचेही जीवन आनंदमय, आरोग्यपूर्ण बनेल.

★

# प्राचार्य श्री. अनुभवजी

या जीवन प्रशालेचे अनुभव हे प्रमुख प्राचार्य होत. कसोटी पाहणारे प्रसंग तुमच्यावर ओढववून, तुमच्यासमोर अडचणींचे डोंगर उभारुन ते तुमची पाहतात परीक्षा. अशा रीतीने तुमच्या अंगी शिस्त बाणववून तुम्हाला ते योग्य वळणही लावतात तुमच्या हातून घडलेल्या चुका व तुम्ही घेतलेले चुकीचे निर्णय याबद्दल हे गुरुजी तुम्हांला शासन घडविल्यावाचून सोडीत नाहीत. धोका, संकट कुठे आहे याबद्दल वेळीच मार्गदर्शन करुन, होणाऱ्या संभाव्य अनपेक्षित नुकसानीपासून हे प्राचार्य आपल्या विद्यार्थ्यांना वाचवितात. व्यर्थ कलापव्यय करणे, कुवत अनाठायी वापरणे, चुकीच्या नुकसानकारक योजनांचा मूर्खपणे पाठपुरावा करणे, आणि शारीरिक तशाच मानसिक शक्तींची उधळामाधळ चालविणे या गुन्ह्यांबद्दल भोगावी लागणारी शिक्षा अनुभवाने तुम्हांला आता समजू लागते. झालेल्या चुकांचीच पुनरावृत्ति घडल्यास पूर्वीपेक्षा अधिक कडक शिक्षा का मिळते ते तुम्हाला हे अनुभवगुरुजी नीटपणे समजावून देतात. तुम्ही वास्तव सृष्टीत वावरत आहांत, कांही प्रत्यक्ष कार्य पार पाडण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे आणि विविध समस्या तुम्हांला सोडवायलाच हव्यात याची ते तुम्हांला सातत्यानें जाणीव करुन देतात. या अनुभवगुरुजींनी तुम्हांला रोजच्या रोज शिकविलेले विविध पाठ ध्यानी धरल्याने तुमचे जीवन सर्वांगपरिपूर्ण, अष्टपैलू व सुखीसमाधानी बनेल.

# राष्ट्रीय वैशाख २९

# कमकुवतपणा झटका

परमेश्वराला स्वत: सर्वस्वी अर्पण व्हा आणि आपल्याच मनाला भिऊन वागत चला. ' भगवंता, मी तुला सर्वस्वी शरण आहे, ही खरोखरी अंत:करणापासून घातलेली हाक होऊं द्या. असा धावा करण्यानें आत्म्याला आनंद, शांति, भलाई, श्रद्धा, शालीनता, सहनशीलता यांची प्राप्ति होते आणि कुठचेही विघ्न उभे राहात नाही. हे दैवी गुण तुम्हांठायी बाणून ते तुमच्या जीवनचर्येत प्रकटू लागले की तुम्ही परमेश्वराच्या अधिकाधिक निकट चालचेच म्हणावयाचे. मग, ' भक्ता, तुझ्या मनोकामना फलद्रुप होवोत' असा वर मिळायला कितीसा उशीर ! कुवतीबाहेरच्या कामांना हात घालायचा नि ती पेलत नाहीत, पार पडत नाहीत म्हणून चिंतेने ग्रस्त राहायचे यात मुळीच अर्थ नाही. चिंता, काळजी या निखालसपणे मनोदौर्बल्याच्या द्योतक असतात. तुमच्या कमकुवतपणाची, दुबळेपणाची व आत्मविश्वासाभावाची त्या जणु मुकपणे मान्यताच देतात. संकुचितसे नव्हे तर विशाल जीवन जगण्यासाठी, तुमच्या जवळ धिटाई, धैर्य, धाडस यांचे प्रचंड भांडार असायला हवे. स्वत:जवळ अमर्याद व जिवंत शक्तिस्रोत आहेत याची ठाम जाणीव तुमच्या मनात जागृत होताच तुम्ही कर्तृत्वाला आव्हान देणारी जोखमाची कामे पत्करुन ती पार पाडण्यास कटिबद्ध राहु शकाल, समर्थही ठरुं शकाल.

卐

MAY 19

# राष्ट्रीय वैशाख ३०

## (वैशाख शु. १३, थोरले बाजीराव पुण्यतिथि)

# समर्पणी संप्रदाय

पूर्वीपेक्षा आता जगात सर्वत्र सहानुभूती, कळकळ, त्यागभावना जास्त वाढीला लागल्या आहेत हे मदर तेरेसा ह्यांच्या सारख्यांच्या उदाहरणांवरुन आपणांस आढळून येत आहे. दया, सेवा, सचोटी, निःस्वार्थीपणा यांची इष्टता, सामर्थ्य, गरज लोकांना अधिकाधिक पटत चालली आहेत, हे आरोळकर दाम्पत्याने आपल्या कृतीने सिद्ध करुन दाखवले आहे. व्यवसायांत, सामाजिक जीवनात, अनेक सत्प्रवृत्तीचा वापर वाढत्या प्रमाणात, यशस्वीपणे होऊं लागला आहे. अनेक स्त्रीपुरुषांच्या, शंकराचार्यी विरागीपणा, नारसिंहीशौर्य व थोरले बाजीरावी उमदेपणा या गुणांमुळेच मुख्यत्वेकरुन सध्या जग सुधारत चालल्याचे दिसून येत आहे. परार्थ जीवन वेचणाऱ्या, आमटे पतिपत्नी व त्यांचा गण, यांच्यासारखा धीरोदात्त समर्पणी मंडळींच्या मुळेच प्राधान्येकरुन आज जग उत्तरोत्तर अधिक सुंदर जास्त चेतनादायी व पुरेसे हवेहवेसे वाटु लागले आहे. या जनकल्याण निष्ठ राष्ट्रीय वृत्तीने भारलेल्या, संप्रदायांत समाविष्ट होण्याची सुसंधि, व अशा परहितदक्ष स्वयंसेवक मंडळींच्यात वावरण्याचा बहुमान आज आपणास लाभत आहे. चला तर; पूर्वी, हिंदू धर्मीय नवम अवतार अशा बुद्धानी लोकदुखःनिवारणार्थ स्थापलेल्या संघाप्रमाणे आज तुम्हीही एकाची स्थापना करुन जगाला जास्त आकर्षक, सुंदर, मोहक बनविण्याचा महान कार्यातील आपला वाटा उचलण्याची प्रतिज्ञा आजच्या थोरले बाजीराव पुण्यतिथीच्या शुभ दिनी करा.

(नृसिंहजयंति)

**MAY 20**

# राष्ट्रीय वैशाख ३१

## (वैशाख शु. १४, कूर्म जयंति)

# छान शुभाकांक्षी मनःस्थिति

तुमच्या दैनंदिन जीवनावर तुमच्या मानसिक अवस्थेचा, धारणेचा ठेवणीचा निर्णायकपणे प्रभाव पडत असतो. म्हणून तुमच्या कामांबद्दल, योजनांबाबत, व बेतांविषयी मनाच्या मोठ्या अपेक्षामय नि सोत्कंठ उभारीने प्रत्येक नव्या दिवसाला सामोरे जा. असे केल्यानें तुमच्या हातून प्रत्येक दिवशी खूप जास्ती कामे तर पार पडतीलच शिवाय त्या त्या कार्यांतील कौशल्याचा दर्जाही उंचावत राहील. तुमच्या भोवतालच्या मंडळींबद्दल व एकंदरीने जगाबद्दल तुम्ही जसा आपल्या मनाचा ग्रह करुन घ्याल तसाच ग्रह तुमच्या बद्दलही इतरांनी करुन घेतलेला तुम्हांला आढळून येईल. जेव्हा तुम्ही इष्ट, अनुकूल व आशापूर्ण मन:स्थितीत असता तेव्हां सर्वच गोष्टी जशा संगनमत करुन तुमचे बेत, इच्छा-योजना पूर्ण करण्यासाठी सहकार्य देत जातात. दिवस सुखाने समाधानानें जाऊन योजलेली कामे मनाजोगी पार पडतील कीं नाही हे मूलतः तुमच्या दिवसारंभीच्या मनोधारणेवर बव्हंशी अवलंबून राहते. कूर्मगतीने कां होईना पण निश्चितपणे सर्व कांही उत्तम प्रकारें जमेल अशा सार्थ आशावादी अभिनिवेशाने आणि मंगलाचाच सदा शाश्वतपणें वरचष्मा राहतो या दृढ विश्वासानें दिवसाचा स्वतः शुभारंभ करा व इतरांनाही उपरोक्त विधानाच्या सत्यतेचा पडताळा आणून द्या.

**MAY 21**

# राष्ट्रीय ज्येष्ठ १

## (वैशाख शु. १५, बुद्ध पौर्णिमा)

# उद्योगहीनता

करावयाला उपयोगी उद्योग नसणे याहून दुसरा आधिक मोठा कपाळकरंटेपणा नाहीं. उद्योगहीन होताच जीवन केवळ एक ध्येयशून्य पीडादायक कटकट आणि काळ फक्त एक निर्दय छळवादी उच्छाद, वाटूं लागतात. ज्या माणसाने आयुष्यांत अविश्रांत काम करण्याचा आनंद उपभोगला नाहीं त्याचें जिणे व्यर्थ गेले. भगवान बुद्ध जीवनभर सतत उद्योगमग्न राहिले. कारण त्यांनी एक गोष्ट नीट हेरली होती - कीं जीवनांत सुस्ती वा निष्क्रियता शिरली कीं जीवन नरक बनते. निष्क्रियता सर्वव्यापी दुःखाला निमंत्रण देते. दुःखाच्या सर्वव्यापकतेबद्दलच बुद्धांचे सारे चिंतन होते. त्यांनी दुःखाच्या कचाट्यांतून सुटण्याचा एक उपाय म्हणून आपल्या सर्व अनुयायांना अखंडपणे उद्योगमग्न राहण्याची विशेष आज्ञा दिली होती. सुवर्णसंधीच्या या वर्तमान युगांत निरोगी असूनही कामच नसलेला किंवा जीवनाला ध्येयच नसलेला एखादा तरी मानवमात्र निघणे अतिशयच दुर्दैवी ठरेल. मेहनत करण्यांतला आनंद, धडपड चालूं ठेवण्यांतली मजा, अनपेक्षितपणे येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यांतले सुख, धाडस करण्यांतले समाधान, या सर्वांमुळेच तर जगण्याला चव चढते; जीवन सार्थ, सुखावह, सह्य बनते. म्हणून आपल्याला आवडणारा असा एक कार्यप्रकार पसंद करा आणि मग सारी क्षमता एकवटून त्या कार्याची साधना चालूं ठेवा. इच्छायुक्त अंतःकरणाने, धैर्यपूर्वक, आनंदानें त्या कार्यांत सतत मग्न रहा. बघा तुम्हांला जीवनांतला खराखुरा आनंद मनमुराद लुटता येतो की नाहीं तें.

\+ + +

**MAY 22**

# हेकटपणा सोडा

जीवन भरकटू न देता सुयोग्यपणे कंठता येण्यासाठी मनाच्या ठेवणीत जरुरीप्रमाणे अनुरूप मिळता जुळता बदल करता येणे आवश्यक आहे. अशी मनमिळवणी शिस्तशीरपणा व निःस्वार्थी-पणा या पायाभूत गुणांच्या जोरावर साधू शकते. अनपेक्षित प्रसंगाना, अकल्पित अडचणींना हिच्यामुळेच तोंड झटकन देता येते. मनावर दडपण असता, गैरसमज वाढले असता, बुद्धीवर फार ताण पडला असता मिळते जुळते घेण्याच्या वृत्तीचीच गरज पडते. या वृत्तीच्या वाऱ्यानेच, वातावरणात जमलेली, मतभेद व संशय यांची अभ्रे, विरवून टाकता येतात. मनाची अशी प्रवृत्ति बनल्यावर प्रत्येकाला दुसऱ्याच्या भावनाविचारांत शिरकाव करुन घेता येतो. मनमिळाऊ वृत्तीच्या अभावी आडमुठ्या बनु शकणाऱ्या अडचणीचे, मिळते जुळते घेण्याच्या वृत्तीच्या बळावर निराकारण होऊन जाते. एकदा कां स्वभावाच्या-वृत्तीच्या ठेवणींत मिळतेजुळतेपणा बद्धमूल झाला की मग सर्वसामान्य दैनंदिन जीवनांत उद्भवणाऱ्या, चिंता, संघर्ष, पेंच याना तोंड देणे, त्यांच्या तावडींतून मुक्त होणे, चांगलेच सोपे, सुलभ जाते. हेकटपणा सोडून द्या, स्वभाव मिळतेजुळते घेणारा बनु द्या आणि इतरांच्या बोलण्या-चालण्या-वागण्याचा उलटा अर्थ कधीही न घेता-लावता, ते बोलणे-चालणें-वागणें समजून घेत चला. अशानें आयुष्यांत तुम्ही स्वतःतर आनंद मिळवालच, पण इतरांनाही आनंदी कराल, हौशी बनवाल.

# राष्ट्रीय ज्येष्ठ ३

# दैवी भलाई

भलाई विधायक तर दुष्टावा विध्वंसक. भलाई उदात्त बनविते, प्रोत्साहन देते, टिकवून धरते. उलटपक्षी दुष्टावा खिन्न करतो, दास बनवितो, सत्वहीन करतो. भलाई मंदीरे, शुश्रुषालये, स्मारके व समाध्या बांधविण्यास कारणीभूत होते तर दुष्टबुद्धी द्युतगृहे वेश्यालये व नशास्थानें निर्मिते. भलाई रेखविते महान् चित्रे, कोरविते उदात्त शिल्पे, आणि योजिवते भव्य वास्तु. दुष्टावा मात्र जीवन काळेकुट्ट बनवून उध्वस्त करुन टाकतो. भलाईच्या पोटी निपजतात राजकारण धुरंधर, द्रष्टे, प्रवचनकार, कवि, संतमहात्मे. पापबुद्धी मात्र जन्माला घालते दारुड्यांना, दरोडेखोरांना, खुन्यांना आणि नितिचारित्र्यहीनांना. श्रद्धा, सचोटी, प्रेम, सत्य ही भालईची अपत्ये; तर अविश्वास, अप्रामाणिकपणा, असत्य व विद्वेष ही दुष्टवासनेची कुसंताने. भलेपणा चिरशाश्वत व अविनाशी. उलट दुष्टावा अशाश्वत व स्वविनाशकारी. भलेपणा हा असा दैवी गुण आहे· कारण देव भला असतो. म्हणून तुम्ही ही दैवी भलाई अंगी बाणवा म्हणजे देवही तुमचे भलेच करील.

– ० –

# राष्ट्रीय ज्येष्ठ ४

## (वैशाख व. २, नारद जयंति)

# नारदीय सूक्ते

दुःख, चिंता, व धैर्यनाश यांच्या विषबाधेवर सुकार्यमग्नता हा अचूक गुणकारी उतारा आहे. झाल्या चुकीची पूनरावृत्ति होऊं दिली नाही हेसुद्धा प्रगतीचेच लक्षण होय. कर्ज व रोग ही दोन्ही सारखीच विनाशक, घातक असतात. तुम्हाला नको असलेली वस्तु कितीही स्वस्तात मिळाली तरी ती महागच पडणार यांत शंका नको. एखाद्यासाठी मरण्यापेक्षा एखांद्यासाठीजगण्यात जास्त पुरुषार्थ आहे. दररोज एक तरी भूतदयेचे सत्कृत्य करण्याने तुमचे जीवन विशाल व सामर्थ्यपूर्ण होत जाते. कार्याला हात घालायला मागे पुढे करणे हे कमकुवतपणाचे लक्षण आहे, आणि त्याकडे दुर्लक्ष करून पाठ फिरवणे हा तर संपुर्ण पराभव आहे. जीवनांतल्या तुमच्या आकांक्षाचा मुळीच संकोच करु नका, कां की तुम्हीं त्या सहजगत्या पुऱ्या करू शकणार आहात. तुमचे नवविचार जगापुढे मांडून ते कृतीत उतरवून दाखविण्यास आजच धडाडीने सुरवात करा आणि तद्वारा तुमची योग्यता सिद्ध करा. जगाची खूशामत करु नका कारण ते तुम्हास दाद देणार नाही; पण त्याची जर उपेक्षा कराल तर मात्र ते तुम्हाला डोक्यावर बसू देईल. ध्येय कितीही आदर्शवादी असायला हरकत नाही पण ते गाठण्याची योजना संपूर्णपणे व्यवहाराकडं दृष्टी टेवूनच आंखलीं पाहिजे.

# राष्ट्रीय ज्येष्ठ ५

# टंगळमंगळ टाळा

आपले आयुष्य नेहमीच नकळत व झपाटचाने कमी होत जात असते. तुमच्या मनांतली आंखून पूर्ण झालेली अशी कोणतीही योजना ताबडतोब कार्यान्वित करण्यास प्रारंभ करा. तसाच, आतापर्यंत केवळ विचाराधिष्ठीत राहिलेला एखादा महान उपयुक्त बेतही आजच अमलांत आणण्यास सुरवात करा. तो लांबणीवर टाकणे टाळाटाळ करणे अनिष्ट, नुकसानकारक, विघातक ठरु शकेल, शिवाय टंगळमंगळ केल्याने मनांतला बेत थंडावत, ओसरत विरत जातो. लाभलेल्या संधीवर, ती हातातून निसटू शकण्यापुर्वीच, टपून बसून झडप घाला, प्रयत्नांची पराकाष्ठा करा; आणि मग पहा तुमचे बेत, योजना, उद्दिष्टे फलद्रूप होतात की नाही ते. चालढकल चालविणें टाळाटाळ करणे महाग पडते. एखाद्या सुंदर, थोर, परोपकारी कार्याला तुम्ही हात घालण्याचीच खोटी आहे, कीं, ते तडीस जाण्याच्या मार्गावर तुम्ही पाऊल टाकलेलेच आहे असे खुशाल समजा. महान उद्दिष्ट गाठायला पावलापावलानेच जायचे असते. एकदम उडी घालणे मुळीच हितावह ठरत नाही. अगदी थोर पुरुषश्रेष्ठसुद्धा आपली उद्दिष्टे टप्प्याटप्प्यानेच गाठू शकले होते. टंगळमंगळ, टाळाटाळ, चालढकल अवश्य टाळाच. एवढ्या विवेचनावरुन, आपल्या इच्छित कार्याचा श्रीगणेशा आजच करण्यासाठी उद्युक्त होण्यास तुम्हाला पुरेसे प्रोत्साहन लाभावे. आता तुमची स्वप्ने नक्की सत्यसृष्टीत उतरतील. तुमच्या आशाआकांक्षा निखालसपणे तुमच्यासमोर समूर्त होऊन, याची देही याची डोळा, उभ्या ठाकतील, कामांतली टंगळमंगळ टाळाटाळ संपताच.

☆

**MAY 26**

राष्ट्रीय ज्येष्ठ ६

# असावे, दिसावे, ताठ

आपण कसे वसतो, कसे उभे राहतो, काय खेळतो, कसे वावरतो या सर्व बाबतींत स्वतः दक्ष व काटेकोर असणे हें फार अगत्याचें व आवश्यक आहे. पोक काढून बसूं नये, बैठें खेळ वर्ज्य करावे, ढिलाईने मरगळल्यासारखे उभे राहूं नये; यासाठी सदैव जागरुकता हवी. चालतांना नेभळचाप्रमाणे फरफटत कधी पावलें न टाकावी, खचून गेल्याप्रमाणे न वावरावे, वांकून न चालावें. बसा, उभे राहा, चाला ताठपणाने, खेळा इर्ष्येने म्हणजे सर्व वेळीं तुमच्या विचारांत, बोलण्यांत, कृतींत ताठपणा, जरब, खणखणीतपणा, वचक आढळेल. तुमच्यांतला ऐटदारपणा, रुबाब, भारदस्तपणा इतरांना सतत प्रतीत व्हावा, जाणवत रहावा. छाती कशी पुढे काढलेली, दमदार, फुगवलेली दिसावी, दीर्घश्वसनाचा सराव ठेवावा. दिवसाकाठीं आवर्जून अनेकदां स्मरणपूर्वक आग्रह धरुन खोल श्वास घेऊन छाती फुगविण्याचा व ती तशीच कांही वेळ धरुन ठेवण्याची पद्धत अवलंबावी. उभे राहून दोन्ही हात पाठीमागे एकमेकांनी पकडून धरुन ते तसेच पाठीमागून खांद्यापर्यंत वर आणा, छाती फुगवीत दीर्घ श्वास घ्या. मग हात तसेच पुढे वर डोक्याकडे नेऊन ताणून धरा. हा व्यायाम नियमाने केल्याने तुमच्यांत एक प्रकारची उठावदार ढब येईल. जर व्यक्तिमत्त्वांत सामर्थ्य व वचक यायला हवे असतील तर निरनिराळ्या मैदानी खेळात तुमचे शरीर दिमाखाने वावरतांना सर्वांना दिसेल, याबाबतींत तुम्ही आग्रही व दक्ष राहिले पाहिजे. खंबीरपणे मर्दासारखे वावरा, जगा. हे साधण्यासाठी मर्दानी मैदानी खेळ सहाय्यभूत होतील. अशा खेळामुळे शरीरांत ताठपणा, ऐटदारपणा येईल.

**MAY 27**

## राष्ट्रीय ज्येष्ठ ७

### (वैशाख व. ५, सावरकर जयंति)

# ओसरत नाही तीच-

ऐन आणीबाणीच्या वेळींच तर तुमची कसोटी पाहिली जाते. तुमच्या श्रद्धेची स्थिरता, तुमची सत्यप्रियता, अशा वेळीच वस्तुतः कसाला लागतात. तुम्ही म्हणता, मानता कीं गरजेच्या वेळीं धांवा घालताच तो प्रभु नक्की हांकेला ओ देतोच तुम्ही सांगता की त्या सर्वशक्तिमान कनवाळू प्रभूजवळ सर्व कांही बरें करण्याची, सर्वांना संरक्षण देण्याची, प्रत्येकाला मार्गदर्शन करण्याची, तुम्हांला वाचविण्याची भरपूर शक्ति आहे अशी तुमची दृढ, ठाम, स्थिर श्रद्धा आहे. छान! पण जेव्हां तुमच्यावर खरोखरचा प्रत्यक्ष प्रसंग ओढवतो, - तुम्ही घोर दुखण्याच्या कचाट्यांत सापडता, तुमच्यावर व्यापारांत बुडण्याची वेळ ओढवते, एखादा तुमचा खास मित्र गमावतो, एखाद्या अभूतपूर्व अडचणीला तुम्हांला तोंड द्यावे लागते वा सर्वांवरच राष्ट्रीय किंवा नैसर्गिक आपत्ति कोसळते, - तेव्हां तुमच्या या दृढ श्रद्धेचें सोनें बावनकशी आहे कां फालतू चौदा कॅरेटचे आहे याचा ताबडतोब पत्ता लागतो. स्वातंत्र्यवीरांची मातृभूमिश्रद्धा अशी जाज्वल्य होती. त्यांच्या स्वदेशनिष्ठेचे सोनें पूर्ण शंभर क्रमांकी सिद्ध झाले. प्राणांवर बेतल्यावरही ते डगमगले नव्हते. अशा प्रकारे जिवावर ओढवल्यावरही श्रद्धेला तडा न गेला तर तुम्ही खरे श्रद्धावान. ओसरली नाही तरच तुमची प्रभुप्रीति शंभर गुणी. आपली मनोवृत्ति, विचारप्रणाली संपूर्णपणे श्रद्धामय बनवा. गजेंद्रमोक्ष वा द्रौपदी - वस्त्र - वर्धन घडेलच घडेल पुन्हाही.

**MAY 28**

राष्ट्रीय ज्येष्ठ ८

# दूरदृष्टिपूर्ण दीर्घविचार

दूरदृष्टी ठेवून सावधतापूर्वक दीर्घविचारान्ती मसलत करणे म्हणजे बेत करण्याचीच अळंटळं करणं नव्हे किंवा वेळ वायफळ दवडणेही मुळीच नव्हे. घिसाडघाई न करता समतोल विचारान्ती पद्धतपूर्वक वक्तशीरपणे योजनेची आंखणी व्हावयास हवी त्यानंतरच योजनेला हात घालावा चालू आणि सर्वसामान्य, अशा सर्व बाबींची झटपट वासलात लावायला हरकत नाही. पण असे करतांनाही गांगरलेला धांदरटपणा होऊं नये धीरगंभीरतेच्या जोडीला जोम व दक्षता ही शिवाय हवीतच. काळाचा पळकुटेपणा ध्यानांत घेऊन, दिवसाकांठी प्रत्यक्षांत न वापरता येण्याजोग्या तासांचाच अधिक भरणा असल्याचे लक्षांत आल्यावर तुम्ही नैसर्गिकपणेच तासांचे वांटप जास्त काटेकोरपणे करुन अधिक कार्ये पदरांत पाडूं पाहणारच. होणाऱ्या चुकांमुळे वांटणीला आलेली निराशा, बहुतेकवेळा लहरीपणा व घायकुतेपणा हातून घडले असल्यामुळे, भोगावी लागलेली असते. दीर्घ विचारीपणा एकदां कां अंगी बाणला, रक्तांत मुरला, रोमारोमांत भिनला कीं स्ववृत्तींवर पूर्ण प्रभुत्व लाभते. आता हेहीं खरे की काही काही वेळा, दीर्घसूत्रीपणा टाकून तडकाफडकीनें पावले उचलावी लागतात. पण अशा तातडीच्या प्रसंगीही मनाची स्थिरता शांतता, तसेच त्याचा तोल व ताबा सुटता कामा नयेत.

卐

MAY 29

## राष्ट्रीय ज्येष्ठ ९
## (वैशाख व. ७, रवींद्र जयंति)

# क्षुद्र नसते कोणतेच काम

जर तुमच्या मानसगृहातील टापटीप, व्यवस्था, शिस्त, सारे रीतसर असेल तर बाह्य विपरीत परिस्थिति, प्रतिकूल वातावरण, बेशिस्त अंदाधुंदी तुम्हाला नाउमेद करण्यास वा कचाट्यात पकडण्यास समर्थ ठरु शकणार नाहीत. चिकाटी, सहनशीलता व एकाग्रताही गुणत्रयी आणि स्वसामर्थ्य यांना विकसित करण्यासाठी सद्यःस्थिती तुम्हाला पुरेसा वाव देत असते. आजच्या परीक्षेला वा कसोटीला तुम्ही कसे सामोरे जाता चालू समस्या व जबाबदाऱ्या या तुम्ही कशा हाताळता, ह्यांच्यावरुन, तुम्हाला, जेव्हा जास्त अनुकूल परिस्थिती असेल तेव्हा स्वतःचीं अवस्था काय राहील याचे गणित बिनचूक मांडता येईल. वेळोवेळी अंगावर पडणारी क्षुल्लक कामेही उत्साहपूर्वक व नीट समजून घेऊन पार पाडीत जाण्यानेच, स्वसामर्थ्य – परिवर्धनाचा व प्रगतिचा मार्ग, मोकळा होतो. रविंद्रनाथांनी शिशुगीते रचतानाही आपल्या प्रतिभेचा सढळ वापर केला. व प्राथमिक सहज पाठही तितक्याच साक्षेपाने लिहिले. त्यांनी हे काम क्षूद्र, छोटे, फालतू क्षुल्लक, फडतूस असे मानले नाही वा ते करण्यात कमीपणा मानला नाही. मामूली कार्ये निपुणतेने व व पूर्णशक्तिने उरकीत गेल्यानेच, महान कामगिऱ्या हातावेगळ्या करण्यासाठी लागणारी योग्यता व उपरोक्त गुणत्रयी, व्यक्तिच्या अंगी जोपासली जाऊन दृढमूल होतात. वाटणीला आलेले काम, पडलेली जबाबदारी, यासाठी सर्व कर्तुत्त्वानिशी स्वतःला वाहून घ्या, तोलाची नाही म्हणून अहंतेने नाक मुरडू नका. असे केलेत तरच तुमची कुवत वाढेल.

**MAY 30**

# चाकोरी टाळा

एकाग्र चित्ताने एकाच कामाचा पाठपुरावा करुन ते तडीला लावणे निर्विवादपणे महत्वाचे. तरीसुद्धा चांगल्या गोष्टीचाही अतिरेक केव्हाही वर्ज्यच. एखाद्या कार्याचा नादिष्टपणे सतत ध्यास धरुन फक्त त्यातच गर्क राहणे हे सुद्धा टाळायला हवे. रोजच्या उपजिविकेच्या व्यवसायाव्यतिरिक्त इतर कांही छंद जर तुम्ही जोपासीत नसलात तर तुमचा जीव उबून जाईल, जीवन संकुचित बनेल. होता होता घाण्याच्या बैलाप्रमाणे तुम्ही झांपडे बांधुन चाकोरीत गरगरत बसाल आणि या चक्रातून सुटका करुन घेणें तुम्हाला अशक्यसे होऊन बसेल. विधान हे आहे उघड उघड विरोधाभासाचे. पण ते धाष्टर्याचे असले तरी सत्य आहे. आळशाला नव्हे तर कार्यमग्न व्यक्तिलाच असे इतर विविध छंद जोपासण्याची आवड असते व त्यासाठी तिला वेळही सापडतो. रोजच्या माथी पडलेल्या कामाकडेच, जर तुम्हाला शरीराने ताजेतवाने होऊन व मनाने नवा हुरुप धरुन, वळायचे असेल तर ते चालू काम थांबवून मधे मधे काही दुसऱ्या उद्योगाना हात घाला. काळजी, चिडखोरपणा थकवा, नाउमेद या मनाच्या साऱ्या व्याधींवर एकच रामबाण उपाय आहे. तो म्हणजे, चालू काम सोडून देऊन, चाकोरीतून बाहेर पडून, तात्पुरते एखाद्या दुसऱ्या चांगल्या उद्योगाकडे लक्ष वळविणें. अजमावून तर पहा.

MAY 31

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९६
ग्रं. क्र. २३०९८
दिनांक २०।९।८३
शाखा (स्थळ प्रत)

# राष्ट्रीय ज्येष्ठ ११

# शांत निस्ताण चित्त

मनमोकळे व शरीर शिथिल सोडायचा पद्धतशीर सराव करा. सर्व स्नायूंवरील सारे ताण सैल सोडा, वाहनांतून जात असलात तरीही शरीर शिथिल सोडून सर्व भार संपूर्णतः वाहनावर जाऊं द्या, शरीराला आटोपून धरु नका. रात्री शय्येवर पहुडल्या-वरही शवासनाची स्थिति प्राप्त होऊं द्या. काम करीत असतानाही मन निस्तान ठेवलेत तर एकप्रकारे विश्रांति चालू राहून खर्च होत असलेली शक्ति दुसरीकडे फिरून जमाही होत जात असते अस्थिर चित्ताने, ताणावलेल्या वृत्तीने, क्षुब्ध मनःस्थितींत काम करीत राहि-लात तर शारीरिक शक्तिचा निरर्थक अस्थानी व्यय चालू राहतो, मानसिक जोमाची व्यर्थ उधळमाधळ होत असते. तेव्हा या बाबतींत दक्ष राहून असे अपव्यय आवर्जून अडवीत जावे. योग्य काम करताना मनावर, शरीरावर कुठल्याही प्रकारचें दडपण नसेल तर हुरूप वाढत जातो. दडपणाखाली काम करीत राहिल्यास क्षमता, निपुणता, दोन्ही ओसरत जातात. तरी एकावेळी एकच काम नि तेंही निश्चयी ठाम, मनोवृत्तीनें करण्याची दृढ संवय लावून घ्या. हातांतल्या कामासाठी, ते उत्तम प्रकारे पार पडावे, म्हणून पुरेसा वेळ वापरा. तुमच्या कार्यपद्धतीत कोणत्याही तऱ्हेचे दबाव, ताण, दडपण यांचा शिरकाव होऊं पहात असेल तर त्याना काकदृष्टीने टेहळून अडवा. काम करतांना मनाचा समतोल, शांति, स्थिरता, नियंत्रण ही प्राप्त करण्याचे उद्दीष्ट पुढे ठेवा. सुस्थिर, निस्ताण मनानें झालेले काम उत्तम ठरते.

**JUNE 1**

## राष्ट्रीय ज्येष्ठ १२

# शिक्षण खरेखुरे तेच-

पुस्तकी ज्ञानाची, माहितीची डोक्यांत भरताड करणे म्हणजे खरे शिक्षण नव्हे. शिक्षण म्हणजे असते मनाला, विचारांना, हृदयाला योग्य वळण लावणे, त्यांच्यावर इष्ट संस्कार करणे. आवश्यक त्या गोष्टींचो व गरजेच्या बाबींची माहिती करुन घेणे, व त्या गोष्टी-बाबी करुन दाखविणे म्हणजे खरे शिक्षण. सर्व प्रकारच्या कार्य-प्रवत्तींचा एकसमयावच्छेदेकरुन घडवायचा विकास, त्याला म्हणायाचे शिक्षित होणें. निरनिराळे सद्‌गुण, विविध शक्तींची पूर्णता आपल्या नजरेच्या टप्प्यांत आणणे, आवाक्यांत माववणे म्हणजे शिक्षण मिळविणे. प्रशाला, महाविद्यालये ह्यांतच शिक्षण मिळते असे मुळीच नाही वा तिथेच ते संपते असेही नाही. शिक्षण प्राप्त करणे साऱ्या जीवनभर चालूच ठेवायचे असते. आयुष्यभर विद्यार्थीदशा समाप्त होतच नाहीं जो जो भेटेल त्याच्यापासून दत्तगुरुंप्रमाणे काहीना काही शिकून घेता येतेच. ग्रंथ, मित्र, निसर्ग, चिंतन, प्रवास आदि 'ज्ञान, शिस्त, वळण, शिक्षण' मिळविण्याची प्रमुख साधने होत. तुम्ही मिळविलेल्या माहितीला अनुसरुन तुमचे स्वत्व, व्यक्तिमत्व, घडत असतात. वाङ्मय, शास्त्रे, कला, तत्त्वज्ञान, इतिहास, धर्मग्रंथ ह्यांच्यातील विचारवैभव तुम्हाला सदैव उपलब्ध असते त्याचा आधार घेतल्याने शिक्षण सदा सहजसुलभ वाटते. शिक्षणाने प्राप्त होणारे महत्तम साध्य म्हणजे व्यक्तीच्या चारित्र्य-शील-स्वभाव ह्यांचा सर्वांगीण, समुचित, संपूर्ण विकास.

★

**JUNE 2**

# राष्ट्रीय ज्येष्ठ १३

# शुभ दिनारंभ

बहुतेकजण दिवसाची सुरवात जशी होईल तशी होऊ देतात. याविषयी काटेकोर, चोखंदळ व दक्ष असणारे विरळाच वस्तुत: आरंभ शुभ होण्याचा, दिवसाच्या एकंदरीच्या कामांवर खूपच प्रभाव, परिणाम, पडतो होतो. समजा, एखाद्या दिवशी सकाळीच काही विषण्ण करणारी दुर्वार्ता कानांवर आली, वाचनांत एखादी दु:खांतिका आली, किंवा या ना त्या कारणांनी मनांत नाउमेदीचे विचार उद्‌भवले तर दिवसाच्या पुढल्या साऱ्या कामांवर विरजण पडते. हे टाळण्यासाठी उठल्याउठल्या कोणा मोठ्या विचारवंताच्या ग्रंथांतील उत्तम, स्फूर्तिदायक, वेचक, प्रेरणाकारी असा भाग वाचण्याचा प्रघात पाडावा, अथवा आपल्याच आयुष्यांतील एखाद्या रोमहर्षक चेतनादायी घटनेची मनाशी उजळणी करावी. अशानें तुम्ही मग दिवसभर उत्साहाने, उमेदीने, उल्हासाने वावराल, वागाल, कामे करीत सुटाल. दिवसभराचे बेत व आंखलेल्या योजना फलद्रुप होण्याच्या दृष्टीने, शुभ विचार, उत्साहपूर्ण कल्पना तुमच्या मनांत दिनारंभीच प्रादुर्भूत होणे चांगलेच फायद्याचे ठरते. या दृष्टीनें प्रत्येक प्रभाती, प्रोत्साहक उदात्त कल्पनेवर चिंतन चालविण्याची खास दक्षता तुम्ही अगत्यपूर्वक घ्या. दिवसभर योजलेली उद्दिष्टे नीटपणे हातावेगळी होण्यासाठी, हा रामबाण उपाय आहे, ही खास गुरुकिल्ली आहे.

**JUNE 3**

# पूर्वतयारी

जीवनात यशस्वी म्हणून ख्यातनाम झालेल्या लोकाग्रणींच्या जीवनाचे विश्लेषण, पृथक्करण, अध्ययन करून पहाल तर, त्याना जे पुढे यश मिळाले त्याच्या पाठीशी आधीची जाणीवपूर्वक, योजनाबद्ध, जागरुकतेने केलेली अभ्यासपूर्ण पूर्वतयारी होती, असे तुम्हाला आढळून येईल. ज्ञान, नैपुण्य, संपूर्णता, एकाग्रता, वगैरे अनेक प्रशंसनीय उपलब्धि त्याना प्राप्त होण्यापूर्वी त्यानी खूप सराव व दीर्घ अध्ययन आधी केलेली होती. कुठलेही शक्तिसामर्थ्य ऐन गरजेच्या वेळी वापरता येण्यासाठी ते, जाणीपूर्वक वा यदृच्छाया विकसित करावयास हवे, वा कमवावयास पाहिजे. तरच ते निकड पडताच कामी लावता येणार. अन्यथा ते कुचकामी, अपुरे, निरर्थक उरते. म्हणजे यश कधी अपघाताने, अचानक, योगायोगाने, मिळाले म्हणून मिळत नसते. ते असते प्रयत्नपूर्वक विकसित केलेल्या, वापरांत असलेल्या व सरावांत ठेवलेल्या कर्तृत्वाचे फळ. जितका जास्त वेळ तुम्ही व्यासंगपूर्ण अध्ययनांत, एकांत चिंतनांत, व हुशारीने पूर्वतयारी करण्यांत खर्च कराल, तितके अधिक अपूर्व यश, ती सुवर्णसंधी भाग्याने तुमच्या वाट्याला येताच, तुमच्या पदरांत पडेल आणि पूर्वतयारीप्रीत्यर्थ वेचलेल्या त्या वेळाचे समुचित चीज होईल.

– ० –

**JUNE 4**

# राष्ट्रीय ज्येष्ठ १५

# भयानक कालापव्यय

छे छे, छे ! केवढा हा अपव्यय चालला आहे प्रत्येक मौल्यवान् क्षणाचा ! जनांचे जमाव नुसते इतस्तत: हेलावत मात्र आहेत; नाही दिशा, नाही उद्दीष्ट. विमूढ होऊन, अस्वस्थपणे, विमनस्कपणे, भरकटत राहिलेली ही मानवमोदीनी न्याहाळा तरी एकदा. हतोत्साह, निराश, विगतधैर्य मानवतेचीच जशी अखंड चालणारी मिरवणूक. तुम्ही स्वत: मात्र या दृष्यापासून अवश्य तो बोध घ्या. निश्चित हेतु उराशी बाळगुनच तुम्ही प्रत्येक दिवस कामी लावा तुमची दिशा कुठे, तुम्हाला नेमके साधावयाचे आहे काय. आणि गंतव्य गाठण्यासाठी तुमचे वाटचालींचे वाहन कोणतें, याची निश्चित जाण तुम्हाला असायला हवीच. इतर विवेकभ्रष्ट विचारशुन्य मंडळींनी उधळामाधळ चालविलेल्या आपल्या कालकोशाचा तुम्ही स्वत: मात्र सद्वापरच करा. सुयोग्यपणे वापरलेल्या पळांचेच, पुढे उत्पादन पूर्ण प्रयत्नांनी युक्त असे, घटका-प्रहर बनत जातात याचे आकलन होऊं द्या. नव्हे करुनच घ्या. पापणी लवण्यापूर्वीच हातावर तुरी ठेवणाऱ्या या विपुल पण पळपुटचा पळांचे प्रमुल्य नीट जाणून घ्या. काल भांडार रिते न होणारे असले, म्हणून काय ते व्यर्थ उधळायचे! कालापव्यय टाळून, स्वत:चे कर्तृत्व अवघे, संपूर्णपणे पणाला लावण्याचा सुवर्णक्षण हाच आहे बरे ! तो साधाच, व्यर्थ वाया दवडू नका.

卐

JUNE 5

राष्ट्रीय ज्येष्ठ १६

# कसोटी पाहणारी सचोटी

तडजोड न करता, शंभर क्रमांकी सचोटीनें वागण्याची जर संवय जडलेली असेल तर त्या व्यक्तीला जीवनांत नाना प्रकारचे फायदे मिळतात. प्रथम म्हणजे अशा व्यक्तीजवळ जबर आत्मविश्वास असतो. शिवाय ती पूर्ण स्वतंत्र वृत्तीची व स्वावलंबी असते. त्यामुळे कसल्याही प्रसंगाला न डगमगता अशी व्यक्ती तोंड देऊ शकते. जगांत होऊन गेलेल्या सर्व थोर व्यक्तींनी सत्यनिष्ठा व कर्तव्यदक्षता यांची कास कधीही सोडली नव्हती. त्यामुळेच ही माणसे भल्याबुऱ्या प्रसंगांतून सहीसलामत पार पडली. तुमचा शब्द लेखी करारा इतकाच पक्का, सच्चा असतो, कुठल्याही परिस्थितींत तुम्ही कर्तव्यपथावरुन च्युत होऊन आपल्या दिल्या वचनांना हरताळ फासणार नाहीच अशी तुमच्याबद्दल इतरांची ठाम खात्री पटलेली असणे ही बाब तुमच्या बाबतीत अतिशय वैयक्तिक महत्त्वाची, जमेची ठरते. तत्त्वनिष्ठ माणसाची समाजांत फार मोठी बूज असते. न्यायप्रीतीची, सत्यव्रताची, तत्त्वनिष्ठेची चाड बाळगणाऱ्या परमेश्वराची सर्वत्र अधिसत्ता असताना हे असे व्हायला हवेच, आणि तें तसे होतेही. सचोटी फक्त आचारांत असली म्हणजे भागत नाही. ती तितकीच वृत्तीतही व विचारांतसुद्धां असली पाहिजे तरच ती खरी. सचोटी हा एक मनांत व बुद्धीत जोपासण्याचा गुण आहे. अलौकिक, यशस्वी व कृतकृत्य जीवनाचा सचोटी हा अविभाज्य भाग असतो.

≈

**JUNE 6**

# राष्ट्रीय ज्येष्ठ १७

# होतात दृढ उच्चारणाने

तुम्हांला पार पाडावयाची असलेली कामे, जर पुरी करावयाची असतील तर तुम्ही आपले निश्चय आधिक ठाम, आधिक दृढ, आधिक जोमदार बनविले पाहिजेत त्या दृष्टीने हे निश्चय जास्त ठाशीव करण्यासाठी म्हणून तुम्हाला, जेवढी व जिकडून, कुमक गोळा करता येईल तेवढी करा. करावयाची योजलेली सारी कामे एका कागदावर नोंदा मग दिवसांतून पुष्कळदा ती मनाशी वाचीत चला. अधून मधून त्यांचे मोठ्याने उच्चारणही करा. जे विचार, तुमच्या जीवनांत संवयीसारखे अंगवळणी पडावे असे, तुम्हाला वाटतात ते विचार ठासून मोठ्याने म्हणा लक्ष एकाग्र करुन, आंखलेल्या कामांचा निश्चयात्मक पुनरुच्चार निर्धारपूर्वक करीत चला. दिवस अखेर निजण्यापूर्वी तुम्ही केलेल्या योजना-बेतांचा निःपक्षपातीपणाने आढावा घ्या, म्हणजे नव्याने केलेल्या या बेता-योजनांची वर्तमान अवस्था काय आहे हें तुमच्या दृष्टोत्पत्तीस येईल. एखादा महान् बेत, नवा निर्धार, थोर योजना, मनांत उत्स्फूर्तपणे उद्भवणे हे कमी वा सामान्य मुळीच नव्हे. पण जर तो निर्धार, बेत, विचार तितक्याच तत्परतेने मार्गी लागला, कृतींत उतरला, साकार झाला तर ते सोन्याहून पिवळे ठरेल. उठा पाहू; करा सुरु आपल्या बेतांची मनाशी उजळणी, व कृतीनें अंमलबजावणी.

JUNE 7

# उपलब्ध आहे सारेच

सर्वोत्कृष्ट गोष्टीसुद्धा बहुधा तुमच्याजवळच आणि प्राप्त करुन घेण्याच्या आवाक्यांतल्याच अशा असतात. उत्तम असे सदा उपलब्ध असते, ते केव्हाही हाती लागू शकते, आणि बव्हंशी ते समीपही मिळते. सर्वोत्तम काळ देखील अज्ञात अगम्य, अज्ञेय अशा भविष्यांत नसतो तर आता, इथे, राहत्या वर्तमानातच सापडतो. सर्वश्रेष्ठ संधीपण कुठे दूर पल्ल्यावर नसते तर आज तुम्ही जिथे आहात तिथेच ती ठाकलेली असू शकते. प्रश्न आहे तुमच्या वैयक्तिक कर्तबगारीचा. स्वर्गसुद्धा नीरव नभांतल्या पळपुटचा पोकळीत नसतो. तो असतो तुमच्या हृदयांतच अधिष्ठित. उत्तम, सुरेख, उदात्त असे सारे, आयुष्यांत तुम्हांला यावेळीच नि सहजगत्या मिळणे शक्य आहे. तुमच्यासाठी त्या जगन्नियंत्याने काय काय, कसे कसे, कुठे नि किती किती निर्मून ठेवलेले आहे हें तुमच्या एकदा का ध्यानांत येऊ लागले की मग संशयावृतता, निरुत्साहन, आणि मर्यादाबंधन यांची तुम्हाला थोडीसुद्धा बाधा होऊ शकणार नाही. या सर्व अमोल देणग्या आणि सुवर्णसंध्या प्राप्त करुन घेण्याचा ठाम निर्धार करा. अशा निर्धाराच्या पुरेशा जोरावर तुमची अन्यान्य सारी कर्तृत्वे, उफाळून येऊन प्रकट होतील व तुम्हाला यशस्विता नि:संशय वरमाला घालील. याबाबतीत मनांत लवमात्र किंतु बाळगु नका.

## राष्ट्रीय ज्येष्ठ १९

# अवगुणांवर मात

अनिश्चितपणा. असमर्थता, आलस्य व औदासिन्य अशासारख्या अवगुणांवर दैनंदीन जीवनांत झटापट करीत हरघडी छोटे मोठे विजय मिळवीत राहिले पाहिजे. असल्या विजयांचीच परिणति अंती जीवन यशस्वी ठरण्यांत होत असते. नित्य अनुभवास येणारे गलितधैर्य करणारे विविध क्षुल्लक प्रसंग आणि वांटणीला येणाऱ्या अन्यान्य अडचणी यांना झटापटीने तोंड देण्याच्या नित्य सवयींतूनच, कुठल्याही अवघड कार्याला पुरुन उरण्याइतका आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. या आत्मविश्वासाच्या सामर्थ्यानेच झटापट सर्व शक्य होऊन सर्व अवगुणांवर मात करता येते. उद्योगशील माणसाला जीवन नीरस वाटू शकत नाही. उलट त्याला आपल्या उद्योगमग्नतेंत अवगुणांशी झटापट करण्यांत अपार आनंदाचा ठेवा सापडेल, कार्य तडीला नेण्यासाठी आवश्यक ती चेतनाही प्राप्त होईल. जीवन म्हणजे तुरुंग, शिक्षागृह, कारागार मुळीच नव्हे. ते आहे प्रयत्न, धाडस-हिम्मत, यांना भरपूर वाव देणारे एक कल्पनारम्य, सुंदर अपूर्व असे कार्यक्षेत्र. जीवनाला समृद्ध, सुसह्य, समर्थ करणारे चार वर आहेत– उद्योग, सुसंधी, प्रयत्न आणि सेवा. हे चारी तुम्हाला दिलेलेच आहेत. त्यांचे स्मरण ठेवून योग्य वेळी ते वापरण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. आत्मविश्वासपूर्णतेने झटापट करुन अवगुणांवर मात करुन उद्योगमग्नतेत आनंद अनुभवण्याचे भाग्य प्रत्येकालाच प्राप्त करुन घेता येईल. अवगुणांशी शर्थीने झटापट सुरु ठेवली पाहिजे.

卐

**JUNE 9**

# राष्ट्रीय ज्येष्ठ २०

# व्यत्ययी व्यग्रता

चालू व्यस्त जीवनातील दैनंदिन व्यवहारात अडथळे, विघ्ने, अडचणी, व्यत्यय येणे अपरिहार्य असते. कांही एक विशिष्ट काम आज आता पुरे करावयाचेच असा बेत पक्का करुन तुम्ही कामाला हात घालता आणि – थोड्या वेळाने कोणी नेमके भेटायला उपटते, वा रस्त्यावर दूरभाषकांतून गाणीं ठणाणू लागतात, नाहीतर निदान घरातच वादावादी सुरु होते. काम बाजूला सारुन उठल्याखेरीज सुटका कुठून? अशाच वेळी तर तुमच्या उदारतेची, दाक्षिण्यवृत्तीची आणि खिलाडूपणाची परीक्षा होते. दिवसाचा वेळ कितीही पद्धतशीरपणे, दक्षतेने व काटेकोरपणे, तुम्ही विविध कामांसाठी वाटून दिलेला असलात तरीही त्यांत अशा प्रकारे अटळपणे येणाऱ्या अनपेक्षित व्यत्ययांसाठीही वाव ठेवलेला असावाच. व्यत्यय टाळू म्हणून टळत नाहीत. उलट आल्या व्यत्ययांना समजूतदारपणे सामोरे जाऊन, तोंड देऊन, त्यावर मात करुन त्यांचा, स्वतःची सहनशीलता, दयाळूपणा, जुळवून घेण्याची वृत्ति यांच्या वर्धनाची आलेली एक सुसंधी म्हणून वापर करा. जबरदस्तीने गळ्यांत पडलेली ही व्यत्ययी व्यग्रता म्हणजे एक प्रकारे वेषांतर करुन आलेली ईश्वरी कृपाच समजावी. अशा ईश्वरी कृपेमुळे विघ्नांतून, व्यत्ययांतून, म्हणजेच धारेपालटातून पार पडल्यावर, थांबल्या कामाकडे पुन्हा वळताना, तुमचा दम ताजा, व मन प्रफुल्लित झालेले, तुम्हाला आढळून येतील.

★

JUNE 10

## राष्ट्रीय ज्येष्ठ २१

# ठेचेनंतरही मार्गक्रमण

भोगाव्या लागणाऱ्या दुःखाने पिचून जाऊ नका, झाल्या नुकसानाने हबकलेले राहू नका, वाटणीला आलेल्या निराशेने वैफल्यग्रस्त बनू नका, ठेंच लागली म्हणून कुथत बसू नका. उलट लाभत असलेल्या सुसंधया व प्राप्त होत असलेल्या सोयी-सवलती याबद्दल जगन्नियंत्याचे ऋण मान्य करीत चला. हाती असलेल्या कार्यावर संपूर्ण लक्ष एकवटून ते पार पाडण्यासाठी आपली सारी शक्ति पणाला लावा. चिंता, धास्ती, निराशा यावर मात करण्याकरिता काही नव्या आवडी स्वतःला लावून घ्या, वेगळ्या जबाबदाऱ्या निवडून अंगावर घ्या. सध्या तुमचे लक्ष वेधून तुम्हाला कार्यमग्न ठेवण्याइतक्या विविध खटपटी व अन्यान्य व्यवधाने तुमच्या हाती असणारच. तेव्हा पूर्वी हातून घडलेल्या चुकांची, आधी लागलेल्या ठेचांची पुनरावृत्ति होणार नाही याबद्दल पुरेशी खबरदारी घेऊन मार्गक्रमण चालूच ठेवा. चतुरपणे व चाणाक्षपणे बेत आखा व यश आपले आहेच याबद्दल दृढ विश्वास धरा. सावध आशावादीपणाने आपली कुवत अजमावून ठेवा व छाती पुढे काढून स्वकार्यांत स्वतःला जुंपून घ्या. सर्व नीटपणे निभावून जाणार आहेच अशी स्वतःच आपल्या मनाला ग्वाही द्या. सत्याला प्रवेश मिळावा म्हणून मनाची कवाडे सदैव उघडी ठेवा. सद्विचारांच्या बीजापोटी सद्परिणामांचे पीक येणारच. तेव्हा मार्गक्रमण कुठल्याही परिस्थितीत निर्धाराने चालूच राहू द्या.

\+ + +

**JUNE 11**

# राष्ट्रीय ज्येष्ठ २२

# इष्ट संवय

तुमच्या मनांत प्रामुख्याने वावरणारे, वेळोवेळी उद्भवणारे वा अचानक तरळून गेलेले विचार नोंदवहीत नोंदून ठेवण्याची बिनमोल संवय मुद्दाम प्रयत्नपूर्वक जडवून घेण्याजोगी आहे. सुचलेल्या छान कल्पना, स्फुरलेले अर्थगर्भ विचार त्याचप्रमाणे झालेल्या वाचनाची निवडक टिपणे, ही सारी नोंदवह्यांत समाविष्ट करण्याची सामग्री असते. अशा नोंदवह्या हा, अवगत झालेल्या विविध सत्यांचा एक प्रकारचा खजिनाच होय. अमूर्त विचार अशा रीतीने अक्षरबद्ध होऊन समूर्त केला गेला की तो मनावर जास्त स्पष्टपणे ठसतो. हे विचार अधून मधून पुनः पुनः मोठ्याने वाचीत राहिल्याने मनावर उठलेला त्यांचा ठसा मग अगदी वज्रलेप बनतो. विचार नोंदवहीत लिपिबद्ध झाल्याने तो संदिग्ध न राहता सुस्पष्ट बनतो आणि तो निसटताच मनांत डोकावून गेलेला असल्यास आता सुस्थिर होतो, सुधारलाही जातो. बोलून दाखविले गेल्याशिवाय, वा लिहून ठेवले गेल्याशिवाय, तरळलेले, आढळलेले, उद्भवलेले विचार पूर्णपणे तुमचे स्वतःचे असे ठरत नाहीत. अशा तऱ्हेने नोंदवहीलेखन करण्याचा प्रघात सर्वांनीच पाडणे अत्यंत अगत्याचे आहे. असा प्रघात हे, मनाला सुस्पष्टपणे व तर्कशुद्धरीतीने विचार करता येण्याची संवय लावण्याचे, एक महान्, अनमोल, अपूर्व असे व्यवहार्य साधन आहे.

JUNE 12

## राष्ट्रीय ज्येष्ठ २३

# खास त्रिसूत्री

जीवनावरचे संपूर्ण भाष्य, आयुष्याचे सारे तत्वज्ञान तीन प्रमुख आचारतत्वात गोवता येईल. भगवंतप्रणीत, श्रीकृष्णकथित सारथिश्रेष्ठपुरस्कृत निष्काम कर्मयोगाचे आचारतत्व; पहिले, जिवापाड काबाडकष्ट करीत राहण्याचे, दुसरे; व आनंदी-समाधानी वृत्ती जोपासण्याचे, तिसरे. ईश्वराला साक्ष ठेवून या तिन्ही आचारतत्वांना अनुसरीत तुम्ही आपले जीवन कंठींत चला म्हणजे तुम्हांला जीवनात काहीं उणे म्हणून पडणार नाही. पहिले तत्व परब्रह्माइतकेच चिरशाश्वत आहे. दुसरे निश्चितफलदायी आहे व तिसरे आरोग्यसौख्यवृद्धिकारक आहे. तिन्ही एकवटल्यावर तर यशोलाभच यशोलाभ तिन्ही तत्वांचे नीट अध्ययन, मनन, चिंतन करा. म्हणजे त्यांचे अपार महत्व ध्यानी येईल. मग तिहींना तुम्ही आपल्या दैनंदीन वैयक्तिक जीवनात एक अनिवार्य असे स्थान आपोआपच द्याल. स्वयंविकास, जनकल्याणसाधना व परसेवा, साधावा, व्हावी व घडावी यासाठी आपल्याला लाभलेल्या या संधीचे, जीवनाचे, जन्माचे, सार्थक करा. जो जो म्हणून, हाती घेतलेले कार्य शेवटपर्यंत तडीस नेतो, निष्ठेने पार पाडतो, त्याला त्याला म्हणून कार्यसिद्धी वरमाला घातल्याविना राहत नाहींच. त्या सर्वांच्या जीवनमंदीरावर यशस्वितेचा सुवर्णकळस चढेलच चढेल.

# राष्ट्रीय ज्येष्ठ २४

## (ज्येष्ठ शु. ६, लक्ष्मीबाई स्मृतिदिन)

# चिंतनान्ती बेतआंखणी

बारकाईने खोल विचार करीत चिंतन चालविल्याने ज्ञानवर्धन होतेच पण नवे बेत आखण्यासाठीही पूर्वचिंतन आवश्यक असते. शिवाय आंखलेला बेत, घेतलेला निर्णय, ठरवलेली योजना इष्ट का अनिष्ट हे ही एकांतचिंतनांन्तीच समजू शकते. झांशीवाल्या महाराणी लक्ष्मीबाईने ब्रिटिशांपुढे मान न तुकविण्याचा घेतलेला निर्णय म्हणजे काही मनाची क्षणिक उचल नव्हती. देवीमातेपुढे अहोरात्र अनुष्ठानाला बसून साधकबाधक बाबींचे त्यांनी एकचिंतन केले त्याचा तो परिपाक होता. नंतर सहकाऱ्यांना मसलतींत घेऊन युद्धव्यूह ठरविला. चिंतनाची संवय लावून घेणे खूपच अगत्याचे आहे. कोणाचाही त्रास न होता, दीर्घकाळ स्थिरचित्त होऊन बसता येईल अशा एकांत जागी बसा. शरीर-मनावरील सारे बाह्यताण प्रयत्नपूर्वक शिथिल होऊ द्यात. मग तुमच्या मनांतील कल्पनेवर, योजनेवर, कार्यक्रमावर, एकाग्रतेने लक्ष केंद्रित करा. तो सारा विचार तुमच्या मनःचक्षूंपुढे साकार होऊन उभा ठाकेपर्यंत त्याच्यावर चिंतन चालवा. योजनेचा संपूर्ण आराखडा दृग्गोचर होईपर्यंत तिचा एकांत जागी पाठपुरावा करा. ईप्सित उद्दिष्ट साध्य होण्यासाठी अशातऱ्हेने पूर्वचिंतन करण्याची नितांत गरज आहे. इतक्या पूर्वतयारीनंतरच मग आपल्या बेताच्या कार्यवाहींला प्रारंभ करा. चिंतन करणे हा कालाचा अपव्यय नव्हे.

**JUNE 14**

# राष्ट्रीय ज्येष्ठ २५

(ज्येष्ठ शु. ७, विंध्यवासिनी अर्चनादिन)

# लीनता, अविरोध, लवचिकपणा

‘ **म**हापूरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती’ या उक्तित सूचित झालेल्या बोधाप्रमाणे वर्तणूक ठेवणे खूपच व्यवहारिक ठरते. असे करणे कष्टसाध्य व कृतीत उतरवायला फारच जिकिरीचे वाटले तरीही करुन बघण्याजोगे नक्कीच आहे. हातून घडलेले कृत्य चुकीचे होते असे दिसुन आल्यावर खिलाडू वृत्तीने, मोकळ्या मनाने, कमीपणा न मानता चूक पदरात घेण्याइतकेच, वेळप्रसंगी लवून नम्र होणे बरेच कठीण असते. आपल्या स्वतःच्या मतां-विचारांना एककल्लीपणे हट्टाने, आडमुठेपणे चिकटुन न बसता, इतरांचे दृष्टीकोनही समजून घेणे, हिला मनाची खरी लवचिक वृत्ति म्हणता येईल. जर मनाची अशी देवघेवीची, तडजोडीची ठेवण असेल तरच ते निरोगी व ग्रहणशील बनेल. अशा अविरोधाने, इतरांशी झटकन मैत्री जुळते, विरोधकांचीही समजूत पडते. दैनंदिन जीवनात बसणारे धक्के, मिळणारे तडाखे, लागणाऱ्या ठेचा सुसह्य होतात. समजा, तुमच्या मित्राने केलेला वायदा पुरा न केला, दिलेले वचन न पाळले वा पत्करले काम पार पाडले नसले तरी चडफडण्यात मनःशक्तिचा अपव्यय करु नका. अन्याय करणाऱ्यालाही दोषी ठरविण्याची घाई करु नका. कोणाची गैरसमजूत झाली असेल, नाहकच निंदानालस्ती केली जात असेल तरी क्रोधाविष्टही न व्हावे वा कष्टीही न व्हावे. विंध्यवासिनिच्या कृपाप्रसादाने ही गुणत्रयी तुम्हास अवश्य अंगी बाणविता येईल.

**JUNE 15**

# राष्ट्रीय ज्येष्ठ २६

## (ज्येष्ठ शु. ८, अर्जुन देव, शहीद दिन)

# वृत्तीतील धरसोड

अनिश्चितता व क्रियाशून्यता दोन्ही प्रगतीचे फार मोठे वैरी आहेत. ज्यावेळी एखाद्या कार्याची दिशा ठरवताना तुमच्या मनाचा गोंधळ उडतो, त्यावेळी काहीही निर्णय घेताना जरादेखील घिसाडघाई करु नका. प्रथम मनाला निपक्षपातीपणे व न्यायप्रियतेने निर्णय घ्यायला शिकवा. नंतर प्रत्येक प्रश्नाचा सर्व बाजूनी व सांगोपांग विचार करीत चला. निर्णय सावकाशीने घेता आला तरी हरकत नाही पण तो समजून उमजून घेतलेला असावा, सारे चातुर्य वापरुन घेतलेला असावा. हाताने प्रत्यक्ष कृति करण्यापुर्वी आधी विचारपूर्वक योजना आखणे निःसंशय शहाणपणाचेच असते. मात्र एकदा मार्ग दृष्टिपथात आला की धरसोडीची वृत्ति टाकुन तत्परतेने, निश्चयाने व आत्मविश्वासाने तो आक्रमिण्यास सुरवात व्हायलाच हवी असे शहीद अर्जुनदेवांचे सर्वांना सांगणे असे. योग्य मार्गाने रोज जरी थोडीच पावले टाकलीत, तरी शेवटी एकदा ईप्सित ध्येयापर्यंत तुम्ही जाऊन पोचणारच पोचणार. जीवन प्रगतीमय व्हायला हवे असेल तर ध्येय आटोक्यातले असावे, तत्सिद्धार्थ प्रयत्न सतत चालू रहावेत, व प्रवृत्ति पुढाकार घेण्याची ठेवावी. वापरा वा वाया घालवा हा निसर्गाचा निष्ठुर नियम आहे. म्हणून आजची उपलब्ध संधि वापराच, वाया घालवू नका. उद्या ती पुन्हा मिळेल याची शाश्वती नाही. शिवाय उद्या येणारी संधी काय, केव्हढी, कशी असेल हे कोण सांगू शकणार?

≈

**JUNE 16**

राष्ट्रीय ज्येष्ठ २७

# दुर्दम्यतेने कार्यपूर्ति

सर्वसामान्य कुवतीच्या माणसालाही खूप मोठे कार्य पार पाडता येते यात आश्चर्य नाहीच. त्याच्याजवळ मात्र असायला हवीत तीन साधने-उत्कट इच्छा, दुर्दम्य निर्धार व अविश्रांत मेहनत. दर्शनी दिसणारे चाकोरीभ्रमण, सलामीलाच वाटणारी निराशा, दोन्ही वस्तुतः नियोजनबद्ध वळणशीर कार्यपद्धतीच्या प्राथमिक पायऱ्या असतातच. पण शेवटच्या पायरीला पोहचल्यावर यशःश्रीला हात पोचतातच पोहोचतात. अपरिहार्य ठरु शकणाऱ्या अडचणी दुर्दम्य, धैर्यवान वृत्तीपुढे बोल बोल म्हणता नांगीच टाकतात. अक्षय्य चिकाटी, अपराजय, निर्धार, व अपार उद्योगशीलता ह्यांच्या समुच्चयामुळेच केवळ आतापर्यंत अनेकांनी यश प्राप्त केले. त्यांच्याजवळ नव्हती लोकविलक्षण बुद्धिमत्ता, का नव्हते अपूर्व चातुर्य. पण त्यांना साधलेल्या प्रगतिशील जीवनधारणेसाठी आवश्यक असलेली-स्वयंशासन व स्वयंसंस्करण, दोन्ही त्यांच्याजवळ प्रचुर प्रमाणात होती. तुमची विचारधारा ज्या दिशेने व जेवढ्या पातळीने प्रवाहित होत राहते त्या दिशा व पातळी, ह्यांच्या अनुसार तुमचे दैव घडत बनत जात असते. सदसद्विवेकबुद्धीला अनुसरुन तुम्ही वागत चला आतल्या आवाजाचा नेहमी कौल घेत रहा. कार्यसाधनेत दुर्दम्यपणे रत रहा. तुमचे जीवन इष्ट आकारच धरील.

卐

**JUNE 17**

## राष्ट्रीय ज्येष्ठ २८

# डोळ्यांत तेल

जाणीवपूर्वक चांगलेच विचार मनांत खेळविण्याची इष्ट सवय जिवाला पद्धतशीरपणे जडवून घ्या. डोळयात तेल घालून जागरुक रहा आणि कुविचारांना थारा न मिळण्यासाठी सद्विचारांचीच कास सतत धरण्याचा प्रयत्न करा. अनिष्ट, चूक व दुष्ट विचारांबाबत बोटचेपेपणा–तडजोड औषधालाही नको. वाटाघाटीतसुद्धा पण अनैतिक विचारांच्या वाऱ्याला उभे राहू नका. निंद्य विचाराच्या पगडयांतून सुटण्याचा मार्ग एकच. सद्विचारांची निपज वाढविण्याचे स्वसामर्थ्य वृद्धिंगत करणे. ह्यासाठी उत्तम साधन म्हणजे सद्विचारांचे वाचन, मनन, चिंतन. अधून मधून मनांत सुविचार खेळणे जर आवश्यक असेल, तर मग तसे सदासर्वकाळ घडू देणे कितीतरी अधिक हितकर नाही कां ? दुष्ट, गर्हणीय विचार सुचणे जितके सहजपणे घडते, तितक्याच अनायासाने शक्य असते उत्तम विचार मनांत उद्भवणे एकदा तुमच्या मनाला ही संवय जडली की तुमचे अगणित फायदे होतील; शिवाय ईश्वरीय कृपेचा सतत लाभ तुम्हाला होत जाईल तो वेगळाच. उत्तम विचारांची परिणति उत्तम आचारांतच होणार. त्यामुळे तुमच्या दैनंदिन जीवनाला एक नवा व विशाल अर्थ प्राप्त होईल. तुमची-वागणूक, आचरण, वर्तन - सारी खऱ्या अर्थाने स्वतंत्र व स्वतःच्या धाटणीची अशी बनतात. सुविचारांच्या खतपाण्याने आत्मविश्वासाचे रोपटे, नुसतेच रुजते. अंकुरते असे नाही, तर ते फोफावतेही.

★

## JUNE 18

## राष्ट्रीय ज्येष्ठ २९

# हसावे साडेसातीतही

इष्टमित्रांनी घेरलेले आहात, ऐश्वर्यात लोळत आहात, कीर्ति-शिखरावर आरुढ आहात; अशावेळी हसतमुख, आनंदी, समाधानी असलात, तर त्यांत नवलाचे असे काय ? प्रश्न आहे, जेव्हा सारे तुमच्याविरुद्ध नि विपरीत घडू लागते, साडेसाती ओढवते, तेव्हा तुम्ही कसे वागता हा. मित्र विश्वासघात करतात, सहकारी पाठ फिरवितात, योजलेले बेत फिसकटतात, आराखडे चुकतात, दुर्धर आजाराचा विळखा पडतो, लक्ष्मी सोडून जाते, हुद्दा निसटतो, सगेसोयरे उलटतात; अशा समयी तुमच्या वृत्तीची, उमेदीची कसोटी लागते. नशिबाने तोंड फिरवलेले असताना, दुर्दैव हात धुवून मागे लागलेले असताना परिस्थितीकडे तत्त्वचिंतकाच्या अलिप्त भूमिकेतून पहा आणि हातातल्या कार्यावर मन एकाग्र करा; मित्राने तुम्हाला तोंडघशी पाडले असले तरी त्याला उदार मनाने क्षमा करा. आपल्या जीवनाच्या प्रमुख उद्दिष्टापासून तसूमात्र विचलित होऊ नका. एखादी घोर निराशा, दारुण अपेक्षाभंग, पदरी पडले असले तरी खचू नका, उलट छाती दुप्पट पुढे काढा. धैर्याने वागून अंगीकृत ध्येयापासून जरापण ढळू नका. घडेना सगळे विपरीत, हताश होऊ नका, चिंताग्रस्त बनू नका, लटपटू नका. तर कंबर कसून हसतमुखाने कर्तव्यपथावर अग्रसर व्हा. प्रतिकूल परिस्थितीतही हसू शकलात तर तुम्ही बावनकशी.

卐

JUNE 19

# घातक वाचाळता

अतिवडबड करणे मनुष्याला जीवनात घातकच ठरते. यशप्राप्तीच्या दृष्टीने वावदूकपणा ही पूर्णतया विनाशकारी सवय आहे. ती अनेक चुका व विविध गैरसमजुतींना कारणीभूत ठरते जिभेला लगाम घालण्याने या चुका-गैरसमज टळू शकतात. वाचाळपणा करण्याने तोंडून कित्येक घोडचुका घडतात. वटवटीच्या आहारी जाण्याने अतिशयोक्ती केली जाते फटकळपणामुळे लोकांचे अपमान होतात. आपली अहंता सुखविण्यासाठी मनुष्य असला तोंडाळ स्वार्थीपणा करीत असतो. त्यासाठी तो इतरांचा वेळ जबरदस्तीने लाटीत असतो, त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहत असतो. या दुष्ट सवयीचा बीमोड करायचा तर आधी ताबडतोब तोंडाला कुलूप ठोकणे. मग पुढले पाऊल म्हणजे इतरांचे म्हणणे ऐकण्याची, समजून घेण्याची, ग्रहण करण्याची प्रवृत्ति जोपासण्याचा निर्धार करणे. दुसऱ्याची उत्कंठा वाढविण्यासाठी, उत्सुकता ताणण्यासाठी, मुद्याला न येता, जिभेची रंगणी घोडदौड चालू ठेवणे कित्येकदा अंततोगत्वा नुकसानकारक ठरते बेताल बडबड म्हणजे जिभेवरील नियंत्रण सुटल्याचेच लक्षण. हा अतिवटवट करण्याचा वाचाळपणाचा रोग अनेकांना जडलेला असतो. कितीतरी हास्यास्पद विवाद. व बहुंग बेबनाव या अनिष्ट सवयीपायीच उद्‌भवतात. मौन धारण व अतिसंभाषण या दोन ध्रुवांमधील सुवर्णमध्यी विषुववृत्तावर ठाकता येणे खूपच उपयुक्त, विधायक आणि म्हणून आवश्यक ठरते.

●

JUNE 20

राष्ट्रीय ज्येष्ठ ३१

# ढळू द्या एकाग्रता

माणसाला सठीसहामासी तरी अधून मधून सुस्त बनण्याची नितांत गरज असते. धनुष्य कायमच प्रत्यंचा चढवलेले ठेवले तर? त्याची शक्ति अर्थातच ओसरत जाणार. तसेच मनुष्याचे होते. मन सतत एकाग्र ठेवले तर ते अतिश्रमाने दुबळे बनेल. म्हणून दिवसाकाठी काही वेळ तरी मान, हात, पाय सारे शिथिल सोडून प्रत्येकाने शवासन करावे. शरीर व मन दोन्ही त्यानंतर ताजोतवानी बनतात. संधी मिळताच सर्व शिरा मोकळ्या सोडत चला. वाहनांतून चालला असाल तर आंत डोळे मिटून पूर्ण स्वस्थ व्हा. जसे काही, मोकळेपणाने तुम्ही तुमचे शरीर तात्पुरते दूर टाकून दिले आहे. विश्रांतीने सामर्थ्य वाढते. कष्टांइतकेच आरामालाही महत्त्व आहे. आराम हराम खरा, पण केव्हां? जर तो अति झाला तर किंवा फक्त तोच करीत राहिले तर. विश्रांतीनंतर, आरामानंतर, शैथिल्या-नंतर काम करताना मेंदू जास्त तरतरीत झालेला असतो, जोम वाढलेला असतो, चेव चढलेला असतो. शिवाय काम करतांनाही एक पथ्य पाळावे. वृत्तीचा तोल राखून, स्वतःचा वकूब जोखून, काम करावे, काम पत्करावे. घेमार घेणे दरवेळी आवश्यक वा हितावह नसते. आपल्या विविध शक्तींना वाव अवश्य द्या. पण सतत कार्यमग्नच राहण्याचा धोशा मनाला नसावा. ढळू द्या केव्हा केव्हा एकाग्रता, ठेवा बाजूला जरा वेळ कार्यमग्नता, द्या वाव अधून मधून शैथिल्याला. - मात्र जरासाच हं!

☆

JUNE 21

## राष्ट्रीय आषाढ १

## (ज्येष्ठ शु. १३, सावित्री व्रतारंभ)

# घातक घाई

निष्कारण अवाच्यासवा घिसाडघाई करणाऱ्यांच्या हातून फार कमी प्रत्यक्ष कार्य घडते. सत्यवानाच्या पुनर्प्राप्तीसाठी काळावरही मात करण्याच्या आपल्या योजनेची आखणी सावित्रीने मोठ्या काळजीपूर्वकतेने व मुत्सद्दीपणे केली होती. ती पार पाडण्यासाठी तिने धीरगंभीरपणे, आत्मविश्वासाने, धांदल न करता निर्धारपूर्वक पावले टाकला. शांत मनाने, स्थिरपणे विचार करु शकल्याने तिला अशी प्रभावी युक्ति-कल्पना सुचू शकली. भावनाच्या, शोकावेगाच्या घाईने आहारी न गेल्यामुळेच बिनचूक निर्णय घेऊन तिला साक्षात् यमावरही कुरघोडी करुन दाखविता आली. विविध कार्याच्या धुमाकुळांत मतामतांचा गलबला धुडगूस, कोलाहल माजलेले असताना धांदलीने घाईने केलेले काम, योजलेले बेत यशस्वी ठरणे दुरापास्तच. सारे काही शांतपणे, निश्चयात्मकतेने, धांदरटपणा न करता पार पाडण्याची संवय एकदा रुजली, की मग जास्त कामे पदरांत पडू लागतात, ती अधिक निपुणतेने घडतात आणि सरतेशेवटी आपली सारी योग्यता उत्तमप्रकारे सार्थकी लावता आल्याचे समाधान पदरी पडते. अशा तऱ्हेने हाती घेतलेले प्रत्येक काम स्थिर वृत्तीने घाई न करता तडीस नेता आल्याने तुम्ही मनानेही साहजिकच उल्हसित राहू शकाल. आणि उत्तरोत्तर महत्तर अशी कार्ये हाती घेण्यास तुम्ही सतत उद्युक्त रहाल. मात्र यासाठी एक खबरदारी घेणे फार महत्वाचे आहे. कुठल्याही कार्याला हात घालताना घातक घाई अजिबात वर्ज्य.

JUNE 22

# राष्ट्रीय आषाढ २

# बंधुद्वय

तुमच्या डळमळलेल्या निश्चयांना पुनर्स्थापित करण्याचा, लटपटलेल्या निश्चयांचा जीर्णोद्धार घडविण्याचा उपाय एकच, नि तोही तुमच्याच हाती असतो. तो म्हणजे तोच निश्चय, उच्चार करुन, दृढतर निर्धाराने, आणि अधिक आग्रहाने पुन: नव्याने करणे. तुम्हाला निश्चितपणे काय करावयाचे आहे, याचे नित्य स्मरण रहावे म्हणून आपले निश्चय पांढऱ्यावर काळे करुन ठेवणे अधिक इष्ट. मनस्तिष्ठित निश्चय अशा प्रकारे दृग्गोचर झाल्याने तुमचा व्यक्तिश: जास्त लाभ होतो हें नीट लक्षांत घ्या. केलेले निश्चय आयुष्यांत तडीला जाण्यासाठी त्यांना लागेल तितक्यांदा पुनरुज्जीवित करीत रहा, वाटल्यास ते निश्चय मोठ्याने घोका पण; किंवा इतरांच्या समोर ते प्रकट करा. मग निश्चयपालनासाठी आपल्यावर अप्रत्यक्षपणे इतरांचे दडपण राहते. पुष्कळांना स्वमूल्यांकन रास्तपणे करणे नीट जमत नाही. पण प्रत्येकाने आपल्याजवळचा, इच्छाशक्ति, पुढाकारिता व खंबीरपणा यांचा अभाव नीट ओळखून घेऊन ती तूट भरुन काढली पाहिजे. तुमची ध्येयधोरणे, उद्दीष्टे, खूप उच्च प्रतीची असतातच. पण ती सर्व फलद्रुप होण्यासाठी त्यांना तुमच्या निर्णयशक्तीची, निर्धाराची व निरलसतेची पुरेपूर जोड लाभू द्या. रोज रात्री शयन करण्यापूर्वी, दिवसात आपल्या हातून काय गाठी बांधले गेले, याचा नीट आढावा काढा व दुसऱ्या दिवशी त्याचे प्रमाण वाढविण्यासाठी कंबर कसा. चिकित्सक आत्मपरिक्षण व निर्धारपूर्ण निश्चयपालन, दोन्ही प्रगतिप्राप्त्यर्थ मदत करतात. या बंधुद्वयाच्या सहाय्याला मुकू नका.

**JUNE 23**

# राष्ट्रीय आषाढ ३

## (ज्येष्ठ शु. १५, वटपौर्णिमा)

# नित्य मितव्यायाम

शरीरात जोम टिकवून काटकपणा वाढविण्यासाठी करावयाचे शारीरिक व्यायाम संथ, सावकाश, नियमित व लयबद्ध अशा स्वरुपाचे असावेत. त्यासाठी काही खास उपकरणेही नकोत. रानात लाकडे तोडणाऱ्या सत्यवानाला त्याची कुऱ्हाड हे पुरेसे उपकरण झाले. लाकुडतोडीच्या उत्कृष्ट व्यायामाने शरीर व मन दोन्ही बांधेसूद बनली होती. त्याची हृदयक्रिया अचानकच बंद पडल्यावर न डगमगता, प्रसंगावधानी सावित्रीने छातीला मालीश करुन व तोंडातून कृत्रिम श्वासोच्छ्वास आपल्या तोंडाने फुंकून त्याची हृदयक्रिया पुन्हा चालू करण्यात यश मिळविले. पण मुळात नित्य व्यायामाने सत्यवानाचे शरीर व हृदय दोन्ही उत्तम प्रकारे धडधाकट बनलेली होती. म्हणूनच सावित्रीला असे अपूर्व यश लाभले ती सावलीप्रमाणे पाठीशी राहिली या तपश्चर्येचेही हे फळ होतेच. तर नित्य व्यायामावर भर देताना व्यायाम अति होत नाही हेही बघणे महत्वाचे. विसाव्या वा तिसाव्या वर्षी करावयाच्या व्यायामापेक्षा पन्नाशीतल्या माणसाने करावयाचे व्यायाम हलके म्हणजे कमी कष्टाचे असावेत, हे उघड आहे. मिताहार, मितभाषण यांच्याप्रमाणेच मितव्यायामही आयुष्यात हितावह ठरतो. प्रकृति निरोगी राखण्यासाठी नियमित व्यायामाच्याच जोडीनें स्वच्छ, ताजी मोकळी हवाही तितकीच आवश्यक, हितावह व गुणकारी असते. रानातील प्राणवायुप्रधान शुद्ध अदूषित हवेचाही सत्यवानाच्या पुनरुज्जीवनात तितकीच मोठा वाटा होता. पहाटे उठून बाहेर मोकळ्यावर फिरायला गेल्यास ताजी हवा लाभून वर व्यायामही साधतो.

– ० –

**JUNE 24**

राष्ट्रीय आषाढ ४

# भर विचारांपेक्षा आचारांवर

तुम्ही मनात बाळगीत असलेले विचार व तत्वे कृतीत उतरवा. तुमच्या कोरड्या विचारांना महत्व नसून तदनुसार आचार असण्याला खरी किंमत आहे. थंड पडलेल्या तुमच्या ध्येयकल्पनांना नीट चेतवा. सुप्त अशा, निद्रिस्त आकांक्षा जेव्हा कृतीत साकार होतात तेव्हाच नि तरच त्यांना मोल चढते. तुमचे उत्कृष्ट विचार तुम्हाला कार्यप्रवण बनवू देत. त्याना उच्चार देऊन इतरांसमोर ते प्रकट करा. म्हणजे लोकलाजेस्तवही तुम्ही तदनुसार आचरण करण्यास उद्युक्त रहाल. लोक काय म्हणतील या मनावरच्या धास्तीचा असा फायदा मिळवा. तुमची स्वप्ने सत्यांत रुपांतरीत व्हावीत, तुमचे निर्धार प्रत्यक्षात समूर्त ठाकावेत म्हणून आटोकाट प्रयत्न करा. आकांक्षा, तत्वे, निर्धार, व ध्येये यांनी मिळूनच तुमच्या ठायीचे व्यक्तिगत आंतरिक सामर्थ्य बनत असते. हे शक्तिसामर्थ्य दैनंदिन जीवनात तुम्ही कशा प्रकारे वापरता यावर मुख्यत: तुम्हाला लाभणाऱ्या यशाचे प्रमाण अवलंबून राहते. या परम महत्वाच्या बाबींबाबत चरम दक्षता दाखवा. चाणाक्षपणे तुमची ' आ. त. नि.-ध्ये' अंमलात आणा, म्हणजे कार्यसिद्धी तुम्हाला निरपवादपणे माळ घालणारच तुमचे मनोबल व शक्तिसामर्थ्य तुम्ही किती सुयोग्य इष्ट रीत्या नेमके वापरुन दाखवता यावरच तुमच्या पदरात पडणाऱ्या यशोलाभाचे प्रमाण ठरणार आहे. विचार उच्चारांच्या मदतीने आचारात उतरवा.

★

JUNE 25

# राष्ट्रीय आषाढ ५

# गुणग्राहकता

सुखावह, सुंदर, सुविधायक असे जे, जेवढे, जिथे आढळेल तेवढे तेवढे नीट वेचायला शिका. निरर्थक वा नाउमेद करणाऱ्या किंवा नकारवृत्तीच्या बाबींना, विचारांना, कल्पनांना, थारा देऊन व्यर्थ दवडण्याइतके तुमचे जीवन क्षुद्र क:पदार्थ नाही. ते कारणी लागण्यासाठी कृतज्ञता व गुणग्राहकता यांची नीट जोपासना करुन दोन्ही आपल्या वृत्तीत नीट बाणवा. प्रत्येक व्यक्तीत, बाबतीत व वृत्तीत जे जे उत्कृष्ट म्हणून सापडेल ते चोखंदळपणे स्वीकारा. हा अपूर्व, सुंदर, अप्राप्य असा मानव जन्म आपल्याला लाभला याबद्दल त्या जगन्नियंत्याचे ऋण माना. सभोवतालच्यांच्याबद्दल नेहमी अनुकूल असाच ग्रह करुन घ्या आणि त्यांना आपल्या विचारांचा, प्रोत्साहनाचा, मदतीचा भरपूर फायदा द्या. तुमच्या संवयींचा, सद्गुणांचा, सत्कृत्यांचा तुमच्या कार्यसिद्धीच्या प्रमाणावर खूप व इष्ट असाच प्रभाव, परिणाम, पडणारच. तेव्हा आपल्या कुवतीबाबत आत्मविश्वास व कर्तबगारीवर श्रद्धा असू द्या. म्हणजे तुमची प्रगति ताबडतोब गती घेईल. तुमचे मन म्हणजे अशी तशी फालतू यंत्रशाळा नव्हे. तिथे कल्पना जन्मतात, योजना आकार घेतात, आराखडे बनतात, नवे शोध लागतात, विचार सुचतात, उपकरणे रुप धरतात. या प्रयोगशाळेंत बुद्धिप्रकृति व कार्यपुरुष यांचे तादात्म्य होऊन कृतिबालक अवतरते. पण हे सारे घडण्यासाठी मुळांत अंगी गुणग्राहकता बिंबायला हवी.

≈

JUNE 26

# खोल चिंतन, सुदीर्घ मनन

एखादे निवडक, वेचक, मार्मिक सुभाषित मनांत आणून त्यावर सखोल, सर्वंकष, व साररुप चिंतन चालविणे, त्याचे सुदीर्घ मनन करुन ते सर्वार्थाने आत्मसात् करणे, हा, तुमचा फावला वेळ सार्थकतेने व्यतीत होऊन सत्कारणी लागण्याचा एक उत्तम मार्ग होय. गरज लागताच उपयोगी पडतील असे कित्येक, प्रभावी प्रेरणादायी सुविचार अशा रीतीने तुम्हाला तुमच्या मनोभांडारात प्रचुर प्रमाणांत साठवून ठेवता येतील. अशा योग्यतेचे पुढील सुविचार नमुन्यादाखल म्हणून दिले आहेत. त्यावर खोल चिंतन, सुदीर्घ मनन करा:- तो दयाघन, दीननाथ, साकार प्रेममूर्ती आहे.

सत्याच्या पायावरच आत्मज्ञानमंदिराची उभारणी होऊ शकते.

चपखल चेतनामय चिदात्मा चिरंतन व चिरशाश्वत आहे.

सुयोग्य विचारमंथन करणे म्हणजेच तर नित्य प्रभूप्रार्थना घडणे.

सत्यशिवसुंदराची कास, मतलबासाठी नव्हे परमार्थासाठीच, धरावयाची.

श्रद्धा वा निष्ठा, सर्वथा सर्वदा, निरपवादपणे निर्माणक्षमच असतात.

वेळाचा काटकसरी सदुपयोग करता येण्याने मन परिपक्व होत जाते.

सज्जनांची भलावणी, शिकवणी, आत्मज्ञानशिक्षणाला कारणीभूत होते.

थोर ग्रंथ समग्र जीवनाच्या तोलामोलाचे निर्विवाद पर्याय होत.

सुखीसमाधानी जीवन, हेच प्रगतीच्या मार्गावरील वाटचालीचे लक्षण.

लाभलेली अंतस्फूर्ति हा चिरंतन आनंदाचा ठेवा असतो.

दरिद्रनारायणाच्या सेवेपेक्षा परमेश्वराची पूजा वेगळी नाही.

मन:शांति असते आपल्याच हाती, नाही अवलंबून कोणावर, कशावर.

संकटमूळ अहंकाराचा त्याग हे साक्षेपी सुखप्राप्तीचे साधन होय.

राष्ट्रीय आषाढ ७

# पाऊल, पुढेच पडण्यासाठी

यशाने हातावर मुळीच तुरी ठेवण्यापेक्षा ते उशीरा हाती गवसले तरी हरकत नाही. तुम्ही स्वतःचा मान स्वतःच आधी राखलात तरच इतरही तुमचा मान राखतील. निष्क्रिय न राहता सतत छोटया मोठया कार्यांत मग्न राहणे ही एक उपयुक्त, आवश्यक व हितावह संवय आहे. इतरांच्यावर सहानुभूतीचा वर्षाव करण्याने स्वतःचा दुःखभार हलका होतो. प्रत्येक वेळी सततपणे करणात्मक आशावादी दृष्टिकोन बाळगला की आयुष्य कंटाळवाणे, नीरस व भारभूत वाटत नाही. स्वतः कशांत तरी गुंगून बुडुन जा, मग आपोआपच, साहजिकपणें, सतत, लोक तुमच्यांत गुंगलेले राहतील. ज्ञानाचे जड, व्यर्थ, निरुपयोगी ओझे ज्ञानकोशांतच पडून राहू द्या, आणि तुम्ही आपली बुद्धि, मन, वृत्ति स्वतंत्र मौलिक मनन-चिंतनासाठी मोकळी ठेवा. मित्राजवळ तर उधार मागू नकाच पण कोणाकडूनच कांहीही उधार घेऊ नका कधीच. 'पुढे' आपत्ति कोसळणार आहे या कुशंकेने व्यर्थ दबकून जाऊ नका, कारण तो 'पुढे' कायम पुढेच राहील, 'आता' होणार नाही हेच जास्त शक्य असेल. अंतरंगात जसे तुम्ही आहात तसेच दिसण्या-वागण्याचा परिपाठ ठेवा, उगीच मुखवटे चढवून नसलेले असण्याचा आव आणू नका. पाऊल उचलल्यानंतर ते पुढेच टाकणार, मागे घेणार नाही अशी धम्मक बाळगा, आणि पाऊल पुढे पडणारच ते योग्य व निवडलेल्या पथावरच, याबद्दल जागरुक, खबरदार व सतर्क रहा.

JUNE 28

## राष्ट्रीय आषाढ ८

# ग्रंथराजाचे मार्गदर्शन

जीवनाचा मार्ग चोखाळण्यांत यशस्वी होण्याची युक्ति ग्रंथराज भगवद्गीतेंत सुस्पष्टपणे समजावून दिलेली आहे. भगवंताच्या या वचनाना हरताळ फासून, त्यांना धाब्यावर बसवून, त्यांची अवहेलना करुन, तुम्हाला क्षणभरही सुखाने जगता येणार नाही. व्यवहारांत पावलोपावली नेकीने, सचोटीने वागण्याची नितांत गरज आहे. प्रत्येक करावयाचे कृत्य भगवंतप्रणीत कसोटीवर कसाला लावले जावे. भगवंतानी अशा विविध कसोटया गीतेच्या श्लोका-श्लोकांतून दाखवून दिल्या आहेत. त्यांचे सखोल चिंतन करा, मनन पूर्वक अध्ययन करा; त्यांना मार्गदर्शक सल्लागार माना. त्या कसोटयांच्या लख्ख प्रकाशांत तुम्हाला जीवनमार्गावर सुलभपणे वाटचाल करता येईल, अडखळायला ठेचाळायला होणार नाहीं. गीताव्यासंगाने आत्मिक सत्वगुण जोपासले जातात. प्रेम, आनंद, सहनशीलता, शांति, कोमलता भलाई, लीनता, श्रद्धा, सोशिकपणा हे गुण, गीतापुरस्कृत निष्काम कर्म[illegible]चा जीवनात अवलंब केल्याने, अंगी बाणतात. जीवा, ऊठ; भानावर ये. कर्मफलाबद्दल निरिच्छ राहून कर्तव्यबुद्धीने लोकसेवा करण्याच्या आपल्या वंशपरंपरागत ब्रीदाला आतातरी जाग. आपल्या नियोजित जीवनकार्यार्थ स्वतःला धैर्याने, तडफेने, ईर्षेने वाहून घे. निवडून स्वीकारलेल्या आपल्या जीवन-व्यवसायाला स्वतः पूर्णपणे लायक आहो, हे तू सप्रमाण सिद्ध कर.

JUNE 29

# डावाच व्यवसाय, छंदच उजवा

तुमचा चालू दैनंदिन जीवनव्यवसाय कितीही रंजक, मन गुंतवून, ठेवणारा आवडता असला तरी विरंगुळ्यासाठी, चाकोरीतून बाहेर पडण्यासाठी बदल म्हणूनही, एखादा छंद जिवाला जडवून घ्यावा हें बरे. मेंदू काय, शरीर काय, दोन्हीही पुनरावृत्तीला विटणारच. घाण्याच्या बैलासारखा झापडे लावून चालणारा मनुष्य प्रसंगोपात्त नुकसानीचा धनी तर होतोच पण वरती हे नुकसान लाभाच्या प्रमाणाहून बरेच जास्त ठरते. बागकाम, संगीत, भाषाध्ययन, हस्तव्यवसाय, चित्रकला, लेखन ह्यासारखे कितीतरी, अन्यान्य, विविध छंद असतात. जीव काही काळ अशा छंदात रमल्यावर तो रोजच्या व्यवसायाकडे नव्या हुरुपानें जोमाने, उद्दिष्टानेसुद्धा वळतो. ज्या माणसाला वाढत्या वयाबरोबर नव्या, निरनिराळ्या विषयांत गोडी लागू लागते आणि आपल्या विशिष्ट छंदात अवीट गोडी उपभोगता येते, विरंगुळा वाटतो मन हलके झालेसे वाटते तो खरा सर्वांत सुखी मनुष्य होय. तुमचे रोजचे काम आवडते, मनाजोगते, हितकारक असेल तर उत्तमच, पण त्याशिवाय तुमच्या जिवाला जर कोणताही एखादा छानसा छंद जडलेला असेल तर तें सोन्याहून पिवळे ठरेल. या दृष्टिकोनातून पाहिल्यास, व्यवसाय तसा डावाच ठरतो. पण छंद मात्र उघड उघड उजवा दिसतो.

## राष्ट्रीय आषाढ १०

# ज्ञानार्जन कष्टसाध्यच

विद्वत्ता मिळविण्यासाठी केवळ राजमार्गानेच वाटचाल करता येते इतर कोणत्याही जवळच्या पाउलवाटा उपलब्ध नसतात. पूर्णत्व, अचूकपणा व मग्नता या त्रयीची कास धरली तरच उच्च ज्ञानप्राप्ति होते. नुसते वरवरचे वाचन किंवा अनियमित लहरीनुसार अभ्यास यांनी फार तर तुमच्या माहितीत थोडीफार भर पडू शकेलही. पण या उठवळ पद्धतीने ज्ञानवृद्धि वा शीलवर्धन घडणार नाही. सामान्य कर्तृत्वशक्तीशीसुद्धा असामान्य उद्योगशीलतेची सांगड पडल्यास अद्भुत कार्यसिद्धी प्राप्त होऊन जाते. बौद्धिक सामर्थ्य केवळ ईश्वरदत्तच नसून ते स्वप्रयत्नाने, स्वकष्टाने वाढविता येऊ शकते. जिवापाड मेहनतीचे दाम मोजल्याशिवाय खरे ज्ञान पदरात पडत नाही. तुमच्याजवळ सध्या विद्यमान असलेल्या मानसिक शक्तींचा उपयोग करीत राहिल्यानेच नवीन शक्तींचा उद्भव होत असतो. बौद्धिक सामर्थ्य हे काही केवळ स्वसमाधानासाठी किंवा डामडौल दाखवीत इतरांपुढे मिरविण्यासाठी वा प्रदर्शन करण्यासाठी खचितच नसते. त्यायोगे तुम्ही आपली कर्तबगारी, उपयोगिता व कार्यसाधनशक्ति यात वाढ करुन घ्यावयाची असते. ज्ञानार्जनासाठी खर्च झालेला वेळ वाया गेला असे कधीच होत नाही. ज्ञानार्जनाच्या एकाच दगडांत ज्ञानवृद्धि व शीलवर्धन हे दोन पक्षी. पडत असतात. करा तर सुरु वाटचाल राजमार्गानेच विद्वान् बनण्यासाठी.

JULY 1

# राष्ट्रीय आषाढ ११

# ऐहिकाच्या पलीकडे

त्या कनवाळू दीनवत्सलाच्या साहचर्याची आस लागण्याने, आधारासाठी त्याच्यावर भार टाकण्याने आणि मनोभावे त्यास शरण जाण्याने ते परम आनंद निधान गवसत असते. ते गवसल्यावर, तुमचा थाट काय विचारावा! इह लौकीक मानसन्मानाची भ्रामकता, ऐश्वर्याचा पोकळपणा, ऐहिक थाटाची नश्वरता, स्वार्थसाधनेंतला मूर्खपणा आणि ऐहिक भोगाची, ऐश्वर्याची व्यर्थता सर्वत्र प्रतीत होत आहेत. जिवाचे मात्र एकदा का शिवाशी दैनंदीन हितगुज साधू लागले की खुलणारा मानसिक थाट वाढणारा परमानंद व लाभणारा मनोभोग यांच्यापुढे ऐहिक जीवनांत मिळू शकणारी चैनचंगळ लाभणारा थाट वा प्राप्त होणारे ऐश्वर्य दोन्ही तुच्छ वाटू लागतात. या आध्यात्मिक प्रितिभोजनाच्या पंगतीच्या थाटाचा लाभ घेऊन परमेश्वरी संकेतानी आपली आध्यात्मिक भूक भागविण्याची सुवर्णसंधि आपल्याला लाभलेली आहे. त्या जगत्पित्याचा आपणा संतानावर कायमचा वरदहस्त असणारच अशी जी मनोमन खात्री पटते तिचे सर्वश्रेष्ठ मूल्य लक्षांत घ्यावयास हवे. महान् संतमहात्म्यांच्या, थोर देवभक्तांच्या आणि वंदनीय धर्मसंस्थापकांच्या चरित्रांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवणे म्हणजेच परमेश्वराच्या सान्निध्यांत, सख्यसंबंधांत, सहवासात वावरणे होय. ऐहिकाच्या पलिकडला काही पारलौकीक थाटही जोडण्यासाठी मानवाने सतत प्रयत्नशील राहण्याची नितांत आवश्यकता आहे.

**JULY 2**

# आढावा व साफसफाई

प्रत्यही दिनान्ती निद्राधीन होण्यापूर्वी दिवसभराच्या विचारांचे व कृत्यांचे मनाशी समीक्षापूर्वक परिक्षण करा. ठरवा कोणते विचार-आचार सुयोग्य सन्मार्गी होते, आणि कोणते अयोग्य, उन्मार्गी. तुमच्या व्यक्तिमत्वात डोकावणारे दोष अशा दैनिक आत्मपरिक्षणामुळे काढून टाकणे तुम्हाला सुलभ व शक्य होईल. तुमच्या बचतपेढीपुस्तिकेहून स्वतःच्या जीवनाची रोजकीर्द जास्त महत्वाची, अगत्याची व उपयुक्त असते. रोज किती रुपये वाचवून संग्रहात वाढविलेत यापेक्षा स्वचारित्र्याच्या जमेच्या बाजूला दिनान्ती काय जोडलेत हे अधिक मूल्यवान् आहे या ऐहिक जीवनाच्या समाप्तीच्या समयी तुम्ही जमविलेल्या जमीनजुमला-मालमत्तेपेक्षा तुमच्या आध्यात्मिक ऐश्वर्याचे वैभव कितीतरी पटीने अधिक मोलाचे असते. अधून-मधून तुमच्या मनोगृहाचे सांदीकोपरे नियमपूर्वक झाडूनझटकून दुर्विचाराची जळमटे कोळीष्टके नष्ट करीत चला. अशी वेळोवेळी साफसफाई होणें अत्यावश्यक आहे. म्हणजे गलिच्छ कल्पनांचा केरकचरा गोळा होऊन राहत नाही. याबाबत चालढकल चालविणे घातक होईल, म्हणून डोळ्यांत तेल घालून दक्ष रहा. अपकृत्य व गैरविचार यांना तुमच्या मनोमंदिराकडे फटकूसुद्धा देऊ नका. तेव्हा तुमच्या जीवनकीर्दीत रोजचा आढावा दाखल करीत चला आणि आपल्या मनोगृहाची दैनंदीन साफसफाई करण्यास चुकू नका.

卐

राष्ट्रीय आषाढ १३

# शाबासकीसाठी नको

तुमच्याहातून जेवढे काही घडत असेल, त्याच्या दर्जावर, गुणवत्तेवर भर असू द्या. किती, केवढे, घडले याला महत्त्व जवळ जवळ नाहीच. बाह्य भपक्याच्या आकर्षकतेवर जोर न देता, स्वभावतःच जे गुणवत्तेत श्रेष्ठ ठरेल त्याची निर्मिती करण्याचे मुख्य उद्दिष्ट तुम्ही तुमच्या दैनंदिन जीवनांत पाळू लागलात की मग इतरांकडूनच्या प्रशस्तीची–पसंतीची पर्वा न ठेवणे तुम्हाला सहज परवडेल. प्रयत्नांची शर्थ केल्याने काम मनाजोगे पार पडले आहे अशी स्वतःशीच आंतरिक जाणीव - समाधान मिळणे हेच त्या कार्यसिद्धीचे स्वयं-पारितोषिक होय. पाठपुरावा करावा 'उत्तम' घडवण्याचा, 'पुष्कळ'चा नको. काम नीट होण्यासाठी त्यावर ध्यान एकवटावे लागते. आणि असे ध्यान एकवटण्यासाठी ते काम मनापासून आवडावे लागते. सर्व जगन्मान्य वास्तुविशारद, शिल्पकार, चित्रकार, आपले कार्य योजल्यावर मनापासून कळकळीने, एकाग्रतेने ध्यान देऊन ते जाणीवपूर्वक तडीला नेत. स्वीकृत कार्यात तुम्ही ज्या प्रमाणांत गुणवत्तेवर भर ठेवाल, शाबासकी - मान्यता यांची आस न धरता कार्यनिष्पत्ति उत्तम होण्यावर जोर द्याल त्या प्रमाणांत अशा थोरांच्या पंगतीत जाऊन बसण्याचा मान तुम्हालाही लाभू शकेल. यासाठी मिळणाऱ्या सुवर्णसंधीचा तुटवडा नाही, त्यांना पारही नाही. पण त्यांतली एक लाभल्यानंतर आपल्या निर्मितीच्या गुणवत्तेवर, श्रेष्ठतेवर, उत्कृष्टतेवर भर ठेवा. शाबासकी, काय! सापेक्ष वस्तु आहे.

★

JULY 4

# राष्ट्रीय आषाढ १४

# नियंत्रण वृत्तींवर

चिंता, चीड, विरोध व घाबरटपणा या मनोवृत्तींचा परिणाम भलताच घातक आणि पृथकत्वकारी असतो हे तुम्ही बरोबर ओळखले पाहिजे. म्हणजे मग या चारी शत्रूंना तुम्ही जीवनांत कटाक्षाने अजिबात डोके वर काढू देणार नाहीत. शारीरिक जोमाचा पुरेशा प्रमाणांत संचय वाढायला हवा असेल तर निष्कारण घाबरेपणा निर्माण करणारी बिकट मानसिक स्थिति, ओढाताण व उत्तेजनाही सारी टाळली पाहिजेत. घाईगर्दी, चिंता, काळजी व धास्ती या मनोवृत्तीचा वरचष्मा झाला की काम बिघडणारच, हे नक्की समजावे. काम फत्ते व्हायला हवे असेल तर स्थिरशांत, संतुलित, स्वनियंत्रित अशा वृत्तीची नितान्त गरज असते. यासाठी, धनुष्याची दोरी सोडून ठेवावी तद्वत् दिवसाकाठी अनेक वेळा मन व शरीर दोघांनाही ढिले सोडीत चला. त्यानंतर तुमच्या हाती असलेल्या विद्यमान विधायक उपक्रमांचा मुद्दाम जाणीवपूर्वक स्वतःपुरताच पण प्रकटपणे उच्चार करीत रहा. सौख्य, संवाद व सुस्थिति मला हवीत व ती मी हक्काने मिळविणारच असा मनाशी ठाम निर्धार करा. निश्चय करा, की परिस्थिति कितीही का विपरीत, बिकट व कसोटी बघणारी असली तरी मी आपल्या मनाचा तोल व शांति ढळू देणार नाही. मग खात्री ठेवा की जय तुमचाच.

★

JULY 5

## राष्ट्रीय आषाढ १५

## ( ज्येष्ठ व. १२, श्रीविवेकानंद पुण्यतिथि )

# शीलचारित्र्यघडण

श्रीरामकृष्ण परमहंसशिष्य, भारतलल्लामभूत, स्वामीराज श्रीविवेकानंद यांचा हा समाधिदिन. त्या जगद्वंद्य विभूतीला या निर्वाणदिनी सादर वंदन. त्यांची थोर शिकवण जगन्मान्य झाली. त्यांच्या कांही विचारांचे आज स्मरण करुन, त्यावर मनन-चिंतन करुन, तदनुसार वर्तन ठेवणे, उचित ठरेल. शीलचारित्र्यसंवर्धना-संबंधीचे त्यांचे विचार उद्बोधक, प्रेरक व अनुसरणीय होत. ' मनुष्य जणू केंद्रस्थानी असून विश्वात्मक शक्ति त्याच्याकडे केंद्रित होतात आणि तो त्या परावर्तित करीत असतो. पाप-पुण्य, गुणदोष सुख-दुःख सारी त्याला वेढत असतात. त्यांतूनच त्याला आपले शील-चारित्र्य घडवायचे असते. ज्याच्या कानी सतत अपशब्द पडतात जो सदा दुर्विचारात बुडलेला असतो, जो नेहमी दुष्कृत्यांत गर्क राहतो, त्याच्या मनावर कायम विपरीत प्रभाव पडणारच. त्याच्या वर्तनाला त्याला नकळतच एकंदरीने अनिष्ट, अहितकर, अवाञ्छित, वळण लागणार. तो मनुष्य दुष्ट दुराचारीच बनणार. घातक शक्तीच्या हातातले तो बाहुलेच होणार. त्या शक्ति त्याच्या हातून विनाशकच कृत्ये घडविणार. हे जितके खरे, तितकेच, सद्विचार-कृत्ये त्याच्यावर सत्प्रभाव पाडतील, त्याला सदाचारी बनवतील हेही खरे. त्याच्या शीलचारित्र्याला आता योग्यच वळण लागणार हे उघड आहे. सद्विचारकृत्ये यांच्या प्रभावांत राहून शीलचारित्र्याची योग्य प्रकारे घडण करणे व्यक्तीच्याच हाती आहे. कुशल पेटीवादक काळोखांतही योग्य सुरावरच बोटे ठेवणार; तद्वत् सद्विचाऱ्याच्या हातून अभावितपणेही सत्कृत्यच घडणार.' स्वामीजींची ही विचारप्रणाली शिरोधार्य.

☆

**JULY 6**

## राष्ट्रीय आषाढ १६

# करावे सत्पात्री दान

जीवन लाभल्याचा जो आनंद तुम्ही उपभोगीत आहा, त्याबद्दल सदैव कृतज्ञता बाळगा. काम सेवा करण्याची जी संधि तुम्हाला प्राप्त झाली आहे त्यासाठी आनंद व्यक्त करा. दान देऊन परोपकार करण्याची जी संधि तुमच्या वाटचाला आली आहे त्या विषयी तुम्ही विधात्याचे ऋणी रहा. सेवेच्या, परोपकाराच्या कार्यामुळे तुमच्या चारित्र्याचे संवर्धन साधते. जीवनाला माधुरी मिळते, तुमचे दैवसुद्धा घडते. तुमच्या कार्याचे उद्दिष्ट व त्या मागची वृत्ति कल्याणकारी असली की त्यात सारे आले. मग ते कार्य महान् असो वा क्षुल्लक असो. पण ते करण्याने जीवनाचे सार्थक होणार आहे याबद्दल खात्री व समाधान, तुम्हाला दोन्ही लाभतील. परतफेड होण्याची अपेक्षा न ठेवता, सढळ हाताने रोज सत्पात्री दान करीत चला. द्यावे अगदी सहजगत्या पण अक्कलहुशारीने व पूर्ण विचारान्ती. सेवाकार्य करण्यासाठी, एखादे मोठे गाजावाजा करीत चाललेले शिबिर लागण्याची वाट पाहू नका. छोटी छोटी क्षुद्र वाटणारी सेवाकार्ये व दाने हीच जास्त उपयुक्त आणि सार्थक ठरणारी असतात त्या कमलावराने अनंत हस्तांनी तुम्हाला दिलेले असताना तुम्ही आपल्या फक्त दोनच हातांनी देऊन देऊन द्याल तरी किती! इतरांसाठी झिजण्याचे जेवढे म्हणून सद्‌गुणी प्रकार आहेत ते सर्व छोट्या वा मोठ्या प्रमाणांत अजमावून पहात असा.

# निष्ठुर निवाडा

आत्मपरीक्षणाच्या बाबतीत निरलसपणे सावधान, निखालसपणे, निःपक्षपाती व काटेकोरपणे प्रामाणिक असा. स्वमूल्यांकन केल्यावर, समजा, तुम्हाला जर असे आढळून आले की तुमच्याजवळ नैतिक शैथिल्य आहे, दुष्ट अहकार आहे, अनावर आसक्ति आहे, अमर्याद आळस आहे, तर या वस्तुस्थितीची मनाशी कठोर जाणीव बाळगून या विषवल्ली त्वरित समूळ उखडून टाकण्याचा चंग बांधा. त्यांना क्षुल्लक किंवा उपेक्षणीय समजून या दुर्गुणांकडे डोळेझाक करण्याने तुम्ही स्वतःचीच वंचना करुन घ्याल. तेव्हा हे आत्मपरीक्षण अगदी न्यायनिष्ठुरपणे केले जायला हवे. आपले दोष व उणीवा एकदा समजल्यावर मोठ्या तत्परतेने दोष झटकून टाकण्यास प्रारंभ करा, उणीवांची पूर्तता करण्याचे हाती घ्या. जीवनांत फलापेक्षारहितपणे परसेवा करण्याची वृत्ति असणे हा मोठा सद्‌गुण आहे. दानशीलवृत्ति असणे हाही तितकाच थोर दुसरा सद्‌गुण आहे. तर अशा प्रकारच्या, थोर शीलाच्या व महान चारित्र्याच्या संपादनासाठी आवश्यक त्या गुणसमुच्चयाचे स्वतःठायी बीजारोपण करण्याचा दृढ निश्चय करा. तुम्ही सध्या कसे आहात याचा आधी रामशास्त्री बाण्याने निवाडा द्या. मग तुम्हाला कसे बनावयाचे आहे याबद्दल ठाम निर्धाराने निर्णय घ्या. आता पुढला टप्पा म्हणजे क्षणही वाया न दवडता त्या दिशेने झपाट्याने, निर्धारपूर्वक, दृढपणे वाटचाल सुरु करणे हे सूज्ञास वेगळे सांगणे नलगे.

卐

# बाह्य, अंतस्‌चे, प्रतिबिंब

ज्या गोष्टींची तुम्हाला मनापासून तळमळीची आस लागते त्या सर्व खेचल्या गेल्याप्रमाणे तुमच्याकडे आकृष्ट होतात. अंतर्मनाच्या शक्तीची ती साक्ष असते. तुमच्या घरांत जे वातावरण, जी परिस्थिति असते तीही तुमच्या मनःप्रवृत्तिचीच द्योतक असते तुमचे बाह्यरूप हेही तुमच्या वैयक्तिक आवडीनिवडीचे आणि निर्णयपद्धतीचे निदर्शक असते. तुमच्या चेहेऱ्यावरील भाव तुमच्या मनांतील विचार प्रवाह प्रकट करीत असतात. तुमच्या आवाजाची धाटणी, बोलण्याची ढब, तुमच्या स्वभावाची तऱ्हा व तुमच्या अंतरंगाच्या छटा व्यक्तवीत असतात. तुम्ही बोलताना वापरीत असलेल्या शद्बांवरुन तुमच्या वाचनाची तऱ्हा, पातळी, जात स्पष्ट होत असते. तुम्ही कोणते मित्र निवडता, कसल्या करमणुकीत गुंगता, काय छंद जडवून घेता, वेळ कोणत्या साधनानी घालविता, या सर्वांवरुनही तुमचे अंतःस्वरुप, प्रकट होत असते, इतराना आपोआप विदित होऊ शकते, लोकाना अजमावता येते. तुम्हाला या वास्तवाचे प्रत्यक्ष भान राहो वा न राहो पण तुमचें प्रकट होणारे व्यक्तिमत्व भोवतालच्या जगाच्या चाणाक्ष नजरेतून कधीच निसटत नाही. हे ध्यानी आणून अजून तरी सावध व्हा, व आपल्या अंततःप्रवृतींवर कटाक्षाने नजर ठेवा, त्याना इष्ट दिशेने विकसित करा. कारण तुमच्या अंतरंगाचे प्रतिबिंब तुमच्या बाह्यांगावर दृग्गोचर होणार हे निर्विवाद सत्य होय.

# लागट बोलणे

दुसऱ्याचे मत सांगणे, कल्पना, विचार पहिल्या फटक्यास रोखठोकपणे साफ उडवून फेटाळून न लावणे हा एक खास अवश्य पाळावाच असा, विशेष नियम आहे. रोखठोक फटकळपणा न वापरता आपली नापसंती दर्शविण्याचे बरेच सौम्य, नम्र व हितकर प्रकार असू शकतात. ऐकणाराची लाही लाही उडणार नाही, त्याचे पित्त उसळणार नाही, वा त्याचा तिळपापड होणार नाही अशा बेताने तुम्हाला म्हणता येईल: " दुसरा एक पैलू याबाबतीत विचारांत घेण्याजोगा आहे आपल्या लक्षात तो आला आहे का ? " " याविषयी एक असेही मत प्रचलित आहे. तुम्हांला ते कितपत, पटते ? " " एकाने याबद्दल अशी कल्पना मांडलेली आहे. पहा ग्राह्य वाटते का. " " या प्रश्नाची ही ही एक बाजू लक्षात घेण्याजोगी आहे. " संभाषणाच्या ओघात, मतभेद दर्शवायचा झालाच तरी, एकदम उलट रोखठोक व तुटक पवित्रा कधीच घेऊ नये; किंवा बोचक, फटकळ, लागट विधाने करु नयेत. बोलणे विकोपाला जाईल ज्याने, असा एकही शब्द वापरु, उच्चारु नकाच. कुत्सितपणा तर मुळीच वर्ज्य माना. याविषयी जितकी खबरदारी घ्याल तितकीही कमीच पडेल असे ध्यानी आणून दक्ष असा. संभाषणपटूंची धाटणी, ढब, तऱ्हा निरीक्षणपूर्वक अनुसरा. संभाषण, मते इतरांवर लादण्यासाठी, नसावेच. ते असते अन्यान्य विचार-कल्पनांची मनमिळाऊ धाटणीने, समजुतीने, देवघेव साधावी यासाठी. संभाषणाने, परस्परांचा लाभ व्हावा, एकमेकांचे हित साधांवे. रोखठोकपणाने दोन्ही गमावतात.

JULY 10

# प्रगतिपथावर अग्रसर

आपल्यांतील दोष किंवा कमतरता यांच्याकडे डोळेझाक करुन, किंबहुना त्यांचे अस्तित्वच मान्य न करता, - मग त्या सुधारण्याचा प्रश्न कुठे येतो ? - कोडगेपणाने सर्वसामान्य जीवन जगणारांच्यातले तुम्हीही एक, असे होणे बरे नव्हे. दोष-कमतरता तत्परतेने पदरी घेऊन त्या कमी करण्याचे उपाय तातडीने अवलंबा. स्वत:ला पडलेल्या मर्यादा उल्लंघिण्याच्या इलाजांची, स्वतःत असलेल्या उणीवा घालविण्याच्या उपायांची, काही पध्दतशीर, योजनापूर्वक, खात्रीलायक आखणी केलीत तर तुमचा अधिक विकास होणे, तुमची जास्त प्रगति होणे, सहज शक्य आहे. एकीकडे आपल्यातल्या अवाञ्छनीय, त्याज्य, अनिष्ट बाबींचे उसंत न घेता निरसन करा; तर दुसरीकडे, जो गुण वा जे स्वभाववैशिष्टच अधिक विकसित करण्याची आवश्यकता, गरज, इष्टता तुम्हाला मनोमन जाणवली असेल, ते गुणवैशिष्टच स्वतःठायी वृद्धिगत करण्याचे प्रयत्न निरलसपणे, अविरतपणे, सावधपणे चालू ठेवा. आपल्यातील सामर्थ्याचा आणि कर्तृत्वाचा जास्तीत जास्त वापर करणे हे तुमचे केवळ कर्तव्यच नव्हे तर ती एक जबाबदारीपण ठरते. तुम्ही, प्रत्येक बाबतींत, सर्व अंगांनी, विविध वैशिष्टचांसह प्रगतीच्या दिशेने अखंडपणे, अविश्रांतपणे, अव्याहतपणे वाटचाल चालू ठेवणे अत्यंत अगत्याचे, अतीव इष्ट व अतिशय महत्त्वाचे आहे ह्याचे विस्मरण होऊ देऊ नका.

* * *

## राष्ट्रीय आषाढ २१

# चिकाटीची कार्यमग्नता

**ज्या**साठी तुम्ही अहर्निश काबाडकष्ट, अविश्रांत परिश्रम व अपार प्रयत्न केलेले असतात ते हाती आल्यावर तुम्हाला आपल्या मेहनतीची जास्त मातब्बरी वाटते. नांव घेण्याजोगी, अतुलनीय, प्रशंसनीय कार्यसिद्धि काही सुखासुखी, अनायास वा सहजगत्या पदरांत पडत नाही हे तर देवच बोलला. मोठे यश गाठीला लागण्यासाठी हव्या असणाऱ्या, निर्णयशक्ति, शिस्तबद्धता, निग्रह, कार्यासक्ति, निर्धार, उद्यमशीलता, धैर्य या किमान गरजेच्या बाबी होत. पुढाकार घेणाऱ्या उद्यमशील व्यक्तीबद्दल सर्वांनाच एक तऱ्हेचे आकर्षण वाटत असते. अथक परिश्रम करु शकणाऱ्या उद्योगमग्न कार्यकर्त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यास जग कधीच संकोच करीत नाही. लोहाला चुंबकाने जसे स्वत:कडे आकर्षित करुन घ्यावे तद्वत् तो इतराना आपल्याकडे आकृष्ट करुन घेऊ शकतो. सर्वांच्या प्रशंसेचे तो स्वत: भाजन बनताना जोडीनेच तो आपल्या आत्मविश्वासाचा व स्वमान्यतेचा विकासही साधीत जातो. कित्येकजण गाजावाजाविना आपले कार्य तेवढे एकाग्रतेने करीत असतात; प्रशंसा होईल की नाही, फल पदरात पडेल की नाही याची चिंता त्याना व्यग्र करीत नाही. आपल्यापरीने कुचराई केल्याविना आपण हाती घेतले ते तडीस नेले यातच त्यांना परम संतोष लाभतो. कार्यनिष्पत्ति बाबतचा भार ते देवावर टाकतात.

卐

**JULY 12**

## राष्ट्रीय आषाढ २२

# थोरवी विचारवैभवाची

तुमच्या विचारांची, जाणीवांची, आदर्शांची, पातळी जेवढी जास्त वरची असेल तेवढ्या प्रमाणांत तुमचे शील, तुमचा स्वभाव, तुमचे चारित्र्य ही ही सारी वरच्या दर्जाची बनतील. सुयोग्य, सखोल, भारदस्त विचार मनात वागवीत चला आणि पहा, या उच्च विचारांचे प्रतिबिंब तुमच्या जीवनांत कसे पडते ते. हा जो तुमच्या समोर मांडला गेला आहे तो एक थोर व सदासिद्ध असा आध्यात्मिक तसाच मानसशास्त्रीयही नियमच आहे तुमच्या मनात एखाद्या सुंदर, उत्तम सत्याधिष्ठित विचाराचा उद्भव झाला कीं तुम्हाला काहीना काही विधायक, परिणामकारी, सुखदायी, लाभ होतोच होतो. तुमच्या विचारांचे, जसजसे शुद्धीकरण व उदात्तीकरण होत जाईल तसतशी, तुमच्या जीवनाचा खरा अर्थ काय, त्याची वास्तव किंमत केवढी आणि त्याचा आदर्श विनियोग कसा, ही कोडी तुम्हाला सहजगत्या उलगडू लागतील. श्रेष्ठ कल्पनाविचार व महान उद्दीष्ट-ध्येये यांच्यावर तुमचे मन उत्तरोत्तर पोसत राहिले की तुमच्या जीवनाचे, मूल्य मर्म महत्ता, वाढत राहतील. परमेश्वरी सत्याची कास तुम्ही जितपत धरली असेल, तितपत उदारपणे परमेश्वराने तुम्हाला सर्व कांही बहाल केलेले आहे, असे एक दिवस तुमचे तुम्हाला जाणवेल आणि त्यानंतर तुम्हाला शीघ्रातिशीघ्र पूर्ण समाधान गवसल्याचे एक दिवस आढळून येईल.

JULY 13

राष्ट्रीय आषाढ २३

# जीवनमार्गक्रमण

महत्त्वाच्या बाबींवरच आपण वेळ विशेषकरुन खर्च करण्याचे धोरण ठेवा. आपले दैनंदिन व्यवहार नीट अक्कलहुशारीने पार पाडीत चला. त्यात भोंगळपणा होता कामा नये. सेवाव्रती, प्रगत्युन्मुख, सुयोग्य मंडळींशीच स्नेहसंबंध जोडा. बाष्कळ बडबडीत निष्फळ वाया दवडला जाणारा फालतू वेळ सतत सत्कारणी लागेल याची दक्षता घ्या. निखालस निर्णय घेण्याची क्षमता, आत्मसन्मान, गांभीर्य आणि जीवनाच्या अगाधतेची जाणीव यांनी आवर्जून जोपासायला हवे. जीवनांतले सर्व व्यवहार स्वतःच्या मानसिक, शारीरिक, वैचारिक, अध्यात्मिक प्रगतीला पोषक कसे ठरतील ह्या दृष्टीने योग्य आवश्यक ती काळजी पूर्णपणे घ्या. पाय मागे खेचणारे विचार, अनिष्ट ओळखी, दुष्ट संवयी व घातक प्रभाव यांच्या कचाट्यांत कधीही सापडू नका. आधीच सापडलेले असलात तर सपाट्याने सोडवणूक करुन घेण्याचा शर्थीचा प्रयत्न करा. स्वतःचे सर्वोच्च इष्ट साधण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक दिवसाचे सार्थक केले जाईल या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी म्हणून आपली पावले ठामपणे टाकीत चला, कोणाकडूनही का होईना, वा न मागताच मिळालेल्याही पण योग्य सल्ल्याचे मनात किंतु येऊ न देता मनमोकळेपणाने यथोचित स्वागत करा व तदनुसार आचरण, वागणूक, वर्तन ठेवा. सकाळी ईशस्तवन करताना, व रात्री निजण्याअगोदर करावयाच्या ईशप्रार्थनेत मार्गदर्शनार्थ त्या जगन्नियंत्याची करुणा भाका.

— ० —

JULY 14

# राष्ट्रीय आषाढ २४

# एकांतसेवन

एकांतात शांततेत केलेल्या सखोल चिंतनातूनच सर्वोत्कृष्ट विचार मनात प्रादुर्भूत होतात. शरीर मन शिथिल करुन जेव्हा तुम्ही सुदीर्घ विचारमंथन चालविता त्यावेळी तुमच्या सुप्त अंत:शक्तींना प्रकट होण्याची लाख मोलाची सुसंधि लाभते. कार्याचा सतत उच्चार करण्याने आणि त्याची प्रत्यक्ष कृतीत परिणति होण्यानेच तुमच्या मनोबलाचे भांडवल सत्कारणी लागत असते. उपयोगी कल्पना मनात गोळा होऊन त्यांचा साठा वाढण्यासाठी मौन साधून, चित्त एकवटून, वारंवार एकांतसेवन करण्याची नित्य नितांत गरज पडते. यासाठी पद्मासन घालून प्रथम प्राणायामाच्या सरावाला प्रारंभ करावा. मग क्रमाक्रमाने अभ्यासाने ध्यान लावून बसणे साधू लागेल. समाधि साधणे हा या मार्गावरील अंतीम टप्पा असतो. सदा घाईत राहून वेळाची व्यर्थ उधळमाधळ करण्याची आधुनिक प्रवृत्ति सर्वथैव त्याज्य मानावयास हवी. आवश्यक ध्यान धारणेत व्यतीत होणारा वेळ निश्चितपणे सत्कारणीच लागत असतो करारीपणा, समतोल-वृत्ति व स्थिरमनस्कता यांची यथाशक्ति जोपासना चालू ठेवा. आंतरिक निस्तब्धता साधताच तुमचा परमेश्वराशी संवाद होऊ लागतो, आणि साहजिकच त्याचे गूढ संकेत तुम्हाला आकळू लागतात. ह्यालाच म्हणावयाचे 'साक्षात्कार.' अशा क्षणी भगवंताच्या सर्वव्यापी अस्तित्वाची जाणीव होऊन त्याच्या शक्तिमानतेची खूण चित्ताला पटते.

●

JULY 15

राष्ट्रीय आषाढ २५

# भिस्त स्वकर्तृत्वावर

स्वतःजवळ असलेल्या साधनसामुग्रीवरच नेहमी भर द्या उपयुक्त, सेवाभावी, यशस्वी जीवन लाभण्यासाठी आवश्यक ते शक्तिसामर्थ्य तुमच्यातच विद्यमान आहे. धडाडी व चिकाटी पुरेशी असतील तर भरभराटीला कितीसा उशीर ! अडचणींमुळे अंगी, शिस्त वळण संस्कार, मुरतात. दत्त म्हणून उभ्या राहणाऱ्या समस्या तर प्रगतीला पोषकच ठरतात. दीर्घोद्योग, मेहनत, परिश्रम यांच्या जोरावर इष्ट फल पदरात पाडता येते, विविध पुरस्कार प्राप्त करता येतात. मात्र नशीबावर विसंबून यातले काहीच हाती लागणार नाही; तर भिस्त स्वकर्तृत्वावर हवी. जवळ असलेली कर्तबगारी पूर्णांशाने वापरीत राहिले पाहिजे, म्हणजेच ती आणखीही वाढत जाते. सद्यःकाल ही तर सुवर्णसंधीच समजा. स्वतःचा विकास साधीत असतानाच जितकी म्हणाल तितकी समाजसेवा तुम्ही करु शकणार आहात. तुमचे अंगभूत सामर्थ्य व अनंत बाह्य शक्ति दोन्ही तुमच्या हाताशीच आहेत ती तुम्ही स्वहितार्थ व परोपकारार्थ कशा प्रकारे राबविणार, याबद्दलचा निर्णय ताबडतोब घ्या. हे सारे साधलेत, स्वकर्तृत्वावर सर्वांशाने भिस्त ठेवू लागलात, की मग जगातील ख्यातनाम, कृतकृत्य, यशस्वी पुरुष श्रेष्ठांच्या पंगतीला जाऊन बसण्याचा, खुर्चीला खुर्ची लावण्याचा, बहुमान तुम्हाला सहजच प्राप्त होईल.

# समग्र स्वविश्लेषण

मनाचा ठाव काढणारे असे कठोर आत्मपरीक्षण तुम्ही सतत करीत असायला हवे. क्रोध, विषयानुराग, भावनावशता वा चीड अशा मनोविकारांना तुम्ही बळी पडत असता असे जर तुम्हांला आढळून येऊ लागले तर त्यांच्या तावडीतून सुटण्याचे काही निश्चित उपाय सखोल परीक्षणांती मनाशी योजा. रोज रात्री निद्राधीन होण्यापूर्वी अशा प्रकारे कडकपणे व जाणीवपूर्वक स्वविश्लेषण समग्रपणे करणे खूपच अगत्याचे असते. असे केल्याने, आज कोणत्या उच्च हेतूकडे डोळेझाक केलीत, कोणता सुनिश्चय मोडलात, सदसद्विवेकबुद्धीची टोचणी कशी दडपून टाकलीत हे मागून का होईना पण तुमच्या ध्यानात येऊ शकते. झाल्या चुकीचे माप पदरात घेऊन मोकळेपणानें मनाशी कबूलीजबाब उच्चारल्याने निश्चितपणे आत्मिक उन्नति होत जाते. आपले जीवन विधायक, हेतुपूर्ण व करणात्मक आहे की नाही अशा किंतुला मनात थारासुद्धा राहू शकता कामा नये. आपले रोजचे वर्तन, व्यवहार, कृत्य, वागणूक साऱ्यासाऱ्याचे काटेकोरपणे पृथक्करण करा. तद्विषयक कार्यकारणसंबंधाची मनाशी नीट फोड करा. कोणत्या दोषामुळे, उणीवेमुळे, चुकीमुळे असे गैरवर्तन, दुर्व्यवहार, अपकृत्य आपल्या हातून घडले याचा निर्णय घेऊन आवश्यक त्या सुधारणा स्वतःत घडवून आणा. निश्चित फलश्रुति पदरात पडण्याजोगे काही सत्कार्य रोजच्या रोज हातून घडेल याबद्दल सदैव जागरुक रहा; आणि ते प्रयत्नपूर्वक पारही पाडीत चला.

JULY 17

राष्ट्रीय आषाढ २७

# ठेवा कडक नजर

वरवर फालतू भासणाऱ्या छोटचा छोटचाच घटनांचे केव्हा केव्हा भलतेच गंभीर व अनर्थकारी परिणाम घडू शकतात. अविचाराने जिभेवरुन सटकलेला वाग्बाण, अवेळी निष्कारण उसळलेले हास्य, चीड आणवणारी एखादी लकब, काही विक्षिप्त संवय, यांच्यामुळे इतरांचे तुमच्याबद्दल कलुषित, विपरीत मत – खरे अन्याय्यपणे पण होते. आयुष्य घडत असते छोटचा किरकोळ घटनानीच. लोकांच्या आदराला पात्र ठरण्यासाठी व नंतर तो आदर टिकून राहण्यासाठी तुम्ही आपली उक्ति जोखून उच्चारली पाहिजे, कृति तोलून केली पाहिजे, मति मापून चालविली पाहिजे. सुसंस्कारी सिद्ध होण्यासाठी तुम्ही जेवढी दक्षता बाळगाल तेवढी थोडीच होईल. लोकांच्या नजरेला खुपतील अशा ज्या ज्या म्हणून अनिष्ट सवयी असतील त्या तुम्हाला जडणार नाहीत याबद्दल योग्य ती खबरदारी हेतुपुरःसर घ्या. दुर्दैवाने जर अशा घातक सवयी आधीच लागलेल्या असतील तर त्या घालविण्यासाठी कठोर, कडवे, जालीम उपाय योजण्याची तातडीने खबरदारी घ्या. वृत्तीत घुसू पाहणाऱ्या बाधक खोडींवर बारकाईने कडक नजर ठेवा. स्वतःच्या स्वभावातील वर्तणुकीतील, जीवनातील, जेवढे काही अनिष्ट, अवाञ्छनीय, अप्रशस्त असे असेल त्या सगळ्याचा जागरुकपणे आढावा काढा व त्याचा निष्ठुरतेने पार समूळ उच्छेद करा. मग लाभलेल्या जन्माचे सार्थक झालेच म्हणून समजा.

JULY 18

# राष्ट्रीय आषाढ २८

# कालव्यय

काळ निसुटता आहे, तुरीदाता आहे, पळपुटा आहे. ह्याची जाण जसजशी वाढत जाईल तसतशी त्याच्या व्ययाची तुमची आखणी, उत्तरोत्तर सुधारत जाईल, आणि तेवढयाच अवधीत जास्त व भरीव कार्य तुमच्या पदरात पडेल कोणतेही महत्त्वाचे कार्य पार पाडताना ते नीटपणे होण्याइतका वेळ त्याप्रीत्यर्थ राखून ठेवा· कालवाटपाचे गणित चुकले की पदरी उधळामाधळ, धांदल, अनिपुणता, गैरसोय आणि निराशा - अपयश पडणारच दोन तासात पुरे होऊ शकणारे काम समजा एक तासात डफरावले गेले की ते बिघडणारच. विवक्षित काळांत आपल्याच्याने किती काम पुरे होईल याचा नीट व योग्य अंदाज बाधा आणि तदनुसार आपली योजना आखा. घाईगर्दीत किंवा वेळ संपण्याची तलवार डोक्यावर टांगती असताना कसेतरी उरकलेले काम, तुमच्याहातून जितक्या उत्तमपणे ते पार पडणे शक्य असते तितक्या परिपूर्णतेने ते झालेलेच नसते जास्तीत जास्त फलदायी ठरेल अशा रीतीने आपल्या दिवसाच्या वेळाची वाटणी करा काळ तर बेटा सारखा धावतच असतो. त्यामुळे संपत चाललेला प्रत्येक क्षण अतीव महत्त्वाचा ठरतो. सुनिश्चित विचारशुद्ध आखणी व तदनुसार कृतियुक्त आचरण ह्यांच्यामुळे तुम्हाला वेळाची व शक्तीची काटकसर साधेल. कालव्ययाच्या बाबतीत आखणी नसणे, धरसोड होणे, चांगलेच विघातक ठरते.

JULY 19

# सुदैवच उगाळावे

आपल्याला काय काय नावडते याकडे डोळेझाक करून स्वत:ला काय काय विशेष आवडते यावर आपले सर्व लक्ष एकवटणे हीच जीवन सुखी करण्याची बिनचूक गुरुकिल्ली आहे. एकदा का मनाचा कल दोषैक दृष्टीने नाके मुरडीत प्रत्येक ठिकाणी 'खोड काय' तीच शोधण्याकडे होऊ लागला की तशी संधी दिवसाकाठी वारंवारही उपलब्ध होऊ शकेल. मनाविरुद्ध घडत गेलेल्या गोष्टीवरच जीवनात सदा भर देत राहण्याची दुर्दैवी सवय कित्येक घायकुत्यास्वभावाच्या व्यक्तींना जडलेली असते. परिणामी अशी माणसे आयुष्यभर सर्वथा अस्वस्थ व चिडखोर मनोवृत्तीने जगत राहतात. याउलट आपले विचार सुखद, आवडत्या, प्रेरक अशा बाबींवरच केंद्रित करण्याची सवय लावणे तितकेच शक्य असते. ते एकदा साधले की मन शांत, समतोल राहून निरोगी बनते. जीवनातल्या आवडत्याच घटनांवर चित्त स्थिर झाले की मग सारे आयुष्य सुखावह होत चालल्याची जाणीव वाढीस लागेल मुद्दा सांगायचा एवढाच की उगाळायचेच तर सुदैवच घेतलेले बरे. दुर्दैव, कोळशासारखेच किती केले तरी काळे ते काळेच निघणार. म्हणून ते खुशाल फेकून दिलेले चांगले म्हणजेच लाभलेल्या सुदैवाचेच सदा स्मरण करावे. ओढवलेल्या नि भोगलेल्या हालअपेष्टांकडे कानाडोळा करण्याचा यथाशक्ति प्रयत्न असावा. यानेच जीवन सुखदायी, सफल, सार्थक ठरते. नुसते ठरते इतकेच नाही तर ते तसे प्रत्यक्षात बनतेही.

★

# मन:शक्तींना राबवा

जगातील तुमच्या हक्काच्या मानाच्या स्थानावर आरुढ होण्याची हीच योग्य वेळ आहे. तुमच्या स्वतःच्या मानससाम्राज्यांत वसणाऱ्या अनेक अद्भुत शक्तींच्या नेमणुका प्रत्यक्ष विविध कार्यासाठी करण्यास त्वरीत सुरवात करा, आणि त्यायोगे उत्पादन वाढवून साम्राज्याची भरभराट झालेली पहा. विद्या जशी दिल्याने वाढते, तद्वत तुमचे मन:सामर्थ्य हे वापरल्यानेच वाढणार आहे. केव्हाही वापरता येण्याजोगी ही मानसिक शक्तिसाधने आपल्याजवळ आहेत याची जाणीव नित्य जागति राहू द्या. आणि त्यांच्या साह्याने दैनंदिन व्यवहारात येणाऱ्या सर्व सुसंधीचा अधिकात अधिक व उत्तमांत उत्तम उपयोग करुन घेण्याचा या क्षणी निश्चय करा. आपल्यापुढे असलेल्या नियोजित कार्याची निश्चित रुपरेषा एकदा मनात नीट आखून घ्या. कार्यसिद्ध्यर्थ आवश्यक अशा उत्साहाची वाण कधीच पडत नाही. तुमची बुद्धिमत्ता व कार्यशक्ति यासाठी तुमच्यापुढे अमर्याद कार्यक्षेत्र पसरलेले आहे. आता अधिक चालढकल करण्यांत वेळ दवडणे तुम्हास परवडणार नाही. आत्मविश्वासपूर्वक आपला हुद्दा सांभाळा, खुर्चीत विराजमान व्हा. तुम्हास आवश्यक असणारी सर्व साधने व पुरेशी सामग्री मनोराज्याच्या कुबेरभांडारात, म्हणजे तुमच्याच काखेत तयार आहेत. तेव्हा जगाला वळसा न घालता फक्त पुढे सरसावून त्यांचा वापर करु लागा कसे.

* * *

# राष्ट्रीय आषाढ ३१

## (आषाढ शु. ११, चातुर्मासारंभ, आषाढी एकादशी)

# ठरवा नेम घेण्याचे

आज चातुर्मासारंभाचा दिवस. आज नवा नेम घ्यायचा, नवे व्रत पत्करायचे. पुढील चार महिने तरी धरला नेम सोडायचा नाही घेतले व्रत टाकायचे नाही. पुढेही तो नेम तसाच टिकला तर सोन्याहून पिवळेच सर्व काही चाकोरीत, सुरळीतपणे चालू असेल तोपर्यंत तुम्ही आपला नेम काटेकोरपणे पाळालच हे खरे पण खरी कसोटी लागेल काही अकल्पित विपरीत घडेल तेव्हा. ती तुमची अग्निपरीक्षा व्हायची वेळ असते. जर तुमच्या नेमाने पुरे खोलवर मूळ धरलेले असेल तर तुम्ही तावून सुलाखून निघणार, नेम ढासळून पडणार नाही. तुम्ही नवे, अधिक दुष्कर व्रत घेण्यास उद्युक्त दिसलात तरच तुमचे आधीचे पूर्ण झालेले व्रत बावनकशी ठरणार. चुकीची पुनरावृत्ति टाळणे, किंवा कार्यपद्धति सुधारणे हेच तर निर्धार करण्याचे प्रयोजन. संयम पाळून स्वत:वर नियंत्रण ठेवणे, किती महत्वाचे आहे. हे एकदा तुम्हाला नीटपणे जाणवले की मग तुम्ही आपल्या दैनंदिन जीवनात, वर्तणुकीत, वेळ प्रसंगी संयमनियंत्रणाचा यथायोग्य वापर करु लागाल. खरी प्रगती साधावयाची असेल तर निर्धार, निश्चय, निष्ठा, यांची नितांत आवश्यकता आहे. मोठी कार्यसिद्धि तर या त्रयीवाचून असाध्यच, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ-स्पष्ट, आणि स्वयंसिद्ध आहे. आजच्या आषाढी एकादशीच्या परम धार्मिक दिनी, निर्जळा उपवास धरुन, व्रत:पूत होण्यासाठी येऊन ठाकलेल्या चातुर्मासाला निष्ठेने, निश्चयाने, निर्धाराने सामोरे व्हा.

卐

JULY 22

## राष्ट्रीय श्रावण १

# अंधश्रद्धा सोडा

तुम्ही बाळगीत असलेल्या विविध श्रद्धा - मग त्या योग्य असोत वा अनाठायी ठरोत—तुमच्या जीवनावर हुकूमत गाजवीत असतात पैकी अनाठायी अंधश्रद्धा तुमच्या जीवनाचा खेळखंडोबा करुन सोडतात. अशा या नष्ट अंधश्रद्धांना तुम्ही जितके चिकटून बसता तितक्या जास्त त्या तुमच्या आयुष्यावर विघातक प्रभाव पाडतात पुष्कळ बुद्धिमंताना आपल्याला खोटयाच्या, असत्याच्या, अनृताच्या मागे जायचे नाही हे उमजले, पटले, उमगले होते पण सत्य समजून त्याचीच कास धरण्यासाठी लागणारे प्रयत्न, दिर्घोद्योग, मेहनत करण्याची लोकमान्यांनी दाखविलेली जिद्द अपूर्वच होती. बाळ गंगाधरांचा आज जन्मदिन. त्यांचे आदरपूर्वक स्मरण करुन तुमच्या श्रद्धा-निष्ठांचे नीट परीक्षण, विश्लेषण, पृथक्करण करा. ज्या अनाठायी नाहीत पण डगमगत्या आहेत त्यांना जास्त ठाम बनवा व अंध आणि चुकीच्या ज्या श्रद्धा निघतील त्यांना सोडून द्या. सत्याच्या, सुयोग्यतेच्या, सुमंगलाच्या मजबूत पायावरच सर्व श्रद्धानिष्ठांची उभारणी व्हायला हवी. जीवनाच्या विविध अनुभवांच्या काळी, अन्यान्य प्रसंगांच्या वेळी त्याच तुमच्या कामी येणार आहेत, उपयोगी पडणार आहेत. विवेकानंद-स्वामींच्या स्मारकाप्रमाणे तुमचे जीवन-सुखधामही सत्य, अचल, अभेद्य श्रद्धानिष्ठांच्या प्रचंड शिलासमूहांवरच उभे करावयास हवे आहे.

(टिळक जयंति)

**JULY 23**

# राष्ट्रीय श्रावण २

# उद्दिष्टचयन

तुमच्या दृष्टीसमोर, स्वतःच्या मनाने निवडून एक विवक्षित, सुस्पष्ट व ठाम असे उद्दीष्ट, जीवनकार्य म्हणून सतत असू द्या. एका निवांत जागी इतर अवधाने सोडून देऊन, मोकळ्या मनाने निश्चितपणे बसा आणि या निर्धारित उद्दीष्टाचे बुद्धी एकाग्र करुन मनन करा. प्रत्येक दिवशी काही क्षण जरी पहाटे उठल्यावर लगोलग याबद्दलचेच विचार प्रथम डोक्यात घोळू द्यात. रात्रीही आडवे झाल्यावर या उद्दीष्टाचे चिंतन चालवीतच डोळे मिटा. हे उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून साधने काय वापरावीत, रीत कोणती अवलंबावी यावर भरपूर काळजीपूर्वक विचार करीत चला. हे उद्दिष्ट गाठल्यावर काय फायदे होतील, कशी फलप्राप्ति पदरात पडेल, आणि किती आनंद लाभेल याचे चित्र मनःचक्षूसमोर सतत राहू द्या. मनात धरलेले हे महान उद्दीष्ट आपण गाठणारच याबद्दल मनात दृढ आत्मविश्वास बाळगा, आणि तोपर्यंत आपला उत्साह रतिमात्र ओसरु देऊ नका. या उद्दीष्टचयनाच्या बिनचूकपणाबद्दल स्वतःला राहून राहून पुनः पुनः ग्वाही देत रहा. तुमच्या सर्व कार्यशक्ति, साऱ्या कुवती, संपूर्ण सामर्थ्य, हे उद्दीष्ट गाठण्याच्या कामी सर्वथैवपणे स्वतः वेचणारच, असा दुर्दम्य निर्धार मनात खेळवत ठेवा. कारण काही म्हटले तरी, उद्दीष्टे, ध्येये, लक्ष्ये ह्या अंतःप्रेरणेच्या स्वयंस्फूर्तीच्या भराऱ्याच असतात.

JULY 24

# राष्ट्रीय श्रावण ३

# गुणत्रयी

सामान्य आवाक्याच्या व्यक्तीलासुद्धा, तिने स्वतःची कुवत इष्ट दिशेने, योग्य प्रकारे, रास्त प्रमाणात, वापरली तर भरघोस यश लाभते, हे आपण नेहमी पाहतो. देवसुद्धा दैवी दान दक्षालाच देववितो. काबाडकष्टांपासून अंग न चोरता कळकळीने झटणाऱ्याला, ' उद्योगशीलता ' खूप मोठ्या अडचणींवर मात करायला मदत देते, जटिल समस्यांवर तोडगा सापडवून देते हे पाहिल्यावर खूपच मौज वाटते. लोकोत्तर पुरुषांची चरित्रे म्हणजे अविरत व अक्कलहुशारीनें केलेल्या श्रमांचाच जणू आलेख, इतिहास. ' चिकाटी ', केलेल्या परिश्रमांचे सामर्थ्य अगाध, अगण्य असते, हे सिद्ध करुन दाखविते. तुम्ही स्वतः केवढे कार्य पार पाडू शकता, हे प्रत्यक्ष प्रयत्न करुन पाहिल्याखेरीज समजणारच कसे ? शिवाय कर्तबगारीच्या अधिकाधिक उंच शिखरांवरुन टेहेळणी करायला मिळाल्याखेरीज केवढे विस्तृत कार्यक्षेत्र तुमच्या दृष्टीच्या, कुवतीच्या कवेत सामावते आहे, हे तरी ध्यानी कोठून येणार ? अथक परिश्रम करण्याची क्षमता, ही ही प्रकांड पांडित्याचीच दुसरी बाजू आहे. ' धडाडी ', साहस, पुढाकार, यांनी युक्त अशा व्यक्तीला, कार्य कोणतेही, केवढेही तिच्या आवाक्याबाहेरचे आहे, असे होऊ शकणारच नाही.

# राष्ट्रीय श्रावण ४

## (आषाढ शु. १५, गुरु पौर्णिमा)

# गुरुमाहात्म्य

गुरु कोणास म्हणावे ? तो कशासाठी हवा? तो काय देतो ? या प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी तीन दाखले विचारात घेऊ. एखादा पळवून नेला गेलेला श्रीमंताचा मुलगा भिक्षेकरी पोर म्हणून रस्त्यावर लाचारीचे जीवन जगत असतो. त्याला ओळखणारा कोणी निघून तो त्या मुलाला बापाकडे नेतो. म्हणजे त्याचे असलेलेच स्थान त्या ओळखणाराने त्याला मिळवून दिले. कपाळावर चढवलेला चष्मा हरवलाच आहे असे मानणाराला दुसरा तो दाखवितो. चष्मा होताच, पण वापरणाऱ्याला तो आता पुन्हा मिळाला. कोल्हीने वाढविलेल्या छाव्याला, सिंहाने त्याचे पाण्यात प्रतिबिंब त्याला दाखविल्यावर त्याला आपल्या सिंहत्वाची जाण आली. तद्वतच, गुरु ठायीच असलेली योग्यता शिष्याच्या नजरेस आणतो. नकोत ते कोपरे उडवून शिल्पकार दगडाला देवपण लाभवतो. गुरुही अज्ञानाचे काने-कंगोरे झिजवून शिष्याजवळ नितळ ज्ञान उरवतो. शिल्पकार दगडातून नर घडवू शकतो. तसाच वानरही. दगडात सारे असतेच. उठाव कशाला द्यावयाचा हे शिल्पकाराच्या सामर्थ्यावर, कलेवर अवलंबून. गुरुही आपल्या ज्ञानानुभवाच्या जोरावर हेच साधतो. मुळात मनुष्य भल्याबुऱ्याचे मिश्रण बनून येतो. अवाञ्छनीय भाग गुरु, वगळून टाकण्यासाठी, बाजूला सारतो व इष्ट भाग एकत्रित करतो- कोंडा टरफले पाखडली गेल्यावर धान्याचे दाणे उरावेत तसे. यासाठी गुरु हवा. हे घडविणारा तो गुरु. तो शिष्याला स्वत्वाची, साधुत्वाची, सामर्थ्याची जाण करवितो. याचे स्मरण ठेवून शिष्याने गुरुला आदराचे, कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून यथाशक्ति दक्षिणा अर्पावी.

●

**JULY 26**

# राष्ट्रीय श्रावण ५
## (आषाढ व. १, लो. टिळक पुण्यतिथि)
# थोडे सल्ले

भारतीय कालगणनेनुसार आज लोकमान्यांचा निर्वाणदिन. या महान् विभूतिचे पुण्यस्मरण करीत, त्यांनी जीवनसाफल्यार्थ दिलेले कांही व्यावहारिक सल्ले आज आत्मसात केलेले बरे. त्यानुसार वर्तणुक ठेवल्याने आयुष्याचे सोनेच होईल, इतके ते अनमोल नि प्रभावी आहेत.

स्वपक्षसमर्थनार्थ केलेल्या भांडणतंडणापेक्षा शांतपणे केलेले विधान, प्रकट केलेला विचार, उच्चारलेलें मत प्रतिपक्षाची जास्त खात्री करतात.

जिथे शेजाऱ्यांचे अधिकारक्षेत्र सुरु होते तिथे तुमच्याची हद्द असते.

दिवसाकाठी पूर्ण करावयाच्या कामाचा अधिकांश भाग सकाळीच ताजेतवाने असता उरकून टाकणे हितावह होय.

दारिद्र्याने घेराव घातलेला असेल तेव्हाही तुम्ही हसतमुख राहिलात की तुम्ही त्यावर मात केलीतच हे निर्विवाद.

डोक्यात शेकडो योजना, बेत खेळवत ठेवण्यापेक्षा एकच योजना प्रत्यक्ष अंमलात आणून दाखविणे जास्त कर्तृत्वाचे.

बाब क्षुल्लक म्हणून तुम्ही निष्काळजीपणे हाताळीत असाल तर महत्वाच्या बाबींचेही, तशाच बेपर्वाईने वागून, तीन तेराच वाजविणार.

स्वजिव्हेला लगाम घालून, मित्रमंडळींना बोलू देण्याने, हुशार ठराल.

उच्च उद्दीष्टे, वाढत्या आकांक्षा डोळ्यासमोर व मनातही ठाकलेल्या असताना जीवन निराशामय, अंधारे, कंटाळवाणे होणे अशक्यच.

साधकबाधक विचारमंथनात वेळ घालवायला हरकत नाही; टाळाटाळ, चालढकल, टंगळमंगळ यात क्षणही दवडू नये.

कर्जात बुडण्यापेक्षा संशयात गोते खाणे केव्हांही श्रेयस्कर.

दिसामाजी एकदा तरी आत्मचिंतनात, ध्यानधारणेत वेळ जावा.

## राष्ट्रीय श्रावण ६

# दोषांची वेचणी

विनय किंवा लीनता मिरविण्याकरिता नव्हे, तर स्वसुधारणा घडवून आणण्यासाठी, स्वदोष-गुणाभाव-ज्ञानकमतरता, स्वबुद्धीने ओळखून काढण्याचा जे लोक प्रयत्न करतात आणि खऱ्या कळकळीने, ते दोष काढून टाकण्याचा गुण, अंगी आणण्याची खटपट करतात तेच खरे थोर लोक. प्रत्येकानेच सर्वज्ञ व्हावे अशी जग आशा करीत नाही पण जरुरीच्या व महत्वाच्या गोष्टींची माहिती मिळविण्याकरिता प्रत्येकाने आच लागून प्रयत्नशील बनले पाहिजे. स्वतःचे अज्ञान फजिती कबूल करण्यास लाज वाटणे हे मानसिक दौर्बल्य होय. वरवरच्या मानवी भावनांच्या, स्थिति-प्रसंगांच्या बाह्य स्वरुपाच्या, ज्ञानावरच संतुष्ट न राहता जास्त खोलात शिरुन अधिक ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा तुम्हाठायी उत्पन्न होण्याने मन जास्त बलवान बनते. तुमच्या सत्याच्या आवडीला इतर सर्व बाबींवर, पैलूंवर, मात करु द्या. अज्ञानी माणसाच्या मनातच फाजिल आत्मविश्वास असतो. पण खरा ज्ञानी माणूस स्वतःच्या फजित्या सांगू शकतो उणीवा वेचू शकतो. स्वत.ची रास्त योग्यता ठरविताना अतिशय प्रामाणिक, आणि पराकाष्ठेचे कठोर बनावे. ज्ञानसंपादनाची कला तुम्ही एकदा चांगली हस्तगत केलीत की इच्छित कार्य सिद्धीच्या सुयोग्य मार्गावरुन तुम्ही वाटचाल करीत आहा असे खात्रीने समजा. ज्या मोठेपणाचे लोकांच्या हृदयावर आपोआप प्रतिबिंब उमटते, तोच खरा थोरपणा. मुद्दाम खटपटीने, टिमकी बडवून बडिवार माजवावा लागणाऱ्या थोरपणात काहीच मोठेपणा नाही.

★

**JULY 28**

# राष्ट्रीय श्रावण ७

# अंतरंग सुधारा

तुम्ही काय करता हे जितके महत्त्वाचे त्याहून तुम्ही कसे आहात हे अधिक परिणामकारी ठरते. तुम्हाला सदासर्वदा सक्रीयपणे. दुसऱ्याच्या उपयोगी पडत राहणे शक्य नसते. पण तुम्ही स्वतःचा आदर्श इतरांपुढे ठेवून कायमचे उपयुक्त बनू शकता. तुमच्या भोवतालच्या मंडळींवर तुम्ही प्रत्येक दिवशी प्रत्येक तासाला स्वतःचा प्रभाव पाडीत असताच. शक्यता हीच जास्त की तुम्ही अशा प्रकारे अधिक टिकाऊ छाप पाडून त्याना भरपूर मदत करीत असता. प्रत्यक्ष ताकीद करुन समजावून सांगून, किंवा प्रवचन देऊन हे घडवून आणण्यापेक्षा तुम्ही ते आपल्या स्वाभाविक स्वभावगुणांनी व प्रभावी व्यक्तिमत्वाने साधीत जाता. घडलेल्या दुष्कृत्यांचा झाडा घेऊन, त्यांच्या क्षालनार्थ उदात्त हेतूची व आदर्श वर्तनाची जोपासना करणे मानवजातीची महत्ता वाढविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरते. जेव्हा तुम्ही मनापासून स्व पापकर्मांचा झाडा घेऊन आपले अंतरंग सुधारण्याचा, म्हणजेच हळुवार, पवित्र, सशक्त, सद्वर्तनी बनण्याचा हेतु बाळगता तेव्हा हे सारे सद्‌गुण सहजच तुमच्या बाह्य दृश्य व्यक्तित्वांतूनही प्रकट होतात. उमदेपणा, महानता, सभ्दाव, हे सर्व मूलतः मनाचे, हृदयाचे अंतरंगाचे धर्म असतात. कुप्रवृत्तीच झाड तिथे ते धर्म होऊन दृढमूल झाले की साहजिकच शरीरही तदनुसार व्यवहार करते.

JULY 29

# राष्ट्रीय श्रावण ८

# विधायक सुविचार

तुमच्या सद्विचारांच्या सामर्थ्याच्या प्रचीतीचा प्रत्यय कदाचित तुम्हाला सध्याच येणार नाही; पण जसजसे हे सुविचार उत्तरोत्तर द्विगुणित होत जातील तसतसे त्यांच्या सच्चारित्र्यवर्धक गुणविशेषांची, महत्वाची, जाणीव तुम्हास होऊ लागेल. तुमच्या अंतःकरणात प्रादुर्भूत होणारा प्रत्येक सद्विचार आपल्या परीने तुमच्या जीवनावर सुपरिणाम घडवित असतो. म्हणून विध्वंसक, तामसी विचारांना आपल्या मनात अजिबात थारा मिळणार नाही याची तुम्ही खबरदारी घ्या. तुमच्या हृदयांत सहाय्यक, प्रगतिशील, विधायक, सात्विक विचारांसाठी स्थान अवश्य राखले गेले पाहिजे. वावगे दुर्विचार समूळ नष्ट करण्यासाठी नवसद्विचारांचा मनात प्रयत्नपूर्वक प्रादुर्भाव घडविणे हा एकच उत्तम उपाय तुमच्या हाती राहतो हे उघड आहे. तुमच्या विचारांना धार्मिक अधिष्ठान प्राप्त होताच तुमच्या मनात ईश्वराबद्दल अधिक श्रद्धा, सद्विचारांबद्दल जास्त निष्ठा, व दीनदुबळयांबद्दल वाढती सेवावृत्ती जागृत होऊन तिन्ही दृढमूल बनत जातील. वानगीदाखल, अशाप्रकारे वापरण्याजोगे काही विधायक उपयुक्त सुविचार पहाः

वयानुरुप परिपक्वता येण्याने आंतरिक सौंदर्य वाढू लागते.
विरुद्ध दृष्टीकोनांतील दुरावा थट्टामस्करीच्या पुलाने नष्ट होतो.
भ्याडपणा माणसाचे मोहापासून सर्वोत्तम रक्षण करतो.
उद्या हा असतो सरळ सरळ आजच्या अनुभवांचा ताळेबंद.

JULY 30

## राष्ट्रीय श्रावण १

## (आषाढ व. ६, टिळक जयंति)

# डोंगर उल्लंघ्य

आध्यात्मिक जीवन कंठण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबी जशा साध्यासुध्या स्पष्ट तशाच अनिवार्यही आहेत. त्या उच्च पातळीवर काटेकोरपणे राहता येण्यासाठी, हृदयशालीनता, विनयशीलता, कृतज्ञता यांनी कसे ओतप्रोत हवे; भगवंताच्या अधिसत्तेपुढे मान तुकवून तिला शरण जाण्याची वृत्ति हवी; आयुष्य भक्तिपूर्ण, पवित्र राखण्याची प्रामाणिक इच्छा हवी. टिळकमहाराज या दृष्टीने सर्वांगपरिपूर्ण होते. म्हणून तर ते मंडालेतील एकांतवासाच्या शिक्षेने हतबल न होता तिच्यावर मात करु शकले. इतकेच नव्हे तर हे थोर अध्यात्मसाधक 'गीतारहस्या'सारखा अध्यात्मावरील श्रेष्ठ ग्रंथ शांत, स्थिर समतोलवृत्तीने शिक्षा भोगीत असतानाही निर्मु, रचू शकले. आधी सांगितलेल्या बाबींपैकी एकही उणी पडली, विचारांची पातळी खालावली, वर्तणुक बिघडली, तरी आदर्श आध्यात्मिक जीवनापासून वंचित राहण्याची वेळ ओढवेल. आज गीतार्थवाचस्पति लोकमान्यांची जन्मतिथि. त्यांना वंदन करुन, त्यांचे आशीर्वाद मागून, तसेच सत्याच्या पट्ट्याने कंबर कसून, सचोटीचे चिलखत चढवून, आत्मज्ञानाचे शिरस्त्राण घालून श्रद्धेची ढाल सरसावून. जीवनाची समशेर परजीत, मोक्षमार्गावर वाटचाल सुरु करा. मग इतरही तुम्हाला प्रोत्साहन देऊन 'शुभांस्ते पन्थानःसन्तु' अशा आशीर्वादासह म्हणतील, 'शाब्बास रे पठ्ठे! हो पुढे, मोक्षसाधनेच्या सैनिका, अशीच तडफेने वाटचाल चालू ठेव. आध्यात्मिक दुर्ग सर करणे तुला जरापण जड जाणार नाही. अध्यात्मडोंगर उल्लंघ्य आहेच."

– ० –

JULY 31

# निश्चयपालन

आपली स्वतःची रोजची वर्तणुक चांगलीच वरच्या दर्जाची राखण्याचा तुम्ही प्रभातकाळी उठल्या उठल्या दृढ निर्धार करता. दयाबुद्धीने, धीटपणे, भारदस्तपणे, आत्मविश्वासाने म्हणजेच एकंदरीने शोभेल असा वागेन असा तुमचा ठाम निश्चय होतो. पण दिवसाअखेरीस आपल्या सकाळच्या बेतातील सारी कलमे आपण तितक्या प्रामाणिक काटेकोरपणाने पाळलेली नाहीत, असे तुम्हाला मनाशी जाणवते. दयाळूपणा दाखवायचा राहूनच गेला, नाही म्हटले तरी भागुबाईपणाच झाला, तसे फालतूपणानेच वागलो, आपली टिमकी जरा जास्तच बडवली, बरोबरच्यांच्यावर छाप, प्रभाव, वजन पडेल असे आपल्या हातून काही घडलेच नाही, असे, सचोटीने निःपक्षपातीपणाने आत्मपरिक्षण केल्यावर तुमच्या लक्षात येते. यासाठी तर रोज रात्री निजण्यापूर्वी, कठोरपणाने व प्रामाणिकपणाने स्वविश्लेषण करुन, आपल्यात काय उणीवा आहेत, अंगी जास्त कोणते गुण बाणवायला हवेत, हे ठरविणे फार आवश्यक असते. वर्तणुकीची इष्ट व उच्च पातळी राखण्यासाठी प्रयत्न अविश्रांत व दक्षता अखंडित, केले-घेतली जायलाच हवीत 'निश्चयाचा महामेरु' अशा 'राष्ट्रप्रपिता', लोकमान्यांचा निर्वाण दिन आज. या गंभीर दिनी काही नवा निश्चय करुन, तो पाळण्याचाही जोडीनेच जास्त दृढ निर्धार धरा. निर्धाराने पाळलेल्या निश्चयानांच फक्त जगात किंमत असते. बाकी सारे कवडीमोलाचे ठरते.

**(टिळक पुण्यतिथि)**

**AUGUST 1**

# राष्ट्रीय श्रावण ११

# कार्यासक्तता

जीवनाच्या दैनंदिन कठोर ताबडवणाऱ्या व्यवहारात सततच्या व चाणाक्ष अशा प्रयत्नांचा पाठपुरावा करण्याची फारच गरज पडते यश पदरात पाडण्यासाठी, जी मंडळी स्वतःचे नशीब फळफळण्यावरच अवलंबून राहतात, किंवा योगायोग पथ्यावर पडण्यावर टेकलेली असतात, त्यांच्या नशिबी निराशाच येते. जाणीवपूर्वक मेहनत करण्याचे वळण ज्यांना लागलेले असते त्यांना एक विशेष प्रकारचे सुख-समाधान लाभते. व्यवसाय-नोकरीत यशस्वी होण्यासाठी ज्या विवक्षित गुणसमुच्चयाची अत्यंत आवश्यकता असते ते सारे गुण जीवनाच्या सामाजिक वगैरे इतरही क्षेत्रात तितकेच मूल्यवान, उपयोगी, व आवश्यक सिद्ध होतात. वरुन प्रत्यक्ष दाखवीत नसले तरी जग मनातून आळशी माणसाला शिव्यांची लाखोली वाहते आणि उद्योगरत, कार्यासक्त, व व्यासंगशील व्यक्तीची मानसपूजा करते. आळस, निष्क्रीयता माणसाला इतरांच्या मनातून उतरवितात· तर उद्योगप्रियता त्याला लोकमान्यतेच्या शिखरावर चढविते. जगातल्या नामवंत उद्योगप्रधान पुरुषश्रेष्ठांच्या रांगेत जाऊन बसता आले तर तो केवढा तरी, ईर्षा वाटण्याइतका, सन्मान ठरेल. उच्चउद्दिष्टसाधनेसाठी कळकळीने अंग झिजविण्याची इच्छा कुवत असणे, ही आयुष्यातली खूपच मोठी जमेची बाजू मानली पाहिजे.

**AUGUST 2**

# राष्ट्रीय श्रावण १२

# सुशब्दशतनाम (प्रथमार्ध)

जमेल तितके वेळा हे सुशद्बशतनाम वाचीत चला. ह्याच्या पुरश्चरणाने मन पवित्र, भावपूर्ण जागृत राहील. एकेका वर मननचिंतन करा त्यानंतर त्या शद्बांत सूचित झालेली कल्पना, विचार, भाव ही कृतींत आणा.

अध्यात्मज्ञान
अध्यापन
अजेयता
अनुग्रह
अनुताप
अमरत्व
अवधूत
आत्मविश्वास
आदर्श
आनंदकंद
आराध्यदैवत
आस्थेवाईकपणा
आज्ञाधारकपणा
ईश्वरभक्ति
उमेदवारी
उमदेपणा
एकाग्रता
कर्मयोग
करुणा

कळकळ
कार्यसिद्धि
कार्यक्षमता
कुलदैवत
गणनायक
गुणग्राहकता
गूढार्य
गृहदेवता
गीताध्ययन
चतुर्थाश्रम
चिरंजीवित्व
चिरंतन
जगन्नियंता
जनदाक्षिण्य
जागृति
जिव्हाळा
जीवन्मुक्ति
झुंजारवृत्ति
टवटवीतपणा

तारणकर्ता
तारतम्य
त्रिकालज्ञानी
दबदबा
दिग्गज
दूरदृष्टी
देशभक्ति
धर्माचरण
धैर्यसंपन्नता
निर्धार
निरलसता
निर्वाण
निष्ठा
निश्चयात्मकता
नैपुण्य
न्यायवृत्ति
परमार्थ
परमेश्वर
पावित्र्य

☆

**AUGUST 3**

# सुशब्दशतनाम (द्वितीयार्ध)

पाहिलात ना काल सुशब्दशतनाम-पुरश्चरणाचा प्रभाव ? आज या उरलेल्या कांही शब्दांचे अध्ययन करा.

| | | |
|---|---|---|
| पितृऋण | युगधर्म | सार्वभौमत्व |
| पुण्यात्मा | लोकसंग्रह | साधेपणा |
| पुरश्चरण | वरदहस्त | सावधगिरी |
| पूर्णता | वाडवडील | साहचर्य |
| प्रगति | विजिगीषा | सिद्धपुरुष |
| प्रभुत्व | विजेता | सिंहावलोकन |
| प्रार्थना | विवेकशीलता | सौजन्य |
| प्रेम | शिष्टसंप्रदाय | सौंदर्य |
| बहादुरी | सचोटी | स्वर्ग |
| भावभक्ति | सत्य | स्वातंत्र्य |
| मंगलाचरण | सद्‌गुण | स्वाभिमान |
| मनोनिग्रह | सदिच्छा | स्वामित्व |
| महत्वाकांक्षा | सन्मान | स्वार्थत्याग |
| महानता | समयसूचकता | हक्क |
| मातृत्व | समृद्धि | हजरजबाबीपणा |
| मानसपूजा | सहनशीलता | हमी |
| मैत्री | सहानुभूति | हितबुद्धि |
| मुक्ति | सामर्थ्य | हिंमत |
| यमनियम | साक्षात्कार | ज्ञानसाधना |

AUGUST 4

## राष्ट्रीय श्रावण १४

# ध्यानमग्नता

दिवसाकाठी निदान दहा-वीस पळे तरी पुऱ्या एकांतात तुम्हाला घालविता येतील अशा दृष्टीने तुमची दिनचर्या आखलेली असावी. यावेळी तुम्ही शांतपणे स्थिर बसून सखोल चिंतनात्मक विचारमंथन चालवावयाचे आहे. मानसिक विकासासाठी अशा ध्यानमग्नतेची नितांत आवश्यकता आहे. समाजात उठता बसता वावरता तुम्ही आपली मनःशक्ति नित्य वापरुन संपवीत असता. तिची तूट भरुन तर निघालीच पाहिजे. ती, अशा एकांत शांततेत लक्ष एकवटून केलेल्या मुलग्राही सखोल विचारमंथनातूनच भरुन निघते. दैनंदिन व्यवहारांच्या खटपटींच्या धबडग्यांत मनःशक्तींचा झरा जरा आटू लागतो. दिवसभराच्या उपश्याने कमी झालेले विहिरींतील पाणी रात्रभरात पुनः पूर्वपातळी गाठते. तद्वत या ध्यानधारणेने मनःशक्तींचा साठा वाढतो. मन विचलित करणाऱ्या दैनंदिन खटाटोपातून मुक्त होऊन जेव्हा तुम्ही एकांतात आत्मलीन होऊन मन एकाग्र करता त्याच वेळी तुमच्या मनांतील उत्कृष्ट बहुमोल विचार दुधावर जमणाऱ्या सायीप्रमाणे वर येऊन स्थिरावतात; मन व्यग्र करीत असलेल्या विविध समस्यांच्या सोडवणुकी सापडतात; केव्हा प्रतिभा जागृत होऊन एखादा क्रांतिकारक विचार स्फुरतो. तेव्हा अशा आवश्यक ध्यानमग्न एकांतसेवनासाठी कुठची वेळ सर्वोत्तम ते एकदा निश्चित करा. साधारणपणे भल्या पहाटे तुम्ही ताजेतवाने असता. म्हणून ती वेळ विशेष योग्य. मग ठेवा तर तेव्हाची पंचवीस पळे यासाठी.

**AUGUST 5**

## राष्ट्रीय श्रावण १५

# धाव! नियतिकडे

आपण सर्वच जीवनाच्या जिन्यावर आहोत. कोणी चढत आहेत, कोणी उतरत आहेत पण सर्व जात हे आहेतच. अबब ! केवढचा ह्या झुंडी ! चढणारे दिसतात भलतेच जोरात. त्यांच्या चेहेऱ्यावरुन उत्साह कसा ओसंडून वाहत आहे. पण काही मात्र चाचपडत, धडपडत, अडखळत चढत आहेत. त्यांची उरे धपापत आहेत, कोणाच्या हृदयांचे ठोके चुकत आहेत. काही चेहेरे चिंताक्रांत, ओढलेले दिसत आहेत तर काही प्रामाणिक चेहेरे आशेने प्रफुल्लित झालेले दिसत आहेत. त्यांचे पाहून काहींना धीर येत आहे, कोणाला चेव चढत आहे. तर कित्येकांना मदतीचा हात मिळायला हवा आहे. सारे दृश्य कसे शिरशिरी आणणारे, स्फूर्ति चढविणारे, हुरुप वाढविणारे वाटते. हा अमर्याद जनसंमर्द नियतीकडे प्रवास करीत आहे. उतरणाऱ्यांची तऱ्हा तर केव्हा अगदी बालिश, तर केव्हा उठवळ, नाहीतर बेजबाबदार वाटते. काही थकले भागलेले, तर दुसरे इतरांना आधार देताना दिसतात. धाडधाड उड्या मारीत, लांब लांब टांगा टाकीत, विस्फारीत नेत्रांनी वर चढणाऱ्यांकडे तुच्छतेने पहातही काही उतरताना आढळतात. काहींना भलताच अनावर वेग आला आहे. दोन दोन, तीन तीन पायऱ्या वगळून ते उड्या टाकीत चालले आहेत. काही आपटचा खात आहेत. चढणारा असो, उतरणारा असो, कोणीच नियतीच्या तडाक्यातून सुटणार कसा ? प्रारब्ध चुकणार नाही. इथून तिथून प्रत्येकाची धाव नियतिकडेच हे निर्विवाद.

★

AUGUST 6

# द्योतक कर्तृत्वाचे

हातातले विद्यमान कार्य, फालतू असो वा महान, सारख्याच निपुणतेने पार पाडले जायला हवे. कार्य चांगल्या प्रकारे पार पाडण्याने कर्त्याला एक फायदा सदैव व विशेषत्वाने लाभत असतो कर्त्याच्या मनाचे महान् अवसान क्षुद्र कार्यालाही श्रेष्ठत्व आणते. स्वत:चे बल व साध्य कार्ये याबद्दलची तुमची मनोराज्ये जणू तुमच्या हातून काय घडू शकेल याची द्योतकच असतात. बृहत्तर व जास्त कळकळीचे प्रयत्न करण्यासाठी ती तुम्हाला जशी आवाहन करीत असतात. तुमच्या हातून पुष्कळ चांगले असे काही जरी आधीच घडलेले असले तरी त्याहून महत्तर व श्रेयस्कर, आणखीही बरेचसे घडणे शक्य असते. संभाव्य साध्ये मुळीच कमी नसतात, आणि चिकाटीने तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करु लागलात की उत्तम संधि लाभून तुमचे साध्य साधनाचे, कार्यक्षेत्र रुंदावत जाते, उंचावतेही. महत्तर कार्याला हात घाला, त्याचा अंखडीतपणे सुदीर्घ पाठपुरावा करा. त्याच्या सिद्धीसाठी तुमचे सारे कर्तृत्व एकवटा, म्हणजे अंततोगत्वा ते कार्य साध्य होणारच. संभाव्य साध्ये सिद्ध करण्यासाठी उठून कंबर कसणे तुमच्या वाढत्या कर्तृत्वाचे द्योतक ठरेल. चिकाटीच्या व सततच्या प्रयत्नानी तुम्ही आपल्या कर्तृत्वाला साजेसे, योग्यतेला शोभेल असे व निपुणतेच्या लायकीचे उच्च स्थान मिळवालच याची उमेद पाळा, खात्री धरा, विश्वास बाळगा.

**AUGUST 7**

# राष्ट्रीय श्रावण १७

# वाचनाचे वेड

उत्तम ग्रंथांचे पद्धतशीर वाचन केले तर अनेक अमोल फायदे मिळू शकतात. सर्वात आधी जाणवणारी बाब अशी आहे की ते एक विरंगुळयाचे उत्तम साधन आहे. वाचनाने एकाग्रता, चिंतन-क्षमता, आदि हितकर मनोवृत्ती विकसित होतात. एकाकीपणा, वैताग, नाउमेदी यांवर वाचनाचे वेड हा उत्तम उतारा आहे. त्यामुळे, वृत्तीत स्थिरता व गांभीर्य दोन्ही बाणतात, आंतरिक शांति व सामर्थ्य वृद्धिगत होतात. वाचनाने मनाला आश्चर्य, परिचितता, सहानुभूती, प्रशंसाक्षमता, विकसन व सत्योदय या प्रवृत्तींचा लाभ होतो. वाचन व्यक्तित खऱ्या महात्मतेचे बीजारोपण करते. वाचनाची चव, सवय, गोडी एकदा जडली की जीवनात फार मोठ्या आनंदाचा लाभ घडतो. हे वेड लावून घेणे प्रयत्नसाध्य आहे. एखाद्या ख्यातनाम विचारवंत तत्त्वज्ञ निबंधकाराचे एखादे उत्कृष्ट पुस्तक निवडा. आता त्यातल्या विचारसागरात खोल अवगाहन करा. एकदा, त्याच्या विचाराचे मर्म-माणिक व उद्दिष्ट-रत्न, तुम्हाला गवसले की तुमच्या आनंदाला पारावार उरणार नाही. एखादे सुरेखसे पुस्तक सहज सापडण्याजोगे हाताशी ठेवलेत, तर फालतू वेळ सापडताच तो सत्कारणी लावता येईल. यामुळे तुम्ही एक मर्मज्ञ, जाणकार वाचक बनू शकाल.

**AUGUST 8**

राष्ट्रीय श्रावण १८

# जीवन समर्पित

आपले जीवन तुम्ही सर्वार्थाने भगवंताच्या चरणी समर्पित करा. तुमची जी काही दैनंदिन कार्ये असतील, जे नित्याचे व्यवहार असतील, सारे पार पाडताना, ही अर्पणवृत्ति अहंविहीनपणे सतत मनात वागवा. देवाची भक्ति, सेवा थोडी तरी करावी असे तुमच्या मनात अधून मधून येत असेल तर मग तो सर्व काळ करण्यात तरी काय अडचण ? भगवंतापायी आपल्या अंगची एखादी तरी गुणवत्ता रुजू व्हावी असे वाटत असेल तर मग तुमच्याजवळचे सारेच गुणविशेष त्याच्या पदी अर्पायला काय हरकत ? ' अति सर्वत्र वर्ज्ययेत ' हे तत्त्व इथे लागू पडत नाही. इथे प्राधान्य व्हायला हवे, ' अधिकस्याधिक फलम् ' या विचाराचे जीवनात काही काळ का होईना, पावित्र्य, विद्वत्ता, नेकी यांचा अवलंब व्हावा हे तुम्हाला पटत असेल तर अशा महान् गुणांचा सर्व वेळ अवलंब करण्यात काय अडवणूक येण्याजोगी असू शकेल ? आपल्या साऱ्या विचारात, प्रत्येक उच्चारात, आणि संपूर्ण आचारात स्ववृत्ति सर्वदा भगवच्चरणार-विंदी मिलिंदायमान रहावी याहून इष्टतर असे जीवनसाध्य असणे कठीण. अशा प्रकारे जीवनकुसुम प्रभुपदी वाहण्याची संधि तुम्हांला लाभलेली आहे. तुम्ही काय निश्चय करता नि कसा पार पाडता याकडे देवाचे नीट व बारीक लक्ष असते. तेव्हा या जीवनपद्धतीवर खूप मनन चिंतन करुन, ' इदं भगवते, न मम, ' या विचार-सरणीनुसार आयुष्य व्यतीत करा.

●

**AUGUST 9**

# वृत्तींत सदानंद

आशावादीपणा चांगलाच संसर्गजन्य असतो. एकजण भोवताल-च्यानांही आपल्या सारखाच आशावादी करुन टाकतो. समाधानीपणाने प्रकृति सुधारते, व दीर्घायुष्य लाभते. सुस्वभावी हसतमुख व्यक्ति नेहमीच इतरांचे कल्याण चिंतिते, साधतेही. अशा माणसाच्या मन:सुर्याच्या उन्हामुळे संशय, निराशा, नाउमेदी ह्यांचा अंधार कुठल्याकुठे पार नष्ट होऊन जातो. खेळकर वृत्तीमुळे मन व शरीर दोन्ही सशक्त बनतात. आत्म्यासाठी तर हास्य हे रामबाण शक्तिवर्धक सिद्ध होते. बुद्धीमान आशावादी मनुष्य सर्वत्र धैर्य आत्मविश्वास, आशा ह्यांनी भारलेले वातावरण निर्माण करतो, आनंदी वृत्तीने वावरणारी व्यक्ति सर्वांचे कल्याण साधते. स्फूर्तिदायक, आनंदी, आशावादी विचार प्रसृत करण्याने तुमच्या हातून इतरांची जी मदत होईल ती अनाठायी, वा निष्फळ होणार नाही. कोणाशी सहानुभूतीने बोलण्याची, कोणाला धीर वाटावा म्हणून त्याच्याकडे हास्यमुखाने पाहण्याची वा प्रत्यक्ष सक्रीय मदत देऊन कोणाला सुखी करण्याची एकही संधि फुकट जाऊ देऊ नका, वाया दवडू नका. चोखंदळ, परहितकारी, शतगुणी आशावादीपणा व वृत्तीतला व्यापक सदानंद, ह्या दोन्ही अमोघ व विधायक शक्ति आहेत. अशा शक्तीं-मुळे महान्, उमदी, अपूर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळते, स्फूर्ति लाभते, चेव येतो.

\+ + +

## राष्ट्रीय श्रावण २०

# ज्ञान व आचरण

थोर ग्रंथांचे जरी तुम्ही खूप वाचन-पारायण-मनन केले असलेत. जगद्वंद्याची भरपूर उपदेशात्मक प्रवचने श्रवण केली असलीत, व मनात पुष्कळ उत्कृष्ट आणि ठाम निर्धार-निश्चय केले असलेत तरीही त्या सर्वव्यापी शिवाची जोपर्यंत तुमच्या जिवाशी दैनंदिन जीवनात, व्यवहारात, आचरणात सतत सांगड पडत नाही तोपर्यंत खरे थोरपण तुम्हाला मिळणे नाही. तुमच्या मनोभांडारात अमोल व उच्च विचारसत्यांचा केवढा का साठा असेना, पण त्यांचे तुमच्या लेखी खरे मुल्य काय. हे तुम्ही ती व्यवहारात किती उतरविता या वरच ठरावयाचे असते. अशा प्रकारे, प्राप्त झालेल्या सत्याचा जेव्हा तुम्ही प्रत्यक्ष वापर करून पहाल, तेव्हा तुम्हाला त्याहून महत्तर सत्य उमगून येईल. स्वतःच्या मार्गदर्शनासाठी, सुखासाठी, व आचरणात उतरविण्यासाठीही, तुम्ही विचारसत्यांची जरी सर्वोच्च पातळी गाठावयाचे ठरविलेत तरीही ते साध्य करणे तुम्हाला मुळीच जड कठीण, अवघड असे वाटणार नाही. परमेश्वरी संकेत तसे सहजी आकलन होत नाहीत. पण तो कर्ता-करविता तुमच्या मनात सुविचार सतत जागवीत राहतोच. प्रश्न उरतो फक्त त्या उदित ज्ञानानुसार तुम्ही आचरण ठेवण्याचाच. तुमच्यासाठी एक महान व समृद्ध वारसा ठेवलेलाच आहे. पुढे सरसावून त्याचा ताबा घ्या. दिरंगाई करु नका.

卐

**AUGUST 11**

# राष्ट्रीय श्रावण २१

# श्रद्धेनेच मनुष्या-

**श्रद्धेनेच मनुष्या येते सामर्थ्य या जगामाजी**
**न दिसे एकहि वस्तु श्रद्धेने हो अलभ्य आहे जी**

ह्या काव्यपंक्ति सर्वांच्याच अवलोकनात आहेत. तेव्हा देवावर पुरेपूर श्रद्धा असू द्या. साऱ्या जीवनक्रमातच श्रद्धेवर भिस्त ठेवा. सचोटी व नेकी श्रद्धेमुळेच अंगी बाणतात. पण दीर्घोद्योग, अंग मेहनत, प्रयत्न यांची जोड मिळाल्याशिवाय मात्र श्रद्धा असमर्थ ठरेल. तसेच अश्रद्ध जीवावरही परमेश्वर खूष नसतो. इहलोकी श्रद्धेने वावरलात, अडीअडचणींवर श्रद्धेने मात केलीत की परलोक साधलातच अशी खात्री बाळगा. साऱ्या ईप्सिताचे सार सर्वस्व या श्रद्धेतच सामावलेले आहे. साक्षात्कार वाटणीला येण्याचा तोच एकमात्र आधार, तेच एकमेव साधन आहे. श्रद्धेची ढाल सरसावलीत की दुष्टांचे विषारी वाग्बाण तुम्हाला घायाळ करु शकणार नाहीत. सश्रद्धाला सर्व काही लाभू शकते पण अश्रद्धाला फुटकी कवडी सुद्धा दुरापास्तच होते. भगवंताला शरण जायला अंतःकरण सश्रद्धच हवे. निढळाचा घाम गाळणाऱ्यांना व मनगटातला कस सिद्ध करणारांना परमेश्वर कधीच अंतर देत नाही ही श्रद्धा सदैव मनात बाळगा. जीवनात मी यथाशक्तिच नव्हे तर आटोकाट परिश्रम केले आहेत, कच न खाता लढलो आहे, सारी कर्तव्ये यथासांग पार पाडली आहेत, अंगचोरपणा न करता परोपकारार्थ झटलो-झिजलो आहे. जगन्नियंत्यावरील श्रद्धा कधीच ढळू दिलेली नाही. असे तुम्हाला. निःशंकपणे, छातीठोकपणे, निर्धास्तपणे म्हणता यावे.

## राष्ट्रीय श्रावण २२

# गठबंधन भगवंताशी

भगवंताशी जडलेल्या आपल्या शाश्वत गठबंधनाची महत्त्वपूर्ण जाणीव विचारी माणसाच्या मनात एकदा का जागी झाली की मग त्याचे सारे जीवन कसे, उच्च विचारसरणी, अविरत कार्यमग्नता, व उच्च उद्दिष्टे यांनी ओतप्रोत होऊन जाते. आत्मविश्वास आणि आनंद यांच्या अवर्णनीय लहरी त्याच्या मनात सतत उचंबळत राहतात. आलेल्या प्रत्येक आणीबाणीला सुवर्णसंधीला, वा बंधनाला पुरुन उरायला समर्थ ठरेल इतकी अचल श्रद्धा त्याच्या जवळ केव्हाही असते. परमेश्वराशी जवळीक साधण्याचा, त्याचे मार्गदर्शन मिळविण्याचा त्याच्या अपार करुणेचे भाजन ठरण्याचा आणि त्याच्याशी केव्हाही, कुठेही, संवाद करण्याचा योग प्रत्येक मनुष्य जुळवू शकतो. आपल्या दैनंदिन आचार विचारात भक्कमपणे आपण परमेश्वराला मार्गदर्शक व भागीदार मानायचा की नाही हे प्रत्येकाने स्वतःच ठरवायचे आहे. आजपर्यंत हजारो सध्दर्म प्रवृत्त विचारवंतांनी परमेश्वराशी सख्यसंबंध जोडण्याने व त्याचे मार्गदर्शन पत्करण्याने होणाऱ्या, अपार लाभाचा प्रत्यक्ष पुरावा आपल्या समोर स्वतःच्या उदाहरणांनी ठेवला आहेच. त्यांच्याप्रमाणेच अक्कलहुशारीचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी आपणही परमेश्वरावर पूर्ण भार टाकण्यास मुळीच हरकत नाही. तो नौका पैलतीरास लावीलच.

AUGUST 13

# राष्ट्रीय श्रावण २३

# सक्रिय निष्क्रियता

पुष्कळ वेळा शांत स्थिर निष्क्रिय बसण्यातही हित असते समस्येला गांगरुन धावाधाव करणे बव्हंशी निरुपयोगी ठरते. याउलट स्थिर बसून गंभीरपणे विचार मंथन चालविल्यानंतर समस्येचा उकल हळूहळू होऊ शकतो. अविरत धडपडीनेच कार्यसिध्दि पदरात पडणार या भ्रमात राहणे बरे नाही. चिंतन-मननात गेलेला वेळ, कल्पनेला स्वैर सोडून घालविलेला काळ आणि मनोमन बेत-आखणीत खर्चलेला समय सारे सत्कारणी लागतात. कार्यपूर्ततेत याही अवधीचा खूप हातभार लागतो. सतत कार्यमग्न असणाऱ्या माणसाला जास्त यश मिळते असे हमखास होत नाही. अनुभवी कार्यकर्त्यांना, समतोल स्थिर वृत्तीची किंमत बरोबर समजते, निश्चयीपणाचे मोल ओळखते व मन:संयमाचे मूल्य पटते. घाईत, चिंताग्रस्ततेत, लहरीच्या झटक्यात हातावेगळे केलेले काम साधारणपणे बिघडतेच. तेव्हा असली सवय पार घालवून टाका. शांत स्थिर, व आत्मविश्वासमय अशा मनाच्या अवस्थेत तुमच्या विविध कार्यशक्ति, मनोवृत्ती, विचारपद्धति, जास्तीत जास्त कार्यक्षम ठरतात हे त्रिकालाबाधित सत्य आहे. निष्क्रियतेतही सक्रियता असू शकते.

卐

**AUGUST 14**

## राष्ट्रीय श्रावण २४
## (श्रावण शु. ५, नाग पंचमी)

# अंगी मुरवा-

रोज उचित संस्कार होतील, योग्य वळण लागेल, व इष्ट शिस्त पाळली जाईल, तर सुखकर सवयीच जडतील. अविकसित व अज्ञात अशी अनेक गुणबीजे माणसात सुप्तावस्थेत असतात. त्यांना योग्य खतपाणी मिळून, त्यांची यथास्थित मशागत झाल्याने, पद्धतशीर सरावानंतर ते गुण अंगी फोफावतात. घाबरगुंडी उडणाऱ्या भेदरटाच्या ठायी आत्मविश्वास उपजतो, सुस्तावलेल्या जडभरताच्या अंगी उद्योगप्रियता उद्भवते. निरुद्देश्य भरकटणाऱ्याला एकाग्रता साधून योग्य उद्दिष्ट लाभते. चिकाटीच्या जोरावर सर्वांनाच स्वत:ला पडलेल्या मर्यादा लांघता येतात. हे सारे काही घडण्यासाठी आजच्या नागपंचमीच्या सुमुहूर्तावर रोज सराव अभ्यास व प्रयत्न करण्यास प्रारंभ होऊ द्या. आदर्श वर्तणुकीसाठी व वैयक्तिक यशस्वितेसाठी आत्मनियमन अतिशय अगत्याचे असते अंगी मुरायला हवेत शिस्तपालन, आत्मनियमन, स्वाभिमान आणि स्वयंशासन हे चार सद्गुण त्यांचे खुपसे शिक्षण आखणी करुन अगत्यपूर्वक सर्वांनीच निष्ठावंतपणे घ्यायला हवे. ते घेण्यास सुरवात करण्यास, आजच्या स्वातंत्र्यदिनाहून अधिक योग्य असा दिवस दुसरा नाही. अंगवळणी पडलेल्या सवयी या स्वरुपात, या गोष्टी सहजी साधू लागल्या की माणसाला समाजात मानाचे पान लाभते, त्याच्या जीवनक्रमाचे अनुकरण होऊ लागते. आपल्या नियोजित उद्दिष्टाकडे अग्रसर होत असल्याची त्याला खात्री वाटते.

**(स्वातंत्र्य दिन)**

**AUGUST 15**

## राष्ट्रीय श्रावण २५

# मनोविकार

चीड, प्रतिकार. संताप, अशासारख्या तामसी विकारांचा मनातून समूळ उच्छेद करावयास हवा. ती आहेत सूक्ष्म न जाणवणारी मानसिक जहरी विषे. केव्हाही जर काही मनाविरुद्ध घडले तर त्याचे कारण बहुश: आपल्याचपाशी स्वत:चे ठायीच अंतर्मानसातच सापडेल. आपल्यात असणाऱ्या उणीवा तत्परतेने ओळखून, समजून घ्या, मान्य करा; नव्हे त्या दुरुस्त करण्याची तातडीने नीट काळजी घ्या, दक्षता बाळगा. आपला 'स्व' भाव सुधारण्यात वेळ वेचा. आपला आदर्श लोकांपुढे ठेवून त्याद्वारे त्यांच्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न पाहिजे. त्यावर ताशेरे झाडून वाक्ताडनाने त्याचे मत बदलण्याचा प्रयत्न उपडचा घडचावर पडणाऱ्या पाण्याप्रमाणे व्यर्थ जाईल. जेव्हा जेव्हा अन्याय विरोध होईल, वादळी विवाद वाटचाला येईल, किंवा वैयक्तिक नालस्तीला तोंड द्यावे लागेल, तेव्हा तेव्हा, सत्याची शक्ति अमोघ असते हे ध्यानी धरुन मनाचा तोल ढळू न द्यावा. कसल्याही परिस्थितीत तुम्ही सापडला असलात तरी मनमिळावू वागणूक, प्रभावी परोपकारबुद्धि आणि शांत समतोल वृत्ती यांच्या बळावर स्वत:ला संयमात ठेवून तुम्ही, ओढवलेल्या प्रसंगावर मात करु शकाल. मनातला मूक संवाद व नेणिवेतले चिंतन यांच्या साहाय्याने तुम्ही जास्त उपयोगी पडता. मतपरिवर्तन शद्वांच्या माऱ्याने फटकळपणाने होत नाही ह्या वास्तवाचे विस्मरण न व्हावे.

*

**AUGUST 16**

## राष्ट्रीय श्रावण २६

# कृतिप्रवणता

अंगीकृत कार्य तडीस जावे एतदर्थ पुष्कळ वेळा कामात ढिलाई न करता आपली इच्छाशक्ति सर्वसामर्थ्यानिशी निर्धारपूर्वक एकवटावी लागते. महान् कार्ये हातावेगळी होण्यासाठी आपण स्वतः कार्यनिपुण व कर्तबगार आहोत कर्तव्यदक्षतेत ढिलाई होणार नाही असा स्वतःला ठाम विश्वास वाटायला हवा. निर्णयशक्ति, हेतुनिष्ठता आणि सातत्य यांचे बाळकडू प्यालेले असल्यामुळे अंगी बाणलेल्या धैर्य व आत्मविश्वास यांच्या जोरावर ढिलाईला अजिबात फाटा देऊन अनेक मंडळींनी सौख्य, समाधान व भरभराट प्राप्त करुन घेतली. दैनंदिन जीवनातले विविध कार्यभार, कर्तव्यपालने आणि समस्यासमाधान तुमच्या कर्तृत्वाची कसोटी पाहणारच. पण, जर तुमचे चारित्र्यसंवर्धन तत्त्वनिष्ठेच्या मजबूत पायावर उभारलेले असेल तर तुम्ही या सर्व प्रसंगाना सहज पुरुन उराल. यशस्वी सबल निर्णय घेता येणे आणि तदनुसार ढिलाईला डोके वर काढू न देता अंमलबजावणीची कार्यपद्धति कार्यवाहीत आणणे, ही नावलौकिक मिळविलेल्या थोर जगद्वंद्य विभूतींची प्रधान गुणवैशिष्टये होत. हुशारीने, सारासारविचारपूर्वक, साधकबाधक बाबींचा आढावा घेऊन तुम्ही आपला मार्ग उद्दिष्ट व नियत अवधि निश्चित करा आणि मग मात्र कृति प्रवण बनून ढिलाईवर मात करुन न कचरता, चांचरता, डगमगता वाटचाल चालू ठेवा. ध्येय गाठालच गाठाल.

卐

**AUGUST 17**

## राष्ट्रीय श्रावण २७

# विचारवैभववर्धन

मन व्यापक व समृद्ध बनण्यासाठी मुख्यतः जास्त उपयोग वाचनाचा होतो. पण पाचकळ, फालतू, चटोर पुस्तके वाचण्याने मात्र वेळाचा विनाश करण्याशिवाय इतर काहीच साधत नाही निरर्थक व निरुपयोगी कार्यात जीवनाची उधळपट्टी करणे ह्याला कोणी शहाणपणा समजत नाही. म्हणून रोजच्या वाचावयाच्या ग्रंथाची मोठ्या चोखंदळपणे निवड करा. इतिहासाला व भूतकाळाला ललामभूत ठरलेले थोर ख्यातनाम तत्त्वचिंतक त्यांच्या सहवासात सोबतीत, स्वतःचा विचारकोष व भावभांडार लुटण्यासाठी, सदैव तुम्हाला पाचारण करीत असतात. भव्योदात्त, प्रेरक व स्फूर्तिप्रद अशा साहित्याचा समृद्ध संग्रह सुलभपणे तुम्हाला उपलब्ध आहे. एखादा महान् ग्रंथराज निवडून त्याला आपला कायमचा सखा बनवा. विद्वान् व्यासंगी विचारवंतांनी लिहिलेल्या विचारांचे मननपूर्वक परिशीलन करुन ते आत्मसात् करा. या ग्रंथगुरुंचा उपदेश शिरोधार्य मानून तो अंगी बाणवा. ह्याने तुमचे बुद्धिसामर्थ्य, तुमची इच्छाशक्ति, दोन्ही बलवत्तर होतील. आपले महान तारतम्य-विवेकपूर्ण जीवन सत्कारणी लागण्यात विचारवैभवसमृद्ध वाचनाचे महत्त्व किती अजोड आहे हे वेळीच ओळखा. वाचनाने विचार-वैभववर्धन घडते. जेवढे तुमचे विचारवैभव मोठे, तेवढे तुमचे जीवन महान्, योग्यताही जास्त.

**AUGUST 18**

# घोर सत्याचा

भोवतालच्या जगातील कित्येक जीवांच्या जीवनावर अज्ञान, आर्तता, अंधश्रद्धा, ह्यांचे किती भयानक दुष्परिणाम घडलेले आहेत याचे नीट काळजीपूर्वक निरीक्षण करा. म्हणजे या दुश्चिन्हांचा पगडा आपल्या जीवनावर बसू देण्याचा मूर्खपणा तुमच्या हातून घडणार नाही. असंबद्ध दिशाहीन विचारप्रणालीची गुलाम करुन सोडणारी शक्ति, जर तुम्ही नीटपणे ओळखू शकलात तर खऱ्या सत्याचा शोध घेण्याची उत्कट इच्छा तुमच्या मनात उद्भवू शकेल. सत्यसाधनेचा दुर्दम्य निर्धार कायम तुमच्या हृदयांत दृढमूल होऊन बसू द्या म्हणजे हळूहळू तुमची ती आकांक्षा फलद्रुप होत जाईल. अविरतपणे, निरलसपणे, एकनिष्ठेने सत्याच्या शोधाचा घोर तुमच्या जीवाला अखंड लागू द्या म्हणजे सत्य तुम्हाला गवसेलच गवसेल. इच्छा-आकांक्षांच्या पाठोपाठ पूर्ति आलीच पाहिजे असा अलिखित पण अटळ नियमच आहे. नित्यश: , कळकळीने, आग्रहपूर्वक सत्याचे सखोल अध्ययन करा. सत्य तुम्हाला, अज्ञान, आर्तता, अंधश्रध्दा, यांच्या तडाक्यात, कचाट्यात, विळख्यात, सापडू देणार नाही. अंततोगत्वा तुम्हाला, त्या सत्याचे उगमस्थान अनादि अनंत आत्म्याशीच आहे, हे ज्ञान प्राप्त होईल.

# राष्ट्रीय श्रावण २९

# गुणदोषविश्लेषण

अज्ञानच असते पापाच्या, गुन्हयाच्या कृत्याच्या मूळाशी.
अपूर्णताच उघडकीस येते आदळआपटीने नेंहमी.
घाईमूळे वेळेचा, पैशाचा कायम अपव्यय होतो.
स्वतःवरच दाखविलेली दया निश्चितपणे स्वार्थमूलक असते.
असमाधान हा माणसांना जडलेला एक दुर्धर रोगच होय.
तोंडपुजेपणा करणारा मनुष्य निःसंशयपणे मूर्ख असतो.
गर्वाचा जन्म स्वतःत असणाऱ्या कमतरतेच्या पोटी होतो.
आळशीपणा म्हणजे वेळेची सरळसरळ उधळपट्टी होय.
भीति हे स्वतःला निष्कारण घालून घेतलेले बंधन आहे.
चिंता हे मानसिक आंधळेपणाच्या वृक्षाला लागणारे फळ आहे.
पूर्वग्रहदूषित विचारांचा उगम असतो मनाच्या कोतेपणात.
मत्सरी स्वभाव मानसिक क्षुद्रपणाचा, कोतेपणाचा द्योतक असतो.
परस्पर चुरशीचे पर्यवसान घातक हेव्यादाव्यात होते.
उद्धटपणा हे अकुलीनतेचे बाह्य, दृश्य, स्पष्ट लक्षण होय.
सूडभावना ही माणसातल्या पूर्वापार रानटीपणाचे चिन्ह आहे.
उदारपणा व कृतज्ञता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
सच्चेपणाचे दुसरे नांव - औदार्य; शिस्तीचे-सहनशीलता; आशेचे-विश्वास.
खरा उपजत थोरपणा माणसाच्या साध्या राहणीत आढळतो.
सभ्यपणा हेच माणसाचे खरे प्रधान, अक्षय सामर्थ्य होय.
समतोलपणा ही माणसानें कमाविलेली अमोघ शक्ति आहे.
नेकी, सचोटी, पावित्र्य याचेच दुसरे नांव शहाणपणा.

☆

**AUGUST 20**

## राष्ट्रीय श्रावण ३०

# क्षेम सद्भावांनी

आजचा दिवस आधीच्या सर्वांहून अधिक आनंदमय व उत्तम बनविणे सर्वस्वी तुमच्याच अधीन आहे. एखादा स्फूर्तिप्रद, प्रेरणादायक व चैतन्यमय असा विचार दिनारंभीच मनात खेळू द्या. आजच्या लाभणाऱ्या सुसंधीचा जास्तीत जास्त व लगेचच्या लगेच फायदा मिळविण्याची उत्कट इच्छा हृदयी दाटू द्या. आदर्श विचारांची आज जर तुम्ही पेरणी केलेली असलीत, तरच उद्या उत्कृष्ट कार्यसिध्दीच्या भरघोस पिकाची कापणी करु शकाल. मनोगृहाच्या दारे-खिडक्या सताड उघडया टाका. उत्साह, आशावाद व सदिच्छा यांचा सूर्यप्रकाश आत सर्वत्र पसरु द्या. अशा प्रकारे जर, तुमच्या व भोवतालच्या मंडळींच्या मनाची ठेवण सद्भावपूर्ण बनली, तर सर्वांचेच जीवन समाधानी, सुखी व समर्पित असे होईल. काही महत्त्वाकांक्षी, हेतु पूर्ण, उत्पादक असा उद्योग आत्ता हाती घ्या; आजच्या दिवसाचे सार्थक करा. सदिच्छा, कल्याण, परोपकार यांचा ध्यासच लागू द्या. म्हणजे या सभ्दावांनी सर्वांचे क्षेम साधेल. मनाला या रीतीने सुसंस्कारपूर्ण वळण लावीत राहिल्याने तुमच्या मनाची इच्छाशक्ति अधिकाधिक बलवत्तर होत जाईल आणि येणारा प्रत्येक दिवस जास्त शुभंकर, अधिक उत्साहवर्धक व भरपूर प्रेरणादायी असा ठरुन सर्वत्र क्षेमवृद्धि होईल.

## राष्ट्रीय श्रावण ३१

# सद्विचारी मनोवृत्ति

तुमच्या मनोव्यापारात नित्य दैनंदिन विचारांची, कल्पनांची, आशयांची प्रचंड उलाढाल तुम्हांला कळत नकळत होत राहते. यातला प्रत्येक मनात आलेला व जोपासना झालेला विचार, कल्पना, आशय तुमच्या जीवनाची बरी वाईट घडण घडवीत असतो तुमच्या मनोकोषात काही विवक्षित मर्यादेपर्यंतच विचारसंपदेला जागा असते. तेव्हा चुकीच्या अहितकर, निरुपयोगी, अश्लाघ्य, विध्वंसक विचारांची खोटी नाणी फेकून देऊन सद्विचारांच्या, सभ्दावांच्या, सद्वृत्तीच्या अस्सल नाण्यासाठी जागा रिकामी करा. बारकाईने, प्रयत्नपूर्वक जागरुकतेने, एक एक खोटे हिणकस विचारनाणे टिपून काढून फेकून द्या व नवे अस्सल उत्तम नाणे जोडीत चला चांगल्याचा अंगिकार केल्यानेच वाईटाचा सुलभपणे त्याग घडेल अशीच परमेश्वरी योजना असते. अन्याय, मत्सर, स्वार्थ आशंका, सूड, अप्रामाणिकपणा, यापैकी कोणचीही तामस व त्याज्य भावना प्रबळ होतेशी वाटताच तिच्यावर सात्विक सद्विचारांचा मारा करण्यास सुरवात करा आणि बघा काय चमत्कार घडतो तो. हातच्या कांकणाला आरसा लागत नाहीच तुम्ही आपल्या प्रत्यक्ष वर्तनाने, अनुकरणीय आदर्शाने, अस्सल आचरणाने हा प्रयोग यशस्वीपणे सिद्ध करुन दाखवू शकाल.

★

AUGUST 22

## राष्ट्रीय भाद्रपद १

# कर्तृत्वाची वल्ही

आपल्या बोलण्यातून नि वागण्यातून आपले स्वत्व प्रकट होत असते. तेव्हा तोंडून उच्चारले जाणारे शद्ब नीट निवडलेलेच असतील अशी खबरदारी घ्या जवळची विविध सामर्थ्ये नि आपल्या अन्यान्य कर्तबगाऱ्या यांचा जास्तीत जास्त उपयोग होत राहील अशी योजना असावी. तुमची विचारधारा सखोल, भारदस्त नि सुनिश्चित असावी. कारण तुमच्यातली गुणवत्ता अजाणतेपणी तुमच्या बाह्य वर्तणुकीतही डोकावत असते. आपला आब राहिला पाहिजे. ह्याची सतत जाणीव मनात बाळगून त्या दृष्टीने तुमचे वैशिष्टच स्वतःच्या सुरातून, बोलण्यातून, उच्चारातून प्रकट होत जाऊ द्या. जीवन अधिक विशालतेने जगण्याच्या योजना आखण्यास आणि तद्सिध्यर्थ सर्वस्व वेचण्यास अधिक चांगला मुहूर्त सापडण्याची वाट पाहू नका. तो आताचाच आहे. अंतिम यशाच्या प्राप्तिची प्रतिज्ञा घेऊन नव्या निर्धाराने पाऊल टाका. जास्त विलंब न लावता तुमच्या साऱ्या शक्ति लावा पणाला. बघा कळकळीने केलेला असा चिकाटीचा प्रयत्न नक्की फलद्रुप होतो की नाही ते. ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावर दृष्टी खिळलेली राहू द्या. कर्तृत्वाची वल्ही हाती उचला आणि कार्यसिद्धीच्या दिशेने या भवसागरावर आपली जीवननौका निधड्या छातीने हाकारा.

**AUGUST 23**

## राष्ट्रीय भाद्रपद २

# उद्योगमग्नता

मानवजन्म लाभून अंगमेहनत करण्याची, परोपकार करण्याची सुवर्णसंधि तुम्हाला लाभली याबद्दल त्या सृष्टीकर्त्याचे तुम्ही सदैव ऋणी राहिले पाहिजे. एक विवक्षित उद्दीष्ट मनाशी निश्चित ठरवून ते गाठण्यासाठी कायावाचामनेकरुन झटा, अंगचे कर्तृत्व संपूर्णपणे तदर्थ पणाला लावा. तुमचे सारे मनःसामर्थ्य आणि व्यक्तिमत्वातले निःशेष कौशल्य त्याकारणी खर्ची पडू द्या. म्हणजे निवड केलेले कार्य मनाजोगे पार पडेल. उत्तम प्रकारे पूर्ण केले जावे या हेतुने प्रभुने हाती देवविलेले सत्कार्यही, वस्तुतः माणसाच्या अंगी पुढाकारप्रवृत्ति, स्वावलंबन, कष्टाळूपणा, उपक्रमशीलता, वगैरे अस्सल गुण बाणविण्याची एक परमेश्वरी तरतूद, योजना, तऱ्हा आहे. पत्करलेले काम खऱ्याखुऱ्या उल्हासमयतेने व सच्च्या कृतज्ञताबुद्धीने सर्वांनी करावे. दिवसाचा शुभारंभ हा एक नवे निर्धार करण्याचा व जुने अधिक मजबूत बनविण्याचा प्रसंग आहे असे माणसाने मानावे. दिवसाच्या अंती आज काही नवी जमा झाली, पूर्तता जमली, कमाई केली, म्हणजेच ईश्वरी कृपा लाभली असे प्रत्येकास वाटावे. प्रत्येक दिवशी परोपकाराच्या, कार्यनिवडीच्या आणि कार्यपूर्ततेच्या असंख्य संध्या उपलब्ध होतात. आजचाही दिवस तसाच आहे आणि तोही सर्वस्वी तुमच्याच मालकीचा. उद्योगमग्नतेने तो भोगुन मनाची प्रसन्नता, आनंद अनुभवा.

●

AUGUST 24

# राष्ट्रीय भाद्रपद ३

## (श्रावण शु. १५, राखी पौर्णिमा)

# दातृत्व

आजच्या नारळीपौर्णिमेच्या शुभ दिना पासून सत्पात्री दान देण्याची सवय लावून घेण्यास सुरवात करा. द्यावे कसे हुशारीने, मनमोकळेपणाने, सढळ हातानी. देता काय येणार नाही? द्रव्य आहे, ग्रंथ आहेत, घरसामान आहे. एवढ्यानेच काय होते? सल्ला, सहानुभूति स्फूर्तिसुद्धा देता येते. प्रतिदिनी काही ना काही देत असावे. जशी काटकसरीने संग्रह करण्याची सवय लावायची, तशीच ही उदारपणे देत जाण्याची. द्यायचे ते विशाल अंत:करणाने. कृतज्ञतेने परत करणे ते वेगळे. प्राप्तिप्राप्तीच्या उद्देशाने देणे तसे गौणच. द्यायचे ते कर्तव्यबुद्धीने, देणे योग्य आहे म्हणून. तेच खरे दातृत्व. योग्य ठिकाणी अक्कलहुशारीने योग्य ते देऊन घेणाऱ्याचे सौख्य वृद्धिगत करण्यातला आनंद काही आगळाच असतो. उदारपणे, सुहानुभूतीने, नि:स्वार्थपणे इतरांची कितीही दानसेवा केली तरी ती अपुरीच पडेल इतकी कमतरता सर्वत्र आढळून येते. दानशुर कर्णाची, पहिल्या पांडवाची आठवण करा. कवच-कुंडले कसली! स्वप्राणच दिले त्याने इंद्राला, त्याचे कपट ओळखल्यावरही. निरपवादपणे देत राहणे हे त्याने आपले जीवितध्येय मानले होते. यथाशक्ति देत जाणे हे आम्हा त्याच्या वंशजांचे आद्यकर्तव्य ठरते. तेव्हा रुढीने चालत आलेली चाकोरीतली राखी दुसऱ्याच्या मनगटावर बांधूनच फक्त संतुष्ट न राहता, आज या कर्तव्याच्या काटेकोर पालनास प्रत्यक्षच प्रारंभ होऊ द्या.

**AUGUST 25**

# राष्ट्रीय भाद्रपद ४

# शब्दमाहात्म्य

विचारांच्या मंथन-चिंतनाची सुरवात वास्तविकपणे पाहता होते शद्बव्यासंगाने, शद्बसाधनेने, शद्बाध्ययनाने. निवडक अर्थघन शद्बावर जर तुम्ही लक्ष केंद्रित केलेत, बुद्धि एकवटलीत, मन एकाग्र केलेत, तर साहजिकपणेच तुमच्या बुद्धीत स्फूर्तिदायक, सुंदर, प्रभावी विचारांची एक मालिकाच जशी गुंफली जाईल. शद्ब व विचार दोन्हीही एकमेकांतून उद्‌भवतात. त्यांची परस्परांवर क्रिया-प्रतिक्रिया सुरु राहते. दोघांनाही एकमेकांशिवाय जसे अस्तित्वच नाही. भाव-विचार नदीचा उगम शद्बडोंगरात असतो. जसजसे तुम्ही वेचक अर्थवाही शद्बांवर ध्यान धरु जाता, तसतसे त्या शद्बांना अनुरुप, अनुषंगिक विचार तुमच्या मनात उद्‌भवतात. सन्मान, श्रद्धा, नीति, सातत्य, पावित्र्य, निष्ठा, विवेकशीलता, उदारमनस्कता, धीरोदात्तता, परहितकांक्षा, उमदेपणा यांसारख्या गुणनिदर्शक शद्बांचा मोठ्याने उच्चार करा नि पहा मन कसे उच्च भावनानी भारले जाते ते. मग पवित्र विचारांचा मनात उद्रेक होईल, हृदय सात्विक आनंदाने प्रफुल्लित होईल, आणि काही शाश्वत, महान उदात्त कार्य कर-ण्याची बुद्धि तुम्हाला उत्स्फूर्तपणे होईल. एकाकी शद्बाचे महत्त्व पूर्ण विचारापेक्षा मुळीच कमी नाही. शद्बांपोटीच तर विचार निपजतात.

## राष्ट्रीय भाद्रपद ५

# उमेदवारी

खऱ्या श्रेष्ठ तत्त्वपालक व्यक्तींच्यावर स्तुतिसुमने उधळण्यास हे जग नेहमीच एका पायावर सिद्ध असते. स्वार्थापेक्षा शील व सत्तेपेक्षा सचोटी यांचीच मातब्बरी मानणाऱ्या श्रेष्ठ अंतःकरणांच्या विभूतींचे अनुकरण करण्यासाठी व त्यांची बरोबरी साधण्यासाठी तुम्ही सदासर्वदा प्रयत्नशील राहिले पाहिजे. अनेक थोर महात्म्यानी, महान् कार्यांना आवश्यक इतक्या पूर्णत्वाने व हिरिरीने, आपल्या रोजच्या व्यवहारातील सामान्य छोटी कामे. पुरी निपुणता वापरुन, पार पाडली आहेत. आपल्या दैनंदिन जीवनातील वरुन क्षुल्लक वाटणारी कार्ये यशस्वीपणे उरकता आल्यानेच महान् कार्याची धुरा वाहण्यासाठी विशेषत्वाने लागणारे - चिकाटी, उद्योगशीलता, धैर्य हे सद्गुण उमेदवाराच्या अंगी उपजतात. कुठल्याही कार्यक्षेत्रात पुढारी किंवा अधिकारी होण्यासाठी तुम्हास प्रथम त्या क्षेत्रातील छोटी छोटी क्षुल्लक कामे हातावेगळी करण्याची उमेदवारी केल्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्ही सध्या अंगावर पडत असलेली छोटी मोठी कामे पार पाडीत जाऊन, आपल्या अंगी योग्य, आवश्यक ते गुण वाढविण्यासाठी, त्या क्षुद्र जबाबदाऱ्यांपासून जास्तीत जास्त लाभ करुन घ्या. अधिक मोठी कार्ये अंगावर घेण्याची सुवर्णसंधी क्रमाक्रमाने, ओघाओघाने तुम्हाला लाभणार आहेच. उमेदवारी करणे कमीपणाचे लेखू नका. तिचे योग्य महत्त्व मनावर नीट बिंबवून घ्या.

— ० —

**AUGUST 27**

# राष्ट्रीय भाद्रपद ६

# बचत

ज्यावेळी तुम्हाला पैशांची खरी निकडीची गरज पडते. तेव्हाच तुम्हाला त्यांचे खरे, योग्य मूल्य पटते. जमेच्या म्हणून मानलेल्या अनेक वस्तू, प्रसंगी व्यर्थ गुंतवणूक सिद्ध होतात. म्हणून मासिक मिळकतीतून नियमाने काही भाग काटकसर करुन बचत म्हणून काढून ठेवणे हिताचे ठरते. थेंबे थेंबे तळे साचे या उक्ती-प्रमाणे प्रारंभिक क्षुद्र स्वरुपाची बचतच पुढे विस्तार पावून मोठी संपत्ति बनते. यश व स्वावलंबन प्राप्त करण्यासाठी बचतीची सवय लावून घेणे हा खास रामबाण उपाय आहे. उधार खाते असण्यात 'आय' होते त्याहून जास्त 'व्यय' घडण्याचा धोका असतो. त्यापेक्षा वेळोवेळी प्रत्येक वस्तु रोखीने घेत गेल्याने आदर सन्मान लाभून आपला आब राहतो. जो मनुष्य चार पैसे बाळगून असतो, त्याचा समाजात दबदबा असतो. त्याला एक प्रकारे सुरक्षिततेची भावना अनुभवता येते. मात्र तिची कल्पना येण्यासाठी गांठीला चार पैसे जमवून पाहिले पाहिजेत. संपत्तिधारी कवडीचुंबकाला अनुभवावी लागणारी अस्वस्थता, असुरक्षितता, धास्ती, विवंचना ह्या साऱ्यांचा, दोष बचतीच्या, संपतीच्या माथी मारता येत नाही. तो असतो त्या कवडीचुंबकत्वाचा. बचतीचा सत्कारणी विनियोग होणे अभिप्रेत आहेच. मात्र खाका वर असणे कोणत्याही परिस्थितीत अनिष्टच. कफल्लकाचे दुःख अगदी कडवट असते. उलट काटकसऱ्याला शांति, समाधान, समृद्धि लाभून शिवाय देण्याचा आनंद उपभोगता येतो.

+ + +

AUGUST 28

# नीरवता

स्थिर, नि:शब्द, स्तब्ध नीरवतेत फार मोठी शक्ति सामावलेली असते. अशा नीरवतेत ऐकू येणाऱ्या सदसद्विवेकबुद्धीच्या सूक्ष्म शांत आवाजाहून जास्त बोलके असे दुसरे काहीच नसते. एवढी घनदाट अरण्ये माजतात, पण कशी जरासुद्धा आवाज न करता. आपण राहत असलेली ही पृथ्वी अंतराळात प्रचंड वेगाने भिरभिरत आहे, पण हूं कां चूं न करता. सत्याचा साक्षात्कारही होतो, पण कसा या कानाचा त्या कानाला न कळता. सत्याच्या शक्तीचा प्रत्ययही येऊ शकतो जर धडपड, गोंधळ, गोंगाट यांचा औषधालाही मागमूस नसेल तर आणि तिथेच केवळ. मानवप्राणी मात्र खुशाल शब्दांची उधळामाधळ, आतिषबाजी चालवीत असतो; काम करायचे सोडून नि:शंकपणे आकांडतांडव घालीत असतो. एक वास्तविकता नीट लक्षांत घ्या. केवढी का कठीण समस्या पुढे उभी राहू द्या, नीरव एकांतात बसून तिच्यावर मनन-चिंतन केलेत की ती सुटणारच म्हणून समजा. अमर्याद आकांक्षा नि बेसुमार हव्यास यापासून नीरवता, मौन तुमचे रक्षण करतील. आंतरिक शांततेचे, जीवनवृक्षाला खतपाणी घातलेत तर परमेश्वराशी सुसंवादाचे फल त्याला लागेलच लागेल.

☆

**AUGUST 29**

## राष्ट्रीय भाद्रपद ८

# जबाबदारी

रोज तुम्ही काही नवी योजना तरी आखा, नाहीतर कशात तरी पुढाकार घ्या; काही आकांक्षा नव्याने धरा, काही वेगळा निर्धार करा, कशाला चांगले वळण लावा, काही अनिष्टे निपटून काढा, नव्या बेतावर लक्ष केंद्रित करा. एखादा दीर्घोद्योग पत्करा, कोणाचे गुंते सोडवून द्या, नाहीतर काही कार्यपूर्ति पदरात पाडून घ्या. सारांश काय की आयुष्य कसे काम, खेळ, आकांक्षा व कार्यसिद्धि यांनी भरगच्च हवे. तुम्हाला मिळालेली, बुद्धि आणि सामर्थ्य, ही योग्य तऱ्हेने वापरण्याची जबाबदारी तुमची आहे. काळ अतिशय पळपुटा आहे हे ओळखून मनातले बेत ताबडतोब अंमलात आणीत चला. अन्यथा चालढकल, दिरंगाई, टंगळमंगळ तुम्हाला लाभत असलेली संधि हिरावून घेतील, नि तुमचे यश तुमच्या पदरात पडू देणार नाहीत. तुमचे सारे कर्तृत्व, कार्यनैपुण्य, कर्तबगारी आजच पणाला लावा म्हणजे दिवसअखेरीला, 'माझ्या कार्यसिद्धीच्या दिशेने आज मी जाणीवपूर्वक व भरगच्च प्रगति केली आहे', असे समाधान तुमच्या वाट्याला पूर्णपणे येईल. तुम्हाला बरेच काही साधणे शक्य आहे. तेव्हा नुकसान टाळावयाचे असेल तर थोडासुद्धा वेळ व्यर्थ दवडू नका. आजच्या दिवशी उपलब्ध होणार असलेल्या एकाही सुवर्ण संधीचा यथायोग्य, संपूर्ण, यथेष्ट फायदा घेतल्याखेरीज राहू नका.

**AUGUST 30**

# राष्ट्रीय भाद्रपद ९

# उल्लासमयता

मन व शरीर दोन्हीसाठी उल्लासमयतेसारखे अन्य शक्तिवर्धक औषध नाही. उल्लासी मनोवृत्तीचा रक्त-नसा तसेच कर्मेंद्रिये ज्ञानेंद्रिये ह्यांच्यावर प्रत्यक्षत: व उपकारक असा प्रभाव पडतो. व्यवसायाच्या दृष्टीनेमुद्धा उल्लासी मनोवृत्ती ही एक जमेकडील मूल्यवान बाब आहे. मित्र जोडणे व मैत्री टिकविणे, दोहोंसाठी ही वृत्ति म्हणजे एक सामर्थ्यशाली शक्ति आहे. उल्लासी मनोवृत्ति ही आशावादी वृत्तीची जुळी बहीण. ह्या दोघींच्यामुळे सभोवताली आत्मविश्वास व उत्साह ह्यांचे साम्राज्य पसरते. चिंता, भीति, अनुत्साहन, किंकर्तव्यता, विसंवाद यासारख्या विषांवर उल्लासी मनोवृत्ति हा एकच एक रामबाण उतारा आहे. हिच्या मदतीने मन तत्पर, दक्ष, चलाख होते, प्रसन्न बनते, सर्वांभूती सहानुभूतिमय राहते. संतोष, स्थिरचित्तता, समाधान या वृत्तीमुळेच लाभतात. उल्लासी मनोवृत्ति माणसाला बेसुमार महत्वाकांक्षेच्या आहारी जाऊ देत नाही की घिसाडघाई व काळजी ह्यांच्या ताणात सापडू देत नाही उल्लासी मनोवृत्ति मी कायम टिकवून, ठेवीन, असे मनाला नित्य व वारंवार बजावल्याने मनुष्य आपले जीवन उत्साहपूर्ण सावेश, जोममय असे टिकवून ठेऊ शकतो मग नाही ना गमावणार तुम्ही आपल्या मनोवृत्तीतला उल्लास?

卐

**AUGUST 31**

## राष्ट्रीय भाद्रपद १०

# यशाची पायरी

दृढनिश्चयी मर्द जवानांच्या जगात अपयश अशी काही चीजच नसते. चुका होतात, दुर्दैव नडते, निर्णय फसतात, नाही असे नाही. पण ते अपयश असे मानण्याचे कारण नाही. या सगळ्यातून आपण व्यवहारातला एक नवा धडा शिकलो, एक वैयक्तिक नवे वळण मिळविले असेच ध्यानात घ्यायचे. योजलेले उद्दिष्ट नसेल गाठले गेले, पण म्हणजे अपयशच पदरी पडले म्हणून फुरंगटून कशाला बसायचे ? उलट याहून उच्च, भव्य उद्दिष्ट गाठता येण्याची ती पूर्वतयारी झाली असे मानावे. जीवनात यशस्वी ठरलेल्या कित्येक महाभागांनी वाटणीला आलेली छोटी मोठी अपयशे यशोमंदिराच्या वाटेवरील पायऱ्या म्हणून वापरलीच, नाही का? जीवनाच्या शर्यतीत माणसे मागे पडतात, ती सर्व अपयश माथी आले म्हणून नव्हे, तर पुरेशी कळकळ नव्हती, दीर्घोद्योगाचा अभाव होता म्हणून काही माणसे गंभीरपणे, चिकाटीने, सतत प्रयत्नशील राहतात तरीही केव्हा नाहीं यश पदरात पडत त्यांच्या. पण हा म्हणजे अपवादच आणि तोही तुरळकसाच. कष्टाविना यश लाभलेल्यांच्यापेक्षा दीर्घोद्योगी अशी ही यशाविहीन माणसे प्रशंसेस जास्त पात्र होत. योग्य दिशेने प्रयत्न, भरपूर मेहनत, व पुरेशी कळकळ, यांच्या त्रिवेणी संगमाने यश लाभते ही काळ्या दगडावरची रेघ.

★

**SEPTEMBER 1**

## राष्ट्रीय भाद्रपद ११

### (श्रावण व. ८, जन्माष्टमी)

# भूक भागवा

दुसऱ्यांच्यात स्वतःला पसंद पडण्याजोगे, प्रशंसा करण्याजोगे पुष्कळच काही सतत आढळत असते. सुरेख, सौष्ठवपूर्ण, सामान्येतर असे नेहमी काहीना काही सभोवतालच्यांतून सतत शोधून काढीत चला. प्रशंसात्मक उद्‌गारांचे सामर्थ्य अमोघ असते. उच्चार सद्भावयुक्त काढले की त्याचे फळही हितकारकच हे ओघानेच आले. इतरांची गुणग्राहकतेने प्रशंसा करण्याची सवय तुमचेही मन प्रफुल्लित राखते. दुसऱ्यांच्यातले उदात्त, उद्बोधक, उत्तम तेवढे शोधण्याने वृत्ति कशी समाधानी राहते. कौतुकाचे शब्द ऐकवणाऱ्या व्यक्ति अर्थातच लोकप्रिय होतात. आजच्या कृष्णाष्टमीच्या रात्री अवतार धारण केलेल्या श्रीकृष्ण परमात्म्याने, या प्रकारची लोकप्रियता जन्मभर संपादिली. इतकेच नव्हे तर कापरे भरलेल्या युद्धविन्मुख परंतपाला रणोन्मुख करण्यासाठी भगवंतानी त्याच्या शौर्यपराक्रमाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि पांडवांना जय मिळवून दिला. तर असा प्रशंसामहिमा. कोणाबद्दलही निंदेचे अवाक्षर न काढण्याचा नियम कसोशीने पाळल्यास अनेक कटु अनुभव व पश्चातापाचे प्रसंग टळतील. इतरांचे उदारपणे केलेले कौतुकपूर्ण मूल्यमापन त्यांच्यावर व तुमच्यावरही इष्ट, लाभदायक, हितकर परिणामच घडविते. लोकांनी सद्‌गुणी, सुवृत्त, सदाचारी बनून प्रशंसेस पात्र ठरावे अशी तुमची आंतरिक मनीषा, तळमळ, इच्छा असेल तर ते तसे आहेतच हे मान्य करण्याने, नव्हे प्रत्यक्ष सांगण्याने ती नक्की पूर्ण होईल.

**SEPTEMBER 2**

## राष्ट्रीय भाद्रपद १२

### (श्रावण व. ९, गोपाळकाला)

# योग्यता + प्रयत्न

जेवढी तुमची योग्यता असते त्या तोलाचे जीवन तुमच्यासाठी राखून ठेवलेले असतेच. पण ते प्राप्त होण्यासाठी मात्र तुम्हाला अपार प्रयत्न करावे लागतातच. सन्मान व सुदैव यांना खेचण्यासाठी केवळ योग्यतेचे आकर्षण पुरेसे ठरत नाही, त्यांत प्रयत्नांच्याही आकर्षणाची भर लागते. खुशालचेंडूपणा न करता, नाउमेद न होता, ज्यांनी प्रयत्नांची कास धरली, त्यांनी कर्तृत्व गाजवून आपली तेवढी योग्यता होती हे सिद्ध केले त्यांनी स्वतःला आराम नाकारला, उद्योगाची पराकाष्ठा केली आणि उद्दिष्टावरुन आपले लक्ष चळू दिले नाही. योग्यता आहेच म्हणून स्वस्थ न बसता त्यांनी प्रयत्नही चालू ठेवलेच. तेव्हा त्यांना उत्तरायुष्यात सौख्य, आराम, यश ही लाभली; योग्यताच तेवढी होती वा नशीब फळफळले असे नव्हे. दहीहंडीला हात पोचून ती फोडण्याची योग्यता सिद्ध करण्यात त्या संघाच्या तळातल्या, पायाभूत वर्तुळातल्या, मर्द मजबूत जवानांनी केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांचा, त्यानी दाखविलेल्या सोशिकपणाचा, चिवटपणाचा, शक्तिसंपन्नतेचा मोठा वाटा असतो. खालच्या सर्वांच्या प्रयत्नांची परिणति होते वरच्याला हंडी फोडण्याची योग्यता लाभण्यात. नावलौकिक मिळवायला जावे लागते काटेरी पायवाटेने, राजमार्ग नसतो उपलब्ध. महान् योग्यता सिद्ध करायची तर खटपट खूप करावी लागते, प्रयत्न असामान्य करावे लागतात. निश्चयी, साहसी, धीरोदात्त, अपराजेय व्यक्तींनाच जीवनातली मोठमोठी पारितोषिके प्राप्त होतात. 'प्रयत्नांती परमेश्वर' म्हटले आहे ते काय उगाच?

– • –

**SEPTEMBER 3**

## राष्ट्रीय भाद्रपद १३

# ढोबळपणे आश्रम

सुनियोजित जीवनाच्या प्रौढ उत्तरार्धात परिपक्वता समाधानीपणा व समतोलवृत्ति यांचाच प्रामुख्याने प्रभाव वाढायला हवा. जीवनाच्या तारुण्यमय पूर्वार्धांत-ब्रह्मचर्याश्रमात–व्यक्तीने अति-उत्साही, अतिआशावादी, व अतिधडपडी असणे नैसर्गिक नि ओघप्राप्तच मानले जाते. गृहस्थाश्रमात पुढे पाऊल पडल्यावर स्थिरता, गांभीर्य, आत्मविश्वास व शक्तिसंपन्नता ही वृत्तींत प्रादुर्भूत होत जातात हातून विनाकारण उतावळेपणा न घडता इष्ट यश संपादन करण्याची कुवत, जीवनात येत गेलेल्या अनुभवांच्या धडचा-वरुन बोध घे–घेऊन प्राप्त होत असते. वानप्रस्थाश्रमात जीवनातल्या रास्त मूल्यांची सखोल जाण उद्‌भवू लागताच प्रत्येकाने कान टव-कारलेले ठेवून खूप श्रवणभक्ति करावी, उपयुक्त ते कर्णसंपुटात साठवून घ्यावे आणि बरोबरच त्यावर सखोल मनन-चिंतनही चालु ठेवावे. एकांत निरव शांततेतच त्या शिवात्म्याशी संपर्क साधता येणे शक्य असते. तो घडल्यावरच जीवनाचा खराखुरा पूर्णपणे विकास होतो. शेवटल्या संन्यासाश्रमात परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त करुन घेऊन कालांतराने त्याचा साक्षात्कार होण्याची वाट आत्म-विश्वासपूर्वकतेने पाहत राहता येईल. ढोबळपणे आश्रमांतराबरोबर हातात हात घालून वृत्यंतराने पण वाटचाल केली पाहिजे. वृत्ति मागल्या टप्प्यात रेंगाळत राहणे अनिष्ट.

★

**SEPTEMBER 4**

# राष्ट्रीय भाद्रपद १४

# हाडाचा शिक्षक

थोर तत्वज्ञानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा आजचा जन्मदिन 'शिक्षकदिन' म्हणून साजरा होत असतो. कारण ते सर्वार्थाने सोळा आणेच काय सतरा आणे, हाडाचे शिक्षक होते. एक शिक्षक आपल्या कर्तृत्वाने राष्ट्राध्यक्ष बनु शकला. अशा शिक्षकाने आपल्या वाणीच्या सामर्थ्याने राष्ट्राचे भावी नागरिक घडवायचे असतात. कोणी म्हणतात, "शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाशी" अध्यापनकौशल्याचा संबंध काय? ते चारित्र्यनिरपेक्ष मानले पाहिजे." हे वावदूकत्व कांही अंशीच समर्थनीय आहे. विज्ञान, अभियांत्रिकी, वा वैद्यकशास्त्र शिकविणाऱ्यांच्या व्यक्तिमत्व-चारित्र्याशी कोणास कर्तव्य नसावे, त्यांचे बौद्धिक सामर्थ्य पुरेसे असले की बस. त्यांच्या आत्म्याचा विकास झाला नसला तरी चालेल एकवेळ. पण अध्यात्मशास्त्र, तत्वज्ञान शिकविणारांच्याजवळ पावित्र्य, चारित्र्य, शीलवत्ता हवीतच, अध्यात्मज्ञान तर मनःपावित्र्यावरच अधिष्ठीत असते. धर्मशास्त्र शिकविणाऱ्या शिक्षकाची नितिमत्ता अध्यापन कौशल्याहूनही जास्त महत्वाची या दृष्टीने राधाकृष्णन परम वंदनीय होते. गुरुंतच आत्मशक्ति नसेल तर तो ती विद्यार्थ्यांत कशी अभिसारित करु शकणार? त्यांच्या मनात तिचे बीजारोपण तो कोठून करु शकणार? शिक्षक बनण्यासाठी म्हणजे ज्ञान दानकरण्यासाठी शिक्षकाजवळ आधी पुरेसे ज्ञान असायला हवे. तसेच विद्यार्थ्यांच्यातही ग्रहणजिगीषा व आकलनशक्ति पुरेशी हवीत. ग्रहणदानाच्या या देवघेवीतले अडथळे हटविणे हे शिक्षकाचे मुख्य काम.

(शिक्षकदिन)

**SEPTEMBER 5**

## राष्ट्रीय भाद्रपद १५

# सुख-संतोष

खरा संतोष व पूर्ण सुख प्राप्त करण्यासाठी आज ना उद्या, प्रत्येकाला आपल्या आध्यात्मिक मूलस्थानाकडे वळावे हे लागणारच. आदर्श आत्मविश्वास व सुदृढ स्थैर्य टिकून राहू शकतात फक्त सत्य नि नेकी यांच्या स्थिर पायावरच. ग्रहणक्षम संवेदनाशील मनच परमेश्वराशी संवाद साधू शकते. त्या परम सत्याचे सुयोग्य ज्ञान प्राप्त झाल्यावरच मग, जीवन जगण्यातल्या आनंदाच्या उत्सुक पण कृतज्ञ अशा जाणीवेचा हृदयांत प्रादुर्भाव होत जातो. आध्यात्मिक परमसत्ताच चिरशाश्वत राहणार आहे. सचोटीच्या चालचलणुकीच्या भरभक्कम पायावरच जीवनाची भव्य इमारत उभारता येते. त्या अनंत असीमाशी दिव्य एकतानता साधल्यानेच जीवाशिवाचे मिलन घडून परम सुखाचा अनुभव लाभतो. भौतिक जग देत असलेली ऐहिक मालमत्ता वा द्रव्य यांच्या पाशांत पडून स्वर्गीय सौख्याच्या लाभलेल्या वारशावर पाणी सोडण्याचा वेडगळपणा न करावा हे समण्याइतकी सामान्य बुद्धी प्रत्येकाला लाभलेली असते. त्या परम सत्ताधारी जगदीशाचा मूल संकल्प काय आहे हे जाणणे व त्यापुढे मान तुकविणे हेच प्रत्येकाच्या दैनंदीन जीवनांतले सर्वोच्च उद्दीष्ट सतत राहिले पाहिजे. म्हणून प्रत्येकाने ऐहिकाच्या या रामरगाड्यांतून दिवसाकाठी काही वेळ तरी काढून तो परमेश्वर-चिंतनात, अध्यात्मसाधनेत गुंतवल्याने त्याच्या पारलौकीक सुखव्याज-प्राप्तीची सोय होईल.

## SEPTEMBER 6

# राष्ट्रीय भाद्रपद १६

# जीवननौका

विशाल, अथांग, अफाट सागर हा या संसाराचे एक सांग प्रतीक आहे. तो जेव्हा शांत, स्थिर, निर्लहर, गंभीर बनतो तेव्हा जीवन नौकेचा या संसारसागरावरचा प्रवास सुखकारक, शांत, निर्विघ्न होणार असा धीर येतो. पण केव्हा भीषण वादळ होते, वाऱ्याचे तांडव चालते, लाटा थैमान घालतात आणि एकंदरीने भीषण विनाश विक्राळ रुप धारण करुन समोर उभा राहतो. वर आणखी विजेचा डोळे दिपविणारा कडकडाट होऊ लागतो. असे हे सागराचे प्रलयंकारी दर्शन मी मी म्हणणाऱ्यांचा थरकाप उडविते, बोबडी वळविते, पांचावर धारण बसविते, काही काळ लोटून गेल्यावर पुन्हा सारे स्थिरस्थावर होते. सागर परत एकदा आपल्या शांत, गंभीर सौंदर्याने विलसू लागतो. नावाडीही हुरुपाने आशावादीपणे आपल्या निर्धारित स्थानाच्या दिशेने दूरवर न्याहाळून पाहू लागतो. संसारातही संकटे, अडचणी, आजार, विघ्ने उद्‌भवतात. या सगळ्यांना तोंड देत असणारे आपण सर्व या संसारसागरावरुन तरुन जाऊ इच्छिणारे प्रवासी आहोत. केव्हा वादळ तर केव्हा भरती कधी ऊन तर कधी पाऊस, कुठे अवस तर कुठे पुनव. दोन्ही प्रकारांसाठी, तऱ्हांसाठी आपण जर सावधानतेने, समतोल मनाने सर्व योग्य साधनांनिशी सिद्ध राहिलो, तर सागरापलिकडे सुरक्षितपणे या भवांतून पार पोहोचू, याबद्दल विश्वास बाळगण्यास कोणताच प्रत्यवाय नाही.

+ + +

**SEPTEMBER 7**

राष्ट्रीय भाद्रपद १७

# खरी मत्ता

देता नि वापरता उणी न होता सदैव वाढतसे ।
ऐशी तर ही बुद्धि-मत्ता गुण नवा हिच्यात वसे ।।

हाय, बुद्धिमत्ता अशी वेगळीच आहे वापरली गेली तर ती थकत नाही, अधिक जोम धरते ज्ञान कोणा इतरांतर्फे प्राप्त होत नाही, बुद्धि वापरुन ते मिळवावयाचे असते. तुमच्या मनोभांडारात मूलभूत सत्यांचा अखूट साठा हवा. त्याप्रमाणे मानसिक समस्यांचे निराकारण आपले आपल्यालाच करायला हवे. पायाभूत सत्यांचा व तत्वांचा खोलवर जाऊन शोध घेत, विचारमंथन स्पष्टपणे व तर्कसंगतपणे करता येण्याचा खूप सराव करा, आणि तशा दृष्टीने मनाला संवय जडवून घ्या. मनावर प्रतिदिन सुसंस्करण करण्याची काही निश्चित व प्रत्यक्ष योजना आखा थोर जागतिक तत्वचिंतकांच्या विचारांवर तुमचे मन पोसले जायला हवे. नव्या उपयुक्त कल्पना नित्य स्फुराव्यात यासाठी फावल्या वेळात सतत स्वतःची बुद्धि वापरात ठेवा. ग्रंथवाचनाने फक्त ज्ञानभांडार समृद्ध होऊ शकेल पण चातुर्य, बुद्धिमत्ता ही स्वतःठायी निपजावीच लागतात. यासाठी वाचनानंतर त्या विषयाचे मनन-चिंतन व त्यावर चर्चा व्हावी. आज हातून किती घडले याचा आढावा घ्या आणि उद्या काय घडवायचे याचा बेत आजच आखून ठेवा, आपल्या कार्यपद्धतीचे नीट परीक्षण करुन ती जास्त सुधारण्याचा आटोकाट प्रयत्न करा. आदर्श विद्यार्थ्याने आपली बुद्धिमत्ता नित्य प्रज्वलित ठेवावी. तसेच त्याने आपल्या ज्ञानपिपासेचे केव्हाही शमन होऊ न द्यावे.

**SEPTEMBER 8**

## राष्ट्रीय भाद्रपद १८

# फायदा अनुद्विग्नतेचा

मनाचा समतोलपणा मुख्यत: आत्मिकच असतो. चित्त प्रसन्न राहिले की वागणुकीत सहजपणा दिसतो हे खरे पण हा सहजपणा शंभर अंकी समतोलपणा नव्हे. बेपर्वा माणसेही समतोल वाढतात. शैथिल्य आलेल्या व्यक्तीही समतोलपणा साधलेल्याशा दिसतात पण हा दिखाऊ, फसवा समतोलपणा. अस्सल समतोलपणा ही आत्म्याची वस्तुत. अंतरावस्था होय. समतोलपणा म्हणजे दुसऱ्या शब्दांत, विश्रांति मिळू दिलेली राखीव आत्मशक्तित्र असते आणि म्हणून ती वापरतेवेळी सदाच ताजीतवानी सापडते. हा मानसिक समतोलपणा, म्हणजेच अनुद्विग्नता, अनुभव व तारतम्यता यांच्या पोटी निपजते. नैतिक सचोटी व सारासारविवेक असणाऱ्या प्रत्येकाला ही अनुद्विग्नता लाभू शकते. ही लाभलेल्या कोणाचेही मन कोणत्याच कारणाने उद्विग्न म्हणून होत नाही. व्यक्तीला आत्मपरिक्षणानंतर स्वत:चे उचित मूल्य आकलन झाले आहे, ती आपल्या सर्व कार्यशक्तींचा संपूर्णपणे वापर करु शकत आहे याचीच हा समतोलपणा, अनुद्विग्नता-साक्ष होय. लागेल तेवढी मशागत व साधेल तितकी जोपासना करीत लागवड करण्याच्या लायकीचे आहे. मानसिक अनुद्विग्नता हे पीक जीवनात सर्वोत्कृष्टपणे यशस्वी ठरणाऱ्या महाभागांच्याच अंगी दिसणारे सारे श्रेष्ठ सद्‌गुण, असे मानसिक अनुद्विग्नतेचे पीक मिळवणाऱ्या व्यक्तींच्याही अंगी असतात हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

卐

**SEPTEMBER 9**

## राष्ट्रीय भाद्रपद १९

# दोषनिरसन

स्वभावात भिनलेल्या सवयी बदलणे जसे बहुतेकाना फार जड जाते, तसेच स्वभावात मुरलेले अन्यान्य दोषही घालविणे, या जीवनांत सर्वांनाच दुरापास्त होते. सवयी बदलण्यासाठी व दोष बदलण्याकरता केलेले सामान्य निश्चय व विविध प्रयत्न साधारणत: पुरेसे परिणामकारक ठरत नाहीत. चिंता, राग, विकाराधीनता, असहनशीलता वगैरे तुमच्या स्वभावांतील दोष तुम्ही खऱ्या कळकळीच्या, खूप जोराच्या व कायमच्या प्रयत्नांनीच घालवू शकाल. प्रामाणिक आत्मपरीक्षणाने स्वत:च्या स्वभावांतील साऱ्या दोषांचे कठोरपणे विश्लेषण करा व मग आढळलेले दोष समूळपणे काढून टाकण्याकरता प्रत्येक उपलब्ध साधन उपयोगात आणा. जर तुमच्या मनात धैर्यनाश, दारिद्र्य, भित्रेपणा व मर्यादितपणा अशांसारख्या चुकीच्या विचारांनी ठाणे दिलेले असेल तर त्यांची हकालपट्टी करुन त्यांची जागा धैर्य, वैपुल्य, आत्मविश्वास आणि संधिसाधना यांच्यासारख्या आवश्यक विचारांना द्या. चुकीच्या, हानिकारक, अयोग्य सवयींना हाकलून देऊन त्यांच्या जागी पूर्ण विचारान्ती चांगल्या, हितकारक, इष्ट सवयी लावून घेण्याच्या प्रशंसनीय पद्धतीमुळे तुमच्या स्वभावात, वर्तणुकीत, आवडीनिवडीत, उत्तरोत्तर आवश्यक, लाभदायक, संतोषजनक अशी सुधारणा होत राहील.

## SEPTEMBER 10

# राष्ट्रीय भाद्रपद २०

## (भाद्रपद, शु. २, वराह जयंति)

# धडाडी

परोपकाराच्या वा सौख्यसाधनेच्या जास्तीत जास्त सुवर्णसंध्या तुम्हाला प्राप्त करता याव्यात अशा उद्देशाने तुमच्या धडाडीला, प्रवृत्तीला कार्यप्रवण करणे हे तुम्ही घेत असलेल्या शिक्षणाचे प्रमुख साध्य असते. तुमच्या कर्तृत्वबुद्धीची, सुशिक्षिततेची आणि प्रगतीची आताच खरी कसोटी लागावयाची असते. वाढत्या आवडीने व वर्धिष्णु कळकळीने तुम्ही रोज आधिकाधिक परोपकारकार्ये जर पार पाडीत असलात तर तुम्ही प्रगतीपथावर योग्य दिशेने मार्गक्रमण करीत असल्याची खात्री धरता येईल. जीवन म्हणजे वाहते पाणी असावे, साचलेले डबके नको. प्रवाह नसलाच की शेवाळ जमणार. प्रगति अवरुद्ध झाली की विघटनमय परागती ठेवलेलीच. धडाडी धरुन प्रवेशण्यासाठी हजारो शिक्षणोत्तर द्वारे तुमच्यासमोर उघडून धरलेली असतात. ती हुडकून काढून शिरा आत छातीठोकपणे आणि वराहजयंतीच्या मुहूर्तावर घाला हात परोपकाराच्या उपयुक्त अशा कामांना. वर्तमान काळातल्या आव्हानपूर्ण वातावरणात जीवन जगण्याचा बहुमोल हक्क तुमच्या वाट्याला आलेला आहे. पण त्याचबरोबर या लाभलेल्या सुसंधीचा सुयोग्य वापर करण्याचे अनिवार्य कर्तव्य, महान् जबाबदारी तुमच्या खांद्यावर ठेवलेली आहेत. उठा तुमच्या कर्तृत्वाला शोभेलसे काही महान् कार्य अंगिकारा, ते पार पाडण्यासाठी निरलसपणे घाम गाळा, ते धडाडीने तडीला न्या.

**SEPTEMBER 11**

# राष्ट्रीय भाद्रपद २१

# मनोबलवर्धन

विचारसामर्थ्य ही, जगातील सर्वांत जास्त प्रभावी, अशी शक्ति आहे म्हणून तर तुम्ही स्वतः कळकळीचे विचार कर्ते बनणे अति अगत्याचे ठरते. प्रतिदिन स्पष्टपणे खोलवर व मुद्देसुदपणे विचार करण्याची मनाला शिकवण द्या. विचारार्थ गंभीर महत्वपूर्ण असा विषय निवडा. सखोल एकाग्रतापूर्ण चिंतनासाठी रोजचा काही काळ योजनापूर्वक राखून ठेवा. कुठलीही महत्वाची गोष्ट ही अशीअशीच असणार हे गृहीत धरुन चालू नका. तर स्वतः तिच्या कारण परं-परेची व परिणामांची छाननी करा. विचारांसाठी कार्यप्रवण केल्यानेच मनाची वाढ होते. कुठला तरी एक महत्वाचा प्रश्न घ्या. नि त्याचे समाधाकारक उत्तर सापडेपर्यंत काळजीपूर्वक त्याचा अभ्यास करा. अशा तऱ्हेच्या मानसिक व्यायामासाठी, अेक तरी तास दिवसाकाठी अवश्य राखून ठेवा. धंदा काय, शोध काय, नोकरी काय, महत्कार्य काय, किंवा लक्ष्यप्राप्ति काय, सर्वच बाबतीत मनोबलवर्धनासाठी उच्चत्तम विचारशक्तीचीच कास धरावी लागते. मनोबलवर्धन साधायचेंच असेल तर विचारशक्ति समर्थ, कार्यप्रवण व सदासिद्ध असू द्या.

SEPTEMBER 12

# राष्ट्रीय भाद्रपद २२

## (भाद्रपद शु. ४, गणेश चतुर्थी)

# विघ्नांवर विजय

यश अगदी हातातोंडाशी आलेले असताना कित्येक लोक हातपाय गाळून कच खातात. थोडी जास्त उमेद, चिकाटी, तग, दीर्घोद्योग जवळ असते तर या पराभवाचे विजयांत रुपांतर होते. पुष्कळदा यश पुढल्या वळणावरच उभे असते पण ते अगोदर दिसू शकत नसते. त्या वळणापर्यंत पोचले तर पाहिजे. जगात जीवनाच्या रोजच्या धकाधकीत येणाऱ्या अडचणींवर मात केली पाहिजे, सिद्धिदात्या विघ्नेशाचे स्मरण करुन विघ्नांवर विजय मिळवायला हवा, समस्यांवर तोड काढली पाहिजे, सकृद्दर्शनी भासणाऱ्या अपयशाला धीराने सामोरे जायला हवे. आत्मविश्वास, शौर्य, निर्धार, चिकाटी दीर्घोद्योग ज्यांच्याजवळ असतील त्यांच्या वाट्याला यश ठेवलेलेच, कारण तो सिद्धिदाता सदैव आशांच्या पाठीशी असतो. मन वा इच्छाशक्ति थोडी कमकुवत असेल तर ती कसर सततोद्योगाने नक्कीच भरुन काढते येते. रोज एक विशिष्ट उद्दीष्ट निवडा, दूरदृष्टीने व साधकबाधक विचार करुन ते गाठण्याची योजना आखा, त्यावर भरपूर चाणाक्षपणाने चिंतन करा. मग मेहनतपूर्वक कामाला लागा काबाडकष्टाना बिचकू नका, विघ्नांनी दचकू नका, पुढल्या वळणावर भव्य दिव्य यश तुमच्यासाठी उभे आहे, हाच आजच्या गणेशचतुर्थीनिमित्त त्या सिद्धिदात्या विघ्नहर्त्याचा सांगावा आहे.

●

**SEPTEMBER 13**

## राष्ट्रीय भाद्रपद २३

# अंकुरी कुठार

तुमच्यावर नैराश्याचा चिंतातुरतेचा, वैफल्याचा पगडा बसू पहातो आहे, असे जेव्हा तुम्हाला वाटू लागते त्यावेळी प्रथम तावडतोब अभ्यंगस्थान करुन शुचिर्भूत व्हा. मग हत्री अंथरुन त्यावर, शरीरावयव शिथिल सोडून पद्धतशीर शवासन करा. श्वास थेट ओटीपोटापर्यंत पोचू द्या. आळीपाळीने दोन्ही हात ऊंच उचलून धरा आणि मग त्यांना खुशाल दोन्ही कुशीकडे बाजूला खाली टाकून द्या. नंतर दोन्ही पाय तसेच वर उचलून धरा आणि क्षणभराने एकदम खाली पाडा. आता तुमचे सर्व शरीर आपादमस्तक शिथिल पडले आहे. गतकाळांतील एखादी सुंदरशी, सुखावह, सुमधुर स्मृति, घटना, आठवण आता मनात जागवा आणि थोडा वेळ घोळवा. आपल्या मनाला ग्रासू पाहणारी काळजी एव्हाना आता नाहीशी झालेली आहे असे तुम्हाला आढळून येईल. जसजसे तुम्ही मनातले प्रेरणादायक स्फूर्तिप्रद, उत्साहवर्धक, विधायक विचार वाढवीत न्याल तसतसे आधीचे मरगळवणारे, ढेपाळवणारे, फुरंगटवणारे विचार माघार घेत जातील, नाहीसेच होतील. चिंतेचे बीज मनात अंकुरण्यापूर्वीच हुडकून काढून टाकलेले बरे. नसती चालढकल चालवलीत की घात झालाच म्हणून समजा. चिंतेच्या बीजाचा अंकुर होण्याआधीच त्यावर 'मूले कुठारः' करा.

**SEPTEMBER 14**

# राष्ट्रीय भाद्रपद २४

# प्रेरक प्रश्न

पुढे दिलेल्या प्रेरक प्रश्नांची प्रामाणिकपणे उत्तरे जर आपल्या मनाशीच शोधलीत तरी तुम्ही सर्व सामर्थ्यानिशी दीर्घोद्योग सततपणे करण्यास नित्य उद्युक्त रहाल. ते प्रश्न असे आहेत :

दिवसाचा दीर्घ काळ उत्तम प्रकारे व्यतीत करण्याचा श्रेष्ठ मार्ग कोणता ?

कोणत्या विशेष उद्दिष्टांसाठी मुख्यतः सारे प्रयत्न प्रयुक्त व्हावेत ?

जीवन सर्वोत्तम रीत्या वेचण्याची तऱ्हा कोणती ?

रोज आधिकाधिक फायदे देण्याच्या सुसंध्या कशा प्राप्त करुन घेता येतील ?

सध्या होत असलेल्या प्रगतीचा वेग जरा तरी जास्त कशाने वाढविता येईल ?

'जीवनाची सर्वोच्च महत्त्वाकांक्षा' हे स्थान प्राप्त करु शकेल असे कोणते उद्दिष्ट आहे ?

उत्तम साध्यांसाठी योग्य साधनेच वापरली जात आहेत याची खाराखुशी कशी करावी ?

प्रत्येक दिवशी व्यक्तिशः वागणूक, मानसिक बल व सचोटीचा व्यवहार यांत पाऊल पुढे कसे पडेल ?

स्वतःचे जीवन परार्थ वेचण्याचा आणि इतरांच्या उपयोगी पडण्याचा व्यवहार्य व शीघ्र प्रकार कोणता ?

रामराम ठोकून निजधामी जायला निघतेवेळी आयुष्यांतले मार्ग सर्वश्रेष्ठ होते असे समाधान कसे प्राप्त होईल ?

**SEPTEMBER 15**

# प्रगति साधनेने

जर तुम्ही रोजच्या रोज जास्त सामर्थ्यशाली, आधिक चांगले व प्रकर्षाने उमदे बनत चाललात तरच तो विकास खरा, ती प्रगति आदर्श. असा विकास साधताना तुमची सचोटी, सत्य, समतोल व स्वातंत्र्य या चतुष्टयाबद्दलची आस वाढीला लागते. तुम्ही ध्यान-धारणेला बसता तेव्हा आपला मानसिक विकास नक्कीच होत आहे, हे तुम्हास स्पष्टपणे जाणवते. त्यावेळी महामोलाचे असे नवे विचार तुम्हाला सुचू लागतात आणि ते विचार तुम्ही आपल्या जीवनांत कृतीत उतरविण्यास उत्कंठित होता. हा सर्व प्रभाव तुमच्या ध्यानस्थ प्रार्थनेचा असतो. समाधि लागल्यावर तुमच्या जीवाचा शिवाशी सुखसंवाद चालू होतो, तुमच्या कुंडलिनी आदि सुप्त नाड्या जागृत होतात आणि तुमच्यातले आगळे सामर्थ्य प्रगट होते. म्हणून विकासाच्या प्रगतीच्या दिशेने एकतरी पाऊल पुढे पडल्याखेरीज तुमच्या जीवाला चैन पडता कामा नये. ‘मला आधिक सत्त्वशील व्हायचे आहे’ असा तुम्हाला कायमचा ध्यास लागायला हवा. ज्ञानांत, संस्कारांत व साधनेत निश्चित, किमान व सतत विकास होणे, प्रगति साधणे हे तुमच्या जीवनाचे प्रमुख सूत्र, आयुष्याचे उद्दिष्ट असायला हवे.

# राष्ट्रीय भाद्रपद २६

## (भाद्रपद शु. ८, गौरीपूजन)

# गुणसाधना

आपले सर्व सामर्थ्य एकवटा आणि कामाला लागा. जे काही कार्य तुमच्या वाटणीला येईल ते आपल्या साऱ्या शक्तींनिशी, अन्यान्य नैपुण्यांसह आणि जवळची विविध कौशल्ये वापरुन भरपूर मेहनतीने पार पाडा. चित्रगुप्त तुमच्या प्रत्येक कार्याची नोंद ठेवत असतो हे विसरु नका. मेहनत अनाठायी मात्र वाया दवडू नका. जे कराल ते न्यायशुद्ध असावे. दीनदुबळ्यांवर करुणा, दया, प्रेम करा मात्र गर्वाने, अभिमानाने, अहंकाराने केव्हाही फुगून जाऊ नका. श्रद्धेला सदाचाराची जोड द्या, सदाचाराला ज्ञानाची, ज्ञानाला सहनशीलतेची, सहशीलतेला नेमस्तपणाची आणि नेमस्तपणाला जोड द्या धार्मिकतेची, साधुवृत्तीची, कार्यमग्नतेची, बंधुत्वभावाची, दानशूरतेची. भगवंताच्या न्यायनिष्ठुरतेवर तशीच न्यायप्रियतेवर दृढ निष्ठा ठेवा. देवी गौरीच्या कृपेने वरील सारे गुण तुम्ही अंगी बाणवू शकाल. काल आवाहित केलेल्या गौरीबद्दल श्रद्धा बाळगण्याने तुम्हाला मनसोक्त सुख व भरपूर मनःशांति दोन्ही लाभतील. आज गौरीमातेचे मनापासून भजनपूजन करा. उद्या तिचे विसर्जन करताना आपले आयुष्य तिला अर्पून कायावाचामनेकरुन तिला शरण जा. लोकसेवा, परउपकार व जनकल्याण हीच प्रभुसेवा, तेच गौरीपूजन.

★

SEPTEMBER 17

# राष्ट्रीय भाद्रपद २७

# जोडा साधेपणा

जीवन कसे साधे आणि कळकळीने ओतप्रोत असावे; प्रवृत्ति कशी हळूवार नि कल्याणकारी असावी. साधेपणातच अस्सल व महत्तम थोरपणा सामावलेला असतो. सरळमार्गी आयुष्यच सामर्थ्य-युक्त व सेवाव्रती, तसेच उपयुक्त व उत्पादक असते. तिथेच आप-ल्याला उच्च उद्दिष्ट व अदम्य आत्मविश्वास यांची सांगड मिळते. निसर्गसुद्धा साधासुधा सरळमार्गी नसतो का? प्रेम, सौंदर्य, सत्य, उदात्तता व सचोटी अशा सारख्या जीवनातल्या महत्तम गोष्टी स्वभावतः प्रवृत्तीने साध्यासुध्याच असतात. तेव्हा आपण साधे नि सामर्थ्यशाली बनायचे अशी रोज प्रातःकाली उजळणी करा मनाशी. उद्दिष्टे व त्यांची पूर्ति ह्यांचा प्रधान सूर रहावा. साधेपणा, गर्विष्ट-पणा, अहंमन्यता, अमर्याद आकांक्षाखोरी व स्वार्थीपणा यांच्यापासून जपा स्वतःला. साध्या राहणीची जर मनाला तीव्र तळमळ लागेल वा कोमल कळकळ वाटेल तर तिथे औदार्य व धीरगांभीर्य यांचा तुटवडा पडणार नाही. जसजसे तुमच्यांत साधेपणा व सरळमार्गीत्व विकसित होत जातील, तसतसे तुमचे जीवन संपूर्ण व सुंदर होईल. साधेपणातच मोठी ऐट सामावलेली आहे. तुम्ही आपल्या आदर्श उदाहरणाने भोवतालच्या अनेकांना प्रेरणा, प्रोत्साहन प्रभावीपण द्याल.

– • –

SEPTEMBER 18

# राष्ट्रीय भाद्रपद २८

# नीरवएकांतसेवन

समोवती गोंधळ गजबजाट, गोंगाट यांचे साम्राज्य पसरलेले असताना शांत स्थिर बसून, मन एकाग्र करुन सखोल चिंतन ज्याला चालविता येते त्याला फार मोठी अशी देणगी लाभलेली आहे हे निःसंशय. उलट काही जणांचा अधीरा स्वभाव त्यांना काहीतरी धडपड, वळवळ, खटाटोप केल्याशिवाय गप्पच बसू देत नाही. एखाद्या घामटे काढणाऱ्या उपद्व्यापाला तरी ते हात घालतील. आहे त्यात सुख-संतोष न लाभून काही नसताच उद्योग तरी ते काही जास्त मिळविण्यासाठी म्हणून पत्करतील, नाहीतर आपला सारा जीव पणाला लावून काही भलताच आटापिटा तरी ते चालवतील. योजनाप्रियता व उद्योगीपणा हे तसे नुसतेच चांगले गुण नव्हेत तर ते अत्यावश्यकही आहेत. पण जीवनाची जर सर्वांग परिपूर्ण आखणी करायची तर त्यात शांतता, एकांत, नीरवता यांनाही यथोचित स्थान मिळाले पाहिजे. या त्रयीमुळे मानसिक आत्मिक विकास साधतो काही मनोराज्ये स्थापित करता येतात, काही स्वप्नरंजनी योजना आखता येतात आणि काही भविष्यातले मनसुबे रचता येतात. असे नीरवएकांतसेवन हे पुढील ध्यान धारणेची आधीची पायरी होय. मनन, चिंतन, विचारमंथन, यासाठी रोज काही काळ नीरव एकांतसेवन घडल्याशिवाय अक्कलहुशारीचे संयोजन, अष्टपैलू जीवनयापन आणि निपुण कार्यसंचालन पदरी पडणार नाही.

卐

**SEPTEMBER 19**

## राष्ट्रीय भाद्रपद २९

# गतकाळाचा शोक वृथा

भूतकाळावर कायमचा पडदा पाडण्यातच हित असते. ज्या घटना वा प्रसंग तुम्हाला जास्त प्रयत्नशील बनायला प्रेरित करु शकतात तेवढ्याच काय त्या स्मृतीत राहू द्याव्यात. हातून ज्या संध्या निसटल्या, जी अपयशे वाट्याला आली, ज्या कटु निराशा पदरी पडल्या., त्या साऱ्यांबद्दल खंत करीत बसण्याचे सोडून द्या. अर्थात् लागल्या ठेचेने मिळालेला शहाणपणा वाया घालवू नये वा झाल्या चुकांची पुनरावृत्ति अवश्य टाळावी. 'असे होऊ शकले असते' हे खूळ डोक्यातून साफ काढून टाका. 'असे घडेल' या विचारावर शक्य तेवढा जोर द्या. शारीरिक वा मानसिक, कोणच्याही विकासाचे प्रगतीचे, निश्चित पायऱ्या पायऱ्याचे टप्पे असतात, एकदम उडी नसते. अपयश, विघ्न, निराशा ही तर केवळ सर्वच बाह्यरुपे असतात. अंतःस्वरुपी ती सारी, अंततोगत्वा ठरणारी, तुमच्या कल्याणाची – लाभाचीच तर साधने असतात. 'याहूनही मोठे कर्तृत्व आपल्या भाग्यांत आहे व तें प्रकट करण्यासाठी मी प्रयत्नांची शर्थ करीन' हे तुमचे ध्येयवाक्य असावे. तुमच्या कल्याणाच्या वाटेत परमेश्वर कधीच आडवा येत नाही याबद्दल खात्री बाळगा. तुमच्या कर्तृत्वाची उसळी व अंतःकरणातील स्फूर्ति उत्तम ध्येयसिद्धीसाठी खर्च करा. परमेश्वर तुमचे कुठल्याही प्रकारे केव्हाही नुकसान होऊ देत नसतो.

★

## SEPTEMBER 20

## राष्ट्रीय भाद्रपद ३०
## (भाद्रपद शु. १२, वामन द्वादशी)

# हवा महाप्रयत्न

सन्माननीय यश जास्त झपाट्याने व निश्चित खात्रीने मिळवून देण्यात, असामान्य अक्कलहुशारीपेक्षा, खरी कळकळ, सहानुभूतिपूर्ण दयाळूपणा आणि व्यक्तिगत विश्वासार्हता हीच आधिक यशस्वी होतात. काही व्यक्तींनी, महान कार्यसिद्धीच्या दिशेने वाटचाल, अभूतपूर्व कर्तृत्वाच्या बळावर नव्हे तर चिकाटीच्या निश्चित स्वरुपाच्या व जाणीवपूर्वक, अशा महाप्रयत्नाच्या जोरावर कशी केली हे निरीक्षणपूर्वक पाहणे, खचितच स्फूर्तिदायक आहे. प्रचंड व्यक्तिमत्वापेक्षा अंतरी नाना कळा असणारी महाउद्योगी फाटकी व्यक्तीच कार्य सिद्ध करण्यात आघाडी मारते हेच भगवंतानी वामनावताराच्या द्वारे दाखवून दिले आहे. बटुरुप वामनानी महाबळीराजावरसुद्धा मात करुन दाखविली यातून महाप्रयत्नांचेच सामर्थ्य सिद्ध झाले आहे. आजच्या वामनद्वादशीच्या दिवशी महाप्रयत्नाची कास न सोडण्याची प्रतिज्ञा करणे उचित ठरेल. कर्तृत्व शाली माणसांच्या हातून केव्हा केव्हा फारच थोडे कार्य सिद्ध होते, तर काही शांत वृत्तीच्या, विशेष गाजावाजा न करणाऱ्या, आत्मविश्वासी, मेहनती, सामान्य अशाच व्यक्तींना कमालीचे व आश्चर्यकारक यश लाभते यातली ग्यानबाची मेख आता ध्यानात आलीच असेल. चारित्र्याच्या काही श्रेष्ठ गुणांसमोर जगाने सदाच आदराने मान लवविली आहे. ज्याच्या अंगी असे थोर गुण संपूर्ण प्रमाणात असतात त्याचाच फलतः महान सन्मान होतो. सुंदर, सुयोग्य, सफल चारित्र्य हा अशा दैवी गुणांचा व सन्मार्गी विचार प्रणालीचा इष्ट परिपाक असतो.

*

## SEPTEMBER 21

# साधनशुचिता

साध्याइतकीच साधनांचीही शुचिता पाळली गेली पाहिजे हा एक जीवनातला प्रमुख पाठ मानायला हवा. हा धडा आत्मसात केला की कार्यसिद्धी हमखास होते. आयुष्यात उद्दिष्टांची कधी इतकी भुरळ पडते, ध्येय कधी इतके मोहक वाटते, की ती गाठण्यासाठी अवलंबावयाच्या साधनांबाबतचे भान हरपते, तारतम्य सुटते, इष्टानिष्टता दृष्टीआड होते, आणि मग वाटणीला येतो कार्यनाश. साधनचयनाबाबत प्रत्येकाने अतिशय चोखंदळ आग्रही, काटेकोर, जागरुक राहिले पाहिजे. साधने सुयोग्य, निर्दोश सुविहित असतील तरच अपेक्षित साध्य पदरात पडणार. जसे कारण, जसा हेतु, तसाच घडणार परिणाम. तद्वत साधने निर्लेप असतील तरच साध्य सफल होणार. एकदा उद्दिष्ट ठरवून ते गाठण्यासाठी वापरावयाच्या निष्कलंक साधनांची निवड झाली की मग ते उद्दिष्ट काही काळ दृष्टीआड झाले एक वेळ, तरी मुळीच बिघडत नाही. साधने वापरताना जर प्रामाणिकपणा सोडलेला नसेल तर इष्ट उद्दिष्टाकडेच मजल जाणार कारण सुयोग्य साधन ह्या हेतुकारणाचा उद्दिष्टप्राप्ति हाच परिणाम असतो. जेव्हा जेव्हा या साधनशुचितेकडे किंचितही काणाडोळा केला जातो तेव्हा तेव्हा ध्येयप्राप्ति होत नाही. निदान ती दुरावते तरी काही काळ.

# राष्ट्रीय आश्विन १
## (भाद्रपद, शु. १४, अनंत चतुर्दशी)

# स्फुरणदायी विघ्नविसर्जन

'अशक्य ते शक्य' करतानाच आपल्या बुद्धीवैभवाची खरी वाढ होत असते ही वस्तुस्थिती किती स्फूर्तिदायक आहे! अडचणी व विघ्ने ही आत्मविश्वासू व मनोधैर्य यांनी युक्त असलेल्या माणसाला नवचैतन्य देऊन अधिक कार्यप्रवण मात्र करीत असतात. प्रत्यक्ष कार्याला हात घातल्याखेरीज त्यातल्या खऱ्या अडचणी, वास्तविक गरजा वा अनुस्यूत हतोत्साहता आधी कोणालाच आकलन होत नाहीत. किती का धैर्य खचवून टाकणारे कार्य असेना. ते जर एकदा तुमच्या खांद्यावर ठेवले गेले असेल तर मग लगेच आपले सर्व शक्ति सामर्थ्य एकवटून कार्यारंभ करा नि बघा तुमच्या उद्योगशीलतेपुढे सर्व अडचणींचे निवारण होऊन त्यांचे कसे यथासांग विसर्जन होते ते. विघ्नहर्त्या मंगलमूर्तीचे तुम्ही नुकतेच प्रतिष्ठापन केलेले आहे. मग आजच्या या विसर्जनाच्या दिवशी तो सुखकर्ता आपल्या बरोबरच तुमच्या साऱ्या अडचणी-विघ्नांचेही विसर्जन होईल याची निश्चित खबरदारी घेईल. विशेष उरक वा नैपुण्य असणारा मनुष्य अर्थात महान कार्यालाच हात घालण्याची इच्छा धरणार. तुमच्या संपूर्ण शारीरिक व मानसिक शक्तींची गरज पडणारी कार्ये केल्यानेच त्या शक्तींची खरी जोपासना व वृद्धी होऊ शकते. नवीन महत्तर अशा दुसऱ्या कार्याची दिशा दिसणे हेच आधीच्या महत्कार्याच्या सिद्धीचे सर्वात मोठे पारितोषिक आहे.

卐

**SEPTEMBER 23**

# राष्ट्रीय आश्विन २

# त्रागा त्याज्यच

वृद्ध माणसांना एवढ्या तेवढ्यावरुन त्राग्याने त्रासिकपणाने, त्रोग्रस्ततेने पुटपुटत राहण्याची वाईट सवय जडलेली असते. " मी काय! आता संपल्यातच जमा." "आपली अमदानी आज आटपली." "आम्ही काय कधी तरुण नव्हतोच की काय ? पण हे थेर !" "सारे आयुष्य पुन्हा जगता आले तर !" "आता साऽऽऽऽरे व्यर्थ आहे बघा." "सध्या काय, सद्दी आहे तरुणांची तेवढी" "आयुष्याचा कसा अगदी वीट आला आहे पहा." "कशासाठी दाखवायची आता जिद्द ?" "आमच्या गोवऱ्या पोचल्यासुद्धा की स्मशानात." "माझे झाले आहे आता सगळ्यांना लोढणे." "आणखी चांगले मित्र मी मिळवायला हवे होते. पण हे आता समजणे, बैल गेला नि झोपा केल्यासारखे." "मी आता कचऱ्यातच जमा. म्हणावयाचा." "मला खरी म्हणावी तशी खास संधि आयुष्यांत मिळालीच नाही हो." "केव्हातरी जायचे, एवढेच उरले आहे आता." "जगणे नकोसे झाले आहे अगदी !" "ये यमा, घाल बाबा पाश एकदाचे." "काहीही चालेल रे आता तिकडे तिरडी तर तयार !" असला कांगावखोरपणा त्रासिकपणा घायकुतेपणा निश्चितपणे निषेधार्ह. याने स्वतःच पायावर दगड पाडतो आपण. उत्कट तारुण्यातून, भारदस्त प्रौढपणात, पुढे आदर णीय वार्धक्यात, जीवन परिणत व्हावे.

**SEPTEMBER 24**

## राष्ट्रीय आश्विन ३

# आगळे असा, एकांडे नसा

कांही तऱ्हेवाईक किंवा स्वतःला आगळे समजणाऱ्या व्यक्ति जगाशी फटकून वागतात, जगापासून दूर राहतात, जगाला धुत्कारतात. जर तुम्ही स्वतःमध्ये आणि समाजामध्ये भिंत घालून घेतलीत तर जग नाही तुम्हाला मुकत, तर तुम्ही जगाला मुकता. तुम्ही जगाला कुलुप घालीत नाही तर तुम्ही स्वतःलाच कुलुप लावून घेता. मनुष्यप्राणी एकटा राहण्यासाठी निर्माण झालेला नाही आंतरिक विकासासाठी एकांत हवा पण त्याजबरोबर जीवन समृद्ध होण्यासाठी मनुष्याला भोवती समाज हवाच. इतरांचा आवश्यक सहवास, त्यांचा पडणारा प्रभाव जर तुम्ही टाळू पहाल तर तो तुमचा एकांडेपणा होईल. आणि तो तर निखालसपणे अनिष्ट. पार एकांडेपणा आणि अतिसंगतिप्रियता या दोन ध्रुवांमधल्या विषुववृत्तावर जगता यावे. एकांतसेवनाच्या अवधीत आत्मसंगतींत मग्न होऊन आत्म्याशी संवाद साधीत पुरेसा आत्मानंद गाठीला लावावाच. पण समाजातही सर मिसळून तिथे प्राप्त होणाऱ्या विचार व कल्पना यापासून आणि स्वतःवर घडणाऱ्या प्रभावापासून स्वतःला वंचित न राहू देणेही तितकेच अगत्याचे, आवश्यक व अटळ मानावे.

## SEPTEMBER 25

## राष्ट्रीय आश्विन ४

# उद्योग व आकांक्षा

आपले मन नेहमी दृढ, विधायक व निर्माणक्षम अशा विचारात गुंतलेले असावे. आज आपणास कोणती गोष्ट पार पाडावय।ची आहे याचे सुस्पष्ट चित्र आपल्या मनःश्चक्षूंपुढे रोज उजाडतच आणावे आणि मग त्या दिशेनेच आपले प्रत्येक पाऊल पडावे. रोज काही ना काही अल्प का होईना पण दिव्य भव्य असे स्फुरावे आणि ते कृतीतही उतरावे. सत्य व सचोटीच्या पक्षाच्या बाजूने जितक्या प्रमाणात निर्धाराने, ठामपणे होकारात्मक दृष्टीने उभे राहता येईल तितक्या प्रमाणात हे महान् गुण तुमच्या वर्तनात, स्वभावात नि जीवनात झपाट्याने खात्रीपूर्वक उतरतील. योग्य विचार करणे. नि तदनुसार योग्य आचार ठेवण्यासाठी मनाशी सुयोग्य आखणी करणे अतीव महत्त्वाचे आहे. त्या महत्वाचा पुनरुच्चार मनात कितीही वेळा झाला तरी तो कमीच ठरेल. वैर धरण्याच्या, विरोध करण्याच्या, सूड काढण्याच्या विचारांना मनात थारा मिळून कदापि व्यर्थ कालापव्यय न व्हावा. विधायक, रचनात्मक व्यवहारी कृति करण्यावर विचारांचा मुख्यतः भर असावा. निवडक आकांक्षा व दीर्घ उद्योग आयुष्यांत सुख, समाधान, समजूतदारपणा निर्माण करतात. दिरंगाई, टाळाटाळ, टंगळमंगळ यांचा निखालसपणे त्याग घडून सतत कार्यमग्न राहण्यांतच सर्वांचे हित आहे.

*

**SEPTEMBER 26**

राष्ट्रीय आश्विन ५

# बेलगाम वाणी

साधकबाधक विचार केल्याशिवाय तोंड उघडले असता अनेक गैरसमजुती व शत्रुत्वाचे संबंध निर्माण होत असतात. अविचारीपणाने व उर्मटपणाने बोलण्याच्या सवयीसारखी, मैत्रीला विघातक अशी दुसरी गोष्ट नाही. आपल्या बोलण्याने आपण आपले किती नुकसान करुन घेतले असेल यासंबंधी विचार करण्यात मनुष्य जरासुद्धा वेळ खर्च करायला तयार नसतो. सहजगत्या भराभर या विषयावरुन त्या विषयावर उड्या मारताना ऐकणाऱ्यांचा वैयक्तिक अपमान तर होत नाही ना यासंबंधी काडीमात्र तमा, मनुष्य बोलण्याच्या भरांत बाळगीत नाही. तो फक्त असमंजसपणे फिरवीत सुटतो जिभेचा पट्टा. बेलगाम जिभेपेक्षा अधिक विध्वंसक असे दुसरे दुधारी शस्त्र असण्याबाबत वानवाच आहे. उगीच कां तिला 'कळीचा नारद' म्हणून नामाभिधान दिले गेले आहे? तेव्हा आपल्या ओठांना कुलुप ठोका, जिभेला लगाम घाला आणि माफक मोजके बोला. बोलावे हे लागणारच पण त्याआधी पुरेसा विचार व्हावा. वाणी-इतकेच, मौन हे ही विचार प्रकट करण्याचे प्रभावी साधन ठरते, हे नजरेआड न व्हावे.

\+ + +

SEPTEMBER 27

# राष्ट्रीय आश्विन ६

# श्रीपदी लीन

सर्वशक्तिमान भगवंत हाच तुमच्या जीवनाचा मार्गदर्शक प्रकाश व संरक्षक शक्ति आहे अशी निष्ठा जेव्हा तुमच्या हृदयात ज्वलंतपणे विराजमान होते आणि जेव्हा तुम्ही आपल्या पूर्ण दैनंदिन जीवनाचा सारा भार जाणीवपूर्वक जगत्‌नियंत्यावर टाकता तेव्हा तुम्ही सर्वस्वी भयमुक्त, चिंतारहित बनता. मग तुम्हाला कुठलीच विवंचना म्हणून उरत नाही. भगवच्चरणांना श्रद्धापूर्वक शरण जा आणि हवी असलेली निर्वेध मनःशांति सहजपणे मिळवा. सुवर्ण-संपत्तीची हाव न धरता, सत्यप्रिय परमेश्वराच्या प्राप्तीची मनाला आस जडवा. सचोटीचा सतत ध्यास धरा म्हणजे तुम्ही समाधानी रहाल कारण मग परमेश्वरी वरदहस्त तुमच्या शिरी कायम असेल. दैनंदीन जीवनक्रमासाठी काही नियंत्रक मार्गदर्शक तत्वे व हेतु ठरवून ठेवा. आपल्या विचारांची गुणवत्ता व पातळी सतत उन्नत होत जाईल अशी खबरदारी घ्या. परमेश्वरी आदिसत्याचा मूळातूनच शोध घेण्याचा, ते आकलन करुन घेण्याचा सारखा प्रयत्न करा. अध्यात्मसंपत्तीचा महान् वारसा तुमच्याकडे चालत आलेला आहे. त्यावर हक्क सांगुन त्या अध्यात्मसंपत्तीचा यथायोग्य वापर करा म्हणजे त्या सत्यप्रिय, कल्याणकारी, प्रेममय जगदीशाचे प्रतिबिंब तुमच्या जीवनात उमटेल. यासाठी श्रीपदी सदैव लीन राहण्याची गरज आहे.

★

**SEPTEMBER 28**

# राष्ट्रीय आश्विन ७

# प्या खूप पाणी

**स्व**च्छ पाणी भरपूर प्रमाणात प्यायले जायला हवे. दोन भोजनांच्या मधल्या काळात निदान सहासात पेले पाणी उदरात जावे. याबद्दल थोडीदेखील हयगय, किंचितही निष्काळजीपणा होऊ नये. प्रभाति उठताच शौचमुखमार्जनानंतर नेमाने केलेले उषःपान खूपच आरोग्यदायी असते. रात्री निजण्यापूर्वीही पेलाभर पाणी पिणे हितकर ठरते. स्वच्छ पाणी आंतडी स्वच्छ ठेवते आणि पचनसंस्था कार्यक्षम राखते, इतकेच नव्हे तर सर्वच शरीराचे चलनवलन सुस्थितींत राखून त्याला निरोगी बनविते. पाणी गटागट न पिता सावकाश घोट घोट प्यावे. स्वच्छ ताज्या पाण्याचे आरोग्यवर्धक दायित्व समजून घेऊन ते चवीने चाखत प्यावे. प्रकृति नरम झालेली असताना, ताप आला असताना, पाणी उकळून प्यावे. मात्र अति कडकडीत वा अति शीत जल वर्ज्य मानावे. घरात, नोकरीवर, उद्यानात, जाल तिथे स्वच्छ शुद्ध ताजे पाणी कायम प्यायला मिळण्याची सोय असणे आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे. अशी सवय स्वतःला एकदा लागली कीं, किंवा सर्वत्र अशी सोय झाली कीं, मग एकूण एक नागरिकांचे सर्वसाधारण आरोग्यमान खूपच उंचावेल आणि अंततोगत्वा, राष्ट्रहितही साधेल.

– • –

SEPTEMBER 29

# राष्ट्रीय आश्विन ८

# छडा दुर्गुणांचा

अनेक दोष, खोडी व दुर्गुण झडप घालायला जसे टपून बसलेले असतात. त्यांच्या कचाटयात कधीही न सापडण्याचे आटोकाट प्रयत्न प्रत्येकाने सतत करायला रहायला हवेत. दोषदुर्गुणांचे समर्थन करणाऱ्या अनेक, बाह्यतः बिनतोड पण वस्तुतः लंगडया अशा, सबबी तुम्हाला हव्या तितक्या सूचू शकतील. पण त्यांची कास न धरता असलेल्या साऱ्या अनिष्ट दोष-खोडी-दुर्गुण-सवयींचा समूळ उच्छेद करा, संपूर्ण नायनाट करा. चिडखोरपणा, चिंतातुरता, क्रोधिष्टपणा, असहनशीलता, अतिहळवेपणा, अस्वस्थता, तापटपणा, निंदाप्रियता, कुढेपणा, अदाक्षिण्यबुद्धी, लहरीपणा, उपहासप्रियता, क्रूरपणा, भावनावशता, निष्काळजीपणा, अहंमन्यता, कपटीपणा, आढयता, अविचारीपणा, तुच्छताबुद्धी, आगलावेपणा, नालस्तीखोरी अशी एक, या दोषदुर्गुणांची लांबलचक यादीच पुढे ठेवता येईल. स्वभावातल्या अशा अन्यान्य अनिष्ट विशेषांचा व पैलूंचा छडा लावा कारण त्यांचा भस्मासुर स्वतः तुम्हा मोहिनीवरच कधी उलटेल आणि तुमची कधी राखरांगोळी करील याचा मुळीच भरवसा नाही. यांच्यामुळे दुसऱ्यांना होणाऱ्या निष्कारण त्रासापेक्षाही आपले स्वतःचेच होऊ शकणारे ध्यानी आणून या सर्वांपासून कोसभर दूर रहा.

卐

SEPTEMBER 30

# छाप पाडा

सभोवतालच्या मंडळींशी बोलून-चालून, त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन, त्या मंडळींचा अभ्यास करणे एक मोठी ज्ञानवर्धक, उपकारक, उद्देश्यसाधक क्रिया आहे. लोकांची चालचलणूक, स्वभाव-वैचित्र्ये, ह्यावरुन त्यांचे मूल्यांकन करणे तुम्हांला साधू शकते. मात्र अशा प्रकारे ज्यावेळी तुम्ही इतरांचे पृथक्करण, अध्ययन चालवीत असता त्याचवेळी इतर मंडळीही तुमच्या बावतींतही तेच करीत असतात ही वस्तुस्थिति नजरेआड न झालेली बरी. म्हणून स्वतःठायी एक जास्त प्रभावशाली गुणपरंपरा विकसित करण्याची व ते गुण तुमच्या नित्य जीवनातून इतरांसमोर प्रकट होण्याची नितांत गरज आहे. जग तुमच्याबद्दलचा स्वतःचा काही ग्रह बनवून घेत असते. तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द, चेहेऱ्यावरील भाव, शरीराची हाल-चाल तुमच्या लकबी, सवयी, मनोवस्था या सर्वांचा म्हणून एक-समयावच्छेदेकरुन असा, एक विवक्षित प्रभाव त्यांच्या तुमच्याबद्द-लच्या ग्रह बनवून घेण्यावर होत असतो. तेव्हा तुमच्या वागणुकीची तऱ्हा, तुमचे विचार, तुमची मते, तुमच्या पद्धति, तुमच्या सवयी, वैयक्तिक आवडी-निवडी-खोडी, ह्याबद्दल तुम्ही सतत फार चोखंदळ, दक्ष, जागरुक राहिले पाहिजे. तुमच्याबद्दलचे इतरांचे मत अनुकूल व्हावे असे वाटते ना? मग इतरांवर आपली छाप पाडाच.

# आत्मसुधार

आजच्या, गांधीजी–शास्त्रीजी या दोन आदरणीय भारतरत्नांच्या जन्मदिनी त्यांना आपले सश्रद्ध प्रणाम. आपल्याला लाभलेल्या या जीवनांत, सहानुभूति–सद्भाव–सत्यनिष्ठा–स्वार्थत्याग या चार महान् सद्‌गुणांना तत्परतेने स्वतःठायी नित्य विकसवित राहण्याची थोर जबाबदारी ओघप्राप्तपणे सर्वांवर आहेच. ती पार पाडल्याने जगाला सुधारण्याच्या आणि प्रगत करण्याच्या कार्यातील आपापला वाटा प्रत्येकाने उचलला असे होईल. जग उत्तरोत्तर जास्त चांगले, समंजस व उमदे तर बनत जायलाच हवे असे पूजनीय बापूजींनी मनाशी ठरविले. प्रत्येक नागरिक हे गुण जितक्या प्रमाणात आपल्या अंगी बाणवील तितक्या प्रमाणांत भारत राष्ट्र उपरिनिर्दिष्ट गुणांनी समृद्ध होईल हे महात्माजींच्या तेव्हाच लक्षात आले. अशा प्रकारे आत्मसुधार करण्यांतले पहिले पाऊल कोणी दुसरेच आधी उचलतील अशी वाट पाहण्यात वेळ न घालवता गांधीजींनी कर्मनिष्ठपणे स्वतःच आत्मसुधाराला हात घातला. आपला कित्ता गिरवावा असे बाकीच्यांना आपण होऊन वाटेल इतका महान् आदर्श त्यानी आपल्या उदाहरणाने जगापुढे ठेवला. लालबहाद्दुर शास्त्री यानी थोर विचारसरणी बाळगण्यासाठी व तद्‌नुरुप आचरण ठेवण्यासाठी स्वतःला आजन्म वाहून घेतले होते. या दोन नरवरांच्यामुळे भारत व परिणामी जग सुधारले. त्यांचा कित्ता गिरविण्यासाठी सर्वांनीच झटले पाहिजे.

**(गांधी-शास्त्री जयंति)**

**OCTOBER 2**

# राष्ट्रीय आश्विन ११

# सदैव बरोबरच

जेव्हा तुम्ही रस्त्यावरुन जात असता तेव्हा तुमची वावरण्याची पद्धत बरोबर असायला हवी. जिन्यावरुन चढउतार करीत असाल तेव्हाही तुम्ही बरोबर रीतीनेच चढले उतरले पाहिजे. जेव्हा तुम्ही बुचकळ्यांत पडता तेव्हा तर विचार बरोबर तऱ्हेनेच करा. जेव्हा तुमचा मार्ग हरवतो, तेव्हा न गडबडता बरोबर दिशा मिळवा. जेव्हा तुम्हाला मोह पडतो, तेव्हा बरोबरच म्हणजे निरिच्छ मार्ग चोखाळा. भरभराट होवो व दुर्दैव ललाटी लिहिले जाओ, तुमची वागणूक बरोबर म्हणजे सदा समान असावी. जेव्हा तुमचे आप्तसंबंधी, सगेसोयरे पाठ फिरवितात, विश्वासघात करतात, तेव्हा बरोबर म्हणजे हिंमतीने वागा. नाउमेद व्हायला झाल्यावरही बरोबर म्हणजे धीराने वागा. जेव्हा सारे तुमच्या विरुद्ध गैरसमजूत करुन घेतात तेव्हा तुम्ही स्वतःची समजूत बरोबर ठेवा. जेव्हा सारे सारे तुमच्या मनाविरुद्ध होत जाते तेव्हाही बरोबर म्हणजे न खचता विचार करा, जेव्हा मती गुंग होऊन साऱ्यावर पाणी सोडावेसे वाटते. तेव्हा भावनावश न होता बरोबर पावले टाका. पार रसातळाला जायची पाळी ओढवली आहे असे जव्हा मनाला वाटू लागते तेव्हा विवेकबुद्धीकडून नीट बरोबर काम करुन घ्या. विचारसरणी बरोबर असली, कृतिव्यवहार बरोबर असले, की तुमचे सारे कांही बरोबरच होत जाईल.

# राष्ट्रीय आश्विन १२

# शिथिलता हवी

•

पहाटेच्या वेळी एखाद्या एकांत शांत निवांत जागेत हलक्या पोटाने उदबत्ती लावून ठेवून, पद्मासन घालून स्थिर बसा. सर्व शरीर शिथिल सोडा. पूरक होण्यासाठी एका नाकपुडीने खोल श्वास घ्या. मग कुंभकात श्वास कोंडून धरा. रेचक होऊ देताना दुसऱ्या नाकपुडींतून हळूहळू श्वास सोडा. अनुलोम–विलोम साधण्यासाठी नाकपुड्या आलटून पालटून वापरा. कांही काळ, निदान पाव घटकाभर, सावकाश-नियमीत-खोल, श्वास घेण्याचा हा पूरक-कुंभक-रेचक आवर्तनाचा व्यायाम रोज अखंडपणे चालू ठेवा. तुमचे मन मोकळे होऊन शांत बनल्यावर, शरीर पूर्णपणे शिथिल झाल्यानंतर तुमच्या रिकाम्या मनात शांतता, समाधान, प्रेम, सत्य, चांगुलपणा, सौंदर्य, दयाळूपणा, कृतज्ञता, आरोग्य, यश, कार्यसिद्धि, सुख, स्वातंत्र्य, भरभराट अशा सारख्या करणात्मक विधायक विचाराना जागा द्या. तुम्ही हा श्वसनाचा व्यायाम नियमीतपणे दीर्घ काळपर्यंत चालू ठेवलात तर एकीकडे प्राणवायु ग्रहण करण्याची क्षमता वाढून रक्तदोष नाश साधेल आणि दुसरीकडे तुमच्या जीवनात उपरी-निर्दिष्ट गुण आपोआप दृग्गोचर होऊ लागतील. मन-शरीर शिथिल करण्याच्या या उच्च मार्गाने तुमची प्रगति होण्याला कोणतीच आडकाठी वा मर्यादा उरणार नाही. निर्विकार मनात खेळू दिलेले सुविचार तुमचे ईप्सित साध्य करतील.

•

**OCTOBER 4**

## राष्ट्रीय आश्विन १३

# टाळी लागू द्या

•

जर तुम्ही मनाने उत्तरोत्तर अधिक विशाल, उदार बनत चालला असाल, जर दुसऱ्याच्या सुखाची कल्याणाची तुम्हाला अधिकाअधिक आस लागू लागली असेल, दिवसभराचा सारा वेळ जर तुम्ही लोकसेवेच्या कामांत घालवीत असाल, जर मन:शांतीसाठी व मार्गदर्शन मिळविण्यासाठी तुमची बरेचवेळा भगवद्‌भजनी टाळी लागत असेल तर तुम्ही निश्चितपणे मुक्तिच्या दिशेने वाटचाल करीत आहात. भगवद्‌भजनाने वासनाक्षय साधतो 'ठेवी भगवंती जो विश्वास, त्याला लाभे समाधान खास.' मन:शांती, सौख्य, परिपूर्णता प्राप्त करण्याचा राजमार्ग आता तुम्हाला नि:संशय लाभला आहे. 'भजनाविण नाही दुजे साधन, हे सांगत आले सर्व संतजन.' विनम्रतेने वागून, सेवाव्रत्ती बनून, मनाने व वाणीने भगवद्‌भक्ती करीत राहून आपले उद्दीष्ट तुम्ही गाठणारच, 'भगवंताला होता अर्पण, तेथे सुखदु:खाचे नुरे कारण.' मिळाल्या जन्माचे सार्थक करुन आपल्या आदर्शाने इतरांचा मार्ग प्रकाशीत करणे तुमचे प्रधान कर्तव्य ठरते. भगवद्‌भजनाचा धरता आधार होतो सुखाचा संसार.' आपले भक्त नेमुन दिलेले कार्य निपुणतेने, मन:पूर्वक व यथाशक्ति करीत आहेत हे पाहून आणि त्यानी चालविलेल्या नामाचा गजर ऐकून भगवंत निश्चित संतुष्ट होईल. प्रत्येक कर्तव्यनिष्ठ सेवाव्रती जनवत्सल भगवद्‌भक्ताची, लोकसेवा करणे ही, जबाबदारी होय.

☆

**OCTOBER 5**

# राष्ट्रीय आश्विन १४

# आरंभ आताच

भविष्यकाळासाठी आखून ठेवलेल्या सुंदर योजना आजच हाती धरुन तडीस नेण्यास, राबविण्यास प्रारंभ करा, आयुष्याच्या उत्तरार्धासाठी योजलेले आत्मविश्वासपूर्ण कार्यक्रम तडीला लावण्यासाठी आजच कृतीत आणण्यास सुरवात करा, आणि पहा तुमचे जीवन पार बदलून जाऊन किती सुखावह होते ते. आपल्या सवयी, कार्यपद्धती, खोडी जास्त अनुकुल काळ प्राप्त झाला की चांगला मुहूर्त झाला की, सापडला की, किंवा योग्य परिस्थिती लाभली तर आपण आमुलाग्र बदलून टाकू अशा तऱ्हेचा विचार करण्याची घोडचूक सहस्त्रावधि लोकांकडून आजतागायत घडलेली आहे. आपले इप्सित फेरफार इच्छापूर्वक लगेच घडविण्यास तडीला पोचविण्यास सुरवात करणे हाच खरा आपले जीवन प्रगतीशील बनविण्याचा खात्रीचा उपाय आहे. त्याचप्रमाणे आपली लक्ष्ये, आपल्या योजना, आपली ध्येये, परिस्थितीची रड न सांगता, तड गाठण्याच्या दृष्टीने, दिशेने, दृढतेने पावले टाकण्यास ताबडतोब प्रारंभ करणे, हाच एकमेव शहाणपणाचा मार्ग आहे. तरच तुमची निश्चित प्रगती होऊ शकेल. लांवणीवर टाकलेले अनेक बेत, किंवा विविध निश्चय हे साधारणपणे मनातल्या मनात जिरुन जात असतात. कधीकाळी करण्यासाठी योजलेले कार्य कदाचित केल्याविनाच राहील. पण आजच हातावेगळे झालेले काम तडीला नेलेले कार्य जमेच्या बाजूस टाकता येणार आहे.

★

## OCTOBER 6

# रास्त मूल्यांकन

अल्पसमाधानी आत्मसंतुष्ट वृत्ती निश्चितपणे प्रगतीच्या मार्गातील एक अदृश्य असा अडसर आहे. त्याचप्रमाणे स्तुतीपाठक तोंडपुजी मंडळी तुम्हाला सहाय्यभूत तर होत नाहीतच उलट प्रगति होऊ देण्याच्या दृष्टीने ती तुमचे नुकसानच करतात. स्वत:च्या हातून घडणाऱ्या गुन्ह्यांवर, चुकांवर पांघरुण घालण्याकडे, त्यांचे समर्थन करण्याची मखलाशी करण्याकडे, प्रत्येकाचा नैसर्गिक कल असतो. पण अचूक निर्णय घेता येण्याचे कौशल्य कमावणे साधण्याच्या बाबतीत असला कल विघातकच ठरतो. चंचल वृत्तीच्या धरसोडच्या वर्तनाच्या व कमकुवत मनाच्या व्यक्तिना, सध्याच्या जीवनस्पर्धेत विजय प्राप्त करुन आदर, सन्मान, नावलौकिक मिळवणे अशक्यप्राय आहे. या जीवन शर्यतीत वेगाला तसे प्राधान्य कमीच राहते. जिकण्यासाठी स्पर्धकाजवळ मुख्यत: शौर्य· बुद्धीमत्ता आणि निपुणता हवी. आपल्या महत्वाकांक्षेला कसलीही आडकाठी नाही, आणि आपल्या जवळ कार्यशक्ति, कर्तृत्व, कर्तबगारी पुरेशी आहेत, या दोन्ही बद्दल प्रत्येकाने भरपूर आत्मविश्वास बाळगायला कसलीच हरकत नाही. तरीही आपल्या कुवतीचे यथायोग्य, उचित, रास्त मुल्यांकन प्रत्येकाने काटेकोरपणे करावे. परोपसेवी यशस्वी जीवन घडविण्याच्या दृष्टीने असे मूल्यांकन उपयुक्त ठरते. कारण मग उद्दिष्ट आवाक्यातलेच निवडलेले असते.

– ० –

OCTOBER 7

# राष्ट्रीय आश्विन १६

# निष्काम कर्मयोग

भगवंतांनी केलेला आध्यात्मिक उपदेश निःसंदिग्ध व आग्रहपूर्ण आहे जो कोणी गीतेचे लक्षपूर्वक परिशीलन करील त्याच्या सहजपणे हे ध्यानात येईल की – 'एकमेका सहाय्य करा, अवघे धरा सुपंथ । तेणे क्रमाल पारलौकिकाचा, मार्ग नीट आणि संथ ।।–' हा गीतेतील शिकवणीचा एक निष्कर्ष आहे. 'स्वतःचा पवित्र देह परमेश्वरचरणी अर्पण करा म्हणजेच परोपकारार्थ झिजवा,' हे ही त्या गीतेतील उपदेशाचे एक दुसरे सार आहे. गीतेतील ही शिकवण कृतीत उतरविल्याने पारलौकिकार्थ उपयुक्त असा पुण्यसंचय पदरी पडतो. या पुण्यसंपदेची चोरी होऊ शकत नाही. हे पुण्य प्रभावी असते, न गंजणारे असते, शाश्वत असते. हा पुण्यकोष अभेद्य ठरतो. याचा वापर परलोकीच व्हायचा असल्याने मुमुक्षूला पारलौकिकाची आस लागून राहते. इहलोकी जीव जरा देखील गुंतू न देता ऐहिक जीवनाचे क्रांतिकारी परिवर्तन साधावे. 'अहं' चा त्याग करुन 'तत्त्वमसि' हे समजून घ्यावे. हे भ्रममूलक मायाबद्ध जग नश्वर असल्याने ह्याच्या मोहपाशातून प्रत्येकाने सुटायलाच हवे. भगवंत-प्रणीत निष्काम कर्मयोग आचरणारा फलाशा धरीत नसल्याने या मोहपाशात जखडला जातच नाही. एकनिष्ठ कर्मयोगी परमेश्वरावर भार ठेवून इहलोकी वावरतो. म्हणून मोक्षप्राप्ति त्याला असाध्य असत नाही.

# राष्ट्रीय आश्विन १७

# तुल्यबलता

श्रेष्ठ असे कर्तृत्वही जर तुम्ही फालतू कार्यासाठी वापरलेत तर पदरात पडणारी फलप्राप्ति तशी नगण्य असते. पण महान कार्यासाठी मात्र तुमच्याजवळचे छोटे कर्तृत्वही वापरलेत तर लाभ-लेली फलप्राप्ति जास्त उल्लेखनीय ठरते. मग महान् कार्य व श्रेष्ठ कर्तृत्व यांची जर सांगड पडली तर साधणारी फलप्राप्ति उच्चतम सिद्ध होईल यात काय संशय ? कार्य व कर्तृत्व यांची तुल्यबलता ही महान् यशप्राप्तिची खरी गुरुकिल्ली आहे. जर सद्य:परिस्थितीत तुम्हाला समाधान लाभत नसेल, तुमच्या कर्तृत्वाला पुरेसा वाव नाही असे वाटत असेल, तर वेगळ्या नि विस्तृत कार्याला हात घालण्याची योजना आखा. नावडत्या कार्यक्षेत्रात, अपोषक वाता-वरणात, उगीचच आंधळेपणाने, हट्टाने धडपडत राहण्यात मुळीच शहाणपणा, अर्थ, स्वारस्य नाही. तुमच्या कर्तृत्वाला साजेशा अशा, अनंत नि विविध संध्या, भोवताली विखुरलेल्या असतात. आपल्या-तील उणीवा उमगून घेऊन, त्या नष्ट करुन, जोडीने उपयुक्त अशा संध्या हेरुन काढा. आपल्या दोषांबाबत आपण अडाणी असणे म्हणजे आपणच आपल्याला ठकविणे आहे. तुम्ही प्रगति साधण्यासाठी तर जन्माला आलात. तेव्हा आपला प्रभाव, आपली क्षमता दोन्ही प्रयत्नपूर्वक वृद्धिंगत करा. आणि साजेसे असे श्रेष्ठ, इच्छित उद्दिष्ट निवडून ते गाठूनही दाखवा.

●

**OCTOBER 9**

## राष्ट्रीय आश्विन १८

# सुसंस्कारिता

सुसंस्कार म्हणजे सुधारणा आहे, संवर्धन आहे; केवळ संग्रह नव्हे. मानसिक व नैतिक शिक्षणातून साधणारा अज्ञाननाश व येणारी शिस्तबद्धता म्हणजे सुसंस्कारिता. सुसंस्कारांचा भर गुणवत्तेवर असतो, संख्यात्मकतेवर नसतो. सुसंस्करण हे गर्दशाप्रिय, चढाईखोर, पुढेपुढे करणारे वा स्वतःचेच घोडे पुढे दामटणारे नसते. सुसंस्कारिकेत अंतर्भाव होतो समतोलपणाचा, सभ्यपणाचा, विचारीपणाचा, सुनियंत्रितपणाचा. सुसंस्कारांना स्वसामर्थ्याची उचित जाणीव राहते, स्वतःच्या तत्त्वनिष्ठेबद्दल व सुसवयींबद्दल आत्मविश्वास वाटतो. स्वतः घेतलेल्या निर्णयावर ते कधीच बोळा फिरवीत नाहीत. सुसंस्कृतपणाला टाळ्या, शाबासकी, प्रशंसा यांची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणे तो निंदेलाही धूप घालीत नाही. गाजावाजा, भपका, डामडौल याबाबतीत तो सर्वस्वी निरिच्छ, निरपेक्ष राहतो. 'तुल्यनिंदास्तुतिर्मौनी, असा हा स्थितप्रज्ञ समाजात वा एकांतात सारखाच अनुद्विग्न असतो. ग्रंथवाचन, सुसंगति आणि मनन चिंतन यांच्याद्वारे सुसंस्कृतपणा अंगी बाणतो; आणि मग त्यामुळे जीवन जखडलेले, संकुचित असे न राहता ते विशाल, समृद्ध संपूर्ण बनते. सुसंस्कारिता हीन जीवन, ते जीवनच नव्हे.

卐

**OCTOBER 10**

# झाला निर्धार?

तुम्ही आतापर्यंत वरेचदा निरनिराळे बेत ठरवलेत, निश्चय केलेत, योजना आखल्यात, पण यातले काहीच तुम्ही पार पाडले नाहीत. होय ना ? मुळात ते बेत तुम्हांला चांगलेच महत्त्वाचे व इष्टही वाटलेले. जीवन मनाजोगत्या साच्यात ढाळण्यासाठीच्या कल्पना होत्या त्या. त्या वापरल्याने तुमच्या जीवनाला काही प्रेरणा लाभणार होत्या. पण काळाच्या ओघात, आळसाच्या ओढीत, परिस्थितीच्या प्रवाहात ते सर्व जसे वाहून गेले, बेत विरले, उपेक्षिले गेले पार विसरले सुद्धा. हा अनुभव तसा बहुतेकांचाच. निष्कर्ष काय, की जीवनाला इष्ट वळण लावण्यासाठी जर असे बेत कृतींत उतरवले जायला हवे असतील, तर त्या दृष्टीनें काही परिणामकारक अशा उचित साधनांचा तुम्ही अगत्याने अवलंब केला पाहिजे. घोडे कुठे पेंड खाते आहे, तुमच्यात नेमक्या उणीवा काय आहेत, बेत कशामुळे फिसकटतात. याचे मनाशी नीट पृथक्करण करा, स्वतःशीच सांगोपांग उहापोह करा. 'निश्चयाचे ऐसे बळ, तुका म्हणे तेचि फळ,' हे जरी खरे असले, तरी त्यासाठी निश्चयात पुरेसा जोम हवा. तदनुसार दैनंदिन प्रगति होते आहे की नाही, याची कटाक्षाने पाहणी व्हायला हवी. तुमचे निश्चय, स्वतःचे बेत फलद्रूप होण्यासाठी सारे सामर्थ्य एकवटून कंबर कसा. केलात ना आता, योजलेले बेत ताबडतोब हाती घेण्याचा, ठाम निर्धार ?

– ० –

# हातचा वर्तमानच

वातावरण जेव्हा जास्त पोषक होईल, परिस्थिति जेव्हा अधिक अनुकूल बनेल, व प्रसंग जेव्हा मनाजोगा जमेल तेव्हा आपण अमुक अमुक उत्कृष्ट कार्यांना हात घालू असे असतात तुमचे मनसुबे. पण खरे बोलायचे तर खात्रीने तुमच्या हातात आहे फक्त चालू क्षण, आताचा हा वर्तमान. तेव्हा जे काय करायचे ते आताच, लगेच, कोणाची प्रशंसा करावयाची असेल, कोणाला सहानुभूति दर्शवायची असेल, उदार हातांनी कोणाला काही मदत द्यावयाची असेल. एखाद्या अविचारी मित्राने तुमची केलेली आगळिक माफ करावयाची असेल, इतरांसाठी स्वतःच्या स्वार्थावर अर्घ्य सोडायचे असेल, तर हे सारे करुन टाका आधी, ताबडतोब, विनाविलंब, टंगळमंगळ न करता. तुमच्या हृदयाची कळकळ, दिलदारी, निःस्वार्थता सिद्ध करण्याचा क्षण हाच हे नीट समजून घ्या. चालढकल होत आलेल्या अनेक सेवाकार्यांपैकी एकतरी टाळाटाळ न चालविता शीघ्रपणे उरकून टाका. जीवनातल्या एखाद्या सहप्रवाशावर देवाने तुम्हाला बहाल केलेल्या अपार कर्तृत्वाचा ओघ या क्षणीच सोडा. अशानेच तुम्हाला लाभलेला हा अनमोल मनुष्यजन्म सार्थ व कृतकृत्य होणार आहे. मात्र हे व्हायला हवे याच वेळी. तेव्हा ' शुभस्य शीघ्रम. ' हातच्या वर्तमानाचाच वापर करा.

*

# राष्ट्रीय आश्विन २१

# तयार ठेवा यादी

तुमच्या मनोभांडारातील मालाचा साठा एकदा मोजून पहा, त्याचा नीट ताळेबंद जमवा. शिल्लक मालाची तयार ठेवा यादी. विशेषतः विचारसामुग्री, कालधन, बुद्धिमत्ता ठेवी आणि विवेकसंचय यांच्या बाबतीतील भांडाराची परिस्थिति भक्कम आहे की नाही याची डोळ्यात तेल घालून तपासणी करा. सारा माल मिळण्याजोगा असा नीट व्यवस्थितपणे उत्तम जागी लावून ठेवा. विचारसामुग्री तर मालात सर्वश्रेष्ठ. कारण ती जगव्यवहाराचे नियमन करते. प्रत्यक्ष आचरणात वा दृश्य कृतीत उतरण्यापूर्वी प्रत्येक रचना आधी मनात घडविली जावी लागते. जे, जेवढे, जसे तुम्हांला सुचू लागते, तेवढे ते व तसे तुम्ही कृतीत आणू लागता. म्हणून थोर, थोर विचारवंतांची विचारसामुग्री तुमच्या मनोभांडारात आणखी आणखी साठवीत चला. ग्रंथस्थित प्रज्ञावंतांशी सतत संपर्क साधीत राहिल्याने अभिरुची उत्तम होऊ लागेल व बौद्धिक दृष्टिकोनाचा आवाका वाढू लागेल. तेव्हा आपल्या आकांक्षा, सवयी, खटपटी यांना नीट वळण लावीत रहा. मानसिक व नैतिक संस्करणासाठी नियमाने दिवसाकाठी वेळ राखून ठेवा. म्हणजे महत्त्वाकांक्षांची पातळी उंचावेल, कार्यसिद्धीचा दर्जा सुधारेल. भव्योदात्त बुद्धिवंतांचे काहीही सुमार दर्जाचे असू शकत नाही.

OCTOBER 13

# राष्ट्रीय आश्विन २२

# घडवा चारित्र्य

बाष्कळ बडबडीत कालापव्यय करण्यापेक्षा आरोग्य, प्रगति, सौख्य सुयश याबद्दल चर्चा केलेली केव्हाही हितावह. दुष्ट विघातक विचारांना मनात थारा देण्याऐवजी काही सुरुचिपूर्ण, सत्यशोधक प्रेरणादायी, आणि आदर्शवादी कल्पनांवर आपले विचार केंद्रित करणे निश्चितच श्रेयस्कर. नसत्या नतद्रष्ट उठाठेवींच्या तुंबड्या लावीत न बसता काही आनंददायक, आत्मविश्वासवर्धक, अपेक्षामय उत्साहपूर्ण अशा खटपटींना हात घालणे खूपच हितकर. जीवनातल्या धकाधकीला टरकुन जीवनपराङमुख होणे भ्याडपणाचे इतके सारे नीट समजल्यावर आता पुढे काय करायला हवे हे अगदी ओघानेच ध्यानात आले असणार तुमच्या. 'जगाचा मामला धकाधकीनेच भरलेला आहे. काय करणार ?' अशी सबब न सांगता विधायक विचारांनी व लोककल्याणकारी उद्दिष्टांनी तुमचे अवघे जीवन संपूर्णपणे व्यापून टाका. मग दुर्विचारांना आणि निराशाकारी धकाधकीच्या कल्पनांना थाराच मिळणार नाही. परोपकारी, उपयुक्त, प्रोत्साहक तेवढेच विषय आपल्या संभाषणात असू द्या. विचार, उच्चार, आचार आणि हेतु-प्रचार याबाबत उदारमतवादी म्हणजे जनसेवी बना. धकाधकीवर मात करुन जगात रहावयाचे तर आहेच. मग त्यालाच का न सुधारुन टाका! सत्य, सचोटी याबद्दल ठाम आग्रह धरा. शाश्वत प्रगति व चिरकालीक सौख्य प्राप्त व्हावे या ध्येयाने प्रेरित व्हा अशा प्रकारची जीवनाच्या धकाधकीला पुरुन उरणारी दिनचर्या ठेवलीत की तुमच्या जीवनाची घडण चारित्र्यमयच होईल निःसंशयपणे.

\+ + +

**OCTOBER 14**

# ठेवा श्रद्धा

परमात्मा सच्चिद्रूप आहे, प्रेमरुप आहे. तो जगन्नियंता मूर्तिमंत प्रेम आहे, पण निराकार निर्गुणही आहे. त्याचे ध्यानही त्या निर्गुण निराकार स्वरुपातच धरता यायला हवे. परमेश्वराच्या बाबतीत अशक्य असे काहीच नसते. त्या अनादि अनंतालाच तुला शरण जायचे आहे. दोन्ही बाहू पसरुन तुला उराशी धरायला तो सदा तिष्ठत असतो. मनोभावेकरुन सर्वस्वाने त्याच्यावर ठेव श्रद्धा. स्वतःच्या सूज्ञपणाचा, अक्कलहुशारीचा टेंभा-दिमाख मिरवू नकोस. त्याला सदा साक्षी मानूनच जे काय करायचे ते कर. केव्हाही तो तत्परतेने मार्गदर्शन करील. भला माणूस जे काही करतो ते सारे परमेश्वरी संकेतानुसारच असते. शिवाय तो माणूस त्यात परम संतोषच पावतो. स्वतः तू धीराने वागत चल. मग परमेश्वर तुझी पाठराखणही करणार. तुला मनाशी कसलाही घोर बाळगण्याचे कारण नाही. मनोभावे त्याची फक्त विनवणी-प्रार्थना करीत चल. परमेश्वरापुढे नाक घासून त्याला साकडे घाल. तो तुझा टाकला शब्द झेलल्याशिवाय कदापि राहणार नाही. ते ब्रह्मरुप अचिंत्य, अनाकलनीय, अकल्पनीय आहे. तरीही त्याच चिदात्म्याचा तू ही अंश असल्याने तू निराधार राहणारच नाहीस. प्रेमरुप परमात्म्यावर खुशाल श्रद्धापूर्वक भार सोड.

*

**OCTOBER 15**

राष्ट्रीय आश्विन २४

(आश्विन शु. ८, महालक्ष्मीपूजन)

# मनोराज्यावर सत्ता

तुमच्या प्रत्येक मनोव्यापाराचा छोटामोठा प्रभाव तुमच्या आयुष्यावर पडतोच पडतो. तुमचे मनोव्यापार दोन वर्गात-गटात विभागता येतील. पहिला-उपयुक्त उद्दिष्टांना पोषक असे, सामर्थ्य-शाली विधायक विचार. दुसरा–तुमची शक्ति खच्ची करणारे निराशावादी विघातक विचार. माणसांची विचार पद्धति सर्वसाधारणपणे अनिश्चित नकारात्मक, धरसोडीची व निरुद्देश्य अशी असते. शिवाय तिच्यावर भोवतालच्या वातावरणाचा, प्राप्त प्रसंगांचा, बोकाळलेल्या चटोर वाचनाचा, चालू चटोर चित्रपटांचा, घेरा घालणाऱ्या मंडळींचा, भलताच पगडा असतो; आणि म्हणून विचार प्रवृत्तींचा कल विध्वंसनाकडे जातो. आता कसल्या प्रकारच्या विचारांना थारा द्यावयाचा, आपल्या दैनंदिन जीवनावर कशा विचारप्रणालीची छाप पडू द्यावयाची याची निवड करणे केवळ तुमच्याच हाती आहे. आजच्या महालक्ष्मीपूजनाच्या मंगल दिनी तिची यथासांग पूजा करुन जर तुम्ही ठरविलेत तर अनिष्ट, हानिकारक, निरुपयोगी, विनाशक विचार कंटकांना तुम्ही आपल्या मनोराज्यांत मुळी मज्जाव करु शकाल. जितक्या प्रमाणात निर्धार ठाम होईल, तितक्या प्रमाणांत महालक्ष्मीच्या आशीर्वादाने मनोराज्यावर अधिसत्ता स्थापित कराल.

★

**OCTOBER 16**

## राष्ट्रीय आश्विन २५

# आणीबाणींतही

जीवन कितीही आखून घेतायचे ठरविले तरी चुका, अडचणी, समस्या काही चुकत नाहीत. रोजच्या वाटचालीत तीच तीच कामे पुन: पुन: पार पाडावी लागतात, किंवा अकल्पित उपद्व्यापांना तरी तोंड द्यावे लागते. यासाठी जवळ हवी सहनशील प्रवृत्ति, स्वार्थत्यागी मनोवृत्ति. नको हे सारे असा वीट येऊन हिमालयात जावेसे वाटते. तरीही मित्रांचे व समाजाचे ऋण फेडण्यासाठी म्हणून मनाला मुरड घालावी लागते. एखादे मेहनतीचे काम पुरे होण्यापूर्वीच शरीर थकते, आंबून जाते. तरीही काम धसास लावल्याखेरीज सुटका नसते. नकोत तेव्हा, व्यग्र करणारे व्यत्यय, कर्णकटु गोंगाट, नाहीतर नसत्यांच्या लुडबुडी यांनी पारा चढला नाही, तळ पायाची आग मस्तकात शिरली नाही तरच नवल. तरीही जबाबदारी ओळखून दहा अंक मोजावे लागतात, मनाचा तोल घालवून चालत नाही. सांगण्याचा इत्यर्थ असा की जीवन सुसंवादी व सौख्यपूर्ण व्हावे या दृष्टीने आखणी करणे अगत्याचे असले तरी ते तसे होईलच यावर न विसंबता येतील त्या आणीबाणीच्या समस्यांवर कुरघोडी करता येण्यासाठी सहनशीलता, चिकाटी व स्वार्थत्याग हे सद्‌गुण जोपासून आणीबाणीला तोंड देण्याची तयारी ठेवलेली बरी.

**OCTOBER 17**

## राष्ट्रीय आश्विन २६

# दाखवा मौलिकता

**कां**ही नवा मौलिक उपक्रम सुचू द्या; एखाद्या नव्या धाडसांत पुढाकार घ्या; कोणतातरी नवा प्रयोग करुन पहा; नाहीतर अज्ञातपूर्व असे काही मुळीच नवे हुडकून काढा. साहसाच्या व चौकशी-तपासाच्या विविध क्षेत्रात नव्याने पाऊल टाकताना मुळीच डगमगू नका. अज्ञात पण अस्तित्वात असलेल्या अनेक ठिकाणांचा शोध लावण्याचे केवढेतरी काम अजून बाकी आहे. मंत्रमुग्ध करु शकतील अशी अनेक प्रवचने अजूनही दिली जाणे शक्य आहे. अजोड ठरतील अशी अनेक मौलिक कार्ये अजून पार पडायची बाकी आहेत थोडक्यात, अजून कितीतरी मौलिक कार्यांची दालने उघडली गेलेली नाहीत, पुष्कळ कार्यक्षेत्रांत कोणी पाऊल टाकलेले नाही. त्या सगळ्यांत तुमच्या कर्तृत्वाला भरारी मारण्यास भरपूर संधि व पुरेसा वाव शिल्लक आहे. मग निवडा एखादे दालन, कार्यक्षेत्र. कंबर कसून मनगटातले पाणी दाखविण्यासाठी, सारी कर्तबगारी पणाला लावा जिवापाड मेहनत जितकी कधी कधी अनिष्ट, तितकेच घाणी फिरवीत बसणेही कंटाळवाणे सोईस्कर, उपयुक्त, उत्पादक, अशा मौलिक कार्यात गढून जाणे, मानसिक व शारिरीक आरोग्याला फारच हितावह ठरते. मग असे व आवडतेही कोणतेतरी काम निवडून मौलिकता सिद्ध करण्याच्या आलेल्या संधीचा फायदा ताबडतोब घ्या पाहू.

☆

**OCTOBER 18**

## राष्ट्रीय आश्विन २७

# डावलू नका

आपल्यातील, आधी ध्यानात न आलेल्या, एखाद्या उणीवेमुळे, आपल्या कर्तृत्वाला पडणाऱ्या सीमेचे, आपण आता उल्लंघन करु शकलो आहो, अक्कल गुंग करणाऱ्या एखाद्या समस्येची उकल करणे आपल्याला साधले आहे. गळयात पडलेले एखादे नावडते कामही आपण कर्तव्यबुद्धीने, निष्ठापूर्वक व यशस्वीरीत्या पार पाडले आहे, असे समाधान प्राप्त झाल्याचे आपल्या ध्यानी येताच स्वतःस होणारा आनंद आगळा अवर्णनीय असा असतो. पुष्कळाना जीवन कंठणे म्हणजे एका ऊंच लांबलचक, दुर्गम डोंगरावर चढुन जाण्यासारखे वाटते पण जसजसा काळ लोटत जातो, तसतसे, धीर धरुन नेटाने जिद्दीने चढ चढून जाणाऱ्यांना जेव्हा कार्यसिद्धीच्या डोंगरमाथ्यावर पोचता येते, तेव्हा त्यांना वरुन खालचे दिसणारे अवर्णनीय दृश्य मोठे मनोवेधक, नेत्रदीपक व चित्तथरारक वाटते. अशाप्रकारचे सीमोल्लंघन करण्याचा प्रत्येकाने आजच्या आनंदमय अशा दसऱ्याच्या दिवशी साडेतीनांतील या एका महामुहूर्तावर दृढ निर्धार केला पाहिजे. आज सीमोल्लंघन डावलावयाचे नसते, तर अहमहमिकेने अंगिकारायचे असते. चढलेल्याना जाणवते की घेतल्या श्रमांचे सार्थक झाले आहे, कार्यपूर्ततेच्या पदरांत पडलेल्या पारितोषिकानें कृतकृत्यतेचा अनुभव येत आहे. आता त्यांना पटते की जीवन हा एक सुंदर प्रेरणादायक आव्हानात्मक प्रवास आहे. कारण ते स्वतः आता प्रवीण प्रवासी सिद्ध झालेले असतात.

**OCTOBER 19**

## राष्ट्रीय आश्विन २८

# राहणी सुसंस्कृत

मन, बुद्धि, वर्तन आणि रुचि यांना सुविनीत, सत्त्वशील आणि सुधारणाप्रिय बनविण्यांत ज्याची परिणति होते ते शिक्षण म्हणजे सुसंस्कृतता. आपण जे, जसे जेवढे आहोत तसे असण्याचे खंतहीन धैर्य बाळगणे हीही सुसंस्कृततेचीच साक्ष असते. सुसंस्कृत व्यक्ति नुसतीच ज्ञानवान नसते तर चतुर, सहानुभूतिमयही असते. साधेपणा व सभ्य वागणूक यांची सांगड म्हणजे सुसंस्कृतता. सत्य, सहानुभूति, सौंदर्य व सेवा यांनी पूर्ण अशा वागणुकीचा विकास आणि दुष्ट, नालायक, नीच, हलकट वृत्तींचा निरास करण्यात सुसंस्कृतता सामावलेली असते. दुष्टावा, अज्ञान, असत्य यांची हकालपट्टी करुन त्या जागी, सुसंस्कृतता, कल्याणवृत्ति, ज्ञानसंपन्नता आणि सत्यप्रीति यांची स्थापना करते. सुसंस्कृतता परोपकारी दयामय सेवाधर्म आचरते, सर्वप्रकारच्या कायिक, मानसिक, वाचिक अस्वच्छतेचा, तिटकारा वाटून बीमोड करते आणि सुयोग्य अशी कृति करण्याची आंतरिक इच्छा बाळगते. सुसंस्कृतपणा जीवनावर सत्प्रभाव ठेवणाऱ्या शक्तींचा पाठपुरावा करतो, सात्विक प्रवृत्तींना प्रोत्साहन देतो, वाटचालीचा मार्ग प्रशस्त करतो. सुसंस्कृत राहणी-मुळे जीवन सत्प्रवृत्तिप्रकाशाने उजळून निघते.

卐

**OCTOBER 20**

## राष्ट्रीय आश्विन २९

# खटाटोप अविरत

इच्छापूर्ति, आकांक्षासिद्धि, सत्तासंपन्नता, धनसंचय, अनिर्बंधता, अल्पसंतुष्टता, यापैकी कोणतेच आयुष्याचे महान् उद्दिष्ट असे बनण्याच्या योग्यतेचे नाही. आयुष्य म्हणजे असते अविरत धडपड-खटपट, बेतांची आखणी, स्वप्नरंजन, आकांक्षासाधना, कशासाठी तरी चळवळ, लोकसेवा, समाजकार्य, कार्यसिद्धीच्या एकापुढे एक पायऱ्या चढत राहणे. इथपर्यंत ठीक आहे की तुम्ही आयुष्यभराचा व्यवसाय, नोकरी, धंदा थांबवू शकता पण त्याचा अर्थ ऊर्वरित जीवन सुस्तीत, आळसात, कार्यविन्मुखतेत दवडायचे असा कदापि नाही. या निवृत्तीच्या आयुष्यात वाचन, लेखन, मनन, प्रवास, चिंतन, ज्ञानदान, साक्षरताप्रसार, समाजसेवा, प्रौढशिक्षण यासारखे परहिताचे, लोकसंस्काराचे कार्य व्हायला हवे. काही महान् आकांक्षा साध्य झालेली आहे, कसलीच आशा-इच्छा उरली-राहिली नाही, महत्त्वाकांक्षा पूर्ण करावयाची राहिलेली नाही, अशी स्थिति प्राप्त होणे म्हणजे एक प्रकारे जीवन संपलेलेच असल्याचे लक्षण मानायला हरकत नाही. जगण्यासाठी काही कारण, साधन, उद्दिष्ट जवळ नाहीच. अशी वेळ तुमच्यावर यायला नको असेल, अखेरपर्यंत तुम्हाला सुखसमाधानसंतोषांत जगायचे असेल तर आपला सारा वेळ कुठल्याही का होईना पण उपयुक्त अशा खटाटोपांत अविरतपणे व्यतीत करा.

≈

**OCTOBER 21**

# राष्ट्रीय आश्विन ३०

# दीर्घश्वसन

**बा**हेर मोकळ्या हवेत फिरायला जाऊन पूर्ण उत्साहाने दीर्घ-श्वसनाचा व्यायाम करण्यात रोज पहाटेचा काही वेळ अवश्य घालवा. चालताना प्रत्येक श्वासाबरोबर नाकाने जास्तीत जास्त हवा फुफ्फुसात भरुन घ्या, मग उदर फुगवा. शेवटी उच्छ्वासाचे वेळी सारी हवा मुखावाटे पूर्णपणे बाहेर सोडा. अशी श्वासोच्छ्वासाची सर्व क्रिया भरपूर जोमाने, प्रामाणिकपणे, अवसान एकवटून, बऱ्याच वेळा व खूप वेळ करा. रात्री अंथरुणावर अंग टाकल्यावर उताणे निजा. दोन्ही पाय कमरेपासून हळुहळू वर छताकडे उचलून धरा. मग एकदम त्राण गेल्यासारखे त्यांना खूशाल अंथरुणावर पडू द्या. नंतर उपडे व्हा. हात समोर व पाय पाठीमागुन उचलून धरा. पुन्हा त्यांना आपल्या वजनाने खाली कोसळू द्या. सर्व गात्रांना जास्तीत जास्त शिथिल सोडा. अंग वळण पडून श्वसन प्रयत्नाविनही नैस-र्गिकपणे आपोआप दीर्घच होत राहते अशी स्वाभाविक अवस्था प्राप्त होईपर्यंत दीर्घश्वसनाचा सराव चालू ठेवा पुष्कळ जण श्वसनकार्यात फक्त फुफ्फुसांचाच वापर करतात. वस्तुतः योग्य तऱ्हेने दीर्घश्वसन चालवायचे तर छाती व पोट दोन्ही श्वसनयंत्रणेत समाविष्ट झाली पाहिजेत. शास्त्रशुद्ध रीतीने चालविलेले दीर्घश्वसन प्रकृति निरोगी राखते.

**OCTOBER 22**

## राष्ट्रीय कार्तिक १
## (आश्विन शु. १५, कोजागिरी पौर्णिमा)

# ऊठ, उपद्रव सोस-

नीट नेम धरुन नाकाडाकर लगावलेले ठोसेच जास्त लागतात असे नव्हे. उलट केव्हा केव्हा तर छोटचा छोटचा चिंतांचे चिमटे, काळजांच्या कोपरखळचा, उण्यादुण्यांची कुसळेच जास्त उपद्रव देऊन जीव नकोसा करुन टाकतात. असते सारे तसे क्षुद्र नि क्षुल्लक पण त्या कुसळांचे सल किती खुपतात ! चिमटे कोपरखळचा कशा जीवघेण्या ठरतात पण। अशा नानाविध निराशा, उपेक्षणीय. उपद्रव यावर मात करणे सहज शक्य असते. उपद्रव निराशा अनपेक्षित मानूच नयेत तर त्यांच्या अपेक्षेने सदासज्ज असावे. मन महत्वाच्या, मोठचा मुलभूत कल्पना-उद्दिष्टांवर एकाग्र करावे. यासाठीच तर आजच्या कोजागिरी पोर्णिमेचे जागरण वापरावयाचे. को जागर्ति? य: चिंता अपेक्षति, उपेक्षति, उपायश्च चिंतयति। वाटणीच्या कितीतरी कटकटींचा, गैरवाजवी लक्ष देऊन, आपण निष्कारण वाऊ करुन ठेवतो, आणि तो भलताच नडतो. हे उपद्रव, ह्या कटकटी असतात बव्हंशी मनगढन्त आजचा दिवस तुझ्या दृष्टीने निराशांधकारमय, म्हणून नकोसा जीव करणारा, वाटला तरीही जीवा, ऊठ. हे उपद्रव सोस थोडेसे कारण उगवणारा दिवस प्रकाशमय असणारच दु:खानंतर लाभणारे सुख अधिक चवदार लागते. अपयशानंतर मिळालेले यश जास्त सुखकर ठरते. तेव्हा आज मन कामात व्यग्र ठेव आणि उद्या आनंद भोग. परोपकाराची नि लोकसेवेची इतकी अनंत कामे तुझ्यासमोर पडलेली असताना काळज्या करायला चिंता चालवायला तुला वेळ तरी आहेच कुठे.

—o—

**OCTOBER 23**

# एकमार्गी साधेपणा

तुमच्या सात्त्विक व ध्येयवादी जीवनापासून तुम्हास दूर नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांच्या दडपणाला बळी पडू नका. तुमचे हे जीवन साधे व एकमार्गी व्हावे यासाठी तुमचे मन व विचार उच्च अशा भूमिकेवर राहतील ही खबरदारी घ्या. खऱ्या शालीनतेचे अंगी अहंभाव, स्वार्थीपणा, यांचे वास्तव्य असूच शकत नाही. साधी सात्त्विक राहणी इतरांशी कळकळीचे व निस्पृहतेचे वर्तन ठेवते. जर तुम्हांला मोठेपणा प्राप्त करुन घ्यायचाच असेल तर तुमची राहणी एकमार्गी साधी, वर्तन सहानुभूतिमय व सरळ आणि मनोभाव बळकट व दृढनिश्चयी असले पाहिजेत. जगातील साध्यासुध्या घटनादेखील मी मी म्हणणाऱ्या शहाण्यासुरत्यांना गुंगबुद्धि बनवितात. जी बाब सकृद्दर्शनी क्षुद्रक्षुल्लक भासते तीच अंततोगत्वा महत्त्वाची आहे असे अनुभवास येते. खऱ्या एकमार्गी छक्के पंजे विहीन जीवनाचे सामर्थ्य व महत्त्व समजून घ्या. साधेपणाला तुमच्या वर्तनात, जीवनात, आपल्या आचरणाने अग्रेसरत्व द्या. सर्वकाळच्या थोर महात्म्यांचे जीवन साधे व वर्तन एकमार्गी होते ही वस्तुस्थिति जरा सुद्धा नजरेआड होऊ देऊ नका.

★

# औचित्यपूर्ण निवड

स्वतःला संस्करण, वळण, शिस्त लावण्यासाठी, ध्येयसिद्धचर्थ किंवा वैयक्तिक विकास साधण्यासाठी, प्रयत्न सुरु करण्यास कोणत्याही दिवशी सारखाच चांगला मुहूर्त असतो. एकदा का तुम्हाला महत्त्वाचे नि क्षुद्र, सत्य व खोटे, सुंदर आणि विद्रूप शाश्वत नि क्षणभंगूर यामधला मूलभूत वास्तव भेद ओळखण्याचे कौशल्य लाभले की जीवनात विकास, प्रगति, साधण्याच्या विविध शक्यता, तऱ्हा, वाटा तुम्हाला दृग्गोचर होऊ लागतील आणि त्यामुळे सुनिश्चित व औचित्यपूर्ण असे जीवितध्येय तुम्हाला निवडता येईल. काही आवडी, काही निवडी, काही तारतम्ये, काही निर्णय व काही कृत्ये या सर्वांचे मिळून तुमचे दैनंदिन जीवन बनत असते. उपरिनिर्दिष्ट बाबी तुमच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली असतात म्हणजेच एका अर्थानें तुम्ही आपले रोजचे भवितव्य, पर्यायाने आपल्या जीवनाची नियति घडवीत असता. जे औचित्यपूर्ण उद्दिष्ट तुम्ही आयुष्यात गाठू इच्छिता, मग ते उच्च, सामान्य वा फालतू कसेही असो, ते तुम्ही सतत तुमच्या डोळ्यांपुढे ठेवा, ह्या उद्दिष्टाचे, जीवितध्येयाचे, ईप्सिताचे औचित्य एकदा तुमच्या मनावर अमिटपणे ठसलेले असले की मग निवडलेल्या जीवितध्येयापासून कुठलीही शक्ति तुम्हाला परावृत्त करु शकणार नाही.

*

## राष्ट्रीय कार्तिक ४

# ऊर्जित काल

चिंतापूर्ण, कमकुवत, आणि अस्थिर विचारांना तुमच्या मनात चुकूनही थारा देऊ नका. जीवन जगण्यासाठी जरुरीच्या महत्वाच्या, गरजेच्या सर्व गोष्टींच्या संपादनार्थ आपल्या सर्व अन्यान्य, शक्ति एकवटुन कामी लावा. चौफेर आकांक्षांच्या रथाला दीर्घोद्योगाचे अश्व जोडल्यावर तुमचे ध्येयमंदिर गाठण्यास तुम्हास जरादेखील वेळ लागणार नाही. अनेक प्रकारच्या शक्ति व नानाविध कर्तृत्वे तुम्हाला नकळत तुमच्या ठायी सुप्तपणे वास करीत असतात. फक्त ती, वापरात आणल्यानेच प्रकर्षाने प्रकट होत असतात. तेव्हा या शक्तिकोषातील कोणकोणत्या शक्ति, किती किती, कशाकशासाठी व केव्हा केव्हा वापरणार ते आजच ठरवून टाका. हा शक्तिसंचय वापरण्याचे ठरविल्यावर कद्रूपणा, काटकसर, हिमचुटेपणा काही काही मुळीच करु नका. कारण हा असीम, अखूट, अक्षय आहे. एकदा या जवळच्याच अज्ञात अनंत, शक्तिसंचयाची जाणीव व प्रचीती तुम्हाला आली की मग तुम्ही इतरांकडे मदतीसाठी तोंड वेंगाडणार नाहीत तुमच्यातील शिवशक्ति संभवच तुम्हास या जगात हवे असलेले मानाचे स्थान तुम्हास प्राप्त करुन देईल. तुमचा ऊर्जित काल दूर नाही. फक्त तुम्ही शड्डू ठोकून, वीरश्रीपूर्वक, जीवन संग्रामात स्वतःला झोकून देण्याचाच काय तो अवकाश.

**OCTOBER 26**

# राष्ट्रीय कार्तिक ५

# श्रेष्ठ गुण

काही श्रेष्ट गुण अंगी बाणवून, त्यांचा दैनंदिन व्यवहारात यथायोग्य व सतत वापर करीत राहण्यावरच जीवनात तुम्हाला लाभणारे महदयश प्रामुख्याने अवलंबुन असते. बिनचूकपणा तडजोडतत्परता, सावधानता, महत्वाकांक्षा, एकाग्रता, आत्मविश्वास, धैर्य, दाक्षिण्यबुद्धी, निर्धारप्रियता, विवेकशक्ति, उद्योगप्रियता, निश्चयात्मकता, उत्सुकता, काटकसरीपणा, नैपुण्य, उत्साह श्रद्धा, दूरदृष्टि, सचोटी, स्वावलंबन, मेहनतीपणा, आरंभशक्ति निष्ठापूर्णता निर्णयनैपुण्य, इमानीपणा- पुढाकार क्षमता, उमदेपणा, आशावादिता, नेटकेपणा, सहनशीलता, चिकाटी, काटेकोरपणा, चलाखपणा, दूरदर्शित्व, वक्तशीरपणा, चाणाक्षपणा, विश्वासहर्ता, सोद्देश्यता, युक्तिबाजपणा, दक्षता, स्वयंनिग्रह, धमक, कळकळ, चिवटपणा, सहानुभूति, धोरणीपणा, पूर्णत्व, नेमस्तपणा, मितव्ययता, सत्यवक्तेपणा, जागरूकता, जोमदारपणा, आस्थेवाईकपणा, हे त्यांच्या पैकी काही गुण आहेत. यापैकी जास्तीत जास्त गुणांची मेहनतपूर्वक जोपासना करा. ते अंगी बाणविण्याचा कसून प्रयत्न करा. ते अंगी बाणविण्याचा कसून प्रयत्न करा. तसेच त्या गुणांना अनुलक्षून, आपले सारे व्यवहार चालवून आयुष्यात यशःसिद्धी प्राप्त करा,

—o—

**OCTOBER 27**

# राष्ट्रीय कार्तिक ६

# औदासीन्य श्रेयस्कर

होत असलेल्या विरोधाला चिकाटीने, औदासीन्याने तोंड देत राहणे हा एक मोठा महत्त्वाचा व अटळ असा धडा शिकण्याजोगा असतो. समजा, तुम्ही एखाद्या बाबतीत विशिष्ट मत व्यक्त केले आहेत. ते जर योग्य असेल तर, त्याविरुद्धच्या प्रदर्शित होणाऱ्या साऱ्या कल्पनांचे, त्या अप्रत्यक्षपणे तुमच्या मताचा पाठपुरावाच करीत आहेत, असे मानून, स्वागत करा. उलट तुमचे मत अयोग्य असेल तर ते दुरुस्त करण्याचे श्रेय त्या कल्पनांना उदारपणे देऊन टाका. आडमुठे लोक शहाणपणाच्या सल्ल्यांकडे हेकटपणे पाठ फिरवितात आणि मग योग्य सत्यसाधनेच्या वाटचालीच्या आलेल्या संधीला मुकतात. वस्तुतः अंतिम निर्णय पक्का करण्यापूर्वी दोन्ही बाजूंचा साधकबाधक विचार करण्याची पद्धत ठेवावी. शक्यतर पडते घेण्याचीही तयारी ठेवावी. खरे सत्य कोणा एकाचीच मक्तेदारी बनू शकत नाही. तुमची बाजू न्यायाची असेल तर अन्याय्य मतांबद्दल उदारमतवादी, सहिष्णु व उदासीन राहणेच श्रेयस्कर. सत्याची तुम्हाला जर मनापासून आस लागलेली असेल, तर इतरांची मते तुम्ही मनापासून सन्मानिली पाहिजेत. सत्य विरोधाची मुळीच धास्ती बाळगीत नाही. ते त्याबाबत केवळ औदासीन्यच दाखविते.

**OCTOBER 28**

# राष्ट्रीय कार्तिक ७

# फल विधायक टीकेचे

दुसऱ्यावर केलेली टीका ही विधायक स्वरुपाची व सूचनावजा असावी; उगीच लहरीला आली तशी केलेली, आडदांड वा बोचक प्रकारची नसावी. उपदेशाचा, सल्ल्याचा भडिमार केला तर तो मदत वाटण्याऐवजी तिरस्कारार्ह ठरतो. कोरड्या शाब्दिक वटवटीच्यापेक्षा स्वतःच्या घालून दिलेल्या कित्त्याचा जास्त प्रभाव पडतो. टीका काय वा सल्ला काय बारेमाप झाला की त्याचा बोज राहत नाही. हुशारीने साधलेले मौन अनेक घोडचुका सहजपणे टाळू शकते. वाष्फळ वडवडीपेक्षा जेवढ्यास तेवढे म्हणजे मितभाषण केव्हाही श्रेयस्कर सिद्ध होते. तुम्ही, जेवढे सर्वोत्तम तेवढ्यावरच, लक्ष एकवटलेत तर साऱ्या निकृष्टाकडे सहजगत्याच दुर्लक्ष होत राहील. जीवन सन्मार्गाला लागून त्याला योग्य वळण मिळण्यासाठी व ते उच्च पातळीवर राहण्यासाठी तुम्ही सतत कार्यमग्न राहिले पाहिजे. दुसऱ्यांचे मनोमन केलेले शुभचिंतन त्यांना नकळत फलदायी होत असते. मदत करणे वा प्रोत्साहन देणे हे तुमच्या दोषदिग्दर्शनाचे उद्दिष्ट असायला हवे. विधायक टीकेचे फल हितवर्धक, गुणकारी असल्याने ती स्वागतार्ह वाटते. स्वतःजवळचे उत्कृष्ट इतरांना द्या. परिणामी ते आपले सर्वोत्तम तुम्हांपुढे ठेवतील.

卐

**OCTOBER 29**

## राष्ट्रीय कार्तिक ८

# ईर्ष्या कार्यसिद्धीची

तुमच्या हातून कोणकोणत्या कार्याची प्रत्यक्ष पूर्तता झालेली आहे हे पाहून तुमची जीवनांतली योग्यता, कुवत, किंमत ठरवली जात असते हे तुम्हाला पुन: पुन: आवर्जून भर देऊन सांगायला हवे आहे. आग्रहपूर्वक प्रतिपादन, सविस्तर स्पष्टीकरण, तीव्रनिषेधदर्शन, मन:पूर्वक क्षमायाचना, गंभीर तक्रारनोंदणी, यापैकी कशाकडेही, उद्योगरत रहाणारांचे जग ढुंकूनही पाहत नाही. वचने, आश्वासने, वायदे सर्व काही व्यर्थ असते. विधायक व प्रत्यक्ष असे किती कार्य जमेला पडले इतकेच काय ते मुद्याचे. उत्तमपणे पूर्ण झालेले कार्य स्वत:च केवढे बोलके असते! तेव्हा ईर्ष्या धरुन आधी, काय ते पूर्ण करुन, जगापुढे ठेवा व मग फार तर राहवतच नसेल तर त्याचा गाजा वाजा होऊ द्या. आश्वासने देण्यात, चुका मागण्यात, सबबी सांगण्यात, वयादा बनविण्यात गमावलेला वेळ निखालसपणे वायाच गेला म्हणावयाचा, स्वप्ने पाहण्यात, मनोराज्यात हरवण्यात, वेळ न दवडता प्रत्यक्ष कार्यसिद्धीची ईर्ष्या धरा, कार्य पूर्ण करुन दाखवा. आजपर्यंत होऊन गेलेल्या महान उद्योगपंडितांनी काबाडकष्टांची क्षिति वा निढळाच्या घामाची तमा न बाळगता कार्ये प्रत्यक्ष सिद्ध करण्यावर भर दिला. तेव्हा जो कार्यसिद्धीची ईर्ष्या धरील, जोमाने कार्यमग्न राहील, तोच बाजी मारील.

★

**OCTOBER 30**

## राष्ट्रीय कार्तिक ९

# अंती, भल्या मिळे भला

सच्चारित्र्यवान् भली व्यक्ति जिथे जिथे जाते तिथे तिथे ती सर्वांना भलेपणाची प्रेरणा देते. मनाचा चांगुलपणा सहजगत्या चेहेऱ्यावर प्रकटतो, चालचलणुकीत दिसून येतो. त्यामुळे इतराना तो आपोआप जाणवतो. अंगभूतच भलेपणा असणारा मनुष्य सभोवतालच्यांना कायम मार्गदर्शक व सतत स्फूर्तिदाता ठरतो. आपल्या मित्राना व सहकाऱ्याना तो, केवढा आत्मविश्वास, किती जोम व कसा उत्साह, आपल्या वैयक्तिक उदाहरणाने मिळवून देतो हे पाहिल्यावर मन सुखावते. शाब्दिक सल्ला व पोपटी उपदेश यांच्याहून, एक चारित्र्यमय सद्‌गुणी भले जीवन, इतरांची मने वळविण्यात, जास्त प्रभावी बोलके ठरते. त्यांच्या आदर्श उदाहरणांचा आपल्यावर प्रेरक प्रभाव पडावा व आपले कल्याण साधावे यासाठी भल्या निवडक मंडळीत सारखे वावरावे, मिसळावेच. पण त्यापेक्षा-सुद्धा, 'आपण स्वत:च भले चांगले बनू', हे उद्दिष्ट कायम, उठता बसता, डोळ्यांपुढे ठेवावे. इतरांना शिकविण्याची, दुसऱ्यांची मने आपलीशी करण्याची, व सर्वांना स्फूर्ति चढविण्याची एक अपूर्व विलक्षण अशी या बहुगुणी सहजसाध्य भलेपणात भरलेली असते भलेपणाला अंती भलेपणाचा प्रतिसाद मिळतोच.

\+ + +

## राष्ट्रीय कार्तिक १०

# क्षमाशील दिलदारी

तुमचा दृष्टीकोण सर्व बाबतीतच उदारमनस्क व विशाल असा असायला हवा. तुमच्याविरुद्ध मते असणाऱ्यांच्याशीही तुम्ही सलोख्याने, क्षमाशीलपणाने वागा. मुद्दा असा आहे की बरोबर काय व कुणाचे हे काही निःसंदिग्धपणे ठरवले जाऊ शकत नाही. तुमचे मत शंभर टक्के योग्य नसेल; तसेच दुसऱ्याचे म्हणणेही मोळा आणे सत्य नसेल. इतरांच्या मतावर, निर्णयावर कांहीही करुन मात करावयाचीच असे उद्दीष्ट न धरता दिलदारपणा दाखवीत स्वतःन्यायी व बरोबर बनावयाचे हे साध्य पुढे ठेवावे. निर्भेळ सत्य हे योग्य वेळी प्रतिष्ठीत होतेच. तुमचे हेतु जर नितिमय व सरळपणाचे असतील तर टिकाटिप्पणी, निंदा-नालस्ती, छळनिर्भत्सना, याना तुम्ही समर्थपणे आत्मविश्वासाने तोंड देऊनही ठायमूर उभे राहू शकाल. तुमच्या मनांत सत्याच्या शोधाची प्रबळ इच्छाज्योत जर शाश्वतपणे तेवत राहील तर मग तिथे विश्वासघाताचा, अधमपणाचा अंधार माजूच शकणार नाही. सत्प्रवृत्ति, सहिष्णुता, सद्धेतु व सोशिकपणा या चार रक्षकांच्या बळावर तुमचा मनोदय अपराजेय ठरेल. तुमची उद्दीष्टें जीवनात इतराना प्रतीत व्हावीत. क्षमाशील दिलदारीने सर्वांची मने जिंकता येतात.

☆

**NOVEMBER 1**

# दौर्बल्य घालवा

पापविचारांच्या विविध सूक्ष्म छटा असतात. आजार व साथीचे रोग यांच्यापासून स्वतःचा बचाव करण्याची जितकी दक्षता आपण बाळगतो, तत्परता दाखवतो, तितकी खबरदारी, अशा विचारांच्या कचाट्यांत आपण कदापि सापडणार नाही, यासाठी घेतली पाहिजे. इतरांसंबंधी तुमच्या मनांत जेव्हां दुःस्वास, नावड, मत्सर, तिरस्कार, गैरमर्जी यांच्यासारख्या अपविचारांचा प्रथम प्रादुर्भाव होऊ लागतो तेव्हाच त्यांचा तावडतोब समूळ उच्छेद करा. अशा वृत्तींची पार हकालपट्टी करा. असे दूषितपण मनात साचणे ही वस्तुतः मनाची दुर्बलता, उणीव, कमकुवतपणा होय. जर तुमचे व्यक्तिमत्व उत्तुंग होत जावयास हवे असेल तर असल्या दुर्विचारांचा छडा लावून त्यांचा बीमोड करण्यासाठी तुम्ही दक्ष, उत्सुक, तत्पर राहिले पाहिजे. त्या विचाराना चले जाव दिल्यावर प्रशंसा, कौतुक, पसंती, कृतज्ञता, औदार्य वगैरेना तातडीचे निमंत्रण पाठवा. मनांत पापवृत्तींचा उद्भव होऊ न देण्याचा उत्तम उपाय म्हणजे मन पुण्यवृत्तीनी ओतप्रोत भरुन ठेवणे, शरीर परोपकार कार्यात गुंतवून ठेवणे याने मनाचे दौर्बल्य कुठच्याकुठे पळून जाईल. जशा तुम्ही विचारांच्या वरच्या पातळया गाठू शकाल, तसे तुम्हाला जीवन उपयुक्त व जग सुंदर वाटत जाईल.

# झाडा मनोमालिन्य

तुमच्या मनाच्या शेतातील तण, झंडोरे वगैरे उपटून टाका. तुमच्या मनाच्या स्मृतिभांडारात उतोमत्तम सुवर्णसत्ये जमवून ठेवा. तुमच्या मनाच्या बागेतला पाचोळा वगैरे झाडून तिची नीट निगा राखा. तुमच्या मनाच्या दूरवाणी केंद्रातून उत्कृष्ट विचार ध्वनिक्षेपित करा. तुमचे मनोगृह आतील मालिन्य, कचरा झाडून झटकून टाकून टापटिपीचे व शोभिवंत ठेवा. हे सर्व ठीकपणे करण्यात तुमचा संपूर्ण वेळ तुम्हाला गुंतवावा लागेल. तुम्हाला जीवनात जेवढे काही म्हणून साधावयाचे असेल त्या सगळ्याची संपूर्ण आखणी तुमच्या मनात प्रथम योजून ठेवा. नव्या कल्पना, वेगळी ध्येये-उद्दिष्टे, अभिनव योजना, भिन्न साध्ये-आकांक्षा सारी तुमच्या मनोभूमीत अंकुरतात, पोसतात. सतत जातीने खपून तुम्ही आपल्या मनाच्या यंत्रशाळेची; ती सतत कार्यसिद्ध अवस्थेत मिळावी म्हणून, देखभाल करा. सौख्य, संतोष, संवाद, स्वास्थ्य, समाधान, ही मालिन्यहीन मनोगृहांतील निवासी मंडळी असतात. परमेश्वराने घालून दिलेले सारे, वागणुकीचे, आचरणाचे, वर्तणुकीचे नियम, प्रेम, सत्य, न्यायवृत्ति यावर अधिष्ठित असतात. तुमच्या मनावर, बुद्धिवर, हृदयावर या परमेश्वरप्रणीत नियमांची अधिसत्ता कायम टिकून राहू द्या. दुर्विचारांची कोळिष्टके, विकारांची जळमटे, अशासारखे मालिन्य तुमच्या मनोगृहात जमूच देऊ नका. कारण मानसमंदीरात मालिन्य मिळणे महानिषिद्ध माना.

– • –

**NOVEMBER 3**

## राष्ट्रीय कार्तिक १३

# ग्रहणशील मन

तुमच्या मनाची ठेवण ग्रहणशील असेल तर तुम्हालाही दत्तगुरुं-प्रमाणे नानाविध छोट्यामोठ्याना आपले गुरु करता येईल. तुम्ही कुठेही का असानात, तिथेसुद्धा तुम्हाला कोणानाकोणाकडून शहाणपणाचा लाभ होऊ शकेल. ज्या ज्ञानाची तुम्ही कळकळीने आस धरलेली असते, त्या ज्ञानाचे, ते उपलब्ध होताक्षणीच तुम्ही सुलभपणे ग्रहण-आकलन करु शकता. जर तुम्ही निवडक उत्तमोत्तम ग्रथांचे परिशीलन चालू ठेवलेत तर किती एक थोर तत्ववेत्यांच्या निवडक विचाराना आपल्या मानसगृहात पाहुणे म्हणून तुम्ही बोलवू शकाल, त्याचे आतिथ्य करु शकाल. तुमच्या मनातली कांक्षा व भोवतालच्या जगाविषयींची तुमची मानसिक धारणा यांच्या द्वारे तुम्ही कोणत्या प्रकारची व कोणत्या दर्जाची विचारधारा स्वतःला रुचेल ते ठरवायचे असते. जगातले विद्वज्जन, तसेच थोर महात्मे आपापले विचार तुमच्या सेवेला सादर करण्यासाठी जसे काही हात जोडून तुमच्यापुढे सदैव ठाकलेले असतात. त्यानी सढळ हाताने वाढलेल्या विचार–पक्वान्नांवर तुम्ही यथेच्छ ताव मारु शकता. तुमच्या आत्म्याचे व मनाचे सुयोग्य पोषण व्हावे म्हणून किती विविध प्रकारची सामुग्री बनवून ठेवलेली आहे. हे पाहता मन कौतुकाने भरुन येते. आपल्या आवडीप्रमाणे प्रत्येकाने त्यातली घ्यायची आहे. मात्र त्यासाठी मन ग्रहणशील हवेच.

**NOVEMBER 4**

## राष्ट्रीय कार्तिक १४

### (आश्विन व. १३, धनत्रयोदशी)

# लवचिक मनोधारणा

तुमचे मन मिळाऊ व लवचिक बनवा. आजच्या धनत्रयोदशीच्या निमित्ताने, आपल्याच मनाप्रमाणे सारे घडावे, असा हट्टी हेकेखोरपणा वर्ज्य करण्याचा दृढ निश्चय करा. इतरांनी त्यांचे वर्तन जीवनक्रम, विचारप्रणाली ही सारी तुमच्या आवडीनिवडी-कल्पनांप्रमाणे बदलावी असे मानण्याचा आडमुठा हट्ट तुम्ही सोडून द्या. तुम्हाला अज्ञात अशा पण इतरांना, इष्ट वाटणाऱ्या काही तत्त्व-धोरणांनुसार, त्यांची तऱ्हा त्यांना लाभप्रद ठरत असेलही सारे जण समजा, एकाच प्रकारे विचारू वागू लागले, तर सारे जीवनच किती नीरस, कंटाळवाणे, रुक्ष वाटू लागेल याची जरा कल्पना तर करून पहा. जग प्रगतिशील, बहुढंगी, विविधरंगी होण्यासाठी, प्रत्येकाचा विचार, आचार व उच्चार, त्याचप्रमाणे, उद्दिष्टे, ध्येये, हेतु यांच्यात विविधता, भिन्नता, वेगळेपणा असणे, अत एव अगत्याचे, आवश्यक, अटळ आहे. आपले आचरण, कृति सुयोग्य राखण्याची प्रबळ इच्छा दृढपणे बाळगा, पण इतरांवर अधिपत्य गाजविण्याची लालसा मनातून निपटून टाका. एककल्ली, एकांड्या स्वभावात समधातपणा आणण्यासाठी मनमिळाऊपणाची अतिशय आवश्यकता असते. स्वतःसाठी प्रचंड, प्रभावी, प्रबळ इच्छाशक्ति अवश्य जोपासावी पण तिचा गैर, वाह्यात्, हटवादी वापर कधीही न करावा. उदारबुद्धि, परमतसहिष्णु, क्षमाशील असे बना. याच गुणजलसिंचनाने तुमच्यातले देवत्वबीज रुजेल, अंकुरेल, फोफावेल हे निश्चित.

**NOVEMBER 5**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९९
२३९९९
निबंधर०१११५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## राष्ट्रीय कार्तिक १५
## (आश्विन व. १४, नरक चतुर्दशी)

# धावती भेट नको

दुमदुमणाऱ्या दिवाळीचा, आनंद–उत्साह हा खरा आत्मा आहे. शिवाय सर्वत्र सफाई, स्वच्छता, सडासंमार्जन यानी पुनीत झालेले शुद्ध वातावरण. वस्तुत: हे सर्व, वर्षांतून एकदा, या चार दिवसापुरतेच का असावे? दीपावलीची भेट अशी धावती कशाला? तिला कायम मुक्कामाला ठेवून घेतली तर! हृदयात उचंबळणाऱ्या प्रेमानंदाचे बारमाही सातत्यपूर्ण प्रकटन का होत राहू नये? ही प्रेमविभोरता, हा शुद्ध सत्त्वभाव, जर संपूर्ण वर्षभरच आपल्या मन:प्रवृत्तींतूनच अविर्भूत होत राहिला तर मानवजातीचा आमूलाग्र कायापालट घडेल. आपुलकी, प्रेम, जिव्हाळा ही जगातील सर्वांत प्रभावी शक्ति आहे. ज्या प्रमाणात ही ममता उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाऊ शकेल त्याप्रमाणात जग बरे, चांगले, उत्कृष्ट असे होत जाईल. इतर सारेजण अशा मित्रभावाने केव्हा वागू लागतील अशी वाट बघत न थांबता, या नरकचतुर्दशीच्या मुहूर्तावर, तुम्ही स्वत:च आपल्या आचरणाने प्रयत्नपूर्वक तसे वागण्याचा धडा घालून देण्यास प्रारंभ करा, आकाशातील नक्षत्रतारे, ते काय करतात यामुळे नव्हे तर, ते कसे दिसतात यावरुन आपल्याला सुंदर वाटतात. तुम्हीही आपल्या वृत्तीतून, आचरणातून, कृतींतून दीपावलीचा हा प्रेमळपणा, इतरांना चोवीस तास जाणवू द्या. पहा तुमच्या जीवनाचा इतरांवर किती उपकारक प्रभाव पडतो तो.

**NOVEMBER 6**

## राष्ट्रीय कार्तिक १६

## (आश्विन व. ३०, लक्ष्मीपूजन)

# मनाची ठेवण

सुख ही तुम्हांला एक जडवून घेता येण्याजोगी लाभदायक सवयच आहे. आनंदी, उत्साही व सुखवादी अशा प्रकारची मनाची ठेवण तुमच्या शारीरिक आरोग्यालाही अगदी आवश्यक आहे. एकटा एकसुद्धा सद्विचार तुमचे मन सुदृढ करण्यास समर्थ ठरतो. सुखी, आनंदी स्वभावाच्या माणसांजवळ मानसिक तोल, आत्मविश्वास, मनःशांति व समाधान ही सर्व स्वाभाविकपणेच आढळून येतात. दुसऱ्यांना दया दाखविण्याचा धर्म व इतरांच्या गुणांचा गौरव करण्याची वृत्ति तुमच्याच सुखात भर टाकतात. औदार्य व सदिच्छा यांच्या अंगी तुमचे मनोबल वर्धित करण्याचे अमोघ सामर्थ्य आहे. सुखी असणे हा तुमचा नैसर्गिक धर्मच व्हावा इतकेच नव्हे तर तुम्ही ते तुमचे आद्य कर्तव्यच मानावे, दुसऱ्याला सुखी करण्याची एक गूढ ईश्वरदत्त उपजत शक्ति तुमच्या ठायी वसत आहे, तिचा तुम्ही यथायोग्य उपयोग, वापर, प्रयोग करावा असा मूळचाच ईश्वरी संकेत आहे, सुख हे मनाच्या योग्य ठेवणीवर जेवढे अवलंबून आहे, तितके ते मोठमोठ्या द्रव्यराशींवर, विविध भोगसाधनांवर अवलंबून असत नाही. दयाळूपणा व गुणगौरवप्रवृत्ति तुमच्या व तुमच्या सभोवतालच्या लोकांच्या आयुष्यांत जितके सुख निर्मू शकतील तितके ते इतर कोणालाच जमणार नाही, आणखी कशानेही साधणार नाही. येईल त्यात सुख मानण्याचा निर्धार, हीच आज तुमची मानसिक लक्ष्मीपूजा होय.

—•—

**NOVEMBER 7**

# राष्ट्रीय कार्तिक १७

## (कार्तिक शु १, बलिप्रतिपदा)

# घोर प्रतिज्ञा

मी माझा सर्व काळ, सारे कर्तृत्व आणि संपूर्ण कार्यशक्ति, आजच्या बलिप्रतिपदेच्या महान दिवसापासून, केवळ सत्कार्यार्थच वेचीन अशी आज घोर प्रतिज्ञा करतो. तसेच मला जडू पाहात असलेल्या दुष्ट सवयी मी तिथल्या तिथेच नष्ट करीन. माझे पथक परिश्रम, सत्यप्रियता व परिपूर्णता उत्तरोत्तर अंगी बाणविण्याच्या हेतूनेच, पूर्णपणे खर्ची घालीन. मी माझी विचारधारा, सार्थक प्रत्ययकारी, प्रयत्नांच्या उच्च पातळीवर सातत्याने टिकविन. अधिक जबाबदारीची कार्ये अंगिकारण्यासाठी माझी योग्यता वाढविण्याचे साधन म्हणून, मला लाभणाऱ्या प्रत्येक सुसंधीचा मी उपयोग करीन. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीच्या मार्गदर्शनानुसारच मी माझे विचार व आचार ठेवीन. दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यासाठी मी कळकळीने झटत राहीन. आशावाद, आत्मसन्मान, आत्मविश्वास व आत्मावलंबन यांची जाणीवपूर्वक जोपासना करुन त्यांना मी माझ्या मनोभूमीत दृढमुल करीन. माझ्या प्रत्येक कृत्याला देवाचा आशीर्वाद नि मान्यता लाभेल याची निजताना मला खरोखर खात्री वाटेल अशाच तऱ्हेने मी माझी दिनचर्या राखीन. असा निर्धार करावयाला दीपावली पाडव्याहून जास्त समयोचित दिन आणखी कोणता असेल ?

**NOVEMBER 8**

# राष्ट्रीय कार्तिक १८

## (कार्तिक शु. २, यमद्वितीया, भाऊबीज)

# मनोराज्य

जेव्हा आयुष्यात, काही मनाविरुद्ध घडते, नकोसे वाटणारे प्रसंग वाटणीला येतात, भोवतालचे वातावरण मनाला विषण्ण करते, तेव्हा या साऱ्यावर मात करु शकणारा एक रामबाण उपाय असतो आणि तोही तुमच्यापाशीच. निराशा, मालिन्य, चिंता, दुरिच्छा, काळजी, भीति, अपयश, संशय या सर्व उपाधींचे मूळ मुळात मानसिकच असते. तुमच्या मनाच्या गल्लीबोळात अकाली चोरटेपणाने वावरणारे विकारशत्रू नेस्तनाबूत करुन मनोराज्याचा दक्षतापूर्वक बंदोबस्त राखणे तुमच्याच हाती आहे. मात्र मनाचा निर्धार तेवढा व्हायला हवा. एकदा आपल्या मनोबलाचा ताळेबंद पहा. मनात कोणत्याही किंतूंचा, कसल्याही सबबीवर शिरकाव होत नाही याबद्दल सतर्क व खबरदार रहा. तुमची सर्व सामर्थ्ये सतत कृतिप्रवण रहावीत यासाठी स्वतःपुढे काही उच्च ध्येय उद्दिष्ट ठेवा. सच्चारित्र्य व सुसंस्कार हातात हात घालूनच वावरतात. थोरपणाचा अंगी उगाच आव आणता येत नसतो. त्याचप्रमाणे औदार्याचा मूलस्त्रोतही मनातच फुटावा लागतो. तुमचा विचार नि आकांक्षा तुमचीच मनोसंतति. तेव्हा त्या विचारबंधूला आपल्या आकांक्षाभगिनीला इष्टपूर्ततेची ओवाळणी घालू द्या. अशी भाऊबीज साजरी होण्याने तुमच्या शीलस्वभावचारित्र्यात मोलाची भर पडणार आहे. तेव्हा या विचार - आकांक्षांना मोकळेपणाने, निर्विघ्नपणे वावरता येण्यासाठी, राज्यातील विविध कार्ये सुरळीत चालण्यासाठी, मनोराज्यात पहाऱ्याची व्यवस्था चोख ठेवा,

\+ + +

## NOVEMBER 9

## राष्ट्रीय कार्तिक १९

# सदामहान् आज

प्रत्येक नव्या दिवसाचा शुभारंभ नेहमी भव्य व उदात्त असाच असतो. आदल्या रात्री शंकाखोर, अविश्वास, घोर निराशा व जबरदस्त भीति यांचे तापदायक वर्चस्व माजलेले असेलही पण प्रत्येक नवी सुप्रभात येताना प्रेरणादायक प्रकाश घेऊन येतेच आणि बरोबर नवपल्लवित आशांचे आश्वासन आणून मन उल्लसित करते, आत्म्याला चेतविते. सुप्रभाती उठल्याबरोबर घराबाहेर मोकळ्यावर जाऊन आकाशमध्यस्थ नक्षत्रग्रहांपर्यंत दृष्टि वर चढवा. या साध्या क्रियेनेही तुमचे मन भराऱ्या मारण्यास उद्युक्त होईल. एका नव्या आत्मविश्वासाने व अपूर्व जोमाने तुम्ही आपले दैनिक कार्यक्रम आरंभाल. एकदा चांगला विचार तुम्ही प्रत्यक्ष आचरणात आणलात, एकच का होईना पण नवे उद्दिष्ट साध्य केलेत, भूतदयेचे काही कृत्य पार पाडलेत, वा कोणाच्या चांगल्या प्रकारे उपयोगी पडलात, तर तो दिवस तुम्ही सार्थकी लावलात असे मानता येईल. असेल नसेल तेवढी सारी कुवत खर्ची घालून, मनसोक्तपणे, निर्हेतुक सच्ची सेवा किती करायची, कोणाची करावयाची, केव्हा करावयाची, कुठे म्हणून करावयाची, यापैकी कशालाही प्रमाणाची आडकाठी नाही. कालाचे बंधन नाही. का अंतराची मर्यादा नाही. काही उत्कृष्ट कार्य, वा थोर मनाने एखादे जनहिताचे कृत्य हाती घ्यायला आजचाही दिवस काय कमी शुभ आहे ? 'शुभस्य शीघ्रम तर !

★

**NOVEMBER 10**

राष्ट्रीय कार्तिक २०

# वारशाचे सार्थक

तुमच्या ठायी असणाऱ्या सर्व कमतरता, डोकावणारे सर्व कमकुवतपणे, त्यांची निर्भत्सना करुन, त्यांना प्रयत्नपूर्वक हाकलून द्या. जीवनातल्या एखाद्या क्षेत्रात तरी सर्वोच्चता प्राप्त करण्यासाठी सतत उद्योगरता रहा. दररोज एक थोर सुविचार आत्मसात् करा; कारण त्यायोगे तुमची योग्यता लौकर वाढत जाईल. आपल्यातील दोषांचा त्याग करण्यास सदैव सिद्ध रहा. आपल्या भावना कळकळीच्या व कृति धैर्यपूर्ण अशा राखा, टिकवा. सेवाभाव जागृत होऊन तो हृदयात केवळ उचंबळत राहण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीत उतरणे अधिकच मोलाचे आहे. जीवनाच्या दैनंदिन व्यवहारांतूनच तुमचा खरा, वास्तविक, नैसर्गिक स्वभाव दृग्गोचर होत असतो. कोणच्याही क्षणाला वा निकडीच्या प्रसंगी सर्वव्यापी सत्तत्वाचे सामर्थ्य–सहाय्य तुम्हाला अगदी सहज प्राप्य असते. ते नित्य मिळवून वापरुन आपलेसे करुन टाका; कारण तोच तर तुम्हाला मिळालेला जन्मजात वारसा आहे. तुम्ही त्या परम शक्तिमान परमेश्वराची मनापासून आराधना केलीत तर तो तुम्हाला कधीच निराधार राहू देणार नाही. तुम्ही स्वतःच त्या चित्शक्तीचे अंश आहात ही जाणीव उराशी नित्य बाळगून तदनुरुप आपली वर्तणुक राखा, वागणूक ठेवा; आणि मिळाल्या वारशाचे सार्थक करा.

NOVEMBER 11

# राष्ट्रीय कार्तिक २१

# प्रगतीच्या दिशेने

नेहमी कुबड वा पोक न काढता, मान ताठ, नजर समोर धरुन, खांदे मागे ओढून, छाती पुढे काढून, डौलदारपणे रुबाबात, वावरा. हसऱ्या चलाख चेहेऱ्यावर चैतन्य ओसंडू द्या. आनंदी, सेवाभावी, आशावादी प्रवृत्तींनी मन ओतप्रोत ठेवा. अशाने तुमच्या चेहेऱ्यावर, आवाजात, भाषेत, हालचालीत सारे आकर्षक गुण आपोआप प्रतिबिंबित होतील. हसतमुख, खेळकर, उल्हासी मंडळीत जाणे, येणे, उठणे, बसणे, मिसळणे चालू राहू द्या. सभोवताली प्रसन्न वस्तु व वातावरण मनोहर राखा. प्रत्येक दिवशी प्रगतीच्या, विकासाच्या दिशेने काही तरी, स्पष्ट, निश्चित, वाटचाल अवश्य होऊ द्या. जेवढे जेवढे सुखमय व सुंदर, त्या त्या साऱ्याचे तुमच्या मानसगृहात स्वागत करा. जे जे कुरुप, वेडेविद्रे, अनिष्ट आहे, त्या त्या साऱ्याला दाराशी फिरकू देखील देऊ नका. विवक्षित उच्च पातळीवरुन जगाशी व्यवहार करा; आणि लोकानाही तुमच्या पातळीवर चढण्यास भाग पाडा. उच्च राहणीमान, विशेष जीवनपद्धति, निवडल्यावर तसे जाणीवपूर्वक व कडकपणे निश्चयाने वागा. सत्ता, संपत्ति, सुखोपभोग मिळविण्यासाठी तत्त्वनिष्ठेवर कदापि अर्घ्य सोडू नका, तिला केव्हाच तिलांजली देऊ नका, तिची कधीही आहुति सोडू नका. तरच प्रगतीच्या दिशेने जात रहाल.

**NOVEMBER 12**

# राष्ट्रीय कार्तिक २२

# ईश्वरनिष्ठा

उद्या कसा पार पडणार, याबद्दल चिंता करण्यात क्षणमात्र वेळ दवडू नका. तो जगच्चालक परम-ईश्वर, तुमच्या कल्याणार्थ आवश्यक तेवढे, म्हणजे सारेच व पुरेसे पुरविण्यासाठी तर तिष्ठत उभा आहे. तुमच्या जागत्या जाणीवेशी, तो कानगोष्टी करतो. आणि या प्रत्यक्ष संपर्कद्वारा तो तुम्हाला, आध्यात्मिक विचारांचे एक न संपणारे भांडार बहाल करुन टाकतो असे विचार व तदनुषंगिक कल्पना तुम्ही स्वतःच्या दैनंदीन जीवनात कृतीत उतरवू शकलात की कल्याणकारी, नेक व शाश्वत अशा साऱ्यांच्या, त्या निर्मात्या ईश्वराशी तुमचा हितकारी सख्यसंबंध जुळलेला असल्याची खात्रीपूर्ण जाणीव तुमच्या हृदयांत जन्माला येईल. ईश्वरी इच्छेपुढे मान तुकवण्यांत, ईश्वरावर दृढ निष्ठा ठेवण्यात आणि ईश्वरी सत्ता प्रमाण मानण्यात तुम्हाला एकदा का आनंद अनुभवास आला की स्वर्गीय अमृताचा स्वाद इथे धरेवरच तुम्हाला चाखावयास मिळू लागेल. केव्हाही त्या परम कृपाळू ईश्वराची आळवणी करा, तो भक्तवत्सल, तुमच्या हाकेला त्वरेने ओ दिल्याशिवाय राहणार नाही. खऱ्याखुऱ्या कळकळीने, दृढ निष्ठेने, तुम्ही त्याच्याकडे मार्गदर्शनाची, दयेची भीक मागा; व पहा त्या भक्तसख्या कनवाळूचा आशीर्वादात्मक हात तुमच्या पाठीवरुन फिरत असल्याचा अपूर्व साक्षात्कार तुम्हाला होऊ लागतो की नाही, ते.

☆

NOVEMBER 13

# राष्ट्रीय कार्तिक २३

# औचित्य बालदिनाचे

**चा**चा नेहरूंना हंसरे मूल व गुलाबी फूल प्रिय असे. त्यांच्या आजच्या वाढदिवशी आपण त्यांच्या तजेलदारपणाचे इंगित समजून घेतले पाहिजे. त्यानी आपल्या वृत्तीत बालसुलभ निरागसपणाचा पडू न दिलेला तुटवडा हेच त्याचे खरे रहस्य होय. ज्या बालांचे या निर्व्याज्यतेबद्दल आपण ऋणी आहोत त्यांच्या बाबतही कांही बाबी आपण ध्यानात धरायला हव्यात. अर्भकाच्या, इतरांशी वागणुकीत पक्षपात नसतो. तसेच त्याचे स्मित हास्य जरी कौतुकास्पद वाटले तरी त्याने जर अट्टहास्य केले तर ते भितिदायकच लागेल. शिशु हे कोणाशीही नव्याने ओळख करुन घेण्याचे, एक हुकमी साधन ठरते. बालकाच्या, विचार, उच्चार, आचार, या तिन्हीत पूर्ण मेळ असतो. या मातीच्या गोळ्याला आकार देण्याची जबाबदारी मुख्यत: कसबी आईची आहे. मात्र, मातेचे हृदय वात्सल्याने कितीही ओसंडत असले तरी तिने फाजिल लाड करुन हे मडके नीट भाजण्यात कसूर करता कामा नये. बालक निष्पाप आहे म्हणजे ते अडाणी आहेच अशी गैरसमजूत सोइस्करपणे करुन घेऊन आईबापानी त्याच्या देखत वागू नये. बालक व्यक्तिनिष्ट असल्याने ते मोठ्यांवर सरसकटपणे लुब्ध नसते. तर ' चाचांच्या ' स्मृतींबरोबर या भतीज्यांबद्दलच्याही वरील बाबी आजच्या ' बालदिनी ' मनात वागविण्यात औचित्य आहे हे वेगळे सांगणे नलगे.

**NOVEMBER 14**

# ऊर्मि वाटचालीची

नैराश्य, सुस्ती, कमकुवतपणा, यांना चुकुनही मनात थारा देऊ नका. स्वतःला खडबडून चेतवा, ताडकन ताठ उभे व्हा, चार दीर्घ श्वास घ्या. आणि योजल्या उद्योगाला तावडतोब निर्धारपूर्वक हात घाला. अनिश्चितता व धरसोड यांच्यामुळे बऱ्याचशा वैयक्तिक शक्तींची व्यर्थ उधळामाधळ होत असते. एकदा उद्दिष्ट नक्की ठरले की मग तातडीने थेट वाटचाल सुरु करणे मुळीच अवघड पडत नाही. विचारपूर्वक निवड करुन काही विधायक असे बेत, निश्चित अशा योजना आधी ठरवा. आखा मग लगेच, यश मिळणारच या आत्मविश्वासाने त्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ करा. साधकबाधक विचारांती महत्वाकांक्षापूर्ण योजना बेतल्या नंतर पाठोपाठ तत्परतेने त्यांच्या शिवणकामाला सुरुवात होऊ द्या. सकाळी उठल्याउठल्या काही विशेष कार्य करण्याचे नक्की करा. आणि रात्री निजण्यापूर्वी ते पार पाडल्याचा आनंद उपभोगता येईल अशी काही तजवीज दिवसभरात घडवा. बेत करण्यासाठी, योजना आखण्यासाठी, उद्दिष्ट निवडण्यासाठी, भरपूर वेळ वापरा पण ठाम निर्धार झाला निवड ठरली, बेत जमला, की मात्र किंचितही वेळ मग वाया न दवडता, वेगाने इष्ट दिशेने वाटचाल करण्याची ऊर्मी हृदयी दाटू द्या, आणि ती कार्यान्वितही होऊ द्या.

# राष्ट्रीय कार्तिक २५

# शरण भगवंतासी

मनगटातला जोर, पुरुषार्थ, कर्तृत्व वगैरेचे तुम्ही कितीही पोवाडे गायलेत तरी अंती हेच प्रत्ययाला येते की त्या अनंत अनादि भगवंताला शरण गेल्याखेरीज गत्यंतर नाही. सत्यधर्माची कास पकडल्याविना मनःशांति व सौख्यसमाधान लाभतच नाहीत. परमेश्वराची इच्छा वा विधिलिखित यांचे इष्टत्व वा अस्तित्व माहीत असूनही त्यांना धाब्यावर बसविण्याचे प्रयत्न अनेकजण करु जातात. सुरवाती सुरवातीला तर ते आपल्या कुटिलतेचाही प्रयोग करण्याचा अट्टाहास करतात. पण छी थू होऊन फजीती त्यांच्या वाटचाला आल्यावर त्यांचे डोळे उघडतात. मग सहाजिकच त्यांना भगवंताला शरण जाण्याचे उशीरा का होईना सुचते, पटते, कळते नि वळतेही समाधान आणि मुक्ति प्राप्त करण्याचा त्यावाचून अन्य मार्ग असूच शकत नाही. शरण जाण्यात कमकुवतपणा नसून तसे करणे अवकल-हुशारी व चाणाक्षपणा ह्यांचेच द्योतक ठरते. परमेश्वरी नीतीनियमांना धाब्यावर बसवून नव्हे तर त्यांना शिरी धारण करुनच खरे सामर्थ्य पुरेसे स्वातंत्र्य ही प्राप्त होतात, परमेश्वरी संकेताना शिरोधार्य मानून जगदिशाला भगवंताला एकनिष्ठेने शरण जा

# राष्ट्रीय कार्तिक २६

# श्रवणभक्ति

कान उघडे ठेवा आणि सर्व काही नीट लक्षपूर्वक ऐकत चला. अर्थात् तोंड बंद ठेवण्याचे पथ्यही जोडीने पाळाच. इतर विचारवंतांचे निवडक विचार जर तुम्हास आत्मसात् करावयाचे असतील तर आपली बुद्धि तुम्ही स्थिर व मन ग्रहणक्षम राखले पाहिजे. तुम्ही स्वतःच जीभ सैल सोडलेली असताना, किंवा काही ना काही धडपड, खटपट, वळवळ चालू ठेवलेली असताना इतरांचे उत्तम विचार तुमच्या मनात रुजणे वा नवे स्वतःचे प्रादुर्भूत होऊन विकसित होणे अशक्यप्राय असते. जेव्हा तुम्ही एकाग्रतेने श्रवण चालविता, आणि त्याला चिंतनाची जोड देता तेव्हाच तुम्हाला दुसऱ्यापासून काही शिकून घेणे साधेल. आपोआपच पाठोपाठ तुमचे विचारही परिपक्व होऊ लागतील. वटवट करण्यासाठी कित्येकजण वळवळत असतात. पण ऐकून घेण्याची तयारी मात्र एखाद्याचीच असते. चांगली श्रवणभक्ती साधायला तोंड अगदी शिवूनच ठेवायला पाहिजे असे नाही; पण प्रसंग परिस्थिति ओळखूनच मन लावून मुकाट्याने साऱ्याचे निरीक्षण करता येणे फार अगत्याचे आहे. जीभ बेलगाम सुटल्याने कित्येक घोडचुका होऊ शकतात. पण अबोलपणाने मितभाषित्व साधल्यास त्या टळतात. वाग्बाण सुटलाच नाही तर जखम होईलच का? श्रवणभक्ति श्रेष्ठ आहे अशी मनाशी खूणगाठ बांधून ठेवा.

卐

**NOVEMBER 17**

## राष्ट्रीय कार्तिक २७
## (कार्तिक शु ११, कार्तिकी एकादशी)

# उपवासाचे व्रत

रोजचा आहार वर्ज्य करुन काही विवक्षित मोजके पदार्थच फराळाला घ्यायचे असतात. आज कार्तिकी एकादशी. आजपासून एक नवा कायमचा उपवास करायचे तुम्ही ठरवा. सबबी सांगणे, फसवे समर्थन करणे, खोटी आश्वासने देणे या वस्तू या उपवासाला निषिद्ध असतात. काबाडकष्ट करणे, हाच पदार्थ फक्त याला चालतो. या उपवासाचे व्रत घ्या. हा वसा घेतल्याने कुशलता अंगी बाणून कार्यसिद्धीचे फल पदरी पडेल. तुम्ही काय बोलता, कसली आश्वासने देता, यावरुन तुमच्या यशाचे मूल्यमापन होत नाही. ते होते, तुम्ही किती प्रयत्नशील असता, तुम्ही काय साध्य करता यावरुन. बुद्धिमान चिकित्सक मंडळी आपल्या सराईत भेदक नजरेने तुमचे अंतरंग न्याहाळू शकतात आणि बिनचूकपणे तुमचे यश काय प्रकारचे व कोणत्या दर्जाचे आहे याबाबत यथायोग्य मूल्यमापन करतात. तुमच्या मन:शक्तीतले रचनात्मक, योजनाकारी, आकांक्षापूर्ण सामर्थ्य, तुमच्या ते वापरण्याच्या कौशल्याच्या व उद्योगशीलतेच्या जोरावर तुम्हाला लोकाग्रणींच्या पंक्तीला बसवू शकेल. आयुष्य शक्यता व संधि यानी भरगच्च भरलेले असते. महत्त्वाकांक्षी व मेहनती माणसांचीच काय ती वाण असते. काबाडकष्टांना न कचरणारी मंडळीच जगांत यशस्वी झाली आहेत. त्यांचा कित्ता गिरविलात तर तुम्हालाही त्यांच्या तोडीचे मानाचे स्थान लाभू शकेल.

★

**NOVEMBER 18**

# राष्ट्रीय कार्तिक २८

# प्रियदर्शिनी दिन

पंडितजींनी आपल्या लाडक्या प्रियदर्शिनीला दिलेल्या बहुमोलाच्या विविध सल्ल्यांपैकी हाही एक असणारच; 'आपले रोजचे सर्वसामान्य संभाषणसुद्धा, नेणताच आपले अंतरंग उघडे पाडीत असते हे तू सर्वदा ध्यानी ठेव. व्यक्ति संभाषणातून नकळतच स्वतःची लायकी, गुण, दोष आणि स्वभावविशेष प्रकट करीत राहते. संभाषणाच्या ओघात मन किती मोकळे झालेले चालेल याचे माणसाला भान उरत नाही आणि मग मनाच्या अगदी आतले कप्पेसुद्धा इतरांना दृग्गोचर होऊ लागतात, अंतरंग भोवतालच्यांच्या होऱ्यांत येऊ शकते. म्हणून संभाषणाचेही उच्चारणांपूर्वी संस्करण होणे आवश्यक आहे याचे सदैव भान ठेव. स्वतःचा आवाज आवेशमय नादपूर्ण व ओजस्वी बनविण्याचा प्रयत्न कर. आपले दैनंदिन संभाषण हे स्वतःवर सुसंस्कार घडविण्याचे आणि वैयक्तिक प्रगति साधण्याचे अप्रत्यक्ष साधन असते. वक्तृत्वशैली सुधारण्याची सदैव खटपट हवी. प्रत्येक पुढील वक्तव्याच्या वेळी स्वतःला अधिक बरे वळण लावण्याची संधि न चुकता साध. भाषणातला शब्दनशब्द चोखंदळपणे निवडून वापरण्यावर भर दे. अशा प्रकारे भाषणाच्या धाटणीचा विश्लेषणपूर्वक अभ्यास कर.' पिताजींनी दिलेले हे धडे वर्षभर गिरवले जातात. भारतवासियांची लाडकी प्रियदर्शिनी, प्रतिवर्षी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन 'जय हिंद' च्या घोषणा, खड्या आवाजात देऊन सारा भारत दुमदुमवून सोडते. त्यांचा निनाद आजच्या तिच्या वाढदिवशीआपल्या कानात गूंजत राहतो.

—०—

**NOVEMBER 19**

## राष्ट्रीय कार्तिक २९

# गाजावाजा नको

गाजावाजा केल्याशिवाय पडद्याआडून झालेली लोकसेवा, ती सेवालाभ मिळाल्यांकडून कृतज्ञतेची वा पुरस्काराची, भावना किंवा अपेक्षा न बाळगता घडलेली असेल, तरच आदर्श समाजसेवा ठरणार. खास एखादा विशेष प्रसंग, घटना, सण, दिवस येण्याची वाट बघू नका. तर रोजच्या रोज संधि सापडताच यथाशक्ति लोकहिताची कार्ये करीत चला. कोणाला प्रोत्साहन द्या, दुसऱ्याला सहानुभूति दाखवा. कुठे दूरगावी बदली झालेल्या आपल्या एखाद्या मित्राला पत्र टाका. एखाद्या उत्तम पुस्तकाच्या प्रति, उपयोग करतील अशा सत्पात्र मंडळींना, भेट म्हणून वाटा. स्वतःपेक्षा सुदैवात कमी ठरलेल्या अशांना मदतीचा हात द्या. व्याधीने ग्रस्त होऊन रुग्णालयात दीर्घकाळ खितपत पडलेल्या एखाद्या वैतागलेल्या रोग्याला फुले वा फळे पाठवा. पोटासाठी दिवसभर काबाडकष्ट करुन थकलेल्या-भागलेल्यांच्या पायां-पाठींवर आईच्या ममतेने हात फिरवा. समाज-सेवेची इच्छा मनात जर खरोखरीच रुजली असेल तर ती करण्याच्या हजारो तऱ्हा सहज सुचतील तुम्हाला. समाजसेवेचे ‘कंकण करि बांधल्याने,’ जीवन मार्ग जास्त चैतन्य-उत्साहाने, अधिक आनंद-प्रकाशाने उजळून निघून झगमगू लागेल. हृदयात अशा प्रकारे निष्काम सेवा कार्याची जिगीषा जागृत होणे म्हणजेच परमेश्वरी साक्षात्कार होणे होय, किंवा भक्ताला भगवंताची उराउरी भेट घडणे होय. घ्या तर सेवाव्रत टिमकी न बडविता.

– ० –

## NOVEMBER 20

# राष्ट्रीय कार्तिक ३०

# खात्री अस्तित्वाची

परमेश्वराचे सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सर्वसमर्थ अस्तित्व तुमच्यासभोवती केव्हाही विद्यमान आहे आणि म्हणूनच त्याची सोबत, त्याचे सहाय्य, त्याचा पाठपुरावा, तुम्हाला सदा उपलब्ध आहे हा विचार मोठाच उत्तेजनदायक असतो. त्यासाठी या कल्पनेवर तुमचे मन केंद्रीभूत करा, लक्ष एकवटा, चित्तपण एकाग्र करा म्हणजे हृदयांत हा मूलगामी विचार सर्वंकषपणे पटून, रुजून, बिंबून पक्का होईल. यामुळे तुम्हाला नवा जोम, वाढता आत्मविश्वास आणि उसळतें सामर्थ्य यांचा अनुभव होऊ लागेल. परमेश्वर हा असतो, तुमच्याशेजारीच तो आहे त्याला कसल्याही वेळी ताबडतोबीने गाठता येते, त्याच्या मदतीची खात्री बाळगून कोणत्याही क्षणी त्याच्यावर अवलंबता येते, याची तुम्ही मनाशी पुनः पुनः खूणगांठ बांधा, कायम निश्चिती बाळगा. ज्या विधात्याने तुम्हाला निर्माण केले, तो तुमचा निर्वाहही योजणारच ही गोष्ट अनायास ध्यानात येण्याजोगी, सहज पटण्यासारखी आहे. तो तुमच्या उपजीविकेची चिंता बाळगतोच. मात्र त्याचे सांगणे, नीट कान देऊन, मन लावून, चित्त एकाग्र करुन, ऐकण्याची संवय जडवून घ्यायला हवी. त्याचे तुम्हाला मार्गदर्शन करण्याचे कार्य, सतत चालूच असते. जितक्या जास्त लीनपणे तुम्ही भगवंताला शरण जाल, तितक्या तत्पर दक्षतेने, तो तुम्हाला प्रकाशाकडे, सत्याकडे, पूर्णतेकडे, साफल्याकडे घेऊन जाईल.

**NOVEMBER 21**

# पवित्र विचारसृष्टि

आरोग्य, ऐक्य नि आनंद ही तिन्ही सौख्यसाधने मूलभूतपणे प्रत्येकाच्या वैयक्तिक विचारधारणेनुसार प्राप्त होत असतात हे आपल्याला आधिकाधिक उघड दिसू लागते, उत्तरोत्तर आपल्या जास्त प्रत्ययास येते. प्रकृति बिघाडाचा प्रादुर्भाव पापांतूनच प्रकटतो. पाप म्हणजे अनिष्ट दुष्ट विचार. तोही कृतीत निर्लज्जपणे उतरलेला. विचारांची धारणा सुयोग्य असेल तर ऐक्य, सुमेळ, सुसंवाद संभवतात. सौख्य तर हितकारक विचारांच्या प्रवर्तनाची इष्ट फलनिष्पत्तिच. प्रत्येक जण अनपेक्षितपणे ही कुठे गेला तरी बरोबर स्वतःची विचारसृष्टि वागवीत असतो. त्यामुळे सभोवतीचे वातावरण आरोग्यमय, ऐक्यपूर्ण व सुखप्रद बनविणे प्रत्येकाच्या स्वतःच्याच हाती असते. विद्यमान परिस्थिति, प्रचलित प्रवृत्ति, भोवतालचा भूभाग, सारी कशीही असली तरी स्वविचारांची धाटणी सुधारुन प्रत्येकाला आपल्या मनोराज्यात एक अचाट चमत्कार घडवून आणता येईल. तुमची विचारसृष्टी हे एक निखालसपणे पावित्र्यमय असे जग असते आणि ते संपूर्णपणे केवळ तुमच्याच मालकीचे असते. तुमच्या अनुमतिविना कोणताही दुर्विचार त्या जगावर कदापि आक्रमण करु धजणार नाही प्रत्येकाने आपले हे मनोराज्य पापविहीन सत्त्वशुद्ध, पावित्र्यपूर्ण राखले पाहिजे; तरच सर्वांचे जीवन आदर्श, परिपूर्ण, निरागस बनेल.

☆

# खराखुरा साधेपणा

जीवनात साधेसुधेपणा असावा, याचा अर्थ महत्त्वाकांक्षा, ध्येय प्रयास वा उत्साह ही मुळीच नसावीत असा केव्हाही नाही. काही आरामाची खास साधने, चैनीच्या विशेष सोयी, वगैरे भिन्न-भिन्न, कोती दृष्टि असणाऱ्या कित्येकाना आवश्यक वाटणाऱ्या, अनेक निरर्थक वस्तूना सोडचिठ्ठी देणे हा त्याचा खरा अर्थ. साधेसुधेपणाची कास धरली की, योग्य व इष्ट म्हणजे काय करायचे ते, जात्यांवरच्या ओवीप्रमाणे आपोआप सुचत जाते. साधेसुधेपणा जीवनातल्या सूक्ष्म, सुंदर पण साभिप्राय गोष्टीतच समाधान मानतो. गाजावाजा न करता शांतपणे काम चालू ठेवायला त्याला जास्त आवडते. संपत्ति–दौलतीची आशा तो धरीत नाही, सामाजिक प्रतिष्ठेच्या मृगजळामागे धावत नाही, का जनतेच्य टाळ्यांची हाव बाळगीत नाही. क्षुद्र, मुलाम्याची, नकली, फसवी वस्तु प्राप्त करण्यात साधेसुधेपणा जराही वेळ दवडीत नाही. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि अविरत सेवासाधना, यांच्यावरच सोधेसुधेपणाचा सर्वस्वी भर असतो. साधेसुधेपणाच्या परीसाचा जीवनाला स्पर्श झाला की जीवनाचे सोने झालेच म्हणून समजावे. मानव नावाड्याने साधेसुधेपणाच्या ध्रुवताऱ्यावर आपली नजर अविचलपणे खिळवूनच स्वतःची जीवननौका डळमळू न देता हाकारायला हवी.

## राष्ट्रीय मार्गशीर्ष ३

# थकव्याचे थोतांड

आपले जीवन शक्य ती उच्च पातळी गाठू शकले आहे, का ते खालच्याच पातळीवर राहिले आहे आणि तरीही तुम्ही थकवा वाटतो ही लंगडी सबब पुढे करुन मनाचे खोटे समाधान करुन घेत आहा, याची एकदा खातरजमा करुन पहा. आणि स्वतःच्या सगळ्या कार्यशक्तींचा यथेष्ट वापर करुन, लाभत असलेल्या साऱ्या संध्यांचा उचित फायदा मिळविण्याची इच्छा बाळगता ना, थकवा येण्याची पोकळ सबब पुढे करीत नाही ना, याचाही नीट पडताळा घ्या. जर उच्च पातळी गाठण्याची तुमची ही इच्छा पुरेशी उत्कट असेल तर मात्र मग तुम्ही, आजच, आपले ध्येय जास्त भव्योदात्त बनविण्याचा व ते गाठण्याचा प्रयत्न थकव्याला धूप न घालता तीव्रतर करण्याचा पक्का निर्धार करा. आपल्या अन्यान्य आकांक्षा रोजच्या रोज यशस्वीपणे साध्य करीत राहण्यानेच तुम्ही आपले ध्येय गाठू शकण्यासाठी आधिकाधिक बलवान् बनत जाणार आहात. आपल्या उच्च विचारांशी अविश्रांत प्रयत्नांची सांगड घाला, वाटणाऱ्या थकव्यावर मात करा, म्हणजे फलनिष्पत्ति ही ठेवलेलीच, भविष्यकाळांत जी महान् कार्ये अथकपणे पार पाडण्याची तुमची योजना आहे, ती साकार होण्यासाठी, कार्याची आधी सुरवात तर व्हायला हवी ना? उठा तर, मरगळ झटकून टाका. कार्यसिद्धीच्या दिशेने पहिले पाऊल आजच आत्ताच टाका कसे! थकव्याचे थोतांड माजू देऊच नका.

NOVEMBER 24

## राष्ट्रीय मार्गशीर्ष ८

# चोखंदळ वाचन

ऐश्वर्य, आयुरारोग्य, ऐक्य लाभणे न लाभणे, प्राधान्ये करुन तुमच्या मनोवृत्तींवर अवलंबून असते. तुम्ही ज्या वृत्ति जोपासता, ज्या विचारांना थारा देता, ज्या भावभावनांना खतपाणी घालता, त्यावर तुमचे चारित्र्य व म्हणून भविष्य अवलंबून असते. तुम्ही आपल्या मनःसृष्टींत आसरा देण्यापूर्वी प्रत्येक विचारांची तावून सुलाखून छाननी करा. त्यांना मुळीच द्वार मुक्त सोडु नका. चांगले, हितकर इष्ट विचार कोणते, हे समजण्यासाठी अर्थातच भरपूर वाचन करायल हवे, या दृष्टीने वाचनासाठी पुस्तके निवडताना तुम्ही खूपच चोखंदळपणा दाखवायला हवा. श्रेष्ठ लेखकांचे उत्तम ग्रंथ वाचण्यावर कटाक्ष ठेवा. जगन्मान्य थोर तत्त्वचिंतकांचे विचारधन वारशाने तुम्हाला लाभलेले आहे. त्यांच्या आयुष्याचे आदर्श आपल्या दृष्टीपुढे बाळगून त्यापासून आपल्या जीवनाला चेतना-प्रेरणा-स्फूर्ति प्राप्त करा. जीवन उदात्त बनवा. परमेश्वरी सहाय्य व प्रोत्साहन सर्वांना सदैव मुक्तपणे प्राप्य असतात. ती उपलब्ध करण्याचे मार्ग समजून घेणे, त्यांचा स्वतःसाठी पुरेसा फायदा मिळवता येणे, त्यांचा स्वहितार्थ वापर करणे, तुमच्या कसबावर, कारागिरीवर, करामतीवर अवलंबून आहे. परमेश्वराजवळचे हिताचे भांडार अक्षय्य असते. तुम्हाला आवश्यक तेवढे पुरेसे हित तुम्हाला पुरवल्यानंतरही ते उणे वा रिते होत नाही.

NOVEMBER 29

## राष्ट्रीय मार्गशीर्ष ९

# फावणारा बलसंचय

दैनंदिन जीवनात भोगाव्या लागणाऱ्या लहान लहान टोचण्याच जिवाला फार हैराण करुन सोडीत असतात. टाळण्याजोग्या नि अनावश्यक अशा गोष्टी करण्यात आपण अनेकदा शारीरिक व मानसिक बलाची व्यर्थ उधळपट्टी करीत असतो. महान कार्यासाठी हिंमत व हौस वापरल्याने तुमचा जोम कधीच खच्ची होत नसतो. ताण, थकवा, हतोत्साहता वाटतात ते क्रोध, घाबरटपणा, घिसाडघाई, चिडखोरपणा, चिंता उत्तेजना यांच्यामुळे. अशा प्रकारे तुमच्या जोमाला जराही गळती लागणार नाही याबद्दल खबरदारी घ्या, या धबडग्यातही एकांतवास साधल्याने मनाला समतोलपणा लाभू शकतो. तुमच्या दैनंदिन धावपळीतही असा एकांतवास साधण्याचा तुम्ही अवश्य प्रयत्न करा. तुमच्या जीवनक्रमाची एकदा या दृष्टीने सर्व-साधारण आखणी करुन ठेवा. आणि मग मात्र कोणत्याही परिस्थितीत तदनुसारच वागण्यासाठी प्रयत्नशील असा. तुम्ही स्वतःची जमवलेली शिल्लक ज्या पद्धतीने पुरवून पुरवून वापरता त्याच तऱ्हेने स्वतःचे मानसिक शारीरिक बलही काटेकोरपणे व काटकसरीने वापरा. महान उद्योग हाती घेण्यासाठी हा शिलकी साठा मोठ्या प्रमाणात जवळ असायला हवा. तो भरपूर असला की तुम्हाला सामर्थ्यपूर्ण आत्म-विश्वासाची प्रचिती येत राहील. अशाप्रकारे झालेला बलसंचय अंततोगत्वा तुम्हाला चांगलाच फावेल.

– • –

**NOVEMBER 30**

# भलाई

सत्याच्या सत्यतेसाठीच सत्यावर प्रेम केले पाहिजे, सत्याची साधना अंगिकारली पाहिजे, सत्याची कास धरल्याने होणाऱ्या लाभावर दृष्टि ठेवून नव्हे. भलाई करण्याची कल्पनाच प्रिय आहे म्हणून कल्याणकारी वृत्तीने वागावयाचे, त्यामुळे आपल्यावर सौख्याचा, सदिच्छांचा वर्षाव होईल, म्हणून नाही. सत्यप्रियता व कल्याणवृत्ति ह्या दोन, भलाईप्रिय जीवनक्रमाच्या आधारभूत स्तंभिका होत. त्यावर उभारलेले जीवन उत्तरोत्तर मधुरतर व समर्थतम बनत जाते. उद्दिष्टांची उच्चता व मनाची महात्मता यांनी स्फुरण येऊन तुम्ही विचारसोपानाची एक एक पायरी चढत जाल आणि भलाईच्या भावनेने मन ओतप्रोत होऊन इतकी उंची गाठाल की तेथून तुमच्या बुद्धीला खालचा सारा सभोवताल हृदयंगम होईल. तुमच्या मनोवृत्तीत क्षुद्र मर्यादा व दुष्ट हेतु औषधालाही उरणार नाहीत. खालच्या यत्तांतून उत्तीर्ण होत होत, सद्हेतूंच्या व सद्विचारांच्या भलाईने वागण्याच्या, बऱ्याच वरच्या यत्तेत आपण येऊन पोचलो आहोत हेही तुम्हाला तिथे जाणवेल. त्या अनादि अनंत चिरशाश्वत सत्याचा सतत मागोवा घेत राहण्याचे महत्तम कार्य यापुढे साहजिकच तुमच्या दृष्टीसमोर सदाचे राहील. आपले सारे बुद्धिबल, विचारशक्ति, मनःसामर्थ्य पुऱ्या कर्तृत्वानिशी इतरांची भलाई साधण्याच्या कार्यार्थ कामी लावा.

卐

DECEMBER 1

## राष्ट्रीय मार्गशीर्ष ११

# निवड उद्दिष्टाची

आपल्याला कोणते उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे, हे जर तुम्हाला निर्णायकपणे व स्पष्टपणे ठरविता आले तर प्रगतिपथावरील वाटचालीचा तुमचा वेग तुम्हाला निश्चित वाढविता येईल. स्वत:चे यथायोग्य मूल्य ठरविणे, आपला आवाका–कुवत ओळखणे, मात करावयाच्या अडचणींची अगोदर जाण येणे हे सर्व तुम्हाला साधले तर उद्दिष्ट साध्य होण्याची संभाव्यता खूपच वाढते. भावनेच्या भरांत उतावळेपणाने केलेले बेत, अविचाराने आखलेल्या योजना साधारणपणे बारगळतात, सोडून द्याव्या लागतात. अपयश पदरी पाडतात. तारतम्य, सारासारविवेक न बाळगता, सुरु केलेले योजनाहीन कार्य अपयशाच्या गर्तेत कोसळणार नक्कीच. यश मिळविण्यासाठी चिंतनपूर्वक संपूर्ण आखणी करावी लागते. ज्या बाबतींत मति कुंठीत होत असेल त्याविषयी अधिकारी व्यक्तीकडून माहिती, सल्ला, मार्गदर्शन प्राप्त करावे. काम जोखमीचे असेल तर काहीही गृहीत न धरता प्रत्येक बाबीची नीट छाननी करावी. चाणाक्षपणे दूरदृष्टी वापरली तर विनाशाच्या खाईत पडण्याचा अनर्थ टळेल. उत्कृष्ट निवड, सुयोग्य आंखणी, व थोरांचे मार्गदर्शन यांच्या आधारानेच यश मिळते. त्यासाठी प्रकांड पांडित्य, अलौकिक बुद्धिमत्ता, वा अजोड ज्ञानवैभव हवेच असे मुळीच नसते.

**DECEMBER 2**

# राष्ट्रीय मार्गशीर्ष ४

# हकालपट्टी पूर्वदुर्ग्रहांची

अनिष्ट, गैरलागू अन्यान्य पूर्वग्रहांनी मनात ठाण मांडण्याचे मुख्य कारण म्हणजे सरळ अज्ञान किंवा दिशाभूल करणारे गैरज्ञान. ज्याचा ज्याचा म्हणून आपल्याला उलगडा पडत नाही ते ते सारे आपल्याला थोतांड वाडते. एखादी, बाब घटना स्थिती, हितकर योग्य खरी, आहे असे मनाने घेतल्यावर त्याला पोषक तीच कारणे आपण जुळवतो, निवडतो, मिळवितो. विरुद्ध जाणाऱ्या मतांकडे आपण जाणीवपूर्वक डोळेझाक, काणाडोळा, कानझांक, करतो. आपल्या मतांबद्दल आपला तो बाब्या या न्यायाने आपण, आग्रही घायकुते हट्टी बनतो. उलट दुसऱ्यांच्याना मात्र 'ती कारटी' या भूमिकेतून हिडिसफिडिस करतो. पण आपली मते दृष्टिकोन वा विचार चूक आहेत असे आढळल्यानंतरही त्यांचा त्याग करण्यास आपण तयार नसतो. चुकीचीही मते एकदा का मनात रुजली की त्यांचा समूळ उच्छेद करणे कोणालाही फार अवघड जाते. सत्य-शोधकाने आपल्या मनाची कवाडे जास्तीत जास्त सत्यप्रकाश आत येऊ देण्यासाठी सताड उघडी टाकायला हवीत. असे करण्यानेच मन विशाल होईल, हृदय उदार बनेल. पूर्वदुर्ग्रह नेहमीच मनोद्वारे लोटून ठेवतात. पण तुम्ही कूपमंडूक प्रिय अशा काळोखात, क्षणमात्रही, चाचपडत वावरु नका. सत्याला आवडते खुले प्रांगण. त्यात पाऊल टाका. पूर्वदुर्ग्रहांची जरादेखील गय न करता त्यांची निष्ठूरपणे हकालपट्टी करा.

卐

**NOVEMBER 25**

राष्ट्रीय मार्गशीर्ष ५

# स्वोदाहरणाचा प्रभाव

या जगात केवळ तुमचे वैयक्तिक आदर्श उदाहरणच दुराग्रह-खंडनार्थ, सत्तत्वप्रसारासाठी वा दुराचारनिवारणाप्रीत्यर्थ, सर्वोत्कृष्ट असा प्रभाव पाडू शकेल. तुम्ही देऊ करणार असलेल्या साध्यासुध्या शाब्दिक सल्ल्यापेक्षा, तुमचा सक्रीय आदर्श, तुमची प्रत्यक्ष कृति करण्याबाबतची कळकळ, तुमचे आपल्या उच्च ध्येयावरील अचल प्रेम, दुसऱ्यांना अधिक धीर, प्रेरणा, मदत देऊ शकतील. खरे पाहता आदर्श प्रत्यक्ष उदाहरणाच्या परिणामकारक प्रभावाची मोजदाद, त्याचा ताळेबंद, त्याचे मूल्यांकन करताच येण्यासारखी नाहीत. कारण अनेकवेळा हा प्रभाव दुसऱ्यांवर त्यांना नकळतच पडत असतो. त्याचप्रमाणे तुम्हालाही खुद्द कल्पना आलेली नसते अशा वेळी तुमच्या व्यक्तिमत्वाची छाप दुसऱ्यांवर पडलेली असते. यासाठीच तर आपली स्वतःची वागणूक तुम्ही सदासर्वकाळ अत्युत्कृष्ट ठेवणे अगत्याचे आहे. आयुष्य हा एक अमोल, ईश्वरदत्त व अपूर्व असा ठेवा आहे. आपल्या सेवावृत्तीच्या उदाहरणाने इतरांचे भले करण्यासाठी मिळालेली ही संधि प्रत्येकावर एक प्रकारची पवित्र जबाबदारी टाकीत असते. तुमच्या संभाषणांतून, आचरणांतून, व्यक्तिमत्वातून तुमच्या सर्वश्रेष्ठ आत्मतत्त्वाचे, विचारांचे आदर्शाचे प्रतिबिंब उमटू द्या. म्हणजे मग तुम्ही इतरांना नित्य मदतीचे व अखूट स्फूर्तीचे स्थान भांडार, आगर वाटू लागाल.

*

NOVEMBER 26

# परिश्रम

पहाटे उठून, शुचिर्भूत होऊन, उषःकालच्या प्रसन्न समयी जो घराबाहेर पडतो, पुष्टीदायक, आल्हादकारक वातावरणात दीर्घ श्वसन करीत लगतच्या टेकडीवर तरतरीने चढतो आणि माथ्यावर उभे राहून भगवान् सहस्त्ररश्मीचे उदयकाली दर्शन घेतो, त्यालाच सूर्योदयाची खरी लज्जत चाखावयास मिळते. अंथरुणात सुस्तीने लोळत पडून बंद खिडकीच्या काचेतून आत येणारे सूर्यकिरण अंगावर बागडू देणाराची अवस्था खरीच बापुडवाणी, दयनीय, दुःखपूर्ण. तो खराच दुर्दैवी. पराकोटीचे परिश्रम केल्याविना जे पदरात पडते त्याचे मूल्य वा स्वाद आंकला व चाखला जाऊच शकत नाही. जो योजनापूर्वक पुण्यमय परिश्रम करतो, आशाभंगाने न खचता अव्याहतपणे मार्गक्रमित जातो, त्यालाच भगवंताचे मनःपूर्वक आशीर्वाद मिळतात. सच्चरित्रता, विश्वासार्हता, आदरणीयता, स्वतंत्रता, स्वयंप्रभुता, यशस्विता ही सारी सततच्या परिश्रमाची फळे होत. सुख जन्मतःच लाभले नाही म्हणून दैवाला बोल लावीत हातपाय गाळून बसणे शुद्ध वेडेपणा आहे. पवित्र परिश्रम करण्याची सुवर्णसंधी स्वतःला लाभल्याबद्दल प्रत्येकाने परमेश्वराचे ऋणी राहिले पाहिजे. प्रयत्नपूर्ण परिश्रम नि त्यामुळे साधलेली कार्यसिद्धी ह्यांची सर जगात दुसऱ्या कशालाच नाही. अशा पावन परिश्रमामुळेच ध्येय गाठता येते.

## राष्ट्रीय मार्गशीर्ष ७

# विनाशक वटवट

शब्दांची उधळपट्टी न करण्याची, नेहमी खबरदारी घेणे, ही जीवनात एक महामहत्वाची बाब मानायला हवी प्रत्येकाने. ती टाळण्यासाठी जरुर तर काही वेळ कटाक्षाने मौन पाळा. व काही वेळ सभाषणासाठी मोकळा ठेवा. दोहोंतही मात्र आत्यंतिकता नसावी. अर्थात अतिबडबड करण्यापेक्षा अेक वेळ अतिमौन परवडले. वटवट ही वक्ता व श्रोता दोघांनाही कमीपणा आणते. ज्या ज्या वेळी तुम्हाला जिभेचा पट्टा चालविण्याची सुरसुरी येईल त्या त्या वेळी ओठाना कुलुप ठोका; आणि आत्मपरिक्षण करा. तुमच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या मुक्ताफळावरुन तुमचे व्यक्तिमत्व जगाच्या निदर्शनास येत असते. तुमची वाणी, जगाला तुमच्या आवडी, आकांक्षा, संस्कृति, तुमचा स्वभाव वगैरे सर्व काही बिनचूकपणे उघड करुन दाखवीत असते. शद्वांचे सामर्थ्य नीट जाणून घेऊन त्यांच्या अर्थछटा खोलात शिरुन उलगडून पहा. अशाने त्यांचा उचित उपयोग करणे तुम्हाला साधेल. गैरशद्व जिभेवरुन घसरताना आढळताच त्याची मानसगृहातून हकालपट्टी करा. जीवनात थोर यश मिळवायचे असेल तर शद्वव्यवहारात अखंड जागरुकता हवी, सावधपणा हवा, काटेकोरपणा हवा. मित्र व शद्व दोन्ही सारख्याच हुशारीने निवडा वागताना वारेमाप वटवट वापरणे विनाशक. अतएव वटवट वर्ज्य वाटावी.

## राष्ट्रीय मार्गशीर्ष १२

# क्षमतापूर्ण आत्मविश्वास

प्रत्येक दिवस उगवतो तोच मुळी तुमच्यासाठी काही कर्तव्ये, थोडया सुसंध्या व बऱ्याचशा जबाबदाऱ्या घेऊन. तुम्ही कसल्या मनोधारणेने आज या कर्तव्याना, कार्याना व कृतींना सामोरे जाता, हात घालता ह्यावरच मात्र फलनिष्पत्ति प्रामुख्याने अवलंबून राहणार. खरे म्हणजे दांडग्या क्षमतापूर्ण आत्मविश्वासाने आणि उच्च अपेक्षापूर्णतेने तुम्ही पुढे सरसावायला हवे. तुमच्या दैनंदिन आवश्यक कामाची हयगय तर करु नकाच. उलट सारी कर्तव्य, सगळ्या जबाबदाऱ्या, दक्षतेने परिपूर्णतेने पार पाडा. शिवाय आज मिळणाऱ्या सुसंध्यांवर डोळ्यांत तेल घालून टपून बसा. तुमच्या इच्छा-आकांक्षा फलद्रुप होण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सतत प्रयत्नशील असा. आपल्याला काय साधावयाचे आहे याबद्दलच्या स्पष्ट, समर्थ व सर्वगामी कल्पनानी मन चेतवून ठेवा. तुमच्या हुकुमाची ताबेदार असणारी तुमच्याजवळची विविध महान् सामर्थे आणि अन्यान्य शक्तिस्त्रोत यांची नीट ओळख करुन घ्या. आपले ईप्सित, सुनियोजित जिवितध्येय गाठण्याच्या उद्दीष्टाकडे आज एवढे एक पाऊल आणखी पुढेच पडले, अशी प्रगति, आजच्या या कार्तिकी एकादशीच्या आळंदीयात्रेच्या दिवशी, गाठीला बांधून दाखवा.

**DECEMBER 3**

राष्ट्रीय मार्गशीर्ष १३

# खिळवा नजर

कोणताही उदात्त विचार अमरत्वाचा ठसा घेऊनच उपजतो. प्रत्येक उत्तम इच्छा पुढे काय घडेल याबाबत प्रतिज्ञा करीत असते. सर्व उच्च आकांक्षा संभाव्य कार्यपूर्तीच्या द्योतक ठरतातच. भगवंताच्या इच्छेपुढे मान तुकवायची हे तुमच्या जीवनाचे सूत्र राहू द्या, सत्यधर्माचे कळकळीने आचरण करण्याचे ईप्सित डोळ्यापुढे ठेवा. जन्माला घालताना, ज्या उच्च पवित्र उद्दिष्टांसाठी आवश्यक अशी, साधनसामुग्री, कुवत व योग्यता, तुम्हाला बहाल केली गेली ते उद्दिष्ट, तो ध्येय ध्रुव मग क्रमाक्रमाने पण स्पष्टपणे दृग्गोचर होऊ लागेल. खऱ्या अध्यात्मज्ञानाचा तेजस्वी प्रकाश हृदयात एकदा का उजळला की संशय-निराशेचा घोर अंधकार पार नष्ट होऊन जाईल. तुमच्या ठायी एक नवी अपूर्व शक्ति उदय पावल्याची आत्म-विश्वासपूर्ण जाणीव तुम्हाला होऊ लागेल. भोग घेण्यात, अभिलाशा पूर्ण करण्यात, संपत्ति जोडण्यात खरे सौख्य नसून सेवा, करण्यात, मदत करण्यात, उपयोगी पडण्यात ते गवसते, हे आता तुमच्या अनुभवास येईल. सत्यधर्माने वागण्याची व सचोटीने चालण्याची दुर्दम्य इच्छा मनाशी बाळगा; तरच तुमच्या मानवजन्माचे खरे सार्थक होईल. आपल्या ध्येयध्रुवावर नजर खिळलेली असू द्या.

\+ + +

**DECEMBER 4**

## राष्ट्रीय मार्गशीर्ष १४

## (कार्तिक व. १३ श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथि)

# ज्ञाननिर्मिति

तुम्हाला ती अज्ञात असतील, पण प्रत्येक समस्येला उकल व उत्तर ही असतातच. गणितातल्या प्रत्येक रास्त उदाहरणाला बिनचूक उत्तर हे आहेच. ते गणितज्ञाला सापडवता आलेले नसेना का ! गणिती कूटप्रश्नांची उत्तरे विद्यमान असतातच. कोणाकोणाला ती आढळून येतात इतकेच. त्यांनी ती नव्याने निर्माण केलेली नसतात. कुठल्याही विवक्षित ज्ञानशाखेचा अभ्यास करताना घडते एवढेच की, ते ज्ञान प्राप्त होते, ते उचित आहे हे पटते, ते साधक मान्य करतो आणि सरतेशेवटी ते ज्ञान आपलेसे होते, आत्मसात् होते. विद्वानांच्या मते कुठल्याही ज्ञानशाखेत काही नवे निर्माण होण्याची शक्यता जवळजवळ नसतेच. अस्तित्वात असलेलेच ज्ञान कोणाला तरी प्रथम उमगते. भ्रमाने त्याला नवे ज्ञान मानले जाऊ लागते. आजच्या दिवशी समाधि घेतलेल्या ज्ञानदेवांनीही ज्ञाननिर्मिती करणे दुष्कर असेच स्वत: तर मानलेच पण इतरांनाही तसे समजाविले. उभ्दवलेली कुठलीही समस्या सोडविण्याचे मार्ग नक्कीच अस्तित्वात आहेत हे यावरुन ध्यानी आल्याने प्रोत्साहन मिळून तुम्हाला आता खात्रीने धीर येईल. परमेश्वरी सत्याच्या साधनेचा अवलंब करुन तुम्ही तो मार्ग निर्विवादपणे व झटकन् सापडवू शकाल याबद्दल नि:संदेह असा.

**DECEMBER 5**

## राष्ट्रीय मार्गशीर्ष १५

# जन्म सत्यशोधनार्थ

सत्याचा शोध घेताना अंगचोरपणा मुळीच करु नका. सत्य सापडवताना खूपच खंबीरपणा दाखवा श्रमाने ते गवसल्यानंतर, त्याचे रास्त मूल्य यथार्थपणे ध्यानी आणा. हे मूल्य समजल्यानंतर, त्याचे रक्षण करण्यासाठी तुम्ही साहजिकपणेच, कंबर कसाल, आकाशपाताळ एक कराल, सारे सामर्थ्य पणाला लावाल. सत्याच्या मूलभूत स्वरुपावरच तुम्ही आता आपले संपूर्ण लक्ष केंद्रित कराल. ज्या समस्या सकृद्दर्शनी तुम्हाला गुंतागुंतीच्या वाटतात, त्यांचे नीटपणे पृथक्करण करुन उगमस्थान शोधून काढले असता, त्या सहज उकलतात, सुटतात; कारण सत्य स्वभावतः गुंतागुंतीचे नसते. ते साधे, सरळ, सोपे, सुटसुटीत, सुगम असते. सत्य आकलन करण्याची, ग्रहण होण्याची व ते पचविण्याची तुमची कुवत, शक्ति, योग्यता क्रमाक्रमाने उत्तरोत्तर वाढत जाईल. वावदुकपणे केलेल्या विधानांवर डोळे मिटून विश्वास न ठेवता, खोलात शिरुन त्यांच्या सत्यतेचे पुरावे गोळा करा. फालतू फापटपसाऱ्यातून मूळ मुद्दे निवडून काढा. समस्येला पद्धतशीरपणे न गांगरता हात घाला. परिश्रमांती ती सुटल्याविना राहणार नाही. मानवजन्मच मुळी सत्याचा निरंतर शोध चालू ठेवण्यासाठी आहे. तो सत्कारणी लावा.

●

**DECEMBER 6**

# जोडा सान्निध्य

परमेश्वराच्या साक्षात् स्वरुपाविषयीच्या कल्पनेची सर्वोच्च भव्य भरारी अशीच असू शकेल. "परमेश्वर म्हणजे एक, अविनाशी जीवन मिळालेले, अतुलनीय प्रेम करणारे, अमर्याद कल्याण वर्षणारे बेजोड बुद्धीमत्ता बाळगणारे, व अपार अधिकार असणारे, अनादि अनंत अस्तित्व होय." सर्वश्रेष्ठ महामानव कसा असेल याबद्दलची कल्पनाही समांतरच जाईल. महामानव परमेश्वराचीच प्रतिकृति असेल, परमेश्वराचे प्रतिबिंबच भासेल, आणि स्वनिर्मात्याचे गुणच प्रकर्षाने परावर्तित करील. परमेश्वराचे सानिध्य जोडण्याचे जास्तीत जास्त जमू जाताच, दोघामधला हा आदर्श प्रतिमा-प्रतिमान संबंध अधिकतर स्थापित होईल. त्यामुळे स्वतःचे सामर्थ्य व अनुषंगिक जबाबदारी वाढत चालल्याची जाणीव तुमच्याठायी पूर्णपण दृढमूल होईल. लाभलेल्या जीवनाचा व्यापक अर्थ व पार पाडावयाचे त्याचे उत्तरदायित्व तुम्हाला आता नीटपणे जाणवून येईल. परमेश्वरी इच्छेपुढे तुम्ही आता आज्ञाधारकपणे, मनापासून व पूर्णपणे मान तुकवू शकाल. जगन्नियंता सर्वज्ञ, सर्वसाक्षी असल्याने, तुम्हाला कुठे केव्हा, किती मार्गदर्शन द्यावे, कसा व काय सल्ला द्यावा, काय प्रमाणात तुमच्यावर नजर ठेवावी, तुमचे संरक्षण कसे व कितपत करावे, हे तो सर्व काही यथास्थितपणे जाणतोच. एतदर्थ तुम्ही सतत त्याच्या उपकारक सानिध्यात असण्याचा अखंड प्रयत्न करीत चला

☆

DECEMBER 7

## राष्ट्रीय मार्गशीर्ष १७
## (मार्गशीर्ष शु. १ देवदीपावली)

# ठपक्याविना आत्मपरीक्षण

स्वतःला जे अस्वास्थ्य भोगावे लागते, स्वतःच्या जे दुर्दैव वाटणीला येते, स्वतःवर जे संकट कोसळते, त्या साऱ्याला तुम्ही स्वतःच जबाबदार वा करणीभूत असता. आजार, असंतोष, आपत्ति ही उगीच तुमच्या वाटयाला आलेली नसतात. तुमची करणी बव्हंशी त्याच्या मुळाशी असते. हा विचार तुम्ही एकदा मनात रुजवून घेतलात की तुमचा उद्वेग हळूहळू ओसरु लागेल. तुमची दोषैक दृष्टी बऱ्याच प्रमाणात निवळेल. ठपका, टेप्पण, बोल, दुसऱ्याला लावल्याविना तुम्ही कसोशीने लबाडी न करता, आत्मपरिक्षण कराल. आता एका आशावादी विचाराचे स्फुरण तुमच्या मनांत उद्‌भवेल. तो विचार असा. " माझे वैयक्तिक आंतरिक दोष व बाह्य परिस्थिति, दोन्ही मिळून अपयशाला, हालअपेष्टांना, अस्वस्थतेला जबाबदार असतात. पैकी माझे दोष नाहीसे करणे तर माझ्याच हाती आहे. हे स्वदोषांचे उच्चाटण एकदा मला साधले, की केवळ बाह्य कारणे असमर्थ ठरतील. मला विपरीतावस्थेत ढकलण्यास दुसऱ्या शद्बांत म्हणायचे तर माझी बिकट झालेली परिस्थिति झपाट्याने सावरु-सुधारु लागेल." हे केलेत की तुम्ही जिंकलेत. सारी जबाबदारी स्वतःच पत्करा. तुमचे भविष्य, सौख्य, दैव तुमच्याच हाती आहे. स्वतःतले दोष, उणीवा, वैगुण्य झटकून टाका. तुमचे सद्विचार, तुमची सत्कृत्ये, तुमच्या सदिच्छा तुमची सतत पाठराखण करतीलच करतील. आज तर देवदिपावली !

—o—

## DECEMBER 8

राष्ट्रीय मार्गशीर्ष १८

# कित्ता घालून द्या

आपल्या उच्च विचारसरणीचे, व आदर्श आचार व्यवहारांचे अनुकरणीय उदाहरण गिरविण्यासाठी समाज बांधवांच्या पुढे ठेवून त्यांचे तुम्ही खूप कल्याण साधू शकता. तुमच्या भोवतीच्या जनसमूहाच्या जीवनावर नकळत का पण तुम्ही स्वतःचा प्रभाव, छाप पाडताच. म्हणून स्वतःची वर्तणूक, आचरण आदर्श राखण्याची नैतिक जबाबदारी तुमच्यावर सहाजिकच पडते. आजपर्यंत होऊन गेलेल्या असामान्यांनी आपल्या तळपत्या जीवनाचा दीपस्तंभ कर्तृत्वाच्या उंच टेकाडावर जसा काही उभारुन ठेवला आणि त्याच्या पथप्रदर्शक प्रकाशात मानवसमाजाने आपापला मार्ग चोखाळला. उपयुक्त, अनुकरणीय, समर्पित जीवनामुळे इतरांवर होणाऱ्या दूरगामी परिणामांचे नक्की प्रमाण ठरविणे तसे सोपे नाही; पण ते क्षुद्र, क्षुल्लक, उपेक्षणीय असे नक्कीच नसते. आधी स्वतः कर्तबगारीच्या शिखरावर आरुढ व्हा आणि आपल्या उदाहरणाने, इतरांना मोठी कार्ये हाताळण्यास उद्युक्त करण्याचे, त्यांना सेवेचे व्रत घेण्यास प्रेरित करण्याचे, ठरवून टाका. नियंत्याने निर्मिलेल्या या जगाचा विकास व्हावा म्हणून स्वतःला लाभलेले कर्तृत्व कामी लावण्याचे भाग्य, अधिकार, दोन्ही तुम्हास लाभलेले आहेत. समाज बांधवांच्यासाठी, त्यांना गिरवता यावा म्हणून, आपल्या आदर्शांचा वळणदार कित्ता पुढे ठेवा.

*

DECEMBER 9

# राष्ट्रीय मार्गशीर्ष १९

# खासे जीवन पुस्तक

तुमचे जीवन म्हणजे जसे एक पुस्तकच. त्याच्या शीर्षकपृष्ठावर तुमचेनाव विराजत असते. तुमचे जगातील आगमन म्हणजे त्याची काही जशी प्रस्तावना. तुमच्या प्रयत्नांचा, कसोटयांचा, आनंद-कल्लोळांचा, नैराश्यवादळांचा, आकांक्षापूर्तीचा आणि ध्येयसिद्धीचा इतिहास त्याच्या पृष्ठांपृष्ठांवरुन तुमच्या कर्तबगारीनुसार अंकित होत जातो. या पुस्तकांतला विवेचित विषय – व्यवसाय, अद्‌भूतकथा सुखांतिका, काव्य, दुःखांतिका, शास्त्र, वाङमय, धर्म यापैकी काहीही असू शकेल. तुमच्या जयपराजयांचा इतिहास, तुमच्या कर्तृत्वाचा आलेख, तुमच्या नित्यकृत्यांची व विचारांची नोंद, या पुस्तकात पानापानावर प्रतिदिनी होत राहते. म्हणून पुढल्या उर्वरित जीवनात तरी तुम्ही या पुस्तकात काय लिहिले जाऊ देणार, हे पाहणे फार महत्त्वाचे ठरणार. अमरपट्टा घेऊन तर कोणी येत नसतोच. केव्हाना केव्हा तरी 'समाप्त' लिहिण्याची वेळ येणारच. ग्रंथसमाप्तीनंतरचा उपसंहारसुद्धा वाचल्यावर वाचकाला समाधान लाभेल असे तुमच्या जीवनपुस्तकात खूप मिळेल. अशी तुम्ही ईर्ष्या धरा. वाचकाने म्हणायला हवे, " वा ! सुंदर ! हे जीवनपुस्तक उदात्त उद्दिष्ट सतत सेवाव्रत व कठोर कार्यदक्षता, कठिण कार्यरतता यांच्यामुळे कसे खासे अध्ययनीय, अनुकरणीय झाले आहे ! "

≈

**DECEMBER 10**

राष्ट्रीय मार्गशीर्ष २०

# उपेक्षणीय चिंता

बाब महान आहे का क्षुद्र, महत्त्वाची आहे का क्षुल्लक हे सारे सापेक्ष वा तुलनात्मक असते. उत्तरायुष्यात जे काही विविध विशेष प्रसंग तुमच्यावर ओढवले ते लक्षात घेता, पूर्वायुष्यात वाटणीला आलेल्या चिंता, काळज्या, डोकेदुख्या या अगदीच उपेक्षणीय होत्या असे तुम्हाला आता आढळून आले आहे की नाही? मुख्य महत्त्वाच्या तेवढ्याच विषयांवर विचार करायचा, फक्त विशेष बाबींचेच चिंतन करावयाचे, असे एकदा तुम्ही ठरवून टाका. मग फालतू विवंचनांकडे लक्ष देण्याची तुम्हाला गरज भासणार नाही. त्या तुम्हाला गोंधळवू शकणार नाहीत. चिंता, निराशा, चीड, भीति, धास्ती विवंचना, साशंकता, काळजी अशासारखे बहुतेक विकार केवळ मानसिक असतात. आपण त्यांचा निष्कारण फार मोठा बाऊ करीत असतो. त्यांचा नायनाट मानसिक बलाने, मानसशास्त्रीय धाडणीने करावा लागतो. असल्या विकाराना थारा देणे शुद्ध बावळटपणा आहे हे पटल्यावर, तुम्ही त्यांचा समूळ उच्छेद करण्याचा चंग कंबर कसून बांधाल. या चिंता भेडसावीत बसू शकणार नाहीत, कारण त्या टाकाऊ, उपेक्षणीय, निरर्थक आहेत हे तुम्हाला समजले आहे. त्यांना अडथळे बनू न देता, संशयात्मिका वृत्ति, विसंवादी कल्पना, धरसोडीची धाटणी यांची जीवनांतून हकालपट्टी होऊ द्या.

**DECEMBER 11**

# विचार धन

चिकाटी, दीर्घोद्योग यांचे बुद्धिवैभवाशी खूप जवळचे नाते जुळते. योग्य प्रयत्नांती इष्ट-इष्ट परिणाम घडून येणे अटळ आहे. या स्थिर धारणेने अथक परिश्रम करुन फलप्राप्तीची धीराने वाट पाहता येणे हे खऱ्या थोरवीचे लक्षण असते. जीवन सदा नियमनावर स्थिर असते. ते गतिशील होण्यासाठी त्यावर सतत जागता पहारा ठेवण्याची दगदग सोसलीच पाहिजे. जीवन म्हणजे अध्ययन व प्रयोग करुन पाहण्यासाठी लाभलेली एक प्रशाला होय, तिथे निरीक्षणाच्या सहाय्याने धाडसाचा अवलंब करुन, अभीष्ट सिद्ध करुन दाखविता येते. इतरांहून स्वतःजवळ काही अधिक शक्तिसामर्थ्य आहे अशी जाणीव बाळगणे हे अहंमन्यतेचे लक्षण नक्कीच नाही. संपत्ति, जमीनजुमला व स्थावर मालमत्ता, यांच्याहूनही प्रत्येकाचे विचारधन हेच खरे वास्तव ऐश्वर्य मानायला हवे. स्वतःचे शक्तिसामर्थ्य हा न आटणारा जिवंत झरा आहे हे ओळखून, प्रत्येकाने ते कुठल्यातरी महान् व लायक अशा उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी योजनापूर्वक राबविले पाहिजे. कार्य हाती घेताना त्याच्या गुणवत्तेवर भर दिला जावा. कार्याच्या सिद्धतेनंतर लाभणाऱ्या पारितोषिकावर वा मान्यतेवर कार्याच्या निवडीचा भर नको. कार्याचा खरा आनंद, विचारधनाच्या बळावर कार्यसिद्धीसाठी चाललेल्या प्रदीर्घ परिश्रमांतच, लाभत असतो.

DECEMBER 12

## राष्ट्रीय मार्गशीर्ष २२
### (मार्गशीर्ष शु. ६ चंपाषष्ठी)

# व्यष्टींतून समष्टींत

सर्वांनीच दु:ख-पाप-दुष्टावा, अज्ञान-अशिक्षितता-अडाणीपणा, लोभ-हाव-हव्यास यांच्याविरुद्ध सतत युद्ध चालविले पाहिजे. म्हणजे या सर्वात तुम्ही स्वत:पण आलातच. नाही का ? मग त्यासाठी तुम्ही स्वत: फक्त इतकेच करा. आजच्या चंपाषष्ठीच्या शुभदिनी आपल्या वैयक्तिक जीवनातून या अनिष्टांचा पार विच्छेद करण्याची प्रतिज्ञा करा. सामाजिक मत, सामूहिक विचार, म्हणजे वैयक्तिक मताविचारांचीच गोळाबेरीज असते. तुम्ही जो विचार मांडता, जे सल्ले देता, खाजगी जीवनात जसे तुम्ही वागता त्या सर्वांचा समाजावर, परिसरावर व पार्श्वभूमीवर कल्याण-अकल्याणाच्या दृष्टीने इष्टानिष्ट परिणाम घडतोच. तुम्ही रोजच्या दिनचर्येतून, परस्परांशी केलेल्या व्यवहारातून, आपल्यात बाणलेले, साधेपणा, दयाळूपणा, उमदेपणा, इमानीपणा व उदारपणा यासारखे सद्गुण इतरांना अनुभवू दिलेत की त्यांचा प्रभाव इतरांवर पडलाच पाहिजे. खळबळनिर्मिती, महागड्या चैनी, निष्कारण भडकावण्या, पैशामागची हावरट धाव यांचा तुम्ही स्वत: धिक्कार करा, त्यांची अवहेलना छीथू करा. त्या द्वारेच तुम्ही समाजाची खरी आदर्श सेवा करता, मानवधर्माचा प्रसार घडविता, विश्वबंधुत्व साकार करता. साधेपणा व कळकळ हे महान् दैवी गुण होत. त्यांच्यामुळेच जीवन, सुंदर, आदर्श व नामी बनते. व्यष्टींत घडलेली 'उत्क्रांति-सुधारणा-प्रगति,' साहजिकच समष्टींत परावर्तित होते.

●

**DECEMBER 13**

# प्रामाणिकता व भलाई

जमा-खर्चाची संपूर्ण शंभर टक्के नोंद ठेवण्याच्या पद्धतीमुळे मनुष्य कदाचित् लबाडी करण्यास धजावत असेल पण याचा अर्थ तो मनानेही शंभर टक्के प्रामाणिक असेलच असा नाही. उघडकीला आल्यावर शिक्षा बेअब्रू होईल या भीतीने फसवणूक, खोटेपणा करण्यापासून दूर राहणे ही गोष्ट चांगली असली तरी निराळीच आहे. कारण टोपी घालण्याची, ताळूवरुन हात फिरविण्याची कल्पना मनात डोकावतच नाही असे कुठे होते आहे? लांडी-लबाडी गैर-व्यवहार कोणालाच सुख लाभू देत नाहीत. असले वर्तन, अस्सल-पणाचा बुरखा पांघरुन वावरणारे एक नकली नाणे असते. हे तुम्हाला मनोमन पटल्यावरच तुमच्यातल्या अपप्रवृत्तींचा खराखुरा बीमोड होईल. भलाई, प्रामाणिकता, चांगुलपणा, सत्प्रवृत्तता, यांच्यातच खरा शाश्वत आनंद देण्याचे सामर्थ्य असते व सुयोग्य उचित विचार मनात वागविण्यानेच तुमची पापवृत्तीतून मुक्तता घडते ही नीट ध्यानी धरा. भगवंताचा सर्वसमावेशक भलेपणा समजून येऊन एकदा का तुमचे मन अध्यात्माकडे वळले की, सूर्यामुळे धुके वितळावे तसे मनीचे दुष्टपण पार नाहीसे होईल. जसा काही कायाकल्प होऊन तुमचा एक वेगळाच नवा अवतार अस्तित्वात येईल. भगीरथाने स्वर्गातून फक्त गंगाच पृथीवर उतरवली. पण असा भला प्रामाणिक मनुष्य स्वर्गच पृथीवर उतरवील.

☆

DECEMBER 14

# राष्ट्रीय मार्गशीर्ष २४

# वर्ण गुणद्योतक

ब्राह्मणांचे निश्चित कर्तव्य कोणते ? विद्याभ्यास राज्य कारभार-वीरवृत्ती? परोपजीवी 'भिक्षापंथ' हितकर आहे? 'लक्षसंचय पंथ' श्रेयस्कर मानावा? वस्तुतः हे दोन्ही पंथ वर्ज्य त्याज्य, व अश्लाघ्य आहेत. संतोषप्रधान स्वावलंबन पंथ हाच खरा संतुलित अनुसरणीय होय. भिक्षा मागायची फक्त सार्वजनिक कार्यासाठी. चरितार्थ केवळ स्वावलंबनानेच चालविला पाहिजे. संतोषविरहित अपरिमित द्रव्यसंचय करणे ब्राह्मण्याला लांच्छनास्पदच मानले पाहिजे. वर्णात श्रेष्ठ-कनिष्ठ असे काहीच नाही. शिवाय वर्ण हा गुण आणि कर्म यानुसार सिद्ध होणार तो जन्मनिविष्ट मुळीच नाही. वर्ण, जाति, कुल, आश्रम चारी सर्वांना सारखच ग्राह्य, विहीत व सेवनीय आहेत. सर्वांचा उत्कर्ष परस्परांच्या सहकार्याने साधेल. परधर्मीय सत्तेच्या कालात सर्वांनीच विहीत व्यवस्था मोडून आपद्धर्म स्वीकारले. तेव्हा झालेली ही धर्माची गल्लत अपरिहार्य होती. आता मात्र स्वावलंबन हाच प्रधान धर्म व्हायला हवा. या व्रताचे उत्तम प्रकारे पालन करुन कुणीही आपापले श्रेष्ठत्व सिद्ध करावे. पुरोहित हे व्यावसायिक नसावेत. ते, सामाजिक गरज भागविण्यासाठी हवेत म्हणून त्या वेळेपुरते उपलब्ध असावेत. श्रेष्ठत्वबुद्धी सोडून, हक्क सोडून, सवलती सोडून सर्वच जण जेव्हा समानतेने वर्तू लागतील तेव्हा राष्टवृत्ति उद्‌भवेल, जोपासली जाईल. परावलंबित्व, परोपजीविका, आत्मघातसदृश निंद्य मानली जातील.

## राष्ट्रीय मार्गशीर्ष २५

# निष्कारण बाऊ

आपल्या मनाविरुद्ध घडणाऱ्या लहानसहान क्षुद्रबाबींनी तुम्ही तुमच्या मनाची शांतता ढळू देऊ नका. दैनंदिन जीवनांतील तुम्हाला न आवडलेल्या गोष्टींच्या टोचणीचा तुम्ही लक्षपूर्वक सतत विचार करु लागाल तर ती विक्राल रुप धारण करुन तुमचे फार नुकसान करील. उलट तिकडे दुर्लक्ष करुन रुखरुखीला मनातून पार हुसकून लावा आणि तिचा मागमूसही उरु देऊ नका. न घडलेल्या गोष्टींच्या काल्पनिक चिंतेच्या ओझ्याखालीच दडपली जाऊन कित्येक माणसे दुःखात अकारण चूर झालेली आढळतात. कित्येकदा अतिश्रमांपेक्षा अति चिंतेपायीच माणसांनी मृत्यु ओढवून घेतलेला आहे. खरे पाहता सत्कार्यशक्यता व सुसंधी यांनी माणसांचे जीवन कसे भरगच्च असते. ओतप्रोत भरलेले असते. म्हणून जगातल्या दैनिक व्यवहारांतून निर्माण होणाऱ्या अटळ अडचणींवर आत्मविश्वासपूर्वक मात करणे कोणालाही मुळीच अवघड जाऊ नये. विनमहत्वाच्या फालतू उपेक्षणीय चिंतांच्यामागे, त्यांचा निष्कारण वारेमाप बाऊ करुन जीवन वाया दवडण्याइतके ते स्वस्त खास नाही. आपल्या पौरुषालाच आव्हान आहे असे समजून तुम्ही सतत दंड थोपटून उभे ठाका. आपल्या जन्मसिद्ध यशप्राप्तीच्या हक्काची योग्य जाणीव ठेवून तुम्ही पावले सदा पुढेच टाका. क्षुद्र विपरीत घटनांची उपेक्षा करीत अखंड मार्गक्रमण चालू ठेवा. तुमची भरभराट, तुमचे यश, तुमचा गौरव, सन्मुख ठाकतीलच,

卐

**DECEMBER 16**

# फारच महान्

जुलुमजबरदस्ती जिथे हात टेकते, तिथे दयाळूपणा विजयी ठरतो. सहानुभुती विरोधाला निष्प्रभ करते, आणि अडचणी-अडथळ्यांचे निराकारण करते. बारिकसारिक क्षुद्र-क्षुल्लक मुद्यांकडेही पुरेसे लक्ष दिल्याने दयाळूपणा व कोमलता हे श्रेष्ठ सद्गुण जोपासले जाऊ शकतात. हे गुण आचरणात आणल्याने, वापरल्याने ते जास्त विकसित होतात, बलवत्तर होतात, वृद्धिंगत होतात. कोमलता ही दुर्बलतेची वा भित्रेपणाची परिणति आहे असे वाटणे पूर्णपणे चुकीचे आहे. कोमलता मृदुता वास्तविकपणे, मनाच्या सामर्थ्याचे, समतोलपणाचे प्रतिक आहे. इतरांना समजून घेणे, त्याना मदत देणे, त्याना प्रोत्साहन पुरविणे, ही सत्कार्ये करवविणारी ती खरी अमोघ शक्ति आहे, ती एक विधायक असा सद्गुण आहे, आत्म्याच्या उमदेपणाचा तो एक प्रत्यक्ष व बोलका असा पुरावा आहे. मृदुता कोमलता ही स्वार्थीपणापासून संरक्षण देणारी कवचकुंडले होत. दयाळूपणा, कोमलता व सहानुभूति ही लाख मोलाची अशी फारच महान सद्गुणत्रयी आहे. या सद्गुणांची जोपासना करण्यात, त्याना अंगी बाणविण्यात, आणि ते इतरांच्यात संक्रमित करण्यात जो काळ तुम्ही व्यतीत कराल, तो तुमचे शील चारित्र्य व्यक्तिमत्व विशाल करण्याच्या कामी लागेल. अशा आदर्श पद्धतीने खर्ची पडलेला तुमचा हा काळ, उदात्त साध्ये प्राप्त करण्यात, तुम्हाला खूपच सहाय्यक होईल.

## राष्ट्रीय मार्गशीर्ष २७
## (मार्गशीर्ष शु. ११, गीताजयंति)

# गीताकारास स्वसमर्पण

त्या गीताकार भगवंताला सर्वार्थाने, सर्वस्वाने, संपूर्णपणे शरण जाऊन त्याची एकनिष्ठपणे सेवा करा. लोकोत्तर अशा श्रीकृष्णाच्या निष्काम कर्मयोग आचरण्याच्या आज्ञेचे कदापि उल्लंघन करु नका. त्या सर्वाधीषाला संपूर्णपणे समर्पित व्हा, भयभीत अंतःकरणाने त्या जगन्नियंत्यासमोर नाक घासा, आणि पर्यायाने स्वतःसाठी मुक्तीचे द्वार ठोठावा. तुमचे शरीर व आत्मा त्या सच्चिदानंदाचेच अंश आहेत याची चाड बाळगा आणि अहोरात्र प्रभुवर श्रद्धा ठेवा. नारायणाने नराला गीताकथनातून शिकवलेले सारे धडे साकल्याने अभ्यासून, नीटपणे समजून घेऊन ते स्वतः आपल्या आचरणात येऊ द्यात. उपदेशपर, कल्याणप्रद व बोधकारी असेच फक्त बोलणे तुमच्या मुखातून स्रवू द्या; त्याबरोबरच अमंगल, अनीतिमय व अशिष्ट असे काहीही जिव्हेवर येऊ देऊ नका. आपल्या हृदयाच्या पावित्र्याला डोळ्यात तेल घालून जपा; कारण जीवनात व्यवहाराबाबतचे सारे निर्णय तिथे स्फुरत असतात. आपल्या आत्म्याला वारंवार उजळा देऊन तुमचे मनुष्यत्व नित्य नूतन, टवटवीत, ताजे असे राखा. मानवपुतळा नेकी व पावित्र्य यांच्या मुशीतून ओतला जातो. आधी जबाबदारी संभाळा. मोबदला मिळो न मिळो. परमेशाने तुम्हाबद्दल बाळगलेल्या अपेक्षा तुम्ही पूर्ण करा. आज्ञापालकांना मिळावयाचा मोक्षाचा मुकुट तुमच्या मस्तकावर विराजेल. तुमचा देह त्याचे मंदीर व आत्मा ही आतील मूर्ति, आहेत हे विसरु नका.

★

DECEMBER 18

## राष्ट्रीय मार्गशीर्ष २८

# भक्तिभावी प्रार्थना

भगवंताला साकडे घालणे हा प्रार्थनेचा उद्देश कधीच नसावा. प्रार्थनेने अंती साधायाचे असते जिवाचे शिवाशी तादात्म्य. प्रार्थना हा काही कसला सौदा नव्हे. इहलोकातील भौतिक मालमत्ता वाढविणे वा वैयक्तिक स्वार्थ साधणे यासाठी प्रार्थना मुळीच नसते. महदीशाकडून मार्गदर्शन मिळावे, परमेशाचा आधार लाभावा, जगदीशाकडून संरक्षण साधावे, यासाठी प्रार्थना करावयाची असते. जगन्नियंत्याच्या चरणी मन लीन झाल्यावर तो भक्तसखा तुमचे हृदय भक्तिभावाने तुडुंब भरुन ठेवतो. भगवच्चरणारविंदी मिलिंदायमान व्हायची तुम्हाला लागलेली तृष्णा हळूहळू तीव्र होत जाते. ही आस मुळांत जीवाला जडणे हीच खरी प्रार्थनेची सुरवात होय, हे तुम्हाला उत्तरोत्तर समजू–पटू लागेल. या प्रार्थनारुपी हाकेला तो दीनदयाळ धावून येतोच. शाब्दिक भजनांचा झांजा, टाळ, मृदंग यांच्या साथीवर गर्गशा घालण्यापेक्षा आंतरिक तळमळीने केलेली मूक प्रार्थना कितीतरी पटीने आधिक श्रेयस्कर व फलदायी ठरते. अशा मूक ध्यानवजा प्रार्थनेनेच शालीनता, वैराग्य, सहनशीलता मन:शांति, सदाचरण, नम्रता यासारखे दैवी गुण अंगी बाणतात. मनात समाधान, श्रद्धा, धैर्य, आनंद जागवते तीच खरी भक्तिभावी आदर्श निष्काम प्रार्थना, हे त्रिकालाबाधित सत्य होय. तिच्याद्वारेच भक्त भगवंताशी भारावून एकरुप होतो.

*

**DECEMBER 19**

# राष्ट्रीय मार्गशीर्ष २९

# खिलाडूवृत्ति

जीवन कंठणे म्हणजे खेळ खेळणे, ईर्ष्येने पण खिलाडूवृत्तीने, खोडसाळपणा, दुष्टावा, नाठाळपणा न करता. खेळाचे नियम माहीत करुन घ्यायचे व ते पाळायचे पण. प्रतिस्पर्धी बेशिस्तपणे, अन्यायाने, दंडेलीने वागला–खेळला तरीही आपण शिस्त मोडायची नाही. जिकण्याची जिद्द हवी पण हरल्याने, फुरंगटायचे नाहीच नाही; शिवाय हताश होऊन हातपायही गाळायचे नाहीत. बुद्धिबळे जशी मननपूर्वक खेळावी लागतात तद्वतच जीवनाचे पण असते. खेळी कोणची, केव्हा, कशी करावी हे आधीच चिंतनपूर्वक योजावे लागते. पूर्वनियोजनाविना शह, काटशह, मात हे कसे जमेल? त्याआधी प्याद्याचा फर्जी बनावा लागतो हे विसरु नका. अडाणीपणाची इथे बिलकुल गय केली जात नाही. नियम काय, डाव कसे, हे जाणीत नसाल तर पद्धतशीरपणे, ठेचा खात का होईना पण, अनुभव गाठीला बांधीत ते शिकून टाका. चुका घडल्या तर किंमत मोजल्याविना सुटका नसतेच; म्हणून त्याचीही तयारी ठेवा. जीवनखेळ आहे तसा मन गुंतविणारा पण त्यात यशस्वी व्हायचे तर सतत, दक्षता, चिकाटी व व्यासंग ही अत्यावश्यक मानली पाहिजेत. प्रतिस्पर्ध्याने लबाडीने, फसवून, लुच्चेपणाने खोटी खेळी केली तरीही तुम्ही स्वतः त्या फंदात पडू नका. सचोटीने खेळल्याचा आंतरिक आनंद अपूर्व असतो. जिकण्यासाठी ईर्षेने, अटीतटीने, जिद्दीने निकराची झुंज द्या; पण डाव करा नेकीचा. खिलाडूवृत्तीनेच खेळा.

**DECEMBER 20**

# राष्ट्रीय मार्गशीर्ष ३०
(मार्गशीर्ष शु. १५, दत्तजयंति)

# श्रीपादवल्लभ, नाहीत दुर्लभ

उपदेश कोणाकडूनही मिळाला तरी तो अवश्य ऐकावा, घ्यावा. समजा तो उपयोगाचा नसला तर तो न वापरायला तुम्ही मुखत्यार असताच. दुसऱ्याने सांगितलेले म्हणूनच केवळ ते धुडकावून लावण्याची कित्येकांना खोड जडलेली असते. त्यामुळे स्वतःच्याच हिताच्या चार गोष्टींना ते नाहक मुकतात. उघडपणे तोंडावर दुरुत्तर करणे, फटकळपणे तडकाफडकी सल्ला अव्हेरणे उर्मट असभ्यतेचे लक्षण होय. सहानुभूतीच्या भावनेने म्हणा, उपयोगी पडण्याच्या इच्छेने समजा, मार्गदर्शन करु पाहणारा कळकळीने चार शब्द सांगत असतो. तसा विरुद्ध दृष्टिकोनसुद्धा समजून घेणे इष्ट. दुसऱ्याचा अनुभवही उपयुक्त ठरु शकतो. शिवाय त्याची निर्णयशक्ति उजवी नसेल कशावरुन ? तेव्हा इतरांनी, अगदी बालांनी देखील, उच्चारलेले बोल जर मोलाचे असतील, तर ते ग्रहण करण्याचे आपल्या मनाला बाळकडू पाजा. ' दत्तदिगंबर दैवत माझे, हृदयी माझ्या नित्य विराजे, ' अशी तुमच्या बुद्धीची धारणा बनू द्या आणि तुमचे हित, सुधारणा, विकास साधावा या बुद्धीने तुम्हाला केल्या गेलेल्या साऱ्या सूचना स्वीकारण्याचे धडे तुम्ही आपल्या कानांना शिकवा. दत्तगुरुंनी केल्याप्रमाणे भेटणाऱ्या प्रत्येकाला गुरुस्थानी कल्पून त्याच्यातले, काहीना काही, चांगले शिकण्याजोगे, असे शोधा. हे साधण्यासाठी, ' दिगंबरा, दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा, ' ह्या भजनाचा तुमच्या जिव्हेला नित्य चाळा जडू द्या. तुम्हालाही ' ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर, सामोरे बसले । मला ते दत्तगुरु दिसले।।' अशी प्रचिती आल्याविना राहणार नाही. 'गुरुदेव दत्त!'

**DECEMBER 21**

## राष्ट्रीय पौष १

# अंबराचे अध्ययन

आत्मिक उन्नति करुन घेण्यासाठी, आंतरिक विकसन साधण्यासाठी, आध्यात्मिक दौलत वाढविण्यासाठी, नीलांबर आपल्याला खूपच मदत करते, प्रेरणा पुरविते, उत्तेजन देते. हे अथांग, स्वच्छ निळे गगन न्याहाळता न्याहाळता मनात पावित्र्य, प्रेम, व पूर्णता यांच्यासंबंधी विचार उपजतात. अस्थिर, कापूसी, चंचल मेघ नीरवपणे, ऐटीने, मुक्तपणे संचरत, वावरत, विहरत, असलेले दिसल्यावर, सारेच निरर्थक, क्षणभंगुर, व निःसत्व आहे असा विचार मनात उद्‌भवतो. माध्यान्ही रविराज पूर्ण वैभवाने तळपत असताना जगन्नियंत्याच्या परिपूर्ण प्रेमाची तसेच अपरिमित सामर्थ्याची साक्ष पटते. निशापूर्व संधिप्रकाश धरतीला प्रकाशहिनतेच्या पांघरुणात गुरफटवून टाकीत असताना मनात शांति दिलसू लागते आणि सर्वत्र नीरवतेचे साम्राज्य स्थापित होते. रात्री तर चांदण्यांची बरसात सुरु होताच सृष्टी ससंतोष, साभिमान सहर्ष चमचमू लागते. व आकाश नक्षत्रांनी नटते. रंग-सौंदर्याची मुक्त उधळण करणाऱ्या या अनंत अंबराचे अध्ययन अजूनही अपूर्वच असून मन विहगाप्रमाणे त्यात भराऱ्या मारु पाहते, आत्मा तृप्त होतो. या सर्वव्यापी गगनाचे रहस्य उलगडण्यासाठी कितीही चिंतन, अध्ययन, मनन केले तरी ते अपुरेच वाटते, आकाश-पाताळ एक करुनही ते अगम्य राहते, आणि त्यामुळे राहून राहून वाटणारे आश्चर्य ओसरतच नाही, मात्र मनात शांति व तृप्ति, संतोष व प्रेम अभावितपणे दाटून येतात.

\+ + +

**DECEMBER 22**

## राष्ट्रीय पौष २

# ईशदत्त वक्तृत्व

सार्वजनीक सभेत भाषण देण्यापूर्वी भरपूर पूर्वतयारी करा. भाषणाचा प्रारंभ, शद्बोच्चार स्पष्टपणे करीत, पण खालच्याच सुरात होऊ द्या. विचारांत ओघ व मांडणीत मुद्देसूदपणा, तर्कसंगतता, व आटोपशीरपणा ठेवा. भाषणाचा समारोप पाल्हाळाविना झटकन करा. भाषणात तुडताळ उर्मटपणा नसावा की फाजिल आत्मप्रौढी नसावी. उलट त्यात मनापासूनची कळकळ आढळावी. श्रोत्यांची ऐकण्याची उत्कंठा टिकवून धरली पाहिजे. सांगावयाचे ते आडवळणाने मुळीच नको, अगदी उघडाउघड बोला. बोलण्याची धाटणी, तऱ्हा, शैली संभाषणवजा नि दाक्षिण्यपूर्ण ठेवा. शद्बांची सुसाट गाडी न सोडता, उचित जागी हवा तेवढाच विराम करीत चला. विचारांना पोषक असे हावभावही वापरा. नजर श्रोत्यांवर फिरवित रहा आणि आपल्या समुचित अंगविक्षेपांनी श्रोत्यांची नजर आपल्यावर खिळलेली राहू द्या. आवाजातल्या तळमळीने त्यांचे सारे अवधान स्वतःकडे वेधून घ्या. शद्बांवर अर्थानुरुप आघात द्या. विषयांतर होऊ देऊ नका. विधाने वाजवी व सत्याधिष्ठित अशीच वापरा. आता क्रमाक्रमाने आवाज चढवू लागा. लय द्रुत बनू द्या; तरीही श्वासासाठी मध्ये उसंतपण मिळवा. स्वतःचा तोल न घालवता, श्रोत्यांच्याच भावना उचंबळवून विचार त्यांच्या काळजांना भिडू द्या. मग त्यांची दोलायमान मनःस्थिती स्थिर होईल. संदेशातील तीव्र सत्याने भारुन श्रोत्यांनी तुमची विचार सरणी जर अंगिकारली तर तुमचे ईशदत्त वक्तृत्व अमोघ, सफल ठरेल.

★

**DECEMBER 23**

## राष्ट्रीय पौष ३

## (मार्गशीर्ष व. २, हुतात्मा श्रद्धानंद बलिदान दिन)

# मोठी मिळकत

दुसऱ्यासाठी काम करण्याची, सेवाकार्य करण्याची मदतीचा हात पुढे करण्याची सुसंधी लाभल्याबद्दल तुम्ही त्या जगन्नियंत्याचे समाधानपुर्वक कृतज्ञ रहा. कोणतेही एक विशिष्ट ध्येय मनाशी निश्चित करा आणि मग ते साध्य करण्यासाठी आपले सारे कर्तृत्व पणाला लावा. कार्य उत्तम प्रकारे तडीला जावे एतदर्थ मनाचे व शरीराचे सारे बल त्या कार्यार्थी एकवटून राबवा. तुमच्या ठायी, उपक्रमशीलता, स्वावलंबन, कार्यसक्ति, अशासारखे अस्सल गुण निपजावे या हेतुनेच, एखादे महान् कार्य परमेश्वर तुमच्यावर सोपवीत असतो. अशी संधि लाभणे हीच वस्तुतः एक मोठी मिळकत आहे. तेव्हा आनंदी मनाने, कृतज्ञतेच्या भावनेने, कर्तव्याच्या जाणीवेने, आत्यंतिक समाधानाने ते कार्य पार पाडण्यास प्रारंभ करा. कार्यभार अंगावर पडल्या बरोबर त्या दिवसाच्या शुभारंभीच कार्यपूर्ततेचा दृढ निर्धार मनाशी करा; आणि दिनान्ति तुमच्या मोठेपणात गुणवत्तेत रतिभर का होईना पण झालेल्या वृद्धीची मिळकत तुमच्या गाठीला लागू द्या. कार्याला हात घालण्याची ते पार पाडण्याची आणि अशाप्रकारे समाजाची सेवा करण्याची अमर्याद संधि देणारा, हुतात्मा स्वामी श्रद्धानंदाच्या बलिदानाचा हा दिवस यथोचित असाच आहे. तो सर्वांसाठीच असल्याने तुमच्या करताही तो आहेच. तेव्हा त्याचा पूर्णपणे उपयोग करा.

≈

**DECEMBER 24**

# राष्ट्रीय पौष ४

## (मार्गशीर्ष व. ३, येशूजयंति)

# जन्म—सार्थक्य

भोगपराङ्मुखतेने व स्वार्थत्यागाने मानवजन्माचे खरे सार्थक होऊ शकते. सेवाभाव व निस्वार्थवृत्ति बाळगल्याने चारित्र्य, मन, शील, स्वभाव सारी सहिष्णु व उमदी बनतात. जसजशी तुमची आत्मिक पातळी उंचावत जाते तसतसे, तुम्ही दुसऱ्यांना हवे असेल ते त्याना मिळू देण्यासाठी, स्वतःच्या इच्छांवर पाणी सोडू लागता. सेवावृत्तीने दुसऱ्यासाठी झिजणे, स्वतः भोगविन्मुख बनून, पडद्याआड राहून इतराना सुख मिळवून देणे, स्वतःच्या हिताला तिलांजली देऊन दुसऱ्याचे कल्याण साधणे, अशासारखी थोर कृत्ये केल्याने तुम्हाला, आंतरिक शांति आणि दैवी समाधान, दोन्ही लाभतात. प्रतिदिन सढळ हातानी, मुक्त मनाने, निरिच्छ बुद्धीने स्वतःला लुटत राहणे, संधि सापडताच दुसऱ्याच्या उपयोगी पडणे आणि अशा प्रकारे, हे जग, आहे त्याहून जास्त समर्थ, अधिक चांगले, विशेष सुखी—सुंदर बनविण्यासाठी मनापासून जाणीवपूर्वक झटत राहणे म्हणजेच भगवान जगद्‌गुरु श्रीकृष्णानी सांगितलेला निष्काम कर्मयोग आचरणे होय. नशिबाने तुम्हाला, हे सर्व सहजगत्या साधता येण्यासारखा, महान् मानवजन्म मिळण्याचा मान लाभलेला आहे. आज तर, महात्मा जगद्वंद्य येशूच्या जन्माचा दिवस. उठा, आलेली संधि वाया न दवडता, आजपासून, परोपकार करीत जीवन जगण्याचा नेम धरुन आजच्या दिवसाचे महात्म्य द्विगुणित करा आणि जन्म—सार्थक्य प्राप्त करा.

☆

**DECEMBER 25**

# राष्ट्रीय पौष ५

# बोधवचनरत्ने

थोर विचारवंत अरविंद सदा प्रसन्नचित्त राहात. हे साधण्याचे सारे श्रेय, ते आपल्या पायगती लावून ठेवलेल्या एका बोधवचनाला देत. 'भोवतालच्या लोकांचे चित्त तुजवर जडलेले आहे कारण त्यांचा तुझ्यावर पूर्ण भरवसा आहे. तेव्हा तुझ्या आदर्शांमुळे त्यांना धीर वाटेल अशा प्रकारे आपले वर्तन ठेवणे हे तुझे परम कर्तव्य होय.' हे बोधवचन दिसताच ते त्यावर अधिकाधिक चिंतनमनन चालवीत आणि स्वतःत सुधारणा घडवीत. तर बोधवचनांच्या ठायी अगणनीय अशी फार मोठी प्रेरकशक्ति निहित असते. मरगळू लागल्या जीवांना नवचैतन्य देतील अशी हजारो सुंदर समर्थ बोधवचने विद्यमान आहेत. हातपाय गाळलेल्यांना ती धीर आणि हताश जीवांना नवश्रद्धा बहाल करतात. अडचणींवर मात करण्यासाठी किंवा समस्या सोडविण्यासाठी लागणाऱ्या थोड्याशाच अधिक स्वावलंबनाची, आत्मविश्वासाची गरज, नड ती भागवितात. मार्मिक, चैतन्यदायी, कार्यप्रेरक बोधवचनांवर मनन–चिंतन केल्याने मन प्रगल्भ होते, चारित्र्य जोपासले जाते आणि कार्य यशस्वीपणे सिद्ध होण्यासाठी लागणारा आत्मविश्वास दुणावतो. हेच वचन पहा ना. 'मनुष्य, तसा प्रतिपरमेश्वरच, बनला असता; त्याला हाव जडती ना, तर.' ह्यातला बोध अंगी बाणला की बस! चारित्र्योन्नयनासाठी उपयुक्त अशी अनंत बोधवचनरत्ने साहित्यसोनियाच्या खाणीत जोडीने हाती लागतात.

**DECEMBER 26**

## राष्ट्रीय पौष ६

# एकच पण धड

अनेक कार्यांना एकाच वेळी हात घालण्याची सर्व-सामान्य पद्धत तुम्ही कटाक्षाने टाळा. एकच कार्य आरंभा व ते उत्तम रीतीने पार पाडा. अशाने पुढच्या कार्यासाठी तुम्ही अधिक समर्थ, निपुण, कार्यक्षम बनाल. या पद्धतीमुळे तुम्हाला गोंधळ व चिंता या दोन रोग-राक्षसांचे भक्ष्य व्हावे लागणार नाही. क्षुद्र, फालतू कामात वेळ वाया न दवडता उत्कृष्ट व महत्तम अशा कार्यासाठीच वेळ खर्च, करण्यावर कटाक्ष ठेवा. तुम्ही आपले कार्य जितक्या जास्त सुस्पष्ट निर्धारित व आखीव मार्गाने चालवाल तितकी अधिक सिद्धी तुमच्या पदरात पडेल. एका वेळी एकच कार्य हाती घेण्याची व ते पूर्णतया तडीस नेण्याची पद्धती, तुम्हाला स्वतः प्रगतीपथावर असण्याचे एक प्रकारचे समाधान लाभू देईल. जमेस धरता येईल असे एक तरी कार्य दिवसाकाठी पार पाडण्याचा निश्चयपूर्वक नियम करा. तो नियम कसोशीने अमलात आणा. निवडलेले विवक्षित कार्य सिद्ध करण्याच्या दृष्टीने मनाशी स्पष्ट रीतीने एकच बेत आखा. हा योजलेला बेत कार्यान्वित होईलच याबाबत आग्रहपूर्वक जागरुक रहा. अशा तऱ्हेने दररोज आखून पार पाडलेल्या एका एका बेताचा, निश्चयाचा, कार्याचा गोळा होत जाणारा एक एक बिंदू सरतेशेवटी आश्चर्यजनक रीतीने अतिविशाल अशा अथांग कार्यसागरात परिणत झालेला तुम्हास आढळून येईल.

– ० –

**DECEMBER 27**

# राष्ट्रीय पौष ७

# ज्ञानदाते ग्रंथ

समुचित इष्ट ज्ञानाचे अर्जन हा वाचनाचा प्रमुख उद्देश असतो. त्याने चारित्र्याची सद्प्रवृत्तींची जोपासना साधते, जीवन सुसंस्कारित होते आणि शील सुदृढ बनते. यासाठी चांगली पुस्तके व उत्तम ग्रंथ यांची निवड व्यवस्थितपणे साधली पाहिजे. लहर लागेल तेंव्हा, वा वेळ मोकळा सापडेल तेव्हा, वाचायला मिळेल अशा बेताने एखादा उत्तम ग्रंथ हातासरसा ठेवलेला असावा. एरवी उधळामाधळीत वाया दवडले जाणारे थोडे थोडे मोलाचे क्षण, अशा रीतीने वाचनात सत्कारणी लावले जाऊ शकतात. या प्रकारे दिवसागणिक व पुढे महिनोगणति वाचनी लागलेले रोजचे चार क्षण तुमच्या दृष्टीने केवढे तरी लाभदायी ठरतील याची तुम्हांला पुरेशी कल्पना येऊ द्या. जगातल्या महान् महान् प्रज्ञावंतांनी लिहून ठेवलेले थोर थोर ग्रंथ आपल्यावर मानसिक व आध्यात्मिक संस्कार घडविण्यासाठी सदैव उपलब्ध असतात. ग्रंथ हे सर्वश्रेष्ठ ज्ञानदाते होत. सुरवातीलाच उल्लेख झालेले, इष्ट ज्ञानाचे अर्जन साधण्यासाठी तीन टप्प्यांतून पार पडावे लागते. प्रथम व्हायला लागते नव्या ज्ञानाचे आकलन. मग ते ज्ञान पचनी पाडून घ्यावे लागते पुरेसे प्रयास करुन. सरतेशेवटी, अशा अर्जित ज्ञानाचा, प्रत्यक्षात उपयोग केला जावा, वापर साधायला हवा, प्रयोग घडावा. तरच गुरुस्थानी असणाऱ्या या ज्ञानदात्या ग्रंथांचे पांग फिटतील.

DECEMBER 28

# राष्ट्रीय पौष ८

# महागडी चिंता

चिंता चालू ठेवणे, काळजी करीत बसणे, तसे फारच थोड्या लोकाना परवडावे. कारण ती फारच खर्चिक, महागडी अशी दुष्ट सवय आहे. तिचा एकही उपयुक्त परिणाम आढळत नाही. पण या व्यसनापायी किंमत मात्र फार मोजावी लागते. आढळते असे की ज्याबद्दल आपण मनानेच अगाऊ चिंता करीत बसतो त्यापैकी सुमारे बव्हंश गोष्टी वा घटना घडतच नाहीत. चिंता वा काळज्या दोन प्रकारच्या. एक, ज्यांच्याबद्दल तुम्हाला काहीच करता येण्याजोगे नसते. दुसऱ्या प्रकारच्या अशा की ज्या निर्माण होणे न होणे तुमच्या आधिन राहते. जिथे तुमचे काही चालणारच नसते त्याबद्दल व्यर्थ्य चिंता करण्यात काळ घालवून काय उपयोग ? बरे, ज्यावर नियंत्रण ठेवणार तुम्ही, त्याबाबतीत योग्य ते उपाय योजणे हेच जास्ती शहाणपणाचे नाही का? जिवाला घोर वा चुटपुट लागू देण्यात जेवढी मानसिक शक्ति व शारीरिक ताकद उधळली जाते ती सारी परिस्थितीवर मात करण्याच्या प्रयत्नात वापरली गेली तर काळजीची मूळ कारणेच नष्ट होतील. चिंता हा तसा दुर्धर रोग मुळीच नव्हे. चिंता करीत बसणे, ही मानसिक शक्तीचा निश्चितपणे अपव्यय करण्याची एक अजब तऱ्हा आहे. स्वतःला, आवडीच्या अशा एखाद्या चांगल्या कार्यात पार बुडवून टाकणे, हा या रोगावरचा जालीम उपाय आहे. जो भोग नशिबी आलाच म्हणा, त्याबद्दल कुंथण्यात काय अर्थ?

**DECEMBER 29**

## राष्ट्रीय पौष ९

# घ्या खबरदारी

दुसऱ्यांच्या भावनांची जाण बाळगण्याची सुरेख सवय जर तुम्ही जोपासलीत तर तुम्ही जीवनात खूप सुखीसमाधानी व्हाल इतरांबद्दल कळकळ बाळगीत, कोणाचेही मन न दुखविता, दुसऱ्याची खूप काळजी घेत जीवनात वक्तशीरपणे चिकाटीने व्यवहार कराल तर भोवतालच्या जगाबद्दलचे तुमचे मत अधिक अनुकल बनत जाईल. जाणीवपूर्वक नेकीने, निपुणतेने, निष्ठेने, आपण हाती घेतलेले काम तडीस नेले आहे या विश्वासात समाधान व कृतकृत्यता असते. शिवाय त्यामुळे पुढले कार्य अधिक कर्तृत्वपूर्वक पार पाडण्याची प्रेरणा लाभते. परस्परात घडणाऱ्या दैनंदिन छोटयामोठया व्यवहारातूनच प्रत्येकाच्या मनात दुसऱ्याविषयी सहानुभूति, सहिष्णुता, सद्भाव निपजतात. मृदुता, कोमलता, सुकुमारता, यांचा सत्ता, प्राबल्य, सामर्थ्य यांच्याशी तिळमात्र संघर्ष नाही. त्यांच्यात आपसात विसदृशता, वा विसंगतीही नाही. कोमलता ही, आत्म्याच्या उमदेपणाचे एक मुख्य लक्षण आहे. कोणाचेही मन न दुखविण्याची, दुसऱ्याची मुक्तकंठाने प्रशंसा करण्याची, विचारपूर्वक परोपकार करण्याची, व उदारतापूर्वक इतरांच्या उपयोगी पडण्याची क्षुल्लक देखील संधि वाया न दवडता तिचा फायदा मिळविण्यासाठी दक्ष रहा. मानवजन्मातच असे काही करणे शक्य असते. तो फिरुन लाभेलच याची मुळीच शाश्वती नाही. तेव्हा घ्या तर खबरदारी, या साऱ्या चांगल्या गोष्टी वेळीच करण्याची.

## DECEMBER 30

## राष्ट्रीय पौष १०

# जोड कार्यसिद्धीसाठी

आयुष्यांत काही बनायचे असेल, काही करुन दाखवायचे असेल, काही मिळवायचे असेल तर निश्चित उद्दिष्ट, अथक परिश्रम व उच्च महत्त्वाकांक्षा यांची सांगड जमली पाहिजे. जर तुम्हाला कार्यसिद्धीच्या उच्च शिखरावर विराजमान व्हायचे असेल तर एखादे महत्कार्य आपली सारी शक्ति पणाला लावून पार पाडण्याचे उद्दिष्ट तुम्ही आपल्या दृष्टीपुढे ठेवायला हवे. अशा प्रकारे आपल्या जीवनकार्याची एकदा निश्चित निवड तुम्ही केलीत, की मग तुम्हाला आपोआपच, आपली शक्ति द्विगुणित झाल्याची, निर्धार दृढतर झाल्याची, हिंमत बलवत्तर झाल्याची खात्री प्रत्ययास येईल. शिवाय अनेक प्रेरक, प्रभावी, पोषक तत्त्वे तुमच्या प्रगतीत तुमचा पाठपुरावा करण्याच्या एकमेव उद्देशाने कार्यप्रवण झाली आहेत असेही तुम्हाला जाणवू लागेल. आपण आपल्या थोर उद्दिष्टांच्या दिशेने काही उपयुक्त, भरीव अशी वाटचाल आजच्या दिवशी गाठीला बांधली आहे, असा विश्वास रोजच्या रोज स्वतःला वाटू लागताच तुमचे धैर्य, जोम, उत्साह सारीच बलवत्तर होतील. शिवाय ह्याहून मोठी कार्ये आपल्या हातून पार पडण्याची शक्यता आता तुमच्या मनात उद्भवू लागेल. उद्दिष्टमार्गावरील हा टप्पा एकदा का तुम्ही गाठलात की अशा सुयोग्य कार्याला देवाच्या मान्यतेची परमेश्वरी सहाय्याची, ईश्वरी प्रेरणेची जोड लाभेल. महत्त्वाकांक्षेला परीश्रमाची जोड लाभताच कार्यसिद्धी नक्कीच.

★

**DECEMBER 31**

# राष्ट्रीय पौष ११

# ईशस्वरूप पुष्प

परमेश्वराने स्वतः केलेल्या चिंतनाचा दृश्य पुरावा आणि त्याचे फलित म्हणजे त्याने निर्मिलेली पुष्पे. अगदी इवल्यातल्या इवल्या सुमनाचाही सुवास, त्याचे सौंदर्य, त्याची सुषमा, ही सारी त्या परम निर्मात्याच्या असीम, अवर्ण्य, आवाक्याची बोलकी रुपे होत. फुलांच्या एखाद्या सुरेखशा झुबक्यावर मोहून जाऊन ज्यावेळी तुम्ही तो न्याहाळीत असता, त्यावेळी तुम्ही जणू त्या ब्रह्मदेवाने रचलेली कविताच ऐकत असता. भगवंत या कुसुमांद्वारे तुम्हाला खूपच काही सांगत असतो. त्याने सूचित केलेले विचारही या कुसुमांसारखेच सुसंवादी, भावप्रदर्शक व परिपूर्ण असतात. जगन्निर्मात्याने रचलेल्या पुष्पसृष्टीतर्फे व्यक्त होत असलेले कितीतरी सुविचार आत्मसात् करण्याचा व पुढे ते स्वतःचे समजून वापरण्याचा अधिकार, वापरण्याचे भाग्य तुम्हाला लाभलेले आहेत. मुग्ध कळ्या व विकसित सुमने, वृक्षराजी व पर्वतमाला, नील गगन व अथांग सागर, ही सारी पाहत असताना त्या सर्वांद्वारा गुंजणाऱ्या परमेश्वरी आवाजाचा वेध घ्यायला शिका. त्याने धाडलेले विविध संदेश आता तुम्हाला हळूहळू आकळू लागून ग्रहण करता येतील. निसर्गवैभव आणि सृष्टिसौंदर्य सदा, परमेश्वराच्या प्रेममयतेची, रचनाकाराच्या चातुर्याची, सृष्टिकर्त्याच्या सामर्थ्याची, जगन्नियंत्याच्या अनन्यत्वाची, एक गूढरम्य कथा तुम्हाला ऐकवीत असतात.

★

JANUARY 1

# राष्ट्रीय पौष १२

# थोरपणा धर्माचरणांत

तुमच्या कार्यप्रवृत्तीत सुधारणा घडवून त्यांचे उदात्तीकरण करणे हे धर्माचे खरे कार्य होय. सर्वसामान्य भौतिक बाबींवरुन तुमचे लक्ष उडवून, मन उच्च आध्यात्मिक उद्दिष्टांकडे वळविणे हा धर्माचा प्रमुख हेतु असतो. असे असल्याने तुम्ही प्रत्येक दिवसाचा काही भाग शाश्वत टिकावू स्वरुपाच्या आध्यात्मिक विषयांच्या चिंतन - मनन - अध्ययनात व्यतीत करावा हे संयुक्तिकच ठरते. प्रेम, नम्रता, सहनशीलता हे दैवी गुण तुमच्या अंगी बाणवावे असा धर्माचा सतत प्रयत्न असतो. धर्माचरण, प्रभूशी तुमचे संबंध, जास्त जिव्हाळ्याचे करुन देते आणि आध्यात्मिक उत्थानाच्या दिशेने तुमची पावले वळविते. आतापर्यंत होऊन गेलेल्या जगातल्या सर्व थोर विभूति अतिशय धर्माचरणी होत्या. धर्माचरण व थोरपणा हे दोन्ही शद्ब समानार्थीच आहेत म्हणा ना. ऐनवेळी हातपाय गाळून बसलेल्या कर्मच्युत अर्जुनाला प्रवृत्तिमार्गी बनविण्यासाठी, भगवंताने कुरुक्षेत्रावर कौरव-पांडव युद्धप्रसंगी निष्काम कर्मयोग आचरण्याचा जो उपदेश केला त्याचे अध्ययन करुन तो आपल्या कृतीत उतरविण्यासाठी उद्युक्त व्हा. आपापले योग्य विहित कर्म जीवनात करीत राहणे हेच प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे निरिच्छया कर्म करण्यात तुम्हांला आगळा उन्नयनकारी आनंद लाभेल.

\+ + +

JANUARY 2

## राष्ट्रीय पौष १३

# कृतार्थता देण्यांत

इतरांकडून काही घ्यावे लागण्यापेक्षा त्यांना काही देता येणे अधिक गौरवमय, उपकारक हितावह असते. जेव्हा, जशी व जेवढी संधि मिळेल तेव्हा, तेवढे, तसे इतरांचे कल्याण करीत चला. गरीबांना, गरजूंना, ग्रामवासियांना यथाशक्ति मदत करा. पेरलेल्या दानातून उगवलेले पुण्य परलोकीही कामी येईल; इहलोकीचा तर प्रश्नच नाही. तुमच्याजवळ देता येण्याजोगे जे जे म्हणून असेल ते ते कर्ण-पणाने द्या. मनापासून, उल्हासपूर्वक, शक्तिनुसार देत राहणारा, प्रभूला फार पसंत पडतो. भुकेला, व्याकुळलेला असेल तर शत्रूला-सुद्धा खाऊ घाला, तहानलेल्यांचे तृषाशमन होऊ द्या. आज तुम्ही, आपल्या कुवतीनुसार का होईना पण, दिलेले असलेत तर उद्या तुम्हाला त्याचे फळ मिळणारच. मात्र तशी कामनामात्र मनात वासापुरतीही नको, दातृत्वाची वासना, इच्छा, भावना मनात उद्‌भवू द्यात, उचंबळू द्यात. ओसंडून वाहू लागू द्यात. या दान देण्याच्या दानतीची लागण झाल्याविना राहत नाही. ज्याला जे सुचेल, भावेल, फावेल ते त्याने दानभावनेने देऊन टाकावे, न कुरकुरता – दडपणा-विना – उत्स्फूर्तपणे. कमलावराकडून अनंत हातांनी मिळालेले असते ते दो करांनी गाडून ठेवण्याचा अट्टाहास करू नका; तर मुक्त हस्तांनी लूटून टाका, जे काही इतरांनी तुमच्यासाठी करावे, तुम्हाला द्यावे, तुमचे चाहावे, ते सारे सारे तुम्ही त्यांच्यासाठी करा, त्यांना द्या, त्यांचे चाहा.

**JANUARY 3**

## राष्ट्रीय पौष १४

# श्रीमंतीविनाही यश

यशःप्राप्ति म्हणजे दुसरे तिसरे काही नसून उल्लेखनीय कार्यसिद्धी हेच होय. अपूर्व असे काही कार्य हाती घेणे व ते परिपूर्णतेने पार पाडणे म्हणजेच यश मिळविणे. व्यावहारिक भाषेत विशिष्ट दृष्टीकोनातून, जीवनातील समृद्धि, भरभराट प्राप्त करणे म्हणजे यश मिळविणे. मात्र यशस्वितेची असली आर्थिक कसोटी काही मर्यादेपर्यंतच योग्य मानली जावी. अर्थप्राप्ति आवश्यक असते जीवनात; पण सुबत्ता हा सुयशाचा एक अंशच वाटावा. श्रीमंतीविना यशप्राप्ति अशक्य, हा भ्रम डोक्यातून काढून टाकलेलाच बरा. वरच्या पातळीवर जाऊन विचार केला की, एक विशिष्ट महान् उद्दीष्ट गाठता येणे हेच यश. आपली विचारशक्ति, वेळ, कर्तृत्व सुयोग्यपणे वापरलीत हाच त्या यशाचा मुख्य अर्थ. सुयोग्य कार्य निवडून ते पार पाडलेत ना ? संपले ! यश लाभले. श्रीमंती नसेल आली. वैयक्तिक कार्यशक्ति तुम्ही पुरेशा विकसविल्यात, यथायोग्यपणे वापरल्यात, यशप्राप्ति झाली. श्रीमंतीची जोड आलीच पाहिजे असे कुठेही कोणीच मानु नये. आदर्श दृष्टीकोनातून, कार्यसिद्धी लाभली एवढाच यशाचा पूर्ण अर्थ आर्थिक स्थिति सुधारणे त्यात अंतर्भूत नाही. त्याचप्रमाणे, कार्यसिद्ध्यर्थ प्रयत्नांची पराकाष्ठाच आवश्यक. श्रीमंतीची त्यासाठी सुतराम् गरज नाही. फक्त तळमळ कळकळ असावी. समाधान जे वाटावयाचे ते कार्यसिद्धीचे, म्हणजेच यशःप्राप्तीचे, श्रीमंतीविनाही.

**JANUARY 4**

# जीवन व विचार

कारण व त्याचे कार्य वा परिणाम यांच्या परस्पर संबंधाचा नियम तुमच्या जीवनाचे नियंत्रण नेहमीच करीत असतो. आज तुम्ही काय, कशाचा, कसला, कसा विचार करता आणि प्रत्यक्षात तुम्ही कृतीने तदनुसार कार्य करता का तद्विपरीत, यावर तुम्ही काय बनणार पुढे हे अवलंबून असते. आरोग्य, यश, सौख्य, मालमत्ता यांच्या प्राप्तीवर जर तुमचा जोर, कटाक्ष, विश्वास असेल, त्याना तुम्ही तुच्छ मानीत नसाल विरागीपणाने, तर ही सारी, तुमच्याही जीवनात निर्माण होऊ शकतील; जसे तुमचे रोजचे विचार असतात, तदनुसार तुमचे जीवन घडत जाते. उच्च, दैवी विचार ग्रहण करण्यास तुमचे मन सदा उत्सुक, उघडे, असू द्या. आपोआप तशा प्रकारचे विचार हळूहळू तुमच्या मनात प्रवेश करुन आपल्या प्रकाशाने तुमचे हृदय उजळून टाकतील. जीवन व विचार हे परस्परानुसारी असतात. आपले सर्वतोपरि कल्याण साधावे म्हणून त्या जगन्नियंत्याबद्दलचेच विचार बाळगायला हवेत सदैव मनात. तो आपल्या भक्तकल्याणाच्या ब्रीदाला जागणारच. कर्तव्यपराङमुख न होण्याचा नारायणाने नराला केलेला उपदेश, सांगितलेला विचार, आपल्या निष्काम कर्मयोगी जीवनात आचरुन, परमेश्वरप्राप्ति, मुक्ति प्राप्त करा.

卐

राष्ट्रीय पौष १६

# जग ही प्रशाला

जीवन उत्कृष्टपणे जगण्याची कला, अनेक वर्षांचे वळण, शिस्त, निरीक्षण, अनुभव ही गाठीला पडल्यावर साध्य होते. जसजसे वय वाढत जाते, तसतशा, हातून घडलेल्या चुका, घेतेले गेलेले गैरवाजवी निर्णय, सुधारण्याच्या संध्या अनेक वेळा लाभत असतात. असे वेगळे धोरण ठेवायला हवे होते, तसा पवित्रा घेतला असता तर बरे झाले असते, निर्णय त्या दृष्टिकोनातून करायला हवा होता, हे नंतर का होईना, ध्यानात येताच मनुष्य ती ठेच स्मृतीत ठेवतो व आलेले शहाणपण पुढील वेळी वापरतो. तेव्हा एक गोष्ट नीट ध्यानात घ्या. जग ही एक अध्ययनार्थ अशी प्रशाला आहे. हिच्यात जीवनयापनाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. कसे वागावे, काय वर्ज्य करावे, बेत कसे योजावे, योजना कशा पार पाडाव्या, धोरण कोणते निवडावे इत्यादींबद्दलचे या प्रशालेत सप्रयोग अध्ययन करायला मिळते. अनुभव हा इथला प्रमुख अध्यापक. तो असतो फार कडक व निष्ठुर. पण त्याच्या तालमीत तावून सुलाखून बाहेर पडल्यावर लाभलेले ज्ञान, आलेले शहाणपण, फार उपयुक्त ठरताच कल्याणप्रद सिद्ध होतात. या जीवनप्रशालेतले अनुभव गुरुजींनी नेमून दिलेले धडे जर वक्तशीरपणे गिरविलेत तर अनुत्तीर्ण होण्याचौ भीति नको. उद्भवलेल्या समस्येचे, उपस्थित झालेल्या प्रश्नाचे, उत्तर तुम्हाला देता येईलच येईल.

●

JANUARY 6

राष्ट्रीय पौष १७

# निर्धारपूर्वक कृति

एक अविनाशी अगोचर आत्मतत्त्व चराचराला व्यापून आहे. त्या शिवाची शरीरस्थ जिवाशी सांगड पडणे शक्य आहे, प्रयत्नसाध्य आहे, असा विश्वास तुम्हाला वाटू लागताच हे उद्दिष्ट गाठण्यासाठी एक नवी श्रद्धा, नूतन शक्ति, तुमच्या मनात प्रदीप्त होतील. हे श्रद्धासामर्थ्य तुमच्या दैनंदिन व्यवहारात प्रत्यक्ष वापरात येऊ लागताच नवनवीन प्रयत्न व अन्यान्य कार्यसिद्धी तुमच्या आटोक्यात येऊ लागतील. आता जसा तुमच्या मनाचा कायाकल्प होऊ लागेल. आयुष्याचे, स्वभावाचे, चारित्र्याचे एक नव्याने मोजमाप काढणे आता तुम्हाला आवश्यक वाटू लागेल नि ते शक्यही होईल. एका उच्च आध्यात्मिक पातळीवरुन तुमची विचारधारा एकदा वाहू लागली की तुमची आदर्श जीवनपद्धतीच्या दिशेने वाटचाल सुरु झालीच म्हणून समजा. जसे विचार तुम्ही आपल्या मनात बाळगाल नित्य तसे तुमचे जीवन क्रमाक्रमाने घडत जाईल. स्वकर्तृत्वाचा व प्राप्त संधीचा अधिकात अधिक फायदा करुन घेण्यासाठी झटत रहा, विचार ठरवा, चिंतन चालवा, निर्णय घ्या आणि मग जराही दिरंगाई न करता निर्धारपूर्वक कृति चालू करा. फत्ते तुमचीच.

JANUARY 7

# राबा चिकाटीने

या जगात ज्या ज्या प्रख्यात थोर व्यक्तींनी महान् कार्ये अंगिकारुन ती उत्तम रीतीने पारही पाडली त्या त्या साऱ्या व्यक्ति महामेहनती व प्रचंड उद्योगी होत्या. त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे धरुन त्यांचे अनुकरण करण्यात सर्वांचाच फायदा आहे. विद्यमान परिस्थितीत ज्या कांही जबाबदाऱ्या तुम्ही पत्करलेल्या असतील त्या साऱ्या खंद्या उद्योगशीलतेने पार पाडा. अंगावरची जोखीम यशस्वीपणे पेलण्यासाठी उद्दिष्टाला प्राधान्य देणे व कमालीची चिकाटी दाखविणे दोन्ही अत्यावश्यक आहेत. महान् कार्यसिद्धीसाठी लागणारी विविध साधने पुष्कळांजवळ असतात पण आवश्यक ती उद्योगरतता व कार्यक्षमता थोड्यांजवळच आढळतात. सुयोग्य प्रकारचे हुषारीने केलेले अविश्रांत श्रम कोणत्याही प्रकारच्या महत् कार्यात नावलौकीक मिळविण्यास सहाय्यभूत ठरतात. परमयश संपादन केलेल्या पुरुषोत्तमांच्या चरित्रांतून तुम्हाला भरपूर प्रेरणा व अमाप स्फूर्ति लाभेल. जर कार्यपूर्तीची अदम्य अभिलाषा मनात असेल तर पुरेसे कष्ट करा, ह्राच त्या चारित्रांचा स्फूर्तिदायक, सुस्पष्ट सार-संदेश आहे. अत्यंत विकट, सर्वस्वी प्रतिकूल व संपूर्णपणे निराशाजनक परिस्थितीतही दीर्घोद्योग अविरतपणे चालू ठेवण्याची अपराजेय इच्छाशक्ति तुम्ही कमवा की यश निश्चितपणे तुमचे.

☆

## राष्ट्रीय पौष १९

# धीरगंभीर वृक्षराज

महान् वृक्षराज म्हणजे प्रगति सौंदर्य नि परोपकार यांचे बोधकारी व प्रेरणादायी चरित्रच. सुसाट वादळवाऱ्यात आणि तळपत्या उन्हात सारख्याच छातीठोकपणाने व धीरगंभीरतेने ताठ उभा ठाकणारा हा जसा मूर्तिमंत भारदस्तपणाच. त्याची विस्तृत पाळमुळे ही तर सखोलता सुरक्षितता यांची जणु प्रतिकेच. त्याच्या पर्णराशीत आणि शाखाविस्तारात सुषमा व सौंदर्य ओतप्रोत असतात. मौन पण जबरदस्त खराच हा प्रचंड वृक्षराज. जसा काही रक्षकच उभा ठाकलेला, आपल्या गर्द छायेत निवाऱ्यासाठी विसावलेल्यांच्याकरिता. हा अतिविशाल धीरोदात्त वृक्षराज वर्धमान होत जाऊन होता होता सौंदर्याने शोभू लागला. त्याप्रमाणेच तुमचेही जीवन क्रमाक्रमाने उमलावे, फुलावे, विकसित होत जावे. तुमच्या चारित्र्याची मुळे आदर्श तत्वनिष्ठेत खोल खोल रोवली जाऊ देत. तुमचे मन त्या पर्णराशीप्रमाणे सदा प्रकाशोन्मुख राहू द्या. तुमची ध्येये नि आकांक्षा त्याच्या शाखांप्रमाणे सतत स्वर्गाकाशाकडे वर वर चढू द्या. अशाने, त्या थोर धीरगंभीर वृक्षराजाप्रमाणेच तुम्हीही करता करता समर्थ व सुंदर बनाल, भोवतालच्यांना आसरा द्याल आणि परमेश्वरी संकेत पूर्ण कराल.

राष्ट्रीय पौष २०

# पटवणुकीचे धोरण

इतरांनी केलेल्या उपयुक्त सूचनांचे मोकळ्या मनाने स्वागत करण्यास सज्ज रहा. भोवतालच्या जगाबद्दल अपेक्षामय, आशापूर्ण व निस्वार्थी अशी आपल्या मनाची ठेवण असू द्या. तुमच्या स्वभावातल्या समर्थ, ओजपूर्ण आणि उत्थापक वृत्ति वृद्धिगत करण्यावर भर ठेवा. जोम जोपासून, टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त अशा तुमच्या श्रद्धेची किंमत आणि तिचे सामर्थ्य नीट ओळखण्यास शिका. निर्मळता, सामर्थ्य, पावित्र्य, आरोग्य अशा विषयींच्या चेतनादायक विचारांवर पुनः पुनः भर द्या. आत्मविश्वास, गंभीरपणा प्रसन्नचित्तता आणि हितकारिता यांची प्रयत्नपूर्वक जोपासना करा. तुमच्या मनात उद्भवणारा प्रत्येक सुविचार तुमच्या मानसिक शक्तिसंचयात भर टाकीत जातो. योग्य मानसिक वळण व सवयी यांच्यामुळेच आदर्श शारीरिक स्वास्थ्य प्राप्त होत असते. तुमच्या मनःश्चक्षूंसमोर कल्पनासृष्टीत विहार करण्याच्या उपयोगी अशी धैर्याची उदात्त स्वप्नदृश्ये तरळू द्यात. सौख्यारोग्यवृद्ध्यर्थ दैनंदिन प्रार्थना व आध्यात्मिक चिंतन, यांच्याहून अधिक चांगले औषधी उपचार वा प्रभावी इलाज इतर दुसरे नाहीत. दुसऱ्यांचे विचार–मार्गदर्शन यांचे मोकळ्या मनाने स्वागत करा, त्यांच्यावर साधक बाधक उहापोह होऊ द्या. समजूतदारपणा दाखवून अन्यांचे उपयुक्त, सुयोग्य, सुरुचिपूर्ण विचार पटवून घ्या, स्वीकारा, अमलात आणा. पटवणुकीचे, हे मिळतेजुळते घेण्याचे धोरण हितावह होईल.

**JANUARY 10**

## राष्ट्रीय पौष २१

# चिकित्सक आशावाद

आशावादी वृत्तीच्या दोन तऱ्हा आढळतात. एक असते बुद्धिवादी, तर दुसरी अडाणी. पहिली बाळगणारी व्यक्ति सर्व काही सुरळीत पार पडेल अशा विश्वासाने पायावर पाय डाळून स्वस्थ बसून न राहता स्वतःही कार्यप्रवणतेने राबते. तर दुसरी अडाणी आशावादी दैवावर विसंबून पार निष्क्रिय बनते. हे सारे विश्व काही शुभ व्हावे म्हणूनच रचले गेलेले आहे, हा सारा जगड्व्याळ पसारा जीवमात्राच्या कल्याणार्थच मांडला गेलेला आहे आणि लोकवृत्तीचा कौल सत्यं, शिवं, सुंदराच्या बाजूलाच झुकतो असे बुद्धिमान आशावादी मानतो. जीवनांतले सर्वोत्तम तेच निवडण्याच्या त्याच्या बुद्धिप्रधान आशावादी वृत्तीचे, इष्ट प्राप्तव्य मिळविण्यात त्याला सर्वतोपरि सहाय्य लाभते. सुख तशी आहे एक मनोवृत्ति, पूर्ण निराकार. साकार असती तर बुद्धिगम्य होती. पण ती असते अकल्पनीय. मात्र निश्चितपणे अनुकूल अशी. महान सिद्धीच्या यशोमंदीराला चिकित्सक आशावादाचा पाया असावा लागतो. आशावादी स्वतःसाठी सर्वोत्तम ते वेचू शकतोच; शिवाय तो आपल्या सहकाऱ्यांचा एकनिष्ठपणा व धीर दोन्ही वाढीस लावतो. विचक्षण आशावादामुळे कार्यसिद्धयर्थ आवश्यक असा जोम वृद्धिगत होतो. विशेष जोखमीच्या महान् कार्याला हात घालण्यास प्रवृत्त करणारी प्रेरक शक्ति तर अशा आशावादी आवेशापोटीच निपजते.

—०—

**JANUARY 11**

राष्ट्रीय पौष २२

# शिल्पकार चिंतन

विचारव्यवहार सुस्पष्ट व बिनचूक होण्यास प्रत्यही चिंतनासाठी बसण्याची सवय प्रभावपूर्ण व साधनीभूत ठरते. मनोबल केंद्रित करण्याने सुप्त सखोल विचार बुद्धिगोचर होऊ लागतात. अशी पद्धत पाडण्याने महान् कल्पना निपजतात आणि भव्य योजना स्फुरतात. मन ज्ञानदायिनी व निर्मात्या शक्तींचे उगमस्थान आहे. सुसंस्करण बद्धमूल करण्याचा आटोका मनालाच असतो. तुमचे जीवन विशाल व समृद्ध होण्यास्तव मनाला सतत श्रमपूर्वक तालीम देणे आवश्यक आहे. तुमची उपजत बुद्धी, सक्षम इच्छा, उसळती आकांक्षा व सखोल चिंतन, हे सारे तुमचे जीवन, चारित्र्य आणि वर्तन घडविणारे मूक शिल्पकारच होत. शांतपणे एकांतात बसून विचारमंथन-चिंतन होण्यासाठी दिवसाकाठी निर्धारित अवधी अवश्य राखून ठेवा. असे चिंतनप्रधान विचारमंथन-उच्च, उदात्त, उत्कृष्ट-जीवन घडविण्यासाठी लागणाऱ्या, प्रवर्तक प्राप्य प्रेरणांची जोपासना करील. ब्रह्मदेवाने तुम्हाला असामान्य, विधायक, कार्यक्षम मनःशक्ति योजनापूर्वक बहाल केल्या आहेत. त्यांचा यथाशक्ति, यथासंभव व यथेष्ट वापर करण्याची जबाबदारी तुमच्यावरच पडते. ती अंगाबाहेर झटकून टाकू नका. त्या चिंतनरुपी थोर शिल्पकाराकडून तुमची देखणी, सुबक व रेखीव अशी जीवनमूर्ति घटवून घ्या.

# विचारानुसारी शरीरबदल

अध्यात्मदृष्टचाच नव्हे तर वैद्यकीय दृष्टीनेही मानसिक आरोग्य हाच मूलतः शारीरिक आरोग्याचा पाया मानला जातो. महान् विचार, उच्च उद्दिष्टे आणि उत्तुंग आकांक्षा सर्वजण मिळून एकसमयावच्छेदेकरुन मनाला चेतवून बुद्धीला प्रेरणा, स्फूर्ति, चालना देतात. या मन-बुद्धि यांचा अप्रत्यक्ष पण इष्ट असा प्रभाव शरीरावर होऊन ते पवित्र, बलिष्ठ, मंगल व जोमपूर्ण बनते. एक समर्पित भक्तिभाव नैसर्गिकपणे मनात उद्‌भवून, जिवाला शिवाच्या भेटीची तळमळ लागली की आत्मा बलवान् बनतो. मानसिक बल आणि शारीरिक जोम दोन्ही वृद्धिगत करण्यात आध्यात्मिक विचारांचे महत्त्व व सामर्थ्य किती, याचे वास्तविक, यथायोग्य मूल्यांकन करणे अवघड आहे. बेजबाबदार विचारपद्धति विनाशकारीच नव्है तर आत्मघातकीही सिद्ध होते. तुमचे विचार उदात्त बनतील याची खबरदारी घ्या आणि मग पहा तुमचे जीवन कसे निरामय, सर्वांग-परिपूर्ण, आदर्श बनते ते. जर तुमच्या मनात स्पष्ट, सुयोग्य, सुष्ट व विधायकच विचार वर्ततील, वसतील, वावरतील, तर तुमचे शरीरही तदनुषंगाने समर्थ, सुदृढ, सशक्त बनेल अशी निःशंकपणे ग्वाही देता येईल. पुरेसे शरीर बळ प्राप्त करण्यासाठी विधायक विचार वागवून मन सबल करा. अशा विचारांच्या अनुसरणाने शरीरही बलवान बनेल.

– ० –

## राष्ट्रीय पौष २४

### (पौष शु. ९, मकरसंक्रमण)

# टिकाऊ मैत्री

स्वार्थी सौदेबाजीच्या कच्च्या पायावर, खऱ्या मैत्रीची टिकाऊ अशी इमारत उभारता येणारच नाही. आदर्श मैत्री, गैर-वाजवी असे तर नाहीच नाही, पण काहीच मागत नाही. सच्ची मैत्री फाजिल हळवी नसते. ती, मोबदल्याची इच्छा न धरता सदैव देतच राहते व दोषा-चुकांकडे उदारपणे डोळे झाक करते, त्याच-प्रमाणे कोणालाही न दुखविण्याची खबरदारी घेते. संशयाचे सावट पसरणार अशी पुसट जरी शंका आली तरी खरी मैत्री, कसबीपणाने व तारतम्याने, त्याचे निराकारण होईल अशी सावधगिरी वेळीच बाळगते. उच्च मित्रतेत कळकळ, सहानुभूति, सदिच्छा, आपुलकी दृगोचर होतात. ती अहंभाव बाळगीत नाही, आपलाच हेका चाल-वीत नाही; दुसऱ्याचे ऐकून घ्यायला व दुसऱ्याची सेवा करायला सदा सिद्ध असते. आदर्श मित्र लाभण्यासाठी प्रथम आपण तसे बनायचे. वरचे सारे आचरणाचे नियम पाळून उल्लेखित सद्गुण अंगी बाणवायचे. परतफेड व प्रशंसा होण्याची काडीमात्र लालसा न बाळगता, ज्या प्रमाणात तुम्ही देत राहण्याची, सेवा करण्याची, सहानुभूतीने वागण्याची, मदत करण्याची वृत्ति दाखवाल, त्याच प्रमाणात तुम्हाला टिकाऊ खरी, आदर्श मैत्री जोडता येईल. आजच्या मकरसंक्रमणाच्या पर्वकाळी, जोडलेल्या मित्रांना आठवणपूर्वक तिळगूळ देऊन मैत्री बलवत्तर कराच; शिवाय नव्या इष्ट व्यक्तींना तिळगूळ वाटून नवे मित्र जोडा.

*

JANUARY 14

## राष्ट्रीय पौष २५

# हवेहवेसे गुण

थोरपणा, गांभीर्य, सावधगिरी, निर्णायकता व व्यक्तिवैशिष्ट्य यांची आवर्जून लागवड करा. साधे, प्रसन्नचित्त गंभीर व समर्थ बना. मनांत कळकळ, सहानुभूति बाळगा. धैर्य, आत्मविश्वास, निष्कपटीपणा, दाक्षिण्य, एकाग्रता व चारित्र्य यांना सतत खतपाणी घाला. धीटपणा, दूरदर्शिता, चिकाटी, दक्षता, सहनशीलता, पावित्र्य, समतोलपणा, सामर्थ्य हे गुण विषेशकरुन जोपासण्याचे प्रयत्न करा. आपल्या हेतूंचे सतत शुद्धीकरण करीत राहण्याचे उद्दिष्ट नजरेपासून ढळू देउ नका. उंच डोंगरमाथ्यावरुन जास्त विस्तारलेले क्षितीज नजरेच्या टप्यात येते. तद्वत जास्तीत जास्त गुण संपादून जीवनात, इतरांच्याहून वरच्या पातळीवर वावरुन फायदा मिळवा. जी उत्तम सवय बाणवणे, जे अपूर्व गुण संपादणे, अतिआवश्यक वाटेल त्यांच्यावर दिवसाकाठी अनेकदा मन एकाग्र करा. हातोडीच्या एकाच घावात संपूर्ण खिळा क्वचितच ठोकला जातो त्याप्रमाणे एकाच प्रयत्नाने चांगली इष्ट सवय अंगी जडत नाही; वारंवार, अथक, दीर्घ परिश्रमानंतर चांगली सवय मनात रुजते, मूळ धरते आणि मग फोफावते. यासाठी सवयी, गुण निवडून त्यांची हेतूपुर्वक सप्रयत्न जोपासना चालवा. गुणसंपन्नव्यक्ति हवेहवेसे गुण संपादल्यामुळे, स्वतःही सर्वांना हवीहवीशी होते.

JANUARY 15

# अष्टपैलू जीवन

तुमच्या जीवनाच्या कक्षा जमतील तेवढ्या करा विस्तृत. सर्वांबद्दल सहानुभूति बाळगली जाईल असे ते भव्य व व्यापक होऊ द्या. काही जण एककल्लीपणे इष्ट ध्येयपूर्तीत इतके मग्न व केंद्रित होऊन जातात की त्यांच्या कार्यकक्षेला नसती मर्यादा पडून ते केवळ एका चाकोरीतच फिरत राहतात. या अनिष्ट सवयीपासून आधीच सावध व्हा. सर्व प्रकारचे विचारवारे खेळते राहण्यासाठी आपल्या मनाची कवाडे सताड उघडी टाका, व त्याला स्वैरपणे विहरु बागडू द्या. मनांत खोलवर दबलेल्या विचारानाही वर पृष्ठभागी येऊ द्या, उच्चारित होऊ द्या. म्हणजे त्यांना जरुर तर पुष्टी मिळून ते सार्थक बनतील. प्रेमळपणा, खेळकरपणा, उमदेपणा, उत्साह, कृतज्ञता, गुणग्राहकता, सर्वसमावेशकता वगैरेसारख्या भावनांना मोकळेपणाने वावरु द्या. त्यांच्या वावराने मन विशाल होऊन पूर्णत्व पावेल. जीवन कसे अष्टपैलू असावे. एकांडी शिलेदारी काय कामाची? थोर वा महान बनण्यापेक्षा उदारमनस्क, मिलनसार व सुस्वभावी होणे श्रेयस्कर. मित्रांच्या व सहकाऱ्यांच्या लाभलेल्या प्रेमाचे मूल्य ऐहिक ऐश्वर्यापेक्षा सहस्रपटीने अधिक आहे. निष्कर्ष हाच की आपले जीवन सर्वसमावेशक, अष्टपैलु व जनकल्याणकारी होईल या दृष्टीने प्रत्येकाने प्रयत्नशील रहावयास हवे.

—•—

राष्ट्रीय पौष २७

# अतिरेक वर्ज्य

काम करणे, निरीक्षण करणे, वाचणे, संभाषण करणे, व्यायाम करणे, खेळणे, अभ्यास करणे, प्रवास करणे वगैरे सर्व गोष्टी चांगल्याच आहेत. पण त्याबरोबरच सर्वाच्याच बाबतीत 'अति-सर्वत्र वर्जयेत' हा अनुभवजन्य उपदेशही तितकाच महत्वाचा आहे आपल्या सारासार विचार विचारशक्तीच्या सहाय्याने अति व अल्प यांतला सुवर्णमध्य साधणे अगत्याचे आहे. तो साधल्यानेच उत्कृष्ट फलनिष्पत्ती होते. आवाक्याबाहेरचे केलेले काम, कंटाळवाणे निरिक्षण, पाल्हाळीक संभाषण किंवा अतिवाचन ही आपापल्या परीने मनावर व शरीरावर अवांछित ताण पाडीत असतात. अतिकार्यमग्नतेने. स्वतःच्या वाकबगारीत, निपुणतेत, कौशल्यात उणीव येऊ लागते. तत्ववेत्ता इसाप याने दर्शविलेले 'धनुष्य व दोरी' हे उदाहरण यासंबंधात खात्री पटविणारे आहे, तेव्हा या दृष्टीने योग्य ती खबर-दारी घेणे आवश्यक आहे. हे जमण्यासाठी एक प्रकारची निरिच्छवृत्ती काही प्रमाणात अंगी बाणवायला हवी. मग क्षुद्र गोष्टींवर वा एकाच कार्यावर आपल्या कार्यशक्तिचा अपव्यय होण्याचे टळेल. काम नि खेळ, दोहोत हौस दाखवावी पण अतिलंपटता टाळावी. असे साध-ण्यासाठी आवश्यक ती सारासारविचारशक्ति, निवडक्षमता व काटेकोरपणा अनुभवानेच प्राप्त होतात.

**JANUARY 17**

# यशोलाभ कष्टानंतरच

हाती घेतलेल्या एखाद्या मोठ्या कार्याच्या यशपूर्ण सिद्धीसाठी उत्कट इच्छा, मनाचा निर्धार, निश्चित निवड आणि बेजोड धाडस यांची अतिशय जरुर असते. जगात आतापर्यंत वंद्य ठरलेल्या महात्म्यांनी आपला मान या गुणांनीच मिळविला. नुसती इच्छा धरुन वा कल्पना करुन तुम्हाला आयुष्यातील उच्च स्थान प्राप्त करणे कठीणच नव्हे तर अशक्य ठरेल. आपल्या जीवनाची चिकाटीने नांगरणी करुन तुम्ही तेथे सुविचारांची पेरणी कराल तरच मान-मरातबाचे पीक तुमच्या हाती भरपूर प्रमाणात लागेल. अन्यान्य सवलती व विविध पारितोषिके लायक व कष्टाळू माणसानांच मिळतात. तुम्हाला या जगातील जीवनात महान स्थान पटकावायचे असेल तर मनात इच्छा केवळ निर्माण होऊन भागणार नाही. त्यासाठी त्या इच्छेला, अंगच्या विद्वत्तेची, मनाच्या उत्कटतेची, खऱ्या योग्यतेची व अपार कष्टांची जोड दिली पाहिजे. तुम्ही, स्वतःसाठी निवडलेले आयुष्यातील निश्चित इच्छित स्थान, कष्ट करण्याला न कचरता, योजनाकारी विचारशक्तीच्या जोरावर, मिळवू शकणार आहात. तुमची विचारप्रणाली योग्य दिशेने अग्रेसर होऊ द्या. प्रेरक विधायक विचार हे एकमात्र शाश्वत साधन आहे, तुम्ही करत असलेल्या अथक कष्टांना हातभार लावू शकणारे. ते भरपूर वापरा, यथेष्ट कष्ट उपसा. यशोलाभ होईलच होईल.

☆

JANUARY 18

राष्ट्रीय पौष २९

# क्षणिक उसळी अनिष्ट

तुमच्या आचारांची, मनाची, विचारांची ठेवण अध्यात्मोन्मुख करण्यासाठी एक व्यवहार्य अशी योजना तयार करा. जरुर तर ती योजना कागदावर उतरवा. ती सर्वोत्तमच आहे अशी तुमची मनोधारणा झाली की ती कृतीत उतरवण्यासाठी तिचा एकनिष्ठपणे पाठपुरावा करा. हे करताना विकारांच्या क्षणिक उसळीला बळी पडणार की मनाच्या स्थिरतेसाठी झटणार ? तुमच्या मनात प्रादुर्भूत होणाऱ्या इच्छा-विकारांचे नीट पृथक्करण करा. कोणाच्या विचार-विकारांना प्राधान्य प्रोत्साहन द्यावयाचे, कोणच्या भावनोद्रेकांना थोपवायचे या बाबतीत मनाशी नीट निर्णय घ्या. क्षणिक उसळणाऱ्या अवाञ्छनीय मनोविकारांना नियंत्रणात ठेवण्यास व आध्यात्मिक प्रगतिस पोषक अशा स्थिर धारणेच्या आवश्यक विचारप्रवाहांना प्रोत्साहन देण्यास घडीव योजनेचा उपयोग होतो. स्वतःचे आध्यात्मिक सौंदर्य, सामर्थ्य, समतोलत्व वृद्धिंगत करणे हाच खरा उच्चतम जीवनहेतू होय. कल्पनेच्या पल्ल्याच्या पलीकडील अनेक उदात्त साध्ये तुमच्यातील थोर आंतरिक शक्तीच्या आधारे तुम्हाला हस्तगत करता येतील. चांगुलपणा, प्रामाणिकपणा व सच्चेपणा ही आत्म-प्रत्यय घडविणारी दृश्य साधने आहेत. ही सर्वश्रेष्ठ गुणत्रयी अंगी बाणवण्याची जितकी धडपड कराल तितके तुम्ही परमेश्वराशी तादात्म्य पावाल. क्षणिक उसळी नको. स्थिर मनोधारणा हवी.

JANUARY 19

# राष्ट्रीय पौष ३०

# स्वयंसूचन

एखादे विज्ञापन, काही सूचना किंवा विवक्षित विनंती यांचा तुमच्यावर ज्या प्रकारे नकळत प्रभाव पडत असतो त्याच प्रकारे तुम्हालाही तुमच्या जीवनावर स्वयंसूचन वापरुन महत्त्वाचा व इष्ट प्रभाव पाडता येईल. तुमच्या जीवनात, चारित्र्यात, व्यक्तिमत्वात जे जे गुण अंतर्भूत असावेत, समाविष्ट व्हावेत, बद्धमूल करावेत असे तुम्हाला वाटत असेल ते ते गुण अंगी बाणविण्याचे सूचन प्रत्येक सकाळी उठल्याबरोबर व रोज रात्री निजण्यापूर्वी तुम्ही आपल्या मनास जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक आग्रहपूर्वक करीत रहा. या तऱ्हेने असे सूचन मनावर ते नीटपणे ठसेपर्यंत, करीत राहण्याचा नियमपूर्वक प्रघात ठेवा. हे स्वयंसूचन, आवश्यक वाटल्यास मध्यमा वाणी अपुरी पडली तर, खुशाल वैखरीनेही करावे. म्हणजेच नाटकातील स्वगत पद्धति अवलंबावी. पुनः पुनः ते सूचन उच्चार करुन व्हावे. प्रतिदिनी स्वतःलाच प्रेरणा देण्याचा हा क्रम चालू ठेवण्याने ते तुमचे सूचन काही काळाने साकार झाल्याचे तुम्हाला निश्चितपणे आढळून येईल. जसजशी ही स्वयंप्रेरणेची मानसिक शक्ति तुम्ही वापरीत जाल तसतसे सद्धेतु, चिकाटी, बिनचूकपणा यासारखे गुण वाढीला लावण्याचे तिचे सामर्थ्य उत्तरोत्तर तुमच्या प्रत्ययास येऊ लागेल. स्वयंसूचनाचा हा मानसोपचार सर्वांनी अजमावून पहावा. तो फलद्रूप होतोच होतो.

\+ + +

**JANUARY 20**

# राष्ट्रीय माघ १

# स्थानप्राप्ति

या जगात तुम्हालाही काहीना काही उच्च स्थान नक्की प्राप्त करता येईल. अर्थात हे खरे की तुमची विचारपातळी नि आकांक्षा यांची जेवढी भरारी, तेवढीच तुमच्या प्राप्य स्थानाची उंची असणार. म्हणून आकांक्षाच जास्त उंच हवी. उच्चतर आकांक्षेनुसार उच्चतर स्थान प्राप्त करणेही साध्य असते, कष्ट पुरेसे केले तर. त्यासाठी हवा मनाशी कार्यप्रणालीचा नीट आराखडा, त्यावर साधक-बाधक, सखोल चिंतन तीव्रतेने व्हायला हवे; मग स्वतःचा सारा जोम पूर्ण शक्ति व अवघी चिकाटी तदर्थ वेचली जायला हवीत. अवघड जोखमीचे कार्य पार पाडता येण्यासाठी तीन महत्त्वाचे सद्गुण जवळ असायला हवेत. पहिला गुण आहे दक्ष-चाणाक्षपणा; दुसरा गुण हवा अथक परिश्रमशीलता; तिसरा पाहिजे असलेला सद्गुण उद्दिष्टावर ध्रुवनिष्ठा. स्थानप्राप्तीच्या दिशेने व्हायची सारी प्रगति तुमच्या मनाच्या ग्रहणशीलतेवर अवलंबून राहील. वैयक्तिक विकास साधण्यासाठी, इतरांच्या विधायक सूचना आणि चतुर सल्ले ऐकून ते अमलात आणण्यासाठी आपण उत्सुक व तत्पर रहायला हवे. उपदेश व टीका सहनशीलपणे स्वीकारुन तदनुसार स्वतःच्या आचरणात सुधारणा करावी. आत्मसुधाराची आलेली एकही संधी वाया न दवडता उच्च स्थान प्राप्त व्हावे म्हणून अहर्निश झटा.

JANUARY 21

## राष्ट्रीय माघ २

# घडी सुवर्णाचीच

जास्त नैपुण्य दाखवायला उद्युक्त करणारी संधी-घटना अधिक कौशल्याला वाव देणारा प्रसंग वा प्रेरणा, आजच्या इतक्या तुमच्या वाटणीला पूर्वी कधीच आल्या नव्हत्या याची मनाशी पक्की खूण-गाठ बांघा. आज, तुम्हाला लाभलेल्या योग-कर्तृत्व-आकांक्षांचे तुम्ही किती सोने करुन दाखविता यावरुनच, उद्या, तुम्हाला जेव्हा अधिक सामर्थ्य, समृद्धी संधि लाभतील तेव्हा त्यांचा तुम्ही कसा कल्पकतेने, वापर कराल याचा अंदाज बांधणे, सहज शक्य आहे. आता या क्षणी तत्परतेने, कळकळीचे प्रयत्न करुन, धैर्यशाली धडाडी दाखवून, अंगभूत सद्‌गुणांची महत्ता सिद्ध करुन दाखवा, टंगळमंगळ चालढकल व टाळाटाळ ही मंडळी फक्त तुमचा समयच चोरतात असे नव्हे तर हे टोळके तुमच्या आकांक्षा-धैर्य पुढाकारवृत्तीवरही दरवडा घालते. अनुकूल परिस्थिती असती वा पोषक वातावरण असते तर तुमच्या हातून अधिक कार्य संपन्न झाले असते अशा भ्रामक समजुतीने स्वतःचीच फसवणूक करुन घेऊ नका. आज जसे, जिथे आहात, त्या जागीच आपले कार्यकौशल्य लगेच पणाला लावा, आणि मनात योजलेले बेत, किंवा आखलेल्या योजना, अथवा ठरवलेले कार्यक्रम कृतीत उतरविण्यासाठी आताची घडी, हीच सुवर्णसंधी माना.

—o—

**JANUARY 22**

## राष्ट्रीय माघ ३

# पुढारीपणाचे पथ्य

पुढारी असतो धडाडीने सर्वांपुढे झुंजीत प्रथम उडी ठोकणारा खंदा वीर. सेनापति, शिर तळहातावर ठेवून, रणकंदन करीत असलेला समोर दिसतो तेव्हाच सैनिकांना स्फुरण चढते, त्वेष भरतो, आणि ते जिवावर उदार होऊन लढतात. विजयासाठी आत्मबलिदानाची तयारी ठेवणारे वीर सुभाषचंद्र बोस पुढारी म्हणून, सेनापति म्हणून, सर्वार्थाने शोभले. आणि त्यामुळेच ते आझाद हिंद सैनिकांच्या गळ्यातले ताईत बनले. अग्रणीने, स्वतः मागे राहून अनुयायांना 'पुढे व्हा' म्हणणे निखालसपणे वर्ज्य केले पाहिजे. पुढाऱ्याने पूर्णपणे निःपक्षपातीपण असायला हवे, विवक्षित अनुयायांवर प्रेमवर्षाव करणे अयोग्य ठरते. दुःचिन्हाना निमंत्रण देणारे, कटकटींचे बी पेरणारे सिद्ध होते. भारताला आझादी मिळवून देण्याचे कंकण बांधलेल्या नेताजीं- जवळ प्रेम, माया, जिव्हाळा, आपुलकी, ओढ अमर्याद होती, आणि त्यांनी ती सढळ हातांनी लुटली. अनुयायानी पुढाऱ्यांसाठी रक्त सांडा- यला हवे असेल तर या आझादहिंदसेनानीप्रमाणे त्याने स्वार्थविहीन असले पाहिजे. समदर्शी सुभाषांच्या, 'चलो दिल्ली गर्जत निघालेल्या सैन्यात यामुळे मत्सर, हेवेदावे मुळीच नव्हते. आजच्या नेताजी- जयंतीच्या शुभदिनी, सारी पथ्ये पाळीत, सुभाषांच्या स्मृतीने नतमस्तक होऊन, तुम्हीही लोकोत्तर नेते. अग्रणी पुढारी, सेनापति बनण्याची प्रतिज्ञा करा.

**(नेताजी जयंति)**

**JANUARY 23**

## राष्ट्रीय माघ ४

# कसोटीचे प्रसंग

तुमचा एखादा जवळचा आप्त दगावला असला तुमच्यावर मोठे दुर्दैव ओढवले असले, वा घोर निराशा पदरी पडली असली, तरीही त्यावर तुम्ही हास्यमुखाने व आत्मविश्वासाने मात करु शकत असलात तर ते तुमच्या महानतेचे लक्षण गणावे लागेल. 'आज' जरी कितीही काळ्याकुट्ट अंधारात बुडलेला असला तरी 'उद्या' मात्र नक्कीच सूर्यप्रकाशात न्हाऊन निघणार असतो. कसोटी पाहणारा दारुण प्रसंग हा एक प्रकारे नवी शिस्त व श्रेयस्कर वळण लावीत असतो. तुम्ही तुमची एखादी सवय बदलायला हवी आहे असेच निसर्ग जणू तुम्हाला आडपडद्याने सुचवीत असतो. दुःखशोक हे सामान्यपणे एक असह्य ओझेच असते. पण त्यातूनच अनेक जण अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडलेले दिसतात. अनिवार्य कसोटीच्या प्रसंगातही टिकाव धरता येण्यासाठी प्रत्येकाने कै. डॉ. होमी भाभांप्रमाणे प्रसन्नचित्ततेचे, निरोगी आशावादाचे तत्वज्ञान उराशी जोपासणे अतिशय अगत्याचे व आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीत व आल्या परिस्थितीत काहीना काही भले हे असतेच. व ते तुम्हाला सापडवता येणारच येणार. इतरांचे कल्याण चिंतताना, व त्यांच्यातले भले शोधताना तुम्हाला स्वतःतले भलेपण गवसेल. त्यायोगे कसोटीच्या प्रसंगातून तुम्हाला सहीसलामत पार पडता येईल.

JANUARY 24

# राष्ट्रीय माघ ५

## (पौष व. ६, विवेकानंद जयंति)

# विवेकी प्रार्थना

'विश्वगुरु रामकृष्ण परमहंसजी, तुमचा माझ्या हृदयात नित्यवास असो. त्याचप्रमाणे तो लोकमानसातही राहो. तुमच्या आशीर्वादाच्या आधारे मग लोकही इच्छांवर, विकारावर, चांचल्यावर, लालसेवर विजय मिळवतील आणि उन्मादसागराच्या पार तरुन जाऊ शकतील. लोकांच्या हृदयात शौर्याचे स्फुरण चढू दे. भ्याड, लेच्यापेच्या नामर्दांना नव्हे तर स्थिरचित्त शूरवीरानाच मुक्ति लाभते. उन्मत्त विचारांचे सैन्य सर्वदा लोकांच्यावर हल्ला चढवीत असते. गुरो, त्याच्याशी मुकाबला करण्याचे धैर्य-साहस त्यांना द्या. शस्त्र धारण करुन लढण्यासाठी त्यांना कटिबद्ध होण्यास उद्युक्त करा. बद्धांच्या शृंखला तोडण्यासाठी, पिडीतांचा दुःखभार सुसह्य होण्यासाठी चाचपडणाऱ्यांच्या हृदयात ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी हे गुरो, तुम्ही सर्वांच्यावर कृपादृष्टी फिरवा. 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत,' हा श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा आदेश कृतीत उतरविण्यासाठी जनसामान्यांना चेतवा. औदासीन्य, मरगळ, चलबिचल. अकर्मण्यता यांच्या कचाट्यातून सर्व प्राणिमात्रांची सोडवणुक करा निद्रिस्त भारतकेसरीला खडबडून जाग आणवा. त्याची रौद्रभीषण गर्जना विश्वात दुमदुमू द्या. माझी भारतमाता पूर्ववत् स्वतंत्र सुवर्णभूमी होऊ द्या." कन्याकुमारीजवळच्या चिंतनशिलेवर ध्यानस्थ होताना स्वामीजीनी अशी प्रार्थना उच्चारली होती.

*

# राष्ट्रीय माघ ६

# अबाधित स्वातंत्र्य

तुमच्या खऱ्या स्वत्त्वाच्या प्रकटीकरणास किंवा स्वतःचे जीवन उत्तम रीतीने जगण्यास अडथळा आणणारे असे काही जर तुमच्या वृत्तीत, सवयीत, स्वभावात आढळले असेल तर ते आधी कायमचे नष्ट करुन टाका. निष्ठुरपणे सत्यपालन करता यावे यासाठी कंबर कसून उभे रहा. भित्रेपणा, पळवाटा शोधणारी प्रवृत्ति यांना कायमचा रामराम ठोका. स्वतःला पटलेल्या पद्धतीप्रमाणे पूर्ण भरवशाने, विश्वासाने, श्रद्धेने वागा. सत्य व कर्तव्य यांचा मार्ग एकदा चोखाळण्यास सुरवात केल्यावर कसल्याही भुलावणीला बळी पडू नका. तुमच्या सर्वांगीण प्रगतीच्या जरासुद्धा आड येणाऱ्या, विघ्ने–अडथळे यांना कारणीभूत होणाऱ्या दुष्ट विघातक सवयींचा कायमचा निःपात करुन टाका. मग 'आपण विघ्नांतून मुक्त झालो असल्याचे' स्वतःच्या मनालाच हुडसून खडसून बजावून सांगा. ईश्वर कृपेने प्राप्त झालेल्या या मानवजन्मातील जीवन उदात्तपणे, कळकळीने, स्वतंत्रतेने जगत असताना सेवावृत्तीत व कार्यसाधनेत निःशंकपणे मग्न रहा. सार्वभौम अखिल भारताच्या आजच्या अतिमंगल गणराज्यदिनी, ध्येयसिद्धीच्या आड येणाऱ्या सर्व विघातक वृत्तींचा त्याग करण्याचा दृढ निश्चय करा. भारताचे स्वातंत्र्य शपथपूर्वक अबाधित ठेवा.

**(गणराज्यदिन)**

**JANUARY 26**

# उविस्वी

आरंभलेल्या कोणत्याही नव्या सत्कार्याच्या नशिबी, **उविस्वी** ठेवलेलीच, म्हणजेच तीन अवस्था लिहिलेल्याच. पहिली अवस्था **उपहासाची**, दुसरी **विरोधाची** आणि तिसरी **स्वीकाराची**, संस्थापक, द्रष्टेपणाने भविष्याचा वेध घेऊन वर्तमानातच पुढला विचार ठरवितो. आणि नव्या सत्कार्याचा शुभारंभ करतो. साहजिकच तत्कालीन सामान्यांना त्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचे नीट आकलन न झाल्याने ते उपहास–विरोध आरंभतात. या उपहासाने खचू नका, विरोधाने हातपाय गाळू नका. वाटचाला येणाऱ्या छळाला धैर्याने, फुले दांपत्याप्रमाणे, तोंड द्या. धीरगंभीरपणे, सचोटीने, निष्ठेने, स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून अंगीकृत कार्याचा पाठपुरावा करा. त्याला ऊर्जितावस्था ही येणारच. महान् कार्य तडीस नेताना लोकानुरंजन साधेलच असे नाही. पण समाजाच्या नाराजीची पर्वा करु नका. भले तुमच्या कार्याला ऊर्जितावस्था यायला, त्याची महती समाजाला समजायला, ते स्वीकारले जायला कालावधि लागो. तुमची हयात संपेलसुद्धा. पण कधीतरी नक्कीच, तुमच्या सत्कार्याची **इष्टता–उपयुक्तता–आवश्यकता** ऊर्फ **आउइ** लोकांच्या ध्यानी येईल. उपहास–विरोधाचे टप्पे ओलांडून ते स्वीकाराचा टप्पा गाठील. उपहास विरोधाच्या वणव्यात तुमची आहुति पडली तरी ती समाजाच्या, देशाच्या कारणीच ना लागेल? स्वीकाराचा वर्षाव तुमच्या पश्चात् झाला तर बिघडले कुठे ?

## राष्ट्रीय माघ ८

# सदभिरुचिपूर्ण वाचन

रोजच्या बातम्या वाचतानाही निवडक सुसंस्कारी व विधायक प्रकृतीच्याच बातम्या वाचा. जगभरचे गुन्हे, दारिद्र्य, दैन्य, उत्पात, अपघात आदि अपप्रवृत्तींच्या वर्णनाचे प्रसंगच का तुमच्या मन:चक्षूसमोर सतत तरळत रहावेत? छे, छे! ज्या, उत्साह वाढवतील, मन उदात्त करतील, विचारसौंदर्याने हृदय ओतप्रोत करतील अशाच काही वेचक हकीगती, वार्ता, घटना वाचण्यावर भर ठेवा, रचनात्मक सूचना-कल्पना पुढे मांडणारे, ज्ञान माहिती पुरविणारे, जोम स्फुर्ति वाढविणारे असे मार्मिक, भारदस्त, विचारप्रवर्तक अग्रलेख आवर्जून वाचावेत. वाचन करावयाचे सुसंस्कार होण्यासाठी, ज्ञानवर्धन होण्यासाठी. वेळ संपवण्यासाठी नव्हे. पाप, अपत्ती, दुर्घटना, दुष्टपणा, हीनता ह्या संबंधीच्या वर्णनांची डोक्यात व्यर्थ भरताड कशाला करावयाची? काही मोठे प्रकल्प साकारत असतील, योजना आमलात येत असतील, महत्त्वाच्या समस्यांवर विचारविनीमय होत असेल, नवे शोध लागले असतील, जागतिक परिस्थितीवर प्रभाव पाडणाऱ्या घटना घडत असतील, त्यासंबंधीच्या मजकुरावर जास्त नजर ठेवा, नाहीपेक्षा मन एकाग्र करुन डोळे मिटून आत्मचिंतनात मग्न राहणे पत्करा. लालालजपतरायांच्या जयंतीच्या आजच्या दिवसापासून वायफळ वाचन वर्ज्य करा. काय वाचावयाचे याच्याबाबतीत तुम्ही अगदी चोखंदळच असले पाहिजे.

**JANUARY 28**

# वक्तृत्वपथ्ये

प्रभावी, यशस्वी, विजयी वक्ता बनणे साधनेशिवाय जमणे कठीण. सभा जिंकून देणारे वक्तृत्व साधण्यासाठी वक्त्याला कित्येक पथ्ये संभाळावी लागतात. कोणती ती सांगतो. सभेत भाषण करताना चाचरु नका. चुळबुळू नका, तुच्छतेने बोलू नका, अडखळू नका, आरडाओरड भीमदेवी, वर्ज्य करा. घाईघाईने बोलू नका, खाकरु नका. वैयक्तिक टीका तसेच लागट बोलणे टाळा. आवाजाची पट्टी खालचीच राहू द्या. कर कटेवरी वा बुडावरी ठेवू नका. दृष्टि छताकडे वा आकाशाकडे न लावता श्रोत्यांवर खिळवा. दातओठ खाऊन बोलणे अनिष्ट. गुंड्याबटनांशी चाळा नको. अफाट हातवारेही हास्यास्पद होतात. विषयांतर होऊ देऊ नका. भावनावश होणे हितावह नसते. आत्मस्तुति निषिद्ध माना. भाकडकथा सांगत सुटू नका. भाषणाच्या भरात चवड्यावर चढू नका. शरीराला हेलकावे देऊ नका किंवा पार पुतळ्यासारखेही ठाकू नका. वाक्यावाक्यांत श्रोत्याना फेटाळून धाब्यावर बसवू नका. भाषणाचा प्रत्येक मुद्दा उद्दिष्टाकडे नेणारा हवा, हे दृष्टीआड होऊ देऊ नका. इतरांच्या वक्तृत्वांतल्या उणीवा, दोष, खोडी आणि टीकार्ह वाटणाऱ्या बाबी तुम्ही स्वतःही अवश्य टाळा. ही अन्यान्य, महत्त्वाची, विविध पथ्ये तुम्ही पाळलीत की सभा जिंकलीतच, फड मारलातच. आणखी एक शेवटची बाब. मुद्दे संपले वा विषय आवरला की वायफळ वटवट चालवू नका. भाषण संपवून खाली बसा, लगेच.

– • –

## राष्ट्रीय माघ १०

# प्रभुपदी आत्मसमर्पण

**आ**ज हुतात्मा दिन. राष्ट्रपदी बलिदान आज घडले. या अपूर्व दिवसाच्या निमित्ताने, देवाधर्माला मानवणारे देवाजीच्या मनातले, देवबाप्पाला भावेल असेच सारे करणे हे तुम्ही आपले जीवनउद्दीष्ट ठरवून टाका. हीच सर्वश्रेष्ठ अशी वागणूक होय. हेच प्रत्येकाचे परम कर्तव्य ठरते. आदर्शपणे आयुष्य कंठता यावे ही प्रत्येकाच्याच मनची आस असते. आत्मिक उन्नति व्हावी हीच सर्वांना तळमळ. विचारवंत व्यक्तीला, जीवनमार्ग गवसावा म्हणून, शेवटी देवाचीच आळवणी करावी लागते. परमेश्वरी योजना काय आहे ती आकळून घेऊन तदनुसार त्या सर्वज्ञ परमेशाच्या अपेक्षेची पूर्ति करण्यासाठी प्रत्येकाने कायावाचा मनेकरुन झटले पाहिजे. त्या चराचरचालकाच्या आज्ञांचे लक्षपूर्वक व आज्ञाधारकपणे पालन करणे, मोकळ्या मनाने व पूर्णपणाने त्या जगन्नियंत्याला सर्वस्वाने शरण जाणे, आणि त्या चित्संकल्पाचे आत्मसंकल्पाचे तादात्म्य घडविणे, ही आध्यात्मिक अनुभव प्राप्त होण्यासाठी टाकावयाची तीन प्रमुख पाऊले असतात. सौख्यनिधान सापडविण्यासाठी तुम्ही सारी दुनिया का पालथी घालानात, पण प्रभुपदी सर्वस्वाने आत्मसमर्पण केल्याविना, प्रभु सर्वांशाने गवसणे तुम्हाला सुतराम शक्य होणार नाही. महात्म्याने ' देश हा देव माझा, ' म्हणत जीवनपुष्प देशापायी वाहिले. आपणही सर्वजण, प्रभुपदी समर्पित होण्याची आज शपथ घेऊ या.

**(हुतात्मा दिन)**

**JANUARY 30**

## राष्ट्रीय माघ ११

# हाकेला धाव

प्रार्थना व पूर्ति, हा भक्त व भगवंत दोघांच्या भागीदारीतच जमणारा देवाणघेवाणीचा धंदा असतो. त्यातही, तुम्ही–म्हणजे भक्त–निष्क्रीय भागीदार, तुमची त्यात जबाबदारी शून्य आणि कार्यशील भागीदार म्हणजे भगवंत, त्याच्यावर सारे ओझे धंदा चालविण्याचे, असा व्यवहार नसतो. तुम्ही परमेश्वराला 'माझा मार्ग निर्वेध कर' म्हणून विनवू शकता; त्याच्याकडे स्वतःसाठी कष्ट करण्याची कुवत मागू शकता, जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य याचू शकता, इतकेच. पण हातावर हात, पायावर पाय डाळून तुम्ही नुसते बसून राहू शकत नाही, 'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी.' म्हणत. अशा भ्रमात राहणे मूर्खपणाचे ठरेल. प्रयत्नाविना प्रार्थना, पार व्यर्थच. आधी प्रार्थनाही न्याय्य हवी, त्यातील मागणी रास्त, सकारण, योग्य हवी. मग पाठोपाठ कंबर कसून कळकळीने प्रयत्नांना प्रारंभ करायला हवा. तर प्रार्थना फलद्रुप व्हायला अडचण नाही. अर्थात तुमची मागणी अगदी जशीच्या तशी पुरी होईल असे नाही. मनापासून केलेल्या प्रार्थनेने भक्ताला, मनोबल वाढून, धीर वाटतो. भक्ताचे निकडीचे प्रयत्न पाहून भगवंत हाकेला धावतो. पण त्या आधी, प्रार्थनेला पराकाष्ठेची, परमश्रद्धेची, पावित्र्याची, आणि मुख्यतः प्रयत्नांची जोड असलेली दिसायला हवी.

☆

## राष्ट्रीय माघ १२

# परमेश्वरी निर्बंध

इच्छा इष्ट व आकांक्षा आदर्श असल्या की सौख्यवृद्धि ही ठेवलेलीच कार्य व तत्सिद्धि यासाठी नवपल्लवित लालसेने प्रेरित होऊन दिवसाचा शुभारंभ केला जाताच भोवतालच्या जगाने एक नवी मोहक आकर्षकता धारण केली आहे असे तुम्हाला दृग्गोचर होऊ लागेल. कार्यात अहर्निश मग्न राहणाऱ्या मनाला काळ नीरस, कंटाळवाणा, रुक्ष वाटतच नाही. प्रत्येक दिवसाचा प्रारंभ मनात शुभंकर परहितकारी उद्दिष्ट कल्पून नियत कार्याच्या साधनेसाठी ज्या प्रमाणात तुम्ही मेहनत कराल, कष्ट घ्याल, त्या प्रमाणात तुमचे जीवन समृद्ध व निर्माणक्षम होत जाईल. यशप्राप्ति, सुखवृद्धि ही अनाकलनीय गूढे मुळीच नव्हेत. ती आहेत, परमेश्वरी कार्याकार्य-निर्बंधासमोर मान तुकविण्याने, म्हणजे काय करावे काय करु नये, याबाबतच्या नियमांचे पालन करण्याने लाभणारी दृश्य फले. कार्य काय, अकार्य काय याबद्दलच्या निर्बंधांचे सखोल अध्ययन करुन आपल्या साऱ्या आकांक्षा, सारे विचार, तदनुसार घडविण्याने आपल्या जीवनात सुसंवाद, सौख्य, समृद्धि उत्तरोत्तर वृद्धिगत होत चालल्याची सुखद जाणीव तुमच्या अनुभवास येऊ लागेल. हे परमेश्वरी कार्याकार्यनिर्बंध सर्वदृष्टचा अपरिवर्तनीय, शाश्वत व सर्वश्रेष्ठ असे असतात याचे कदापि विस्मरण होऊ देऊ नये.

**FEBRUARY 1**

# योग्य वेळ

"हूड्, ही अगदीच फालतू संधी आहे, योग्य नि खास वेळी पहा, मी माझी योग्यता सिद्ध करुन दाखवितो की नाही ते!" ह्या भ्रमात राहणे म्हणजे स्वतःलाच फसविणे होय. संधी साधी असो वा खाशी, कार्य छोटे असो वा मोठे, वेळ योग्य असो वा नसो, पुढाकार, चिकाटी, निष्ठा, उद्योगप्रियता, एकाग्रता, कार्यमग्नता हे सारे सद्गुण, दोन्ही बाबतीत सारखेच आवश्यक असतात. कार्य छोटेच असले तरी ते उत्तम प्रकारे पार पाडण्याने तुम्ही स्वतःच आधिक कार्यनिपुण, जास्त शिस्तबद्ध व पुरेसे उद्योगमग्न बनून पुढे येणाऱ्या खास संधीसाठी, विशेष कार्यासाठी तयार बनत असता. आल्या कामाच्या वेळी, ते साधे, फुसके आहे म्हणून अंगचोरपणा करीत अळंटळं करावयाची आणि भ्रमात ह्या रहावयाचे की 'परिस्थिति अनुकूल झाल्यावर मग मी खास कार्याच्या वेळी खूप जास्त चांगल्या प्रकारे काम करुन दाखवीन, प्रयत्नशील आहे, हे सिद्ध करुन दाखवीन. संधी आलेली आहे, काम अंगावर पडलेले आहे, म्हणजे लगेच ते छोटे वा क्षुद्र आहे असे न मानता करुन दाखवावे, कळकळीने व अक्कलहुशारीने झटून कार्य पार पाडावे. जी संधी तूर्तास लाभली आहे, तिच्यापासून जास्तीत जास्त फायदा करुन घ्यावा; आणि पुढे अंगावर पडणाऱ्या मोठ्या जबाबदारीसाठी अधिक कार्यक्षम बनून तयार असावे.

卐

राष्ट्रीय माघ १४

# सुविचारसाधना

आरोग्य, सुख, जीवनातील सुखसंवाद आणि विचारातला सुमेळ, ही सर्व अप्रत्यक्षपणे योग्य विचारसाधनेवर अवलंबून असतात, असा एक उच्च व स्वयंसिद्ध अनुभव आहे. तुमच्या बाह्य ऐहिक आयुष्यावर इष्ट सुपरिणाम, वांछित सुसंस्कार व्हावयास हवे असतील, तर तुमच्या आंतरिक मानसिक जीवनात योग्य कार्यकारणभाव उदित व्हावयास हवा. बुद्धिमत्तेच्या जोरावर मूलभूत सत्यांचा नीट छडा लावून आपल्या आयुष्यांतील अनेक भ्रममूलक व गैरसमजुतींच्या परिस्थितीतून यशस्वीपणे सहीसलामत निसटून बाहेर पडणे तुम्हाला सहज शक्य असते. परमेश्वराने चांगुलपणाचा अपार ठेवा, तुम्ही उपयोग करावा म्हणून, सहज लाभेल असा, उपलब्ध करुन ठेवलेला आहे. पण तुम्ही स्वतः उपरिनिर्दिष्ट स्वयंसिद्ध सुस्थापित अनुभवाला अनुसरुन आपली वर्तणुक राखली पाहिजे. अनंत आकाशांत अधांतरी असणाऱ्या अग्निमय गोलांपेक्षाही अधिक अद्भूत वस्तुसुलभस्थिति अशी आहे की भगवंताने तुम्हाला स्वतःचे विचार सामर्थ्य साध्य करुन ठेवून जणू काय एक अमोलिक अशी देणगीच उदार अंतःकरणाने दिली आहे. तेव्हा या सुविचारांच्या साधनेत तुम्ही सदासर्वदा मग्न, व्यस्त, तल्लीन रहा.

FEBRUARY 3

# राष्ट्रीय माघ १५

# भारदस्तपणा

तुमच्या व्यक्तिमत्वात उच्च दर्जाचा प्रौढ भारदस्तपणा आणण्याचा आधी निर्धार करा आणि तो कमावल्यानंतर, भारदस्तपणाच्या त्या श्रेष्ठ पातळीवर तुम्ही टिकून रहाल याबद्दल योग्य ती सर्व दक्षता बाळगा. पुष्कळ अविचारी मंडळी उल्लुपणाने आचरटपणा, पाचकळपणा, गैरवाजवी अतिसलगी आणि कुचेष्टेखोरपणा करुन आपल्याच पायावर स्वतःच्याच हातांनी धोंडा पाडून घेतात. नम्रता, खेळकर हसतमुख वृत्ति आणि शालीनता यांचे भारदस्तपणाशी जवळचे नातेच आहे; त्यांच्यात विसंगति नावालासुद्धा नाही. भांडखोरपणे वितंडवाद घालणे, फालतू अर्वाच्य बडबड करणे व ढोंगीपणाने वागणे, या सवयी मात्र भारदस्तपणाशी विसंगत म्हणून निर्भर्त्सनीय आहेत. त्या न लागण्याची आवर्जून खबरदारी घ्या. जीवनातले कुठलेही क्षेत्र घ्या. तिथे भारदस्त माणसाचाच आदर होतो, त्याच्यावर विश्वास टाकला जातो. भारदस्तपणाची, परिपक्वतेची, प्रौढत्वाची विशिष्ट पातळी गाठल्यावर, तिच्यापासून तिळमात्र ढळू नका, इतकेच नव्हे तर इतरानाही त्या पातळीवर पोचण्यासाठी उद्युक्त करुन मदतही करा. या प्रयत्नात इतरांच्या पातळीवर स्वतःच घसरण्याचा धोका असतो. तो टाळून, तुम्ही बावनकशी भारदस्त सिद्ध व्हा.

## FEBRUARY 4

# भगवंती आंदण

निरोगी, सुखी, भले व प्रगतीशील होण्यासाठीच तुम्ही या जगात आलेले आहात असा दृढ विश्वास बाळगा. तात्कालिकच नव्हे तर चिरशाश्वत सौख्य प्राप्त करुन देऊ शकणाऱ्या सर्व बाबी तुमच्या सदसद्विवेकबुद्धीत गोवलेल्याच असतात. थोर परोपकार करण्यासाठी व टिकाऊ कार्यसिद्धि प्राप्त होण्यासाठी लागणारे सारे शक्तिसामर्थ्य तुमच्याजवळच आहे. मन, बुद्धि, आत्मा, प्रेम, सत्य ही सारी त्या भगवंताचीच रुपे होत. अशा नानास्वरुपी परमेश्वरीय साच्यातच तुम्हालाही ढाळण्यात आलेले आहे. तुम्हाला लाभलेल्या या भगवंती आंदणाच्या अस्तित्वाची पुरती जाणीव करुन घेऊन त्याचा पुरेपूर वापर करा. म्हणजे पाप, अनारोग्य, बेबनाव यांच्यासारख्या सर्व अकल्याणकारी, दुष्टांच्या कचाट्यांतून तुमची कायमची मुक्तता होईल. स्वतःचे मन तुम्ही सातत्याने व पूर्णपणाने पावित्र्य, श्रद्धा, प्रेम आणि सत्यप्रीति याच्या विचारांनी ओतप्रोत ठेवा. परम आदिसत्तेचे अधिराज्य सर्वतोपरि समजून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा म्हणजे जीवन स्वास्थ्य, सौख्य आणि सुसंवाद यानी परिपूर्ण होईल. कारण असे की तुमच्याठायीच त्या सर्वसत्ताधीशाचे साम्राज्य विद्यमान आहे. भगवंताने तुम्हाला योजनापूर्वक सौख्यशांति आंदण म्हणून दिलेली आहेतच.

# न्यायाधीश ?

तुमची स्वतःची भिन्न, अतिरेकी, विक्षिप्त क्रांतिकारी विचार वा मते धोरणीपणाने स्वतःजवळच ठेवून द्या. इतराना ती ऐकविण्याचा मोह शहाणपणाने टाळा. लोकांच्यात वावरत असताना, किंवा मंडळीत बसलेले असताना जास्ती करुन श्रवणभक्ति करा. कुठलीही कृति करण्यापूर्वी वा शद्व उच्चारण्यापूर्वी साधकवाधक विचार करा. निदान, बोलण्या-वागण्यात, हीन पातळीवर तर उतरुच नका. इतराबद्दल वृत्ति सहनशील ठेवा. तुमच्या मतांच्या विरुद्धची बाजूही शांतपणे आवर्जून ऐकून घ्या. कधीही बढाया न सांगणे, आत्मपुराणाचे चऱ्हाट न वळणे, दुसऱ्याची निंदा-नालस्ती न करणे आदि नियम पाळण्यात चातुर्य तर आहेच, हितही आहे. स्वतःला न्यायाधीश मानून इतरांचा निवाडा करण्याचे, दुसऱ्यांच्या कृत्यांबद्दल बरावाईट निर्णय देण्याचे टाळा, निदान, शक्य तेवढे लांबणीवर टाका. लोकांच्या मनातील विचारांचा छडा लावण्याचा दीर्घसूत्रीपणा करण्यापेक्षा, आपल्याच मनात कुठे काय खोल दडून बसले आहे याची विश्लेषणात्मक तपासणी करा. स्वतःच्या विकारलहरींवर कडक नियंत्रण ठेवा. स्वतःला न्यायाधीश समजून, आपल्या शहाणपणाचे प्रदर्शन करण्याचा खटाटोप करु नका. तुमच्या, नेमस्त भाषेवरुन सुसंस्कारितेची साक्ष इतराना मिळू द्या. क्षमाशील वृत्ति, अंगच्या सभ्यता, प्रेमळपणा, सहानुभूति ह्यांच्यात, घवघवीतपणे वाढ करते.

*

## राष्ट्रीय माघ १८

# रजतमसत्व

विघातक, अवाञ्च्छनीय, तिरस्कारार्ह असे कित्येक रजोगुण आहेत, अनिष्ट असे बहुतमोगुणी भावना-विकार आहेत. भीति मत्सर-चिंता, तिरस्कार, क्रोध, द्वेष, निंदाप्रियता, भांडखोरपणा, असभ्यता, शीघ्रकोपीपणा, अहंमन्यता, क्रौर्य, कृतघ्नता, अनादर, निष्ठाहीनता, स्वार्थीपणा, निराशावाद, नामर्दपणा, शत्रुत्व, अविचारीपणा, अश्लीलता, संशयग्रस्तता, तक्रारखोरपणा हे सारे दुर्गुण व ह्या विकार-भावना असंतोष विसंवाद, खिन्नता यांचे वातावरण पसरवितात, वृत्ति तामस बनवितात. ह्याच्याउलट विधायक, इष्ट, अनुकरणीय अशाही सात्विक वृत्ति व वांच्छनीय सद्‌गुण काही कमी नाहीत. श्रद्धा, निष्ठा, भलाई, आत्मविश्वास, प्रेम, औदार्य, गुणग्राहकता, स्वावलंबन, उत्साह, समाजोन्मुखता, सहानुभूति, उपकारप्रियता, हळूवारपणा, सहनशीलता, तडजोडवृत्ति ह्या भावना व सद्‌गुण, आरोग्य, सुसंवाद, सुखसमाधान ह्यांचे अधिराज्य स्थापित करतात. रजतम विरुद्ध सत्त्व अशा या दोन गटांपैकी, कोणता स्वीकारणीय आहे याबाबतची पसंती निवड तुमच्या हाती आहे. हितकर सात्त्विक भावना, वृत्ति यांची जोपासना केलीत, लाभदायक सद्‌गुण अंगी बाणविलेत तर तुमच्या सुखसमाधानाला पार उरणार नाही.

# दु:खविनाश

दारुण निराशेच्या घोर अंध:कारात चाचपडण्याचा कठोर प्रसंग ओढवला असताना आणि धीर द्यायला, सांत्वन करायला आसपास कोणी हितसंबंधी नसताना मार्ग कसा काढावा ही एक न सुटणारी समस्या होऊन बसते. आशासूर्याला खग्रास ग्रहण लागलेसे वाटते, निराशा–खिन्नतेचे कृष्ण ढग मनसांकाशांत दाटतात, हृदय जडावते, मूर्तिमंत दुर्दैवाच्या कचाट्यात सापडल्यासारखे भासते. मनाने तुम्ही अस्वस्थ, निराश, निराधार बनता. पण अशा सर्वस्वी बिकट समयीही हतबलतेच्या आहारी जाण्याचे कारण नाही. आपल्या दु:खाचा डांगोरा पिटणे नाही, दुर्दैवाचे रडगाणे आलापणे नाही. कारण यावरची तोड तुमच्याच तर हाती आहे. उपाय असा आहे. कोणत्या तरी अवजड, अवघड कार्यात स्वत:ला संपूर्णपणे झोकून देणे, पार बुडवून टाकणे. मनाची सारी अवधाने आवश्यक पडतील ज्यात, अशा एखाद्या विस्तृत, प्रचंड कार्याला स्वत:ला जुंपून घ्या. पहा, तुमची सारी दु:खे, सोसावा लागणारा असह्य त्रास, पदोपदी नडणारी विघ्ने कशी चुटकोसरशी पळून जातात ते, हे असे घडेल याबद्दल श्रद्धा बाळगा. आपल्या दुरवस्थेचा डांगोरा पिटलात तरी लोक सहाय्य देतातच असे नाही. समस्येची खात्रीशीर उकल तातडीने सापडेल. जीवन तसे तुटपुंजे, अपुरे पडतेच. म्हणून तेवढ्याच अवधीत सारे कर्तृत्व पणाला लावायचे असते. कार्यमग्नतेला लाभणाऱ्या दैवी पाठिंब्यामुळे तिला दुसरी तोडच नाही, दु:खविनाश घडविण्यात ती अग्रगण्यच. डांगोरा पिटून दीनतेचा बोभाटा होऊ देऊ नये.

–o–

FEBRUARY 8

राष्ट्रीय माघ २०

# घातक ताण

अनिष्ट, दुष्ट, अवाञ्छित, चुकीच्या, गैर, विचारांच्यात मनाला रमू देणे तुम्हाला कधीही परवडणार नाही. असले अयोग्य, हीन, पापी, विचार जर तुमच्या मानसमंदिरात घुसू लागले तर त्या आक्रमकांना हुसकून लावण्यात दिरंगाई करणे अतिशयच धोक्याचे ठरेल. या गुंड मंडळींना पिटाळून लावल्यावर, उत्तम परिपक्व भारदस्त सत्त्वशील विचारांना आपल्या मनोराज्यात नागरिक बनण्यास प्रवृत्त करणे ही एक तातडीची बाब मानायला हवी. पापी विचारांचा प्रादुर्भाव होतोसा वाटताक्षणीच खडबडून जागे व्हा आणि त्यांचा अंकुरण्यापूर्वीच तणवत् उच्छेद करा. जगाला दिसणारी बाह्य कृत्येच योग्यपणे करून भागवू नका. अंतरंगातल्या उलाढालीही सचोटीनेच चालवा. कानाकोपऱ्यातदेखील अयोग्य विचारांची धूळ साठू देऊ नका. सुविचारांची बीजे पेरल्यावर अंकुरलेल्या शेतातील घातक विचारांचे तण विवेकाच्या वखरीने मेहनतपूर्वक उपटून टाका. तुमच्या जीवनावर तुमचे विचारच सत्ता चालवीत असतात, त्याला दिशा देत असतात, त्यावर प्रभाव पाडीत असतात. यासाठी तुमचे विचार पक्के, इष्ट, सुंदर सद्प्रवृत्त आणि वाढत्या दर्जाचे बनत जातील याबद्दल सतत प्रयत्नपूर्वक दक्ष रहा. हे विचार बरोबर असतील तर तुमच्याहातून कृत्येही योग्य घडतील

★

**FEBRUARY 9**

# राष्ट्रीय माघ २१

# ढीग उपसा

मनातल्या मनात विचार करायलासुद्धा माध्यम म्हणून वापरावे लागतात शद्बच. बोलायला, आज्ञा करायला, विनंती ऐकवायला, खात्री पटवायला मन वळवायला, थोडक्यात म्हणजे भाषेचा प्रश्न आला की पावलोपावली साधन म्हणून उपयोगी पडतात शद्बच. तर अशा या शद्बांचा. अर्थपूर्णतेने, परिणामकारक रीत्या व सुयोग्यपणे वापर करता यावा म्हणून, तुम्ही व्यासंग चालू ठेवा. कोश वापरुन शद्बांचा अभ्यास करता येईल किंवा थोर लेखकांचे महान् ग्रंथ वाचून, त्यावर चिंतन-मनन करुनही शद्बांचे अध्ययन चालू ठेवता येईल. शद्बांच्या वापराच्या बाबतीत तुम्ही खूपच चोखंदळ असायला हवे. निवडक शद्ब वेचून त्यांची एक यादी हाताशी असावी. ते शद्ब मग आपल्या बोलण्यात उचितपणे, समर्पकरीत्या वापरण्यावर कटाक्ष ठेवावा. हे घ्या थोडे अशा प्रकारचे शद्ब : प्रशंसनीय, विरक्त, आक्रमणात्मक, अचाट, बोचक, विश्वव्यापी, व्यवस्थित, प्रख्यात, नाजुक, सावध, तेजस्वी, निष्कपटी. ही आहेत काही विशेषणे. आणि आता : गैरमर्जी, अविचारीपणा, तेजस्विता, लहरीपणा, रसिकता, इमानीपणा, नीतिभ्रष्टता, संचोटी, दुटप्पीपणा, प्रतिकूलता, सावधपणा, अनुकूलता, उदात्तपणा ही थोडी नामे. शद्बांचे ढीग उपशीत बसणे, त्यातल्या प्रत्येक शद्बाचा अर्थ नीटपणे समजून घेणे आणि वापर योग्यपणे करता येणे हा एक मौजेचा व लाभप्रद विरंगुळा होऊ शकतो.

**FEBRUARY 10**

# राष्ट्रीय माघ २२

## (माघ शु. ७, रथसप्तमी)

# विवेकी मते

निरनिराळ्या विषयासंबंधी स्वतःच्या समजुती सुनिश्चित बनवून ठेवा. अध्ययनपूर्वक संशोधन मनन करुन तुमच्या निरनिराळ्या विचार-कल्पनाना ठाम मताचे रुप द्या. महत्वाच्या विषयांवर सखोल चिंतन करा. कार्यकारणाची क्रमवार संगति लावू शकण्याची सवय असणे आवश्यक आहे. तुमच्या समजूतींच्या समर्थनार्थ तुमच्याजवळ मुद्देसूद विधाने असायला हवीत. प्रत्येक विषयाचे सर्वगामी सांगोपांग आकलन करुन घ्यावे. प्रत्येक बाबतीत सत्यदर्शन करुन घेण्यासाठी आवश्यक तेवढा काळ व्यतीत करा. हे सत्यशोधन प्रदर्शनासाठी वा अवडंबर माजविण्यासाठी नसावे. ते त्याच्या शाश्वत मूल्यांसाठी केले जावे. जीवनविषयक बाबीसंबंधात ठाम धारणा असण्याचे महत्व नीट ओळखून घ्या. सर्व तऱ्हेने सुस्पष्ट, निश्चित, तर्कशुद्ध अशी बनलेली असू द्यात तुमची मते. आवश्यक व उपयुक्त होईल असे तुम्हाला वाटल्यास तुमच्या साधार समजूती, विवेकपूर्ण मते व तर्काधिष्ठित निर्णय सर्व नीट लिहून ठेवा. आज रथसप्तमी. तुमच्या कल्पनांचे दूध विवेकाच्या शेगडीवर उकळत ठेवा. त्यातला संशयास्पद भाग जाऊ द्या उताला. मग खाली राहील साधार, तर्कसिद्ध विचारांचा फलदायी प्रसाद. रथसप्तमीचा म्हणून तो सेवन करा.

卐

**FEBRUARY 11**

## राष्ट्रीय माघ २३

# व्यक्तित्वपालट

ईश्वरदत्त शरीरसौंदर्य वा जन्मजात बुद्धीमत्ता ही मूळची जशी असतात तशीच राहणार. वरवर आणलेला आव, आग्रहाचे प्रतिपादन, जोराचे समर्थन, फसवे स्पष्टीकरण यापैकी काहीच वरच्या बाबीत, किंवा तुमच्या स्थितीत थोडाही फरक करु शकणार नाही म्हणजेच व्यक्तित्वपालट घडविणार नाही. तो घडवायचा असेल तर तुमच्या मानसमंदिरात जाऊन तिथे तुम्हाला विराजमान व्हायला हवे. तिथुन तुमच्या प्रगतीला वा सुधारणेला सुरुवात होऊ शकेल. प्रगतीची सुरुवात प्रधानतः आंतरिकच असते. सुधारणेला खरोखर मनापासुनच प्रारंभ झाला पाहिजे. बाह्यतः आणता येणाऱ्या दांभिक आवामुळे सदाचार, सद्वर्तन व सच्छील यांच्यात काडीमात्र भर पडू शकणार नाही. सर्वांगीण उन्नतीच्या मार्गाला लागावयाचे असेल तर प्रथम असलेल्या सद्‌गुणांची मोजदाद करा. नंतर अखुट चिकाटीने व प्रामाणिक कळकळीने तुमचे मानसमंदीर झाडून काढा. सुधारणांची कोळिष्टके, जडवादाची जळमटे, काढून टाका. मनाला नेटके वळण लावा. योग्य प्रकारे विचार करण्याची सवय, चोखंदळपणे व आवर्जून, मनाला जडू द्या. प्रत्येक गोष्ट पूर्ण विचारांति, मनाचा तोल ढळू न देता, नियमीतपणे करण्याची पद्धत पाडा. हाती घेतलेले कार्य पूर्ण निष्ठेने उरकल्याशिवाय राहू नका. व्यक्तिमत्वात सुधारणा वा पालट होणे म्हणूनच, व अशा तऱ्हेने, शक्य आहे.

☆

**FEBRUARY 12**

# खास नोंद

केव्हा केव्हा तुम्हाला काही विशेष स्फुरण भरल्याची भावना होते, मन हर्षातिरेकाने, आनंदर्मोनी उचंबळून येते. अशा वेळी तुम्हाला स्वत:जवळ अपार आत्मशक्ति असल्याची एक जाणीव होते. कोणच्या विचारसूत्रांनी ही किमया घडविली ते नीट लक्षात आणा. त्या प्रवाहित विचारधारेची दखल घेऊन तत्परतेने तिची खास नोंद करा. तदनुसार आचरण करणे तुम्हाला मग सोपे जाईल. तुम्हाला स्फुरलेले सारे नवे निर्धार-विचार, नव्या कल्पना-योजना, नवी उद्दिष्टे-ध्येये, यांची वेळोवेळी आवर्जून नोंद करीत चला. अशा महत्वाच्या बाबी नोंदवहीत लिहिण्याच्या पद्धतीमुळे त्या निश्चित, साकार, स्पष्ट जणू दृग्गोचरच बनतात. मग त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात नाही. जीवनांतल्या प्रत्येक क्षणी तुमचे शील, चारित्र्य, वर्तन, घडत जात असते, यांचे विस्मरण होऊ देऊ नका. तुम्ही कारणा-कारणांनी जे काही निवडता, पसंत करता, त्याच्या प्रभावाने तुमच्या जीवनाचा घाट आकार धरतो. तुमच्या सवयीची संकलित परिणती म्हणजे तुमच्या चारित्र्य-शील-स्वभावात येत जाणारी भव्यता. आजच्या, भारतकोकिळा सरोजिनीदेवी नायडूंच्या जन्मदिनी, तुम्हाला जीवनात नेमके काय हवे हे नक्की ठरवा, व ते प्राप्त करण्याच्या दिशेनेच आपली पावले वळवा. तुमच्या दीर्घोद्योगाला, अथक मेहनतीला, अविश्रांत परिश्रमाला, अखंड धडपडीला, अविरत प्रयत्नाला, नि:संशयपणे यश लाभेलच लाभेल.

**(सरोजिनी नायडू जयंती)**

**FEBRUARY 13**

## राष्ट्रीय माघ २५
## (माघ शु १०, अण्णासाहेब पटवर्धन पुण्यतिथि)

# आत्मनिष्ठ श्रद्धा

मानवी जीवनातील सर्व व्यवहार सुरळीतपणे चालविणारी वैशिष्टपूर्ण व परम शक्ति म्हणजे श्रद्धा होय. ही सर्वमान्य वस्तुस्थिति आहे. याबाबतीत कोणाच्याही मनात काडीमात्र किंतु नाही. धंदा म्हणा, शिक्षण समजा, राजकारण पहा, धर्मपालन बघा, सर्व ठिकाणी श्रद्धेला फार महत्वाचे स्थान आहे, ही सर्वांच्या अनुभवाची बाब आहे. महान् शोध, श्रेष्ठ उपलब्धि, भव्य कार्यसिद्धी या सर्वांच्या साधनेची गुरुकिल्ली म्हणजे श्रद्धाच. अर्थात् श्रद्धा म्हणजे आंधळी भक्ति नव्हे, अंधविश्वास तर नव्हेच नव्हे. विश्वास डोळस सुद्धा बुद्धिनिष्ठ असतो. पण श्रद्धा असते आत्मनिष्ठ भावनाजन्य नित्य तुम्ही करीत असलेली बव्हंश कृत्ये किंवा व्यवहार बौद्धिक दृष्टीपेक्षा भावनिक श्रद्धेवरच अधिष्ठित असतात. कळत वा नकळत, जाणता वा नेणता, समजून वा अभावितपणे, तुम्ही सदा श्रद्धेचीच कास धरुन असता. इतकेच कशाला, तुमचा संपूर्ण जीवनव्यवहारच श्रद्धाधिष्ठित असलेला तुम्हास आढळून येईल. आज गुरुवर्य अण्णासाहेब पटवर्धनांची पुण्यतिथि. ते दृढ विश्वासाने सर्वांना उपचार सांगत. अपार श्रद्धेने रोगी ते उपचार करुन यातनामुक्त होत. गुण अण्णांच्या ज्ञानाचा व लोकांच्या त्यांच्यावरील श्रद्धेचा असे. श्रद्धाच सारे मनःस्ताप हरण करते. तर अशी ही श्रद्धा, देवावर हवी, इतरांच्या चांगुलपणावर व स्वतःच्या कर्तृत्वावर हवी.

+ + +

FEBRUARY 14

# राष्ट्रीय माघ २६

# श्रवण व कथन

विचार उचित रीतीने कथन करता आले तर योग्य मार्गाने विचार करण्यास चालना मिळते. मनाच्या सांदीकोपऱ्यात सुप्तपणे पडून राहिलेले अनेक बहुमोल विचार, इतरांस काही सांगताना, त्या ओघात, आपल्या जाणीवेच्या कक्षेत येतात. आपले विचार, कल्पना, मते यांची देवाणघेवाण करण्यासाठीच, पुर्वी अनेकदा जगभरचे व्यासंगी विद्वान व थोर तत्त्वचिंतक सामूहिक रीत्या जागतिक परिषदाना उपस्थित रहात असत. एखाद्या थोर ग्रंथाचे अभ्यासपूर्वक वाचन आटोपल्यानंतर त्यातले ज्ञान पुरे आत्मसात् व्हायला हवे असेल तर त्यातील विषयांवर समानशील बहुश्रुत मित्रांबरोबर चर्चा करण्यासारखा अन्य कोणताच जास्त प्रभावी मार्ग नाही. विचार प्रकट करण्याच्या क्रियेमुळे विचार जोपासले जातात, वृद्धिंगत होतात, इतकेच नव्हे तर नवे विचार उपजतातही. संदिग्ध, अनिश्चित,डळमळीत विचार शब्दरुपाने प्रकट करु लागताच, ते जास्त स्पष्ट, स्थिर व ठाम होऊ लागतात. मात्र हे घडण्यासाठी संभाषणात स्वविचारकथनाइतकाच परविचारश्रवणाचाही अंतर्भाव केला गेला पाहिजे. दुसऱ्यावर एकतर्फी श्रवणभक्ति लादणे हे तसे अनिष्टच. चतुर व निष्णात संभाषणकार बनायचे असेल तर स्वतः पटाईत व प्रेरक श्रोता बनता येणे अगत्याचे आहे. विचारकथन व विचारश्रवण ह्या परस्परपूरक व म्हणून समतुल्य अशा बाबी आहेत.

☆

**FEBRUARY 15**

राष्ट्रीय माघ २७

# यशोदायी मार्ग

ख्यातनाम, लब्धप्रतिष्ठ, कर्तबगार, यशस्वी पुरुषश्रेष्ठांच्या अंगी कोणकोणते सद्गुण होते, त्यांची एकदा जंत्री करुन पहा. साधारणपणे पुढे दिल्या गेलेल्या गुणांपैकीच गुण तुमच्याही यादीत जास्तीकरुन आढळतील. बघा बरे! उद्योगशीलता, एकाग्रता, स्वावलंबन, सचोटी, जोम, चिकाटी, प्रसन्नचित्तता, सारासार-विवेकशक्ति, आत्मविश्वास, धोरणीपणा, उत्साह, मेहनतप्रवणता, निर्धार, निश्चयीपणा, निर्णयशक्ति, धाडसीपणा, सहनशीलता, चिवट-पणा, गांभीर्य, स्थिरबुद्धिशीलता. अशाप्रकारची तुमची स्वतःची यादी तयार झाल्यावर स्वतःचेच एकदा कठोरपणे अंतरंग परीक्षण करा. जगन्मान्य नरवरांच्या अंगच्या वरच्या गुणांपैकी कोणते सद्गुण तुम्ही आपल्या अंगी कितीशा प्रमाणांत बाणवले आहेत याचा निःपक्षपातीपणे आढावा काढा. ही व्यवहार्य, सुलभ व यशस्वी रीत काटेकोरपणे तुम्ही चोखाळलीत की तुमच्यांतल्या अन्यान्य उणीवा तुम्हाला पद्धतशीरपणे उमगतील, जाणवतील, पटतीलही. आणि त्या उणीवा काढून टाकण्यासाठी म्हणजे स्वतःला सुधारण्यासाठी कशावर लक्ष नेमके केंद्रित करावयास हवे ह्याचाही नीट उलगडा होईल. तुम्हाला सुचवलेल्या या मार्गाचा अवलंब एकदा करुन पहा तर खरा. तुमचा न भूतो न भविष्यति एवढा अलोट फायदा होईल.

FEBRUARY 16

## राष्ट्रीय माघ २८

# आतला आवाज

एकांतांत बसून सखोल मननचिंतन करीत असताना सत्याची प्रचीति खऱ्या सुस्पष्टपणाने येऊ लागते. तुमचा आतला आवाज हळूहळू मुखरित होऊ लागतो. त्यावेळी तुम्हाला आपल्या ईश्वरदत्त आत्मतत्वाच्या सूक्ष्म, सत्य व तेजस्वी गुणांची जाणीव होऊ लागते. तुमचा आतला आवाज आता तुम्हांला जास्त स्पष्टपणे ऐकू येऊ लागतो. या आतल्या आवाजाचे मार्गदर्शन, आपले सत्याचे प्रयोग करताना, महात्माजींनी अनेकदा वापरल्याचे आपणास ठाऊक आहे. ईश्वरविषयक चिंतनाने मन शुद्ध होते. जगन्निर्मात्याने सर्व चराचर सत्तत्त्वाने भरुन ठेवलेले असल्यामुळे ते तुम्हास केव्हाही सहजलभ्य असते. सत्तत्त्वाच्या सखोल चिंतनाने मनःशांति लाभते, जीवन सफल होते. आपल्या मनोमय आदर्शाप्रमाणे आध्यात्मिक वृत्तीने, निरपेक्ष बुद्धीने निष्काम कर्मयोग आचरीत, जीवन व्यतीत करण्यात काय मौज आहे, किती सुख आहे, केवढा आनंद आहे; याचा स्वतःच प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा. आतल्या आवाजाच्या आदेशापुढे मान तुकविल्यानंतर ईश्वरीय सद्विचार सत्तत्त्व, सद्भाव, तुम्हाला आपले स्वतःचे म्हणून वापरण्याचे परम सौभाग्य प्राप्त होईल.

—०—

**FEBRUARY 17**

राष्ट्रीय माघ २९

# इच्छांचा विधि-निषेध

तुम्हाला आयुष्यात ज्या इच्छा-अभिलाषांची पूर्ति व्हावी असे वाटते त्यांच्यावर तुम्ही स्वतःचे लक्ष जास्त एकवटा, त्याबद्दल एकाग्र मनाने अधिकाधिक चिंतन चालू ठेवा. म्हणजेच इष्ट इच्छांचा विधि असावा. उलट ज्या बाबींचा आपल्या जीवनाशी संपर्कही येऊ नये, असेच तुम्हाला वाटते त्यासंबंधीच्या विचारांची मनाला शिवा-शीवही होऊ देऊ नका. दुसऱ्या शब्दात, अनिष्ट इच्छांचा निषेध व्हावा. तुम्हाला हव्या असणार–आरोग्य, जोम, विद्वत्ता, शांति, आत्मविश्वास, आशा, सुसंवाद, स्वातंत्र्य, मैत्री, प्रसन्नचित्तता, सौख्य, सुसंस्कार, यश, खिलाडूवृत्ति, नेकी अशासारख्या गोष्टी. अशा व इतरही आनुषंगिक, बाबींवर सर्वदा विचारविनिमय होत असावा, मन एकाग्र करीत जावे. मग ही सर्व ईप्सिते तुमच्या जीवनात मूर्तिमान होतील. नको असलेली दुश्चिन्ह मनातही आणूच नका. नको असलेल्या वस्तूंबद्दल मनात निरर्थक खल चालवूही नका. मनाला संपूर्णपणे गुंतवून टाकतील, त्यावर नियंत्रण ठेवतील, अशीच उद्दिष्टे, ध्येये, ईप्सिते निवडण्याची शक्ति तुमच्याचजवळ आहे, याचे सदैव भान राहू द्या. विचारधारा योग्य दिशेने प्रवाहित होत असली मनात चिंतन इष्ट गोष्टींचेच चालले, इष्ट इच्छांचा स्वीकार व अनिष्टांचा धिःकार झाला, की जीवनही आदर्श बनणार.

*

FEBRUARY 18

# सहाय्य ईश्वराचे

परमात्मा सर्वगामी, सर्वदर्शी तर आहेच, तसा तो सर्वज्ञानी, सर्वव्यापीही आहे. म्हणजेच चराचर व्यापून असलेला हा भगवंत केव्हाही तुमच्याजवळच आहे. ज्या ज्या वेळी एखादा उदात्त सुविचार मनात डोकावतो, एखादे सेवाकार्य डोक्यात डोकावते, एखादी विराट योजना बुद्धीला स्फुरते, त्या त्या वेळी तुमच्या मनात जणू परमात्म्याचे प्रतिबिंबच पडलेले असते. परमात्म्याबद्दलच्या सर्वंकष चिंतनाने, जगन्नियंत्याच्या कार्यप्रणालीसंबंधीच्या मननाने, सृष्टिकर्त्याच्या व्यवहाराबाबतच्या सखोल अध्ययनाने, खरे ज्ञान प्राप्त होते. न्याय, सत्य, प्रेम, दया, पावित्र्य ही सर्व त्या अनादि अनंत निर्गुण निराकार परमात्म्याचीच स्वरुपे होत. तुमच्या, सर्व वैयक्तिक अडचणींचे निवारण, विविध समस्यांचे समाधान, अन्यान्य संकटातून सोडवणूक, त्या सर्वशक्तिमान ईश्वराला शरण गेल्याने होतील. दैनंदिन व्यवहारात सत्याने वागताना व प्रामाणिकपणाने वावरताना त्याच्याकडून योग्य मार्गदर्शन मिळेल, सत्कार्य करताना त्या परम शक्तीचे सहाय्य सतत लाभेल, सहाय्य देणारा हात कायम तुमच्या पाठीवर आहे हे पटल्यावर पावलोपावली तुम्हाला ईश्वराचे अस्तित्व जाणवेल. सत्कृत्यांसाठी सर्वदा, ईश्वरी सहाय्य, सापडतेच सापडते.

# राष्ट्रीय फाल्गुन १

# चारित्र्यघडण

'पेराल तसे उगवेल ' ही म्हण स्वतःच्या सत्यतेच्या पडताळा सहजी आणून देते. हा निर्सगाचा अपरिवर्तनीय आणि सार्वकालिक असा गुणधर्म आहे. पण हा गुणधर्म मनुष्यदेशातील मनःप्रांताला व देहपुराला पण लागू आहे. मनुष्य, त्याचे मन, त्याचा देह सारेच पेरल्या विचारांचे अंकुर असतात. ओढवणारी दुःखे मनुष्याला शिस्तच लावण्यासाठी असतात. दुःख जणू मनुष्यावरचा एखादा पहारेकरीच. ते मनुष्यात सुधारणाही घडवून आणते. दुःखाचा प्रसंग ओढवताच माणसाने वेळीच सावध व्हावे. दुःख, जशी पुढे येणाऱ्या महासंकटाची, पूर्वसूचनाच होय. मात्र हे दुःख वा संकट विनाकारण आलेले नसते, तर ते असते आपणच कधी काय जे पेरुन ठेवलेले कर्म त्याची उगवण असते. मनुष्याच्या साऱ्या बऱ्या-वाईट कृत्यांच्या बेरीज-वजाबाकीतून त्याच्या जीवनाची घडण होत असते. स्वतःच्या जीवनचारित्र्याच्या घडवणुकीतले विचारांचे महत्त्व ओळखून मनुष्याने त्यांचे नियंत्रण केले पाहिजे. ईश्वराच्या अस्तित्वाची, त्याच्या देखरेखीची नि सान्निध्याची जाणीव सतत मनात वागवून, दुर्विचाराना तिथे क्षणमात्र थारा न देता, मौक्तिकांप्रमाणे मूल्यवान् अशा आपल्या चारित्र्याची घडण करणे सर्वस्वी तुमच्याच हाती आहे.

卐

**FEBRUARY 20**

# राष्ट्रीय फाल्गुन २

## (माघ व. १, गुरुप्रतिपदा)

# निवडक निश्चय

आज गुरुप्रतिपदा. या सुयोग्य दिवशी चिकित्सक आशावादी बनून मी प्रत्येक व्यक्तीतील उत्कृष्ट, प्रत्येक गोष्टीतील उत्तम तेवढे टिपून घेईन, असा मी निश्चय करतो. विधायक दृष्टीकोनातून मी माझे विचार मंथन चालू ठेवीन, असा मी निर्धार करतो. सर्वदा मी माझी वैयक्तिक वर्तणूक उच्च पातळीवर राखीन अशी आज मी प्रतिज्ञा करतो. दैनंदिन जीवनात मी माझ्या अंगी स्वभावदाक्षिण्य प्रशंसाक्षमता, निश्चयीपणा, सचोटी आणि कळकळ हे गुण आवर्जून बाणवीन अशी गुरुप्रतिपदेच्या या पर्वदिनी शपथ घेतो. मी केव्हाही इतरांच्याबद्दल प्रशंसात्मक तेवढेच बोलेन आणि प्रशंसा करण्याजोगे काही नसेल तर गप्प राहीन पण निंदानालस्ती करणार नाही, असा माझा निर्धार असेल. माझ्या वागणुकीची व स्वभावाची मी वारंवार परीक्षा करुन त्यांच्यात विकास व सुधारणा साधीत राहीन असा मी निश्चय करतो. माझी कुवत व मला लाभलेल्या संध्या यांचा जास्तीत जास्त सदुपयोग करता येईल व कार्यसिद्धी पदरात पडेल अशा पद्धतीने मी माझ्या विचारांची दिशा ठेवीन, व जीवनात काही उल्लेखनीय उद्दिष्ट गाठीन जीवन कोणत्यातरी महान कार्यासाठी वेचीन, असाही निश्चय मी आज करतो. मला माझ्या गुरुजींचे आशीर्वाद लाभोत.

卐

**FEBRUARY 21**

## राष्ट्रीय फाल्गुन ३

# जुळी भावंडे

मोहकता हा मनाचा व व्यक्तिमत्वाचा एक अंगभूत गुणधर्म आहे. यांनी युक्त व्यक्तिची जीवनाकडे पाहण्याची प्रवृत्ती आशावादी व सुखप्रसारक अशी असते. दाक्षिण्यपूर्ण वागणूक प्रयत्नाने जोपासता येते पण मोहकता आनुवंशिकपणे वा उपजतच लाभावी लागते. तिची इतरांच्यावर अनुकूलच छाप पडते. शिष्टाचारपूर्ण वर्तन म्हणजे बाह्यरंगाची चकाकी, झळाळी. ती प्रसंग-परिस्थितीनुसार उजळून घ्यावी लागते; पण मोहकता ही जन्मानेच लाभलेली नि रोमरोमात भिनल्याने सदासिद्ध असलेली अशी वस्तु आहे. तिच्यावर हात फिरवण्याची गरज पडत नाही. मोहकता ही सुसंस्कारबंधुची जुळी भगिनी, एक प्रकारे मुलुखावेगळी. भाऊ पाठराखण करायला उभा असेल शेजारी तर मग या बहिणीची कळी भलतीच खुलते. मोहकतेत ती मुळात असेल तर, प्रयत्नाने भर घालता येते. कनवाळूपणा, कळकळ, निष्ठापूर्णता व उमदेपणा या वृत्तींच्या मशागतीवर, जोपासनेवर भर द्या की मोहकतेत भर पडेल. या मोहकतेची अव्याप्ति-अतिव्याप्तीचे दोष टाळून नेमकी व्याख्या करायचा प्रयत्न केला तर अक्कल गुंग होते. पण एखाद्याच्यात ती असली की जगाला तेव्हाच जाणवते. जाणत्या मनापासून तिचे अस्तित्व लपुन राहू शकत नाही.

FEBRUARY 22

# राष्ट्रीय फाल्गुन ४
## (माघ व. ३, चंद्रआझाद आत्माहुति दिन)

# सहनशीलता

बाब साधी असो, महत्त्वाची असो, छोटी असो वा मोठी असो सर्ववेळी ती हाताळताना माणसाने सहनशीलतेची कास सोडू नये. ज्या लोकांच्या कल्पना, मते, विचार तुमच्या मतांशी जुळत नाहीत त्यांच्याशीही सहिष्णुपणे वागा. घटना तुमच्या मनाविरुद्ध घडतात, बेत योजल्याप्रमाणे पार पडत नाहीत, तेव्हासुद्धा चिडखोरपणा करु नका. रोजच्यारोज ज्यांच्याशी तुमचा नित्य व्यवहार असतो, त्यांच्याबाबतीत तर जास्तच सहनशीलपणा वापरावा लागतो' थोडक्यात सांगायचे तर प्रत्येकाने सर्वदाच सहनशीलता दाखवावी कोणत्याही प्रसंगी मनाचा तोल ढळू देऊ नये. लहरीपणाच्या आहारी न पडता, सदा स्थितप्रज्ञ राहण्यासाठी सहनशीलतेचीच गरज असते. अडथळे–विरोधांना न जुमानता, आपली मते मांडत राहण्यास व इतराना विरुद्ध विचार बोलू देण्यास गरज पडते सहनशीलतेचीच आत्मनियंत्रण व उदारमतवाद यांच्या मदतीने तुम्ही परदोषांकडे दुर्लक्ष करुन इतराचा दुबळेपणा ओळखीत, त्यांनी केलेले अन्याय पोटात घालू शकता. सहनशीलतेच्या बळावरच शाश्वत कार्यसिद्धी पदरात पडते. आजच्या दिवशी बलिदान केलेले आझाद म्हणजे मूर्तिमंत सहनशीलता. त्यांनीच सहनशीलता हे महान् सामर्थ्य आहे, हे जगाला जाणवविले.

卐

FEBRUARY 23

## राष्ट्रीय फाल्गुन ५

# कार्य सिद्ध कशाने?

**व्या**पारी वृत्ति आजच्या जीवनात सर्वत्र बोकाळली आहे. काही केले की मोबदला हवा. जीवन, गुणार्जन, धर्म, प्रेम आदि साऱ्याच क्षेत्रांत धंदेवाईक प्रवृत्तीला प्राधान्य आले आहे. धंदा म्हटला की भावात चढउतार, काळ अनुकूल–प्रतिकूल ह्या सारख्या आनुषंगिक उपाधि आल्याच जोडीने. कोणासाठी काही केले, की त्याच्या परतफेडीची अपेक्षा ठेवली जाते. ह्यातूनच सारे दुःख निर्माण होते. अभिलाषा वा हव्यास ही दुःखाची जननी होय. निरिच्छपणा हा सर्व सुखाचे आगर. षड्विकारांवर विजय मिळविणारे, इंद्रियदमन साधलेले, लक्ष्मीमायेच्या मोहातून सुटलेले साधूही नावलौकिकाच्या आशेत तरी अडकतात आणि त्यांच्या आयुष्यभराच्या कार्यावर, साधनेवर पाणी पडते. अर्थ इतकाच की कार्यसिद्ध व्हायचे राहिलेच, तेही लौलिकाच्या स्वार्थापोटी. कोणतेही कार्य करावयाचे ते केवळ त्याच्या पूर्ततेसाठीच अशा भावनेने कामाला हात घालणारा विरळाच. सुप्त अंतस्थ स्वार्थी हेतूने कार्यावर पाणी पडते, त्याचा नाश होतो. अर्थार्जन, आधिकारप्राप्ति, स्वार्थसाधन यासारख्या अंतस्थ हेतूंमुळे कार्य सिद्ध होण्यात विघ्न पडते. निःस्वार्थपणे, निरिच्छपणे, निर्हेतुकपणे केवळ लोकसेवेसाठीच केलेले कार्य खऱ्या अर्थाने सिद्ध होते असे मानता येईल.

*

## राष्ट्रीय फाल्गुन ६
## (माघ व. ५, दत्तयात्रा-औदुंबर)

# प्रभूचे प्रतिबिंब

दत्तभगवान म्हणजे मूर्तिमंत प्रेम. तुम्ही घडविले गेलात मुळात ते भगवंताचे प्रतिबिंब म्हणूनच. जितक्या प्रमाणात तुमचा दैनंदीन जीवनातील व्यवहार प्रेमपूर्ण राहील तितक्या प्रमाणात या विधानाच्या सत्यतेचा पडताळा येणार. मनाने तुम्ही, सत्यसचोटीचा जितका अवलंब कराल तितके तुम्ही दत्तप्रभूंच्या अधिक निकट जाता; आणि मग त्यांचे हे सानिध्य आणि त्यांची सर्वव्यापी कल्याणकारिता जसजशी तुम्हाला जाणवत जातील तसतसे तुमचे ऊर अत्यानंदाने ओसंडू लागेल, 'मला ते दत्तगुरु दिसले' अशी तुमची अवस्था होईल. प्रेमळपणा, सत्यशीलता, कल्याणकारिता या दैवी गुणांशी सुसंगत असे विचार मनात वागविण्याचा आजच्या औदुंबरच्या दत्तयात्रेच्या निमित्ताने निर्धार करा. उत्तम, विशाल, समृद्ध जीवन जगता येण्याचा तुमचा वारसा, इष्ट सुसंगत विचार मनात वागविल्याने हस्तगत होईल; आणि दत्तसखा अवधूत भेटून गेल्याचा अनुपम आनंद तुम्हाला लाभेल. मूर्तिमंत कल्याण असे दत्तप्रभु अणूरेणूत व्याप्त. तेव्हा तुम्हा भोवती सर्वत्र कल्याणच कल्याण दत्तप्रभू सर्वशक्तिमान. त्यांच्या सान्निध्याकडे नेणारा तोच खरा नि एकमेव मार्ग. तो चोखळून, चारित्र्य, शील, वर्तणूकीचे बाबतीत स्वत:प्रभूचे प्रतिबिंब बनावे हे उद्दिष्ट मनी बाळगण्यास आजचा दत्तयात्रादिन सर्वोत्तम आहे.

FEBRUARY 25

# राष्ट्रीय फाल्गुन ७

# हिंदुत्व-१

स्वातंत्र्यवीर आज अनंतात विलीन झाले. त्या निमित्ते त्यांच्या हिंदुत्व विषयक विचारांची उजळणी करणे आज उचित ठरेल. हिंदुत्व पंथ-संप्रदाय नाही तर ती एक सर्वसमावेशक, सर्वव्यापक जीवनदृष्टि आहे. ती अनुभवानुसार बदलू शकते, सदसद्विवेकबुद्धी प्रमाणे वर्धिष्णु राहते. विज्ञानाच्या आव्हानाला सामोरी जाऊन ती अद्यावत् बनत जाते. हिंदुत्व एकाच धर्मग्रंथात जखडलेले नाही, किंवा कोणा संस्थापकाच्या अधीन नाही. निष्काम कर्मयोग हा हिंदुत्वाचा मजबूत पाया. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह व संयमी ब्रह्मचर्य या पाच स्तंभावर त्याचे मंदिर उभारलेले आहे. हिंदुत्व दुराग्रही नाही, 'की हम करे सो कायदा' वृत्तीचे नाही. 'अहं ब्रह्मास्मि,' 'तत्वमसि,' व 'सर्व खलु इदं ब्रह्मम्,' ही त्याची तीन प्रधान सूत्रे होत. निष्कामता लाभून हव्यास संपताच, मोक्षाची वाट गवसते. निराकार निर्गुण अव्यक्ताचे ध्यान–मनन–चिंतन ही ही एक प्रकारची मानसपूजाच होय. मायावी दुष्ट कायेच्या बंधनातून निसटणे हे हिंदुत्वाचे प्रधान उद्दीष्ट. हिंदु बनण्यासाठी विधि असा कोणताच सांगितलेला नाही. स्वत:ला हिंदु मानतो तो हिंदु. जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात मनुष्य स्वत:च्याच पापकर्मांनी सापडत असतो. यातून मुक्ति निष्काम कर्मयोग आचरल्याने. पण लोकसेवेची कामना वर्ज्य मानलेली नाही.

**(स्वातंत्र्यवीर पुण्यतिथि)**

**FEBRUARY 26**

# राष्ट्रीय फाल्गुन ८

# हिंदुत्व-२

हिंदुत्व हा अनीश्वरवादी, एकेश्वरवादी, अज्ञेयवादी, विश्वात्मक-देववादी अशा सर्व विविध मतांचा, पंथांचा समन्वय, संग्रह, संगम आहे. व्यवित कायद्याने, रुढीने, संस्कृतीने, वंशाने हिंदू असू शकते पण या हिंदूत्वात जातीयतेचा, बुरसटलेपणाचा लवलेशही नसतो. मनूपासून मार्क्सपर्यंत सर्वांना यात स्थान आहे, वाव आहे व मानही आहे. हिंदुत्व विश्वरहस्याचा उलगडा करते, अध्यात्माचे शास्त्र शिकविते, आत्म्याचे गूढ समजावून देते. हिंदुत्व म्हणजे समाजाच्या वैयक्तिक व सामूहिक कल्पनांचे उत्क्रान्त स्वरुप आहे. ते मानवधर्माचा अवलंब करते. जगा, जगवा व जाणा ह्या हिंदुत्वाच्या प्रधान आज्ञा आहेत. हा आहे विविध श्रद्धांचा एकजिनसी, एकरुपी, एकरंगी समूह. ते हिंदुत्व विश्वनियंत्या अनंताचे श्रेष्ठत्व मानते, आत्मतत्त्वाची मातब्बरी जाणते, कायिक मोहांचा निरास अपेक्षते, विश्वबंधुत्व जागविते, सर्वभूती विलसणारे समान ब्रह्मत्व ओळखते. सुसभ्यपणे, सुविचाराने, सुसंस्कृतपणे, कसे वावरावे–वर्तावे, जगावे–जगवावे, जाणावे–जाणवावे याचे व्यवहार्य यमनियम हिंदुत्व घालून देते. हिंदुत्वातील विशालता, उदारमतवादीता, सहिष्णुता परस्पर-विरुद्ध मतपंथांच्या अनुयायांनाही एकसूत्रात गोवतात. स्वातंत्र्यवीरानी या अशा प्रगल्भ, अपूर्व विश्वव्यापी हिंदुत्वाचा ध्यास धरला व सन्मान वाढविला.

* * *

**FEBRUARY 27**

# राष्ट्रीय फाल्गुन ९

# साधेपणा

साधेपणाच्या ध्रुवताऱ्यावर सदैव नजर ठेवून तुमची जीवननौका तुम्ही हाकारा. आपल्या कुवतीच्या सर्वस्वी बाहेरचे, असे काही मिळविण्याचा नसता हव्यास तुम्हाला असंतोषाच्या मगर मिठीत सापडवील नि दुःखी करील. दुसऱ्याना मिळालेले आपल्याला लाभले नाही, म्हणून त्यांचा मत्सर करण्याने तुम्ही आपल्या मनाची शांतता तेवढी घालवून बसता. भोवताली जी काही भोगसाधने दिसतात ती सारी आपल्याला पाहिजेत अशी अचरट हाव घातक ठरते. कायम असंतुष्ट राहणे हे मानसशास्त्रीय दृष्टीने पण अहितकारकच सिद्ध झालेले आहे. जेवढे परमेश्वरकृपेने आपल्या मनगटाच्या जोरावर मिळविता आले आहे, तेवढेच गोड मानून त्यावर संतोष करणे, प्राप्त सुदैवाबद्दल भगवंताचे ऋणी राहणे, आपल्या कर्तबगारीवर विश्वास ठेवून याहून जास्त उज्ज्वल भविष्य खेचून आणता येईल याबद्दल खात्री बाळगणे, ह्या त्रिसूत्रीनुसार जीवननौका हाकारुन आयुष्यात साधेपणाने वागून सुखी होणे अगत्याचे आहे. सौख्य सुखसाधनांवर अवलंबून नाही. साधेपणा, चिरसंतुष्टता, परोपकारवृत्ति आपल्या स्वभावात उतरवा; आणि जीवनात सुखसमृद्धिसमाधानाची रसाळ गोमटी फळे चाखा.

*

# ध्रुवदृष्टि

कोणच्याही अनिष्ट, अवाञ्च्छनीय, निराशाजनक विघातक विचारांना आपल्या मनात तुम्ही चुकूनही थारा देऊ नका. त्यांना अडविण्यासाठी आपल्या मनाची कवाडे बंद ठेवा अजिबात. आपल्या आत्मिक वैयक्तिक इच्छाशक्तीची दिव्यता जाणून तिला साजेसे आपले जीवन घडवा. आपली आंतरिक योग्यता व कुवत जाणून तिला शोभेलशा अशा एखाद्या प्राप्य उच्च स्थानावर ध्रुवदृष्टी खिळवा. आपले मनसुबे, आकांक्षा, उद्दीष्टे, ध्येये, लक्ष्ये याना कुठल्याही तऱ्हेने आडकाठी, मर्यादा, बंधने घातली जाऊ शकत नाहीत, अशी मनाशी पक्की खूणगाठ बांधून ठेवा. ज्या ज्या थोर संशोधकाने काही नवनिर्मिति करुन दाखविली त्याना नक्कीच काही महान् दिव्यदृष्टी लाभलेली होती. थोरांची नजर सदा भव्य दिव्य उच्चत्वावर खिळलेली असते. जसजसा तुमच्या स्वसामर्थ्याचा विकास होत जाईल, तसतशी तुमची परोपकार करण्याची शक्ति द्विगुणित होत जाईल. प्रेमळपणा, आदरभाव, सन्मान व उमदेपणा यांच्याद्वारा खरा मोठेपणा व्यक्त होत असतो. जे काही उपकारक, हितकर, इष्ट घडवावे असे तुमच्या मनात उचंबळत असेल, त्याला प्राधान्य द्या. ते कृतीत उतरवा. ज्या उच्च स्थानावर तुम्ही आपली ध्रुवदृष्टी रोखून धरलेली असेल ते या पद्धतीने जीवनव्यवहार चालविल्यास तुम्हाला सहजगत्या प्राप्त होईल.

☆

# राष्ट्रीय फाल्गुन ११

# स्वतंत्र बाणा

तुमच्या हातून घडलेली कार्येच तुमच्या योग्यतेची, नैपुण्याची, कौशल्याची, बोलकी साक्ष असतात. कार्य न केल्याचे समर्थन करण्यासाठी सबबी सांगणे हे कमकुवतपणाचे लक्षण होय. तुम्ही प्रयत्नांची शर्थ करुन, सारे कौशल्य पणाला लावून, कार्ये पार पाडीत चला. त्या कार्याचे मूल्यमापन दुनियेला करु दे हवे तसे. त्या कार्याच्या योग्यायोग्यतेबद्दलचा निर्णय जगाला घेऊ द्या खुशाल पाहिजे तो. त्याचा तुमच्या कार्यमग्नतेवर परिणाम न व्हावा. हुरळून जाऊ नका, हिरमुसूही नका. स्वतंत्र बाणा जोपासून वावरलात तर व्यष्टीत काय, समष्टीत काय, तुम्ही कुठेच कच अशी खाणार नाहीत. योग्य, सत्य, न्याय्य, अशीच कार्ये तुमच्या हातून घडली आहेत याची खात्री असल्यावर स्वतंत्र बाण्याने वावरण्यास कोणचीच आडकाठी नाही श्रेष्ठ आचारविचार व उत्कृष्ट वर्तणुक यांच्या जोरावर तुम्हाला प्राप्त झालेले शीलसामर्थ्य ही तुमची अमूल्य अशी पूंजी होय. इतरांशी ज्या नेकीने, बाणेदारपणाने, शिस्तीने वागता त्याहून अधिक कठोर शिस्त तुम्ही स्वतःच्या बाबतीत पाळा. उघडपणे जे करण्यास तुम्ही धजणार नाही, ते चोरुनही करु नका. आत्मपरिक्षण, सुसंस्करण व स्वयंशासन यांची कास न सोडता, स्वकार्यी लक्ष एकवटून, स्वतंत्र बाण्याने वावरलात, तर भोवतालचेही तुमच्याबद्दल आदर बाळगतील.

– • –

MARCH 2

# राष्ट्रीय फाल्गुन १२

# महती सत्यसाधनेची

सत्यस्वरुपी परमेश्वराची श्रद्धेने भक्ति करा. पण या सत्यज्ञान भक्तीचा कधी बाजार मांडू नका, व्यापार करु नका. भगवान् आपले न्याय-निवाडे सत्याच्या आधारेच करतात. सत्याचाच स्वसंरक्षणार्थ ढालीप्रमाणे उपयोग करावयाचा असतो. सत्य चिरशाश्वत असते. या सत्यस्वरुपी परमात्माचा साक्षात्कार होताच, काय करणे योग्य व काय अयोग्य याबाबतच्या किं कर्तव्यमूढतेतून तुम्ही मुक्त होता. सत्यज्ञान त्रिकालाबाधित असते. हुशार मनुष्य त्या ज्ञानाचा फायदा घेऊन आपली विद्वत्ता वृद्धिगत करतो, सत्याची महति समजून वागतो. तुमच्या हृदयात सत्यज्ञानाचा प्रादूर्भाव होताच आत्मा सुखावतो, विवेक जागृत होतो, व्यवहार बोधाचा स्पष्ट प्रकाश उजळतो तेव्हा सत्याचा दंडूका हाती धरुन ठाम उभे रहा आणि नेकी-सचौटीच्या फिती दंडावर झळकवून आसमंतातील कुप्रवृत्तींची दरोडेखोरी निष्ठुरपणे मोडून काढा. असत्यरिपूचा पाडाव करण्या इतके शौर्य, बल, साहस आता तुम्हाला प्राप्त झालेले आहे. भगवंत तुमचा पाठीराखा आहे. हे ध्यानी घेऊन असत्याशी निकराची झुंज द्या. सत्याची शक्ति अपार असते. अशा बलवान् सत्याच्या साधनेने मनुष्याला अपूर्व सामर्थ्य प्राप्त होते.

MARCH 3

# राष्ट्रीय फाल्गुन १३

# शब्दाध्ययन

शब्दांचे व्यासंगपूर्वक अध्ययन चालविणे हा मोठा आनंददायी, ज्ञानवर्धक आणि उपकारक असा छंदवजा विरंगुळा आहे. महान कल्पना-विचार अभिव्यक्त करणाऱ्या शब्दांवर वारंवार चिंतन करा. अशांपैकी एखादा शब्द निवडून त्याचा असाधारणपणा, अर्थ, व अभिप्राय साकल्याने मनात उतरवून घ्या. समजा, तुम्ही 'सत्य' शब्द विचारार्थ निवडला आहात. त्याचे मूल्य-महत्व ओळखा, त्याच्या गर्भितार्थाचे आकलन होऊ द्या. त्या तत्त्वाचा जीवनात, किती, कुठे, कसा वापर होणार यावर मनोमंथन चालवा. सत्य तुमच्या आचार विचार- उच्चारात सर्वांशाने समूर्त होऊ द्या. अशा तोलामोलाचे आणखीही खूप शब्द आहेत. 'अमरत्व,' 'न्याय,' 'प्रीति,' 'ईश', 'निष्ठा', 'मैत्री', 'थोरवी', 'स्वर्ग', 'सचोटी', 'विश्व', 'पुढारीपणा', 'सामर्थ्य', 'सौंदर्य', 'विनय', 'विद्वत्ता', 'पूर्णत्व', 'समृद्धि', अशा शब्दांचा सर्व बाजूनी अभ्यास करा. या शब्दांबद्दल जेव्हा तुम्ही मनोमन सखोल चिंतन चालू ठेवाल तेव्हा शब्दाभ्यासाच्या या उपक्रमामुळे तुम्हाला तुमची मानसिक पातळी उंचावल्याचा व मन प्रगल्भ, विशाल, उदात्त, होत जात असल्याचा एक सुखद, अपूर्व, सम्यक अनुभव प्राप्त होऊ लागेल. वारंवार, हेतुपूर्वक सखोल शब्दाध्ययन करण्याने मन आनंदाने भरुन जाईल.

MARCH 4

# राष्ट्रीय फाल्गुन १४

# समतोलवृत्ति

समतोलवृत्ति म्हणजे नियंत्रणक्षम सामर्थ्य. ही वृत्ति शक्तिसंचय बनवून गरजेच्या वेळी वापरण्यासाठी शक्ति उपलब्ध करते. कसल्याही परिस्थितीत, कोणत्याही प्रसंगी समतोलपणा तुम्हाला धीरगंभीर, शांत पण दृढनिश्चयी ठेवतो. शक्तिहीनता, रिक्तता, सुस्तपणा किंवा बेपर्वाई यांना समतोलवृत्तीत काडीमात्र थारा लाभत नाही. ही वृत्ति आहे सामर्थ्य, आत्मनियंत्रण, शक्तिसंचय यांचे प्रतिक. ती आहे आत्मविश्वास, स्वतंत्रपणा आणि प्रभुत्व यांची द्योतक. आडदांड, कजाग, भांडखोर, आक्रस्ताळी, कांगावखोर माणसे समतोलवृत्तीच्या धीरगंभीर व्यक्तीपुढे पार नांगी टाकतात. समतोल-वृत्तीचा मनुष्य शासन चालवितो, सत्ता गाजवितो. धीरोदात्त, स्थिर वृत्तीने केलेले कार्य उत्तम ठरते; कारण ते मेहनतपूर्वक, अक्कलहुशारीने, परिपूर्णतया असे केलेले असते. समतोलवृत्तीची व्यक्ति इतरांच्यावर प्रभाव पाडते, अनेकांच्यांवर छाप ठेवते, सर्वांना कह्यांत राखते. तिच्याजवळ असते भरपूर संचित सामर्थ्य. ते ऐनवेळी उत्तम प्रकारे उपयोगी पडते. कारण ही शक्ति योग्य प्रकारे नियंत्रित केली जाऊ शकते. अत्यावश्यक सामर्थ्याची, सम-तोलवृत्ति उधळामाधळ तर होऊ देत नाहीच, शिवाय सर्व कर्मेंद्रि-यांची कार्यक्षमता संतुलित राखते. ही वृत्ति शक्तिचा अपव्यय टाळ-ण्यास टपलेली असते.

卐

**MARCH 5**

राष्ट्रीय फाल्गुन १५

# बेतशीर व्यय

काळ भलताच पळपुटा आहे हे प्रत्येक विचारशील व्यक्तीला लौकरच उमगते. ही वस्तुस्थिति मनात पक्की घर करुन बसताच, प्रत्येकजण, प्रयत्नांचे प्रमाण पराकाष्ठा करुन वाढवून जास्त कार्य पदरात पाडून घेण्याची घिसाडघाई करु लागतो. अशा वेळी वास्तव परिस्थिति काय प्रकारची आहे याबद्दल सखोल व जाणीवपूर्वक परिशीलन प्रत्येकाने करणे वास्तविकपणे नितांत आवश्यक आहे. ध्यानात येऊ लागेल की डोंगराएवढा काळ पुढे पसरलेला आहे. पण इष्ट फलप्राप्ति पदरात पडण्यासाठी पुरेशी कार्ये पार पाडण्याच्या दृष्टीने या एवढ्या काळाचा बेतशीर व्यय कसा व्हावा याची योजनापूर्ण आखणी होणे खूपच महत्त्वाचे आहे. दूरदृष्टीने व चातुर्याने, उपलब्ध काळाचा निश्चित व्यय आखल्यानंतर, प्रत्येकाने आपल्या आखणीत काहीही दोष उरलेला नाही याबद्दल खाराखुशी करुन घेतल्यावर, हाती घेतलेले कार्य आत्मविश्वासाने अविरतपणे चालू ठेवण्यास मुळीच हरकत नाही. परिस्थिती इतपत अनुकूल व पाठपुरावा करणारी आहे हे ध्यानी घेतल्यावर निष्कारण घिसाडघाई करण्याची गरजच काय? आपण पुरेसे समर्थ आहोत अशा प्रबळ आत्मविश्वासाने, समतोलवृत्तीने, प्रत्येकाने स्वीकृत कार्याला, धीरगंभीरपणे स्वतःला संपूर्णपणे वाहून घ्यावे हेच श्रेयस्कर.

*

**MARCH 6**

# राष्ट्रीय फाल्गुन १६

# नित्य प्रार्थना

रोज तुम्ही, त्या सर्वशक्तिमान परमेश्वराची, अशा प्रकारच्या धाटणीने करुणा भाका: "हे दयानिधे, तुझी प्रार्थना करण्याची मला इच्छा होत आहे हीही तुझीच लीला आहे. कुठल्याही पापकर्मापासून चार हात दूर रहावे मी, ही बुद्धि मला तुझ्याच कृपेमुळे होत आहे. तुझ्या सत्य स्वरुपाचा मला साक्षात्कार व्हावा यासाठी मी सदा इच्छुक आहे. तुझी आज्ञा मला पाळता यावी, तुझा उपदेश मला कृतीत उतरवता यावा यासाठी तू मला समर्थ बनव. आजपर्यंत मी, सारा भार सदा तुझ्यावरच टाकला आहे, नि पुढेही टाकीत राहणार आहे. तुझी कृपा नसती तर आणि नसेल तर, हे कसे बरे साधले असते आणि साधणार आहे? माझी तुझ्या चरणी दृढ श्रद्धा आहे. तुझी सेवा माझ्या हातून घडावी या हेतूने तू मला मनुष्ययोनीत जन्माला घातलेस याबद्दल मी तुझा सदैव ऋणीच राहीन. मात्र उतराई असा कधीच होऊ शकणार नाही. तुझी इच्छा मला सदैव नेमकी ओळखता येऊन तदनुसार मी आज्ञाधारकपणे वर्तावे. माझे जीवन तुझ्या चरणी वाहिले जावे हीच माझी आकांक्षा आहे. हिची, पूर्ति व्हावी एतदर्थ आवश्यक ती शक्ति, बुद्धि व आवड, हे देवा तू माझ्या ठायी निर्माण कर. तुझी भक्ति करण्याचे कसब माझ्या ठिकाणी उपजो. माझ्या आचार–विचार–उच्चारावर तुझा वरदहस्त राहो. मायबापा, या दीन लेकराला संभाळ."

# राष्ट्रीय फाल्गुन १७

# प्रेरक पर्याय

तुम्हास नावडणाऱ्या, नको असणाऱ्या, अहितकारी अशा सर्व गोष्टींसंबंधी, विषयांबाबत, बाबींबद्दल, विचार करण्याचे या क्षणी पार सोडून द्या. फक्त हव्या असलेल्या इष्ट आकांक्षांचेच चिंतन चालवा. युद्धे, शस्त्रास्त्रे, हाहाःकार, दारिद्र, दुर्दैव, दुष्काळ, घबराट, गुन्हे, दुष्टावे, अपयश, आत्महत्या, रोगराई, मृत्यू विषयक, भवति-न-भवति, मनन वा भाषण कटाक्षाने टाळा. विचार करायला, चिंतन, चालवायला किंवा भाव प्रकट करायला, समृद्धि, शांतता, आरोग्य, जीवन, सुसंधि, आत्मविश्वास, भरभराट, सुख, प्रगति, सामर्थ्य, सिद्धि, सत्य, न्याय, सुयश, सचोटी यासारखे अगणित विषय विद्यमान आहेत. आपणा सर्वांच्या विचारांच्या अनुरोधानेच जग-धारणा चालू असते. म्हणून जसे जग बनावे अशी तुमची इच्छा असेल तशी तुमची विचारधारा ठेवा. स्पर्धेऐवजी सहकार्य, द्वेषा-ठिकाणी प्रेम, संशयाच्या जागी विश्वास, युद्धापेक्षा शांतता, स्वार्था-हून सेवावृत्ति या प्रेरक पर्यायांना जगधारणेत स्थान मिळवून द्या. हे प्रेरक पर्याय, या जगाची विसकटून गेलेली घडी पुन्हा नीट घालू शकतील. जगात शांतता, सद्‌गुणमयता, सदिच्छा स्थापित करण्याला योग्य विचारसरणीहून अधिक प्रभावी अशी दुसरी शक्ति नाही.

*

**MARCH 8**

## राष्ट्रीय फाल्गुन १८
## (फाल्गुन शु. ३, रामकृष्ण परमहंस जयंति)

# ठायींच्या शक्ति

समाजात व्यक्ति दोन प्रकारच्या असतात, एक ठायींच्या सुप्त शक्तींचे ज्ञान झालेल्या व दोन–ज्ञान न झालेल्या. या दुसऱ्या वर्गातील व्यक्ति स्वकर्तृत्वावर विश्वास नसल्याने दैवाच्या नावाने खडे फोडतात. अर्थात ही वाट चुकलेलीच माणसे. 'मी कमकुवत आहे, असमर्थ आहे,' हा विचार समूळ उपटुन टाका. दृढ संकल्प व अथक परिश्रम यांच्या जोरावर काय साधणार नाही ? विचार हे क्रियेमागील प्रेरक तत्व असते. उद्‌भवलेल्या विचारांनुसार कार्य प्रगटते. तेव्हा स्वकर्तृत्वाबद्दल मनात अविश्वासाची हीन दीन भावना कदापि निर्माण होऊ देऊ नका. स्वकर्तृत्वावर विश्वास हा बल वाढविणारा मंत्र आहे. रामकृष्णपरमहंसानी शिष्यवर नरेंद्राला हाच गुरुमंत्र सांगितला. नरेंद्रजी त्या अनुग्रहामुळे विवेकानंद बनले. आजच्या परमहंसांच्या जन्मदिनापासून आपल्या मनाची घडण योग्य प्रकारे होईल याची दक्षता पाळण्यास प्रारंभ करा. इतरांचे दैवी गुण ओळखा. नैतिक मानसिक शक्तींचा प्रभाव पडताच आत्मिक सामर्थ्य-सौंदर्य प्रगटतात. आपण असीम शक्तीचे स्वामी आहोत या धारणेने ठायीच्या त्या सर्व अन्यान्य शक्ति जागृत होतील. परमहंसांच्या कृपेने या शक्ति तात्काल कार्यप्रवण होऊ लागतील, आणि त्याचा तुम्हाला शीघ्र प्रत्यय येऊ लागेल.

**MARCH 9**

# राष्ट्रीय फाल्गुन १९

# दृढ विश्वास

एकदा का तुमच्या मनातील विश्वास बलवत्तम बनला की मग कोणतीही रास्त व वाजवी कार्यसिद्धी तुम्हाला तुमच्या आवाक्याबाहेरची आहे असे वाटणार नाही. कोणतीही नवी जोखीम स्वत:वरील विश्वास दृढ असल्याखेरीज अंगिकारिता येतच नाही. सुसंधीचा दरवाजा उघडून देणारी गुरुकिल्ली म्हणजे आत्मविश्वास. अंतिम परिणाम इष्ट मिळेलच अशा श्रद्धेने नवे कार्य पत्करण्यासाठी लागणारी कार्यशक्ति विश्वासच पुरवू शकतो. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य-आरोग्य विश्वासानेच दुणावतात. विश्वास कार्यमार्ग उजळून टाकतो आणि संशय–चिंतेच्या सावल्यांचा मागमूसही राहू देत नाही. चलबिचल व अडचणी याना तोंड देऊन चिकाटीने कार्यरत राहण्यासाठी दृढ विश्वासच धीर वाढवितो. परिस्थिती प्रतिकूल, पाय ओढणारी, निराशाजनक असताही आशावादपूर्ण दृढ विश्वासच माणसाला विजयाचे आश्वासन देऊ शकतो. अशा या विघ्नविनाशक, सिद्धिदायक, हितकारक, विश्वासमयतेचे सखोल अध्ययन होण्यासाठी व तिचा पूर्णपणे विकास करण्यासाठी भरपूर वेळ खर्च करा. त्यामुळे फायदा असा होईल की तुमचे जीवन चेतनापूर्ण जिवंत व विशाल बनून दृढ विश्वासाच्या सामर्थ्याने त्याचा सर्वांगीण स्तर उंचावेल.

**MARCH 10**

# राष्ट्रीय फाल्गुन २०

# लाभली अक्कल

तुमच्यापाशी असलेली अक्कल इतरांच्यासाठी वेचण्याची अटळ जबाबदारी तर तुमच्यावर असतेच पण स्वतःच्या गौरवास्पद गुणात नवी भर घालण्याचीही कामगिरी तुमच्या हातून घडावी अशी अपेक्षा असते. जीवनात नित्य वैयक्तिक प्रगतीची भर पडत जाणे म्हणजे एकप्रकारे प्रभुसेवाच करणे. तुम्ही करीत असलेली लोकसेवाकार्ये अधिक समर्थपणाने, जास्त अक्कलहुशारीने व वाढत्या कोमलतेने पार पाडीत जाणे हे तुमचे परमश्रेष्ठ कर्तव्य ठरते. यासाठी लागणारी कोमलता (जिव्हाळा) प्रेमपूर्ण व्यवहारांतून, अक्कलहुशारी वाचनव्यासंगातून व सामर्थ्य प्रभुप्रार्थनेतून प्राप्त होऊ शकतात. प्रत्येक योग्य, बरोबर कृत्य कल्याणकारी व कल्याणकारी ते सारे परमेश्वरी. त्यामुळे अशी सेवाकृत्ये करण्यासाठी आपल्या अकलेचा नि लाभल्या संधीचा उचित वापर करणे ही प्रभुसेवा म्हणून रुज होते. प्रभुसेवेसाठी अक्कल वेचली जाणे हा तिचा सर्वश्रेष्ठ उपयोग. असलेला उरक, लाभलेली योग्यता व मिळालेले नैपुण्य म्हणजे प्रभूने तुम्हाला बहाल केलेला ठेवा. वैशिष्ठ्यपूर्ण रीतीने तो वापरणे हाच तुमची त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग. उठा जीवन जास्त उपकारी व अधिक विशाल व्हावे यासाठी कंबर कसा. लाभली अक्कल प्रभुसेवेप्रीत्यर्थ वेचून, त्याबद्दलची परमेश्वरी पुरस्कार—पावती मिळेल अशी ठाम खात्री बाळगा.

—०—

**MARCH 11**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९६
क्र. २३९९६
निबंध २०१९१३
शाखा

# राष्ट्रीय फाल्गुन २१

# सामर्थ्यसाधना

तुमचे खरे अंतःसामर्थ्य तुमच्या स्थिरबुद्धित्वात आणि आत्मविश्वासपूर्णतेत संनिविष्ट असते, असे तुम्हाला अनुभवाने ध्यानात येऊ लागेल. जिवाचे शिवाशी तादात्म्य साध्य करताना नसती उतावीळी वा निरर्थक चिंता करुन मुळीच चालत नाही. स्थितप्रज्ञ व निर्भय बनण्यासाठी तुम्हाला सदैव जागरुक व दक्ष रहावयास हवे. सत्य काय, सुंदर कुठले, शिव कोणते, याची ओळख करुन घ्या. या दृष्टीने जगन्नियंत्याकडून मार्गदर्शन व नियंत्रण मिळविण्यासाठी तुम्ही त्याच्यावर संपूर्णतः विश्वास ठेवण्यास शिकले पाहिजे. अध्यात्मज्ञानाची कवाडे सदैव उघडी ठेवलेली असतात. त्यातून प्रवेश करण्याची तुमची खटपट सुरु झाली की तुम्हाला स्वतःचे सामर्थ्य उत्तरोत्तर वाढत चालल्याचा अनुभव येऊ लागेल. तुमच्या मनात खऱ्या ज्ञानाचा उदय व्हावा, त्याचा झरा फुटावा, तुम्हाला सुरक्षित वाटावे, तुम्हाला स्वतःच्या सामर्थ्याची प्रचीती यावी, तुम्हाला केवलानंद लाभावा आणि तुम्ही अष्टपैलू व्हावे. एतदर्थ तो चिन्मय प्रभु सदैव तुमच्या मनात अध्यात्मविचार जागवीत असतो, त्यांचे झरे निर्मित असतो. ज्या प्रमाणात त्या विचारांची जाण तुम्हाला येऊ लागेल, जितके तुम्ही ते विचार आचारात आणू शकाल, तितके ते तुमच्या पचनी पडू लागतील आणि मग तुमची सामर्थ्यसाधना फलद्रुप होईल.

**MARCH 12**

राष्ट्रीय फाल्गुन २२

# अचल निर्धार

प्रथम एखादे महान् उद्दिष्ट पसंद करा. ही तुमची निवड अक्कलहुशारीची व उत्तम अशी झाली आहे अशी तुमची खात्री होताच तुमचे सारे अवधान त्या उद्दिष्टांवर एकवटा. त्या उद्दिष्टसाधनेसाठी तुम्ही आपली सारी कर्तृत्वशक्ति पणाला लावा. या उद्दिष्टापासून तुमची दृष्टि चळविणाऱ्या नानाविध अनिष्ट शक्तींपासून तुम्हाला सावध रहावयास हवे. निवडलेले उद्दिष्ट तुमच्या दैनंदिन जीवनाचे सर्वोच्च साध्य आहे असा दृढ निर्धार करा. स्वतःचा सारा उत्साह त्याप्रीत्यर्थ कामी लावा. अन्यान्य आकर्षणे तुमचा वेळ नि विचार वेधून घेऊ पाहतील. अचल निर्धाराच्या जोरावर तुम्ही असल्या भुलावणींना बळी पडणे सहज टाळू शकाल. तुम्ही केलेले निर्धारपूर्ण निश्चय इतके सुस्पष्ट व ठाम असावे की कोणतीही भुलावणी आता तुम्हाला तुमच्या उद्दिष्टाच्या व कर्तव्याच्या मार्गापासून च्युत करू शकू नये. स्वप्नरंजनात गुंगून न राहता प्रत्यक्ष भरीव कार्यात मग्न रहा. 'कार्य करण्याची इच्छा तर झाली ना,' एवढ्यावरच समाधान न मानता खुद्द ते उद्दिष्ट कसे समूर्त सिद्ध होईल यावर सक्रीयतेने सर्व लक्ष केंद्रित करा. उद्दिष्टपूर्तीस्तव एकाग्रतेने झटणाऱ्या कर्तृत्ववान् व्यक्तींनीच आपल्या अचल निर्धाराच्या बळावर जगातील कित्येक महत्कार्ये हातावेगळी केली आहेत.

**MARCH 13**

# राष्ट्रीय फाल्गुन २३

# परमतसहिष्णुता

या जगात हजारो विविध स्वभावांच्या व्यक्ति नि शेकडो प्रकारची मते असणारी अन्यान्य माणसे आपल्याला या जीवनात प्रत्यही आढळतात. त्यामुळे तुमच्या मता-स्वभावाविरुद्धची मंडळी जर तुम्हाला भेटली, तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. सर्वांचे विचार एकाच दिशेने, धर्तीने, दृष्टिकोनाने चालावेत हे वस्तुतः इष्टही नव्हेच. विरुद्ध मता-विचारांच्या संघर्षांतूनच पुष्कळदा ' वादे वादे जायते तत्त्वबोधः ' या वादबोध न्यायाने खरे सत्य हाती लागते. मतामतांतली अटळ विभिन्नता एकदा समजली, पटली, पचनी पडली म्हणजे मग इतरांनी तुमचीच री ओढावी असा हट्टाग्रह तुमच्या मनात येणार नाही आणि तिथे परमतसहिष्णुता जोपासली जाईल. प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे, कुठल्याही बाबीचा स्वतंत्रपणे विचार करावा, मताचा परामर्श घ्यावा आणि स्वतःची म्हणून मते आपल्या बुद्धीनुसार इतरांपुढे मांडावीत. असे होण्यातले महत्त्व, इष्टता, आवश्यकता आता तुम्हाला उमगली असणार. सारांश हा की, कोणत्याही समस्येवर सर्वांनी आपापल्या दृष्टिकोनातून विचारमंथन चालविल्यावर तिच्यावरची सर्वोत्तम तोड निवडता येईल आणि समस्या सुटेल. मात्र यासाठी प्रत्येकानेच परमतसहिष्णु असायला हवे.

卐

**MARCH 14**

# कौटुंबिक वर्तणुक

घरी कुटुंबियांशी मवाळ वृत्तीने व दाक्षिण्यभावाने वर्तन ठेवणे फार अगत्याचे असते. आपल्या हातून, अतिसहवासामुळे वा अतिपरिचयामुळे, परस्परांना दाखवायच्या दयाभावात, सहकारी वृत्तीत व समजूतदारपणात ढिलाई, धरसोड, उणीव स्वत:लाही नकळत घडते. अन्यान्य अभिरुचींची व नानाविध स्वभावांची माणसे कुटुंबात रोज एकमेकांच्या निकट सान्निध्यात वावरत असतात. अशावेळी आत्मसंयमन, स्वार्थत्याग व कुशल हातोटी यांचा सर्वांनाच भरपूर वापर करावा लागतो. कुटुंबाच्या प्रत्येक घटकाने जर स्वत:च्या उदाहरणाने इतरांसमोर आदर्श ठेवण्याचे ठरविले तर कौटुंबिक सुखात केवढी तरी भर पडेल. प्रत्येकजण इतरांशी कळकळीने, औदार्याने, सौहार्दाने, उल्हासाने व प्रेमळपणाने जर वागेल, तर घरात खेळीमेळीचे वातावरण पसरेल आणि कुटुंबाला अपूर्व लाभ होईल. प्रेमभाव जगात सर्वश्रेष्ठ शक्ति म्हणूनच सर्वत्र अधिराज्य गाजवितो. कुटुंबियानी परस्पराना अधुनमधुन आपणाला दुसरी व्यक्ति अजूनही पूर्वीइतकीच आवडते, तिच्यावर आपले आजमितीसही मुळाइतकेच दृढ प्रेम आहे, तिची आपणास आज कांकणभर जास्तीच गरज आहे अशी ग्वाही देत राहणे खूपच आवश्यक असते. प्रत्येकाने तसे आवर्जून करावे. प्रेमपूर्ण, सहृदयी जिव्हाळ्याची कौटुंबिक वर्तणुक हा दैनंदिन जीवनातला अत्यावश्यक महान घटक आहे.

☆

# समाजसेवाव्रत

नावलौकिक मिळविल्यानंतरही जेव्हा तुम्ही सेवाभावी वृत्तीने वागता, वावरता तेव्हा तुम्ही तुमच्या यशोमंदिरावर खराखुरा कळस चढविलात असे होते. यशोमंदिराकडे तुम्हाला वाट कठीण वाटली असो वा सोपी, पण तुम्ही तिथे पोचला तर आहात. मग आता तुम्ही इतराना मार्गदर्शन करु शकता. तुम्ही आता सढळ हातानी सर्वांना मदत करावी, इतराना आपल्या अनुभवाचा फायदा मोकळ्या मनाने होऊ द्यावा इतकेच नव्हे तर वेळ पडल्यास सत्पात्री पैशाचीही मदत करावी. लाभलेल्या यशाचा वापर तुम्ही कसा करता यावर त्याचे मोल ठरत असते. यशप्राप्तीनंतर गर्वाने फुगून जाऊन तुम्ही स्वार्थलोलूप, बेपर्वा, हावरट वा अहंमन्य बनलात तर यश लाभूनही तुम्ही नालायक ठरता. तुम्हाला यश न लाभते तरच बरे झाले असते असे इतराना तुम्ही वाटायला लावता. भरभराट, मानमरातब, समृद्धि लाभल्यानंतर थोड्यांचेच डोके ठिकाणावर राहते. पाय जमिनीलाच टेकलेले राहून स्वर्ग दोन बोटे उरल्यासारखे थोडक्यांनाच वाटत नाही. अर्थात् यशप्राप्तीनंतरही स्वार्थांध न बनता समाजसेवेचे व्रत पाळणाऱ्या महाभागांची स्फूर्तिदायक उदाहरणे तशी अल्प नाहीत. पण तुम्हीही असेच एक आणखी समाजसेवाव्रतपालक व्हावे.

*

## राष्ट्रीय फाल्गुन २६

# थेट बत्तीस चर्वणे

अन्न बोकाणे भरीत बकाबका कधीही गिळत जाऊ नये. अन्नाचे नीट चर्वण झाले पाहिजे, अगदी थेट बत्तीस वेळा, असे शास्त्रात लिहिलेले असते. इत्यर्थ इतकाच की सदा दाताना आपले काम नीट-पणे करायला पुरेशी सवड मिळाली पाहिजे. खाल्ले खूप पण त्यातले किती पचून अंगी लागले याला खरे महत्व. घाईत असलात तर थोडे कमीच खा पण खायचे ते नीट चावून. पदार्थ दाताखाली जाण्यासाठी जिभेने तो तोंडात नीट घोळविल्याने तो जास्त रुचकर तर बनतोच, शिवाय त्यामुळे तो पचायला मदत होते. भोजन म्हणजे पोटाचे पोते एकदा भरुन घ्यायचे असे नव्हे. शास्त्र त्याला केवळ उदर-भरण मानीत नाही. ते एक यज्ञकर्म आहे आणि तितक्याच आस्थेने ते घडले पाहिजे. खायच्या पदार्थाची नीट जाणीवपूर्वक सुयोग्य निवड करा. खायचे ते मुख्यत: शरीरधारणेसाठी, स्वादासाठी वा जिभेला सोकावू देण्यासाठी नसते. साधेच पण सकस अन्न खा. बाधणारा पदार्थ वर्ज्य करा. फळे, भाज्या आहारात अधिक हव्या. पोषणापुरेसे अन्न खा पण पोटाला तड लागण्याइतके नको. प्रत्येक जणच बहुधा जरुरीपेक्षा जास्त आहार घेतो. रोजच्या मेहनतीच्या प्रमाणाने, कामाच्या स्वरुपानुसार आहारप्रमाण असावे. त्या दृष्टीने पोषक असे पदार्थ निवडावे. गरज आणि चोचले वाढवूच नये. आवडी साध्या ठेवा. पचेल इतकेच नीट चर्वण करुन खा. यज्ञकर्मात आहुति टाकीत आहो इतक्या पूज्यभावनेने उदरभरण होऊ द्या.

≈

**MARCH 17**

# राष्ट्रीय फाल्गुन २७

# रामबाण इलाज

मरगळ, असंतोष, निरुत्साह या दुर्धर रोगांवरही रामबाण इलाज आहे. तो म्हणजे अखंड कार्यमग्नता. स्वतःची योग्य दिशेने घडण होण्यासाठी, स्वकर्तृत्वाचे सार्थक व्हावे म्हणून ते अधिक विकसित करण्यासाठी, स्वसामर्थ्याचा समाजबंधूना फायदा देण्यासाठी, म्हणून तुम्हाला मानवजन्म लाभला. या अद्वितीय जीवनात व्यर्थ चिंता व निरुपयोगी असमाधान यांना काडीमात्र स्थान नाही, कळकळीने भारलेल्या, महत्वाकांक्षेने ओसंडणाऱ्या, कर्तव्यभावनेने ओथंबलेल्या, कार्यकर्त्याला, दिवसाचा प्रत्येक क्षण मोलाचा व अर्थपूर्ण वाटतो. जीवनभर सुवर्णसंधि सतत तुमच्यासमोर हात जोडून उभी असते. आला दिवस सत्कारणी कसा लावायचा हे सर्वस्वी तुमच्याच अधीन असते. म्हणून प्रत्येक दिवस तुम्ही कसा वेचणार हे भल्या पहाटे तुम्ही रोजच्या रोज योजित चला. प्रत्येक तास तुम्ही कसल्या उपयुक्त व मन गुंतविणाऱ्या कार्यात खर्चणार हे तपशीलवार ठरवीत जा. शिवाय उत्तरोत्तर तुम्ही दिवसानुदिवस जास्त जास्त कार्यनिपुण होत जाणार हे ओघप्राप्त आलेच. तेव्हा तुम्ही कार्यपूर्ततेचा वाढता आवाका गृहीत धरायला हवा. अशी योजनाबद्ध तऱ्हा दिनचर्येत अवलंबिलीत तर मरगळीवरचा इलाज रामबाण ठरुन तुमचे जीवन सुंदर, समाधानी, उत्साहपूर्ण होत चालल्याचे तुम्ही अनुभवाल.

– o –

**MARCH 18**

## राष्ट्रीय फाल्गुन २८

# लाभ अपयशाचा

तुमचा विकास आणि तुमचे पोषण, तुम्हाला जरासुद्धा न जाणवता, दोन्हीही क्रमशः घडतच असतात. एखादेवेळी काही गोष्टी जेव्हा तुमच्याविरुद्ध, तुम्हाला हानिकारक अशा रीतीने घडल्या असे बाह्यतः भासते त्यावेळी अंतिम हिताच्या दृष्टीने, कदाचित तुमच्या भल्यासाठीच सध्यापुरते काही विपरीत घडलेले असू शकते. वर्तमान तात्पुरती निराशा ही भविष्यात होणाऱ्या कल्याणाची सूचक, द्योतक, निर्देशक असू शकते. वरपांगी वाटणारे वर्तमान अपयश हे उद्याच्या उभ्या राहणाऱ्या यशोमंदिराची नामदेव-पायरीच असते. प्रत्येक कसोटीची घडी, मोहाचा क्षण, हातून घडलेली चूक आणि नशिबी आलेले तादृश अपयश यांच्यातूनही काही उपयुक्त, विधायक, उपकारक भाग सापडवता येतो. असा भाग सापडवून तो सार्थकी लावणे, त्या तशा अनुभवांचाही काही फायदा करुन घेणे हे सर्वस्वी तुमच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. वस्तुतः या निराशा-नाखुष्या तुमचे मार्गदर्शक व शिक्षक बनून तुम्हाला आत्मनियमनाची, स्वयंशासनाची सुयोग्य प्रेरणा देत जातात. खूप कठीण समस्येवर प्रदीर्घ मननचिंतन, विचारमंथन चालू ठेवा. त्या समस्येची तोड तुमच्या मनात अचानक उद्‌भवेल. ज्याला विपरीततेतूनही नवी अक्कल लाभू शकते, त्यास अपयश ही लाभदायक, जमेची, प्रेरक बाब ठरते.

*

**MARCH 19**

## राष्ट्रीय फाल्गुन २९

# बाह्यांगमहत्त्व

प्रथम दर्शनी प्रतीत होत असणारे तुमचे बाह्यस्वरुप ही एक फार महत्त्वाची जमेची बाब ठरते. जगाचा तुमच्या बद्दलचा प्रथम ग्रह हा तुमच्या बाह्यतः गोचर होणाऱ्या व्यक्तिमत्त्वावरुनच होत असतो. तुम्ही आतून कसे आहा हे, एकप्रकारे तुम्ही काय परिधान केले आहात यावरुन प्रकट होऊ शकते. तारतम्ययुक्त व्यक्तींना तुमच्या विवेकबुद्धियुक्त मनाचे अगणित चोरकप्पे बाह्य चिन्हांवरुन ओळखता येऊ शकतात. तुमची वस्त्रे, मनोवृत्ति, चालचलणूक ही सारी तुमचे अंतरंग प्रकट करीत असतात. तुमच्या बोलण्यावागण्यावरुन तुमची ओळख पटायच्या आधीच तुमचे रंगरुप, तुमचा अवतार, तुमची चाल, तुम्हांला इतरांसमोर उकलून ठेवीत असतात. तेव्हा स्वतःचे बाह्यस्वरुप सतत सर्वोत्कृष्ट राखण्याची जरुरी समजून घ्या. ते तसे राखलेत की तुमचा आत्मसन्मान वृद्धिंगत होईल आणि इतरांचेही तुमच्याबद्दल अनुकूल मत होईल. तसे, तुम्ही अंतरंगात जे असता तेच शेवटी खरे; नसते आव आणून, खोटे मुखवटे धारण करण्याने, उसनी आढ्यता दर्शविण्याने, पोकळ डौल मिरविण्याने, तुमच्या वास्तव व्यक्तित्वात भर पडत नाही. तुमचे मन नि अंतःकरण यांच्यावरुनच तर तुमची खरी योग्यता सिद्ध होत असते. सुसंस्कृतपणा व सच्चारित्र्य ही दोन्ही प्रयत्नपूर्वक प्राप्त करावयाची असतात. पण त्यासाठी तुमचे बाह्यांगस्वरुपही पूरक राखणे महत्त्वाचे आहे.

●

**MARCH 20**

# राष्ट्रीय फाल्गुन ३०

# ताळेबंद

राष्ट्रीय सौर वर्षगणनेनुसार आजचा दिवस हा वर्षअखेरीचा. सर्वोच्च महत्त्वाच्या विशेष बाबींवर लक्ष एकाग्र करुन आपली महत्तम ध्येये साध्य करण्याचा संकल्प वर्षारंभी तुम्ही सोडला होतात. आठवते? उमद्या वागणुकीने, विशाल वृत्तीने जीवन जगण्याचे तुम्ही ठरविले होतेत. आहे ना लक्षात? आपले नियोजित कार्य उत्कृष्ट रीतीने पार पडून, नव्या महत्तर कार्याचे बीजारोपण होऊन, त्या दृष्टीने विशाल तर कार्यक्षेत्र लाभले, असा वर्तमान सरल्या वर्षाचा आढावा, तुमचा निघाला का? प्रगतीच्या वाटेत विघ्नरुप ठरणाऱ्या तुमच्या लहानमोठ्या दुष्ट सवयींचा पार नि:पात झाला आहे का? आपल्या विचार धारणेचे सूक्ष्म विश्लेषण करुन, तद्वारा लाभलेली आत्मसुधाराची प्रत्येक संधि, वर्षभर दक्षतेने साधू शकलात? स्वत:चे मनोव्यापार विधायक विचारांच्या उच्च पातळीवर राखून, चाललेला काल, वाट्याला आलेले भाग्य, नि लाभलेली संधि यांची बहुमूल्यता चाणाक्षपणे वेळीच ओळखली होतीत ना? गेल्या वर्षात तुमचे पाऊल अस्सल शाश्वत सिद्धीच्या दिशेने पडत राहिले का याचा आजच्या महत्त्वपूर्ण दिवशी आढावा काढा. यश:प्राप्ति हा आपला जन्मसिद्ध हक्क आहेच. पण आज समाप्त होणाऱ्या वर्षात तो तुम्ही किती प्रमाणात बजावलात हे आज आपल्या मनाला विचारा. यशापयशाचा आज नि:पक्षपातीपणे ताळेबंद काढा.

**MARCH 21**

# विषय-सूचि


## अ

| | | |
|---|---|---|
| अक्कल | फाल्गुन | २० |
| | फाल्गुन | २८ |
| अडगळ | वैशाख | २६ |
| अतिरेक | पौष | २० |
| अध्ययन | पौष | १ |
| अध्ययनार्हता | मार्गशीर्ष | १९ |
| अध्यात्म | श्रावण | ९ |
| | भाद्रपद | २५ |
| अध्यात्मभूक | आषाढ | ११ |
| अनुकूलता | ज्येष्ठ | ९ |
| अनुद्विग्नता | भाद्रपद | १८ |
| अनुभवजी | वैशाख | २८ |
| | पौष | १६ |
| अनंतचतुर्दशी | आश्विन | १ |
| अपयश | भाद्रपद | १० |
| | फाल्गुन | २८ |
| अपविचार | कार्तिक | १८ |
| अपव्यय | ज्येष्ठ | १५ |
| अपूर्वाई | आश्विन | २६ |
| अभिलाषा | चैत्र | ५ |
| | माघ | २९ |
| अर्जुनदेव दिन | ज्येष्ठ | २६ |
| अवगुण | ज्येष्ठ | १९ |
| अवहेलना | मार्गशीर्ष | २२ |
| अविरोध | ज्येष्ठ | २५ |
| अष्टपैलूपणा | पौष | २६ |
| अस्तित्व | कार्तिक | ३० |
| अक्षयतृतीया | वैशाख | १९ |

## आ

| | | |
|---|---|---|
| आईन्स्टीन पुण्यतिथि | चैत्र | २९ |
| आकांक्षा | आषाढ | ४ |
| | आश्विन | ४ |
| | माघ | १ |
| आखणी | चैत्र | १२ |
| | आषाढ | २८ |
| आगळेपणा | आश्विन | ३ |
| आचरण | वैशाख | १६ |
| | श्रावण | २० |
| आचार | वैशाख | ११ |
| | ,, | १६ |
| | आषाढ | ४ |
| | श्रावण | २० |
| आज | कार्तिक | २० |
| आडमुठेपणा | ज्येष्ठ | २५ |
| आढावा | आषाढ | १२ |
| | फाल्गुन | २२ |
| आणीबाणी | आश्विन | २५ |
| आत्मनिष्ठा | माघ | २५ |
| आत्मपरीक्षण | आषाढ | २ |
| | मार्गशीर्ष | १७ |
| आत्ममग्नता | चैत्र | १० |
| आत्मविश्वास | मार्गशीर्ष | १२ |
| आत्मसमर्पण | माघ | १० |
| आत्मसुधार | आश्विन | १० |
| | माघ | १ |

आदर्श वैशाख १७
श्रावण ७
मार्गशीर्ष १८
आनंद वैशाख १४
आश्विन २७
आनंदमूर्ति (दहिवाव) पु. चैत्र २०
आराधना कार्तिक २०
आरोग्य चैत्र २१
आरंभ ज्येष्ठ १३
आश्विन १४
आवाज माघ २८
आशावाद वैशाख २
श्रावण १९
पौष २१
आश्रम भाद्रपद १३
आळवणी कार्तिक २२
आज्ञाधारकता चैत्र ३०

## इ

इच्छा माघ २९
इमान वैशाख १२
इलाज वैशाख २३
फाल्गुन २७
इहलोक चैत्र १३

## ई

ईप्सित कार्तिक ३
ईर्ष्या कार्तिक ८
मार्गशीर्ष २९
ईश्वर माघ ३०
ईश्वरनिष्ठा कार्तिक २२
ईश्वरार्पण श्रावण १८

## उ

उच्चाटन मार्गशीर्ष १७
उच्चारण ज्येष्ठ १७
उणीव श्रावण ६
उदात्तीकरण आषाढ २२
उद्दिष्ट भाद्रपद ३१
उद्दिष्टचयन श्रावण २
उद्दिष्टपुर्ति फाल्गुन २२
उद्दिष्टलाभ मार्गशीर्ष ११
फाल्गुन १०
उद्योग ज्येष्ठ १
भाद्रपद २
आश्विन ४
उद्योगप्रियता श्रावण ११
उद्योगमग्नता ज्येष्ठ १९
भाद्रपद २
उद्योगशीलता श्रावण ३
उद्विग्नता भाद्रपद १८
उधळपट्टी मार्गशीर्ष ७
उपक्रमशीलता पौष ३
उपचार पौष २०
उपदेश चैत्र २६
वैशाख ५
वैशाख ९
जेष्ठ ४
आषाढ २३

| | | |
|---|---|---|
| | मार्गशीर्ष | ३० |
| उपद्रव | कार्तिक | १ |
| उपलब्धता | ज्येष्ठ | १८ |
| उपवास | कार्तिक | २७ |
| उपहास | माघ | ७ |
| उपेक्षा | मार्गशीर्ष | २० |
| उमदेपणा | मार्गशीर्ष | २६ |
| उमेदवारी | भाद्रपद | ५ |
| उल्लासमयता | भाद्रपद | ९ |
| उसळी | पौष | २९ |


## ऊ


| | | |
|---|---|---|
| ऊर्जितावस्था | कार्तिक | ४ |
| | माघ | ७ |
| ऊर्मि | कार्तिक | २४ |


## ए


| | | |
|---|---|---|
| एकमार्गीपणा | कार्तिक | २ |
| एकनाथषष्ठी | चैत्र | ७ |
| एकाग्रकता | ज्येष्ठ | २० |
| | ज्येष्ठ | ३१ |
| एकांडा | आश्विन | ३ |
| एकांत | आषाढ | २४ |
| एकांतसेवन | भाद्रपद | २८ |
| एकांतवास | मार्गशीर्ष | ९ |


## ऐ


| | | |
|---|---|---|
| ऐट | चैत्र | ४ |
| ऐश्वर्य | आषाढ | ११ |
| ऐहिकता | चैत्र | १३ |
| | आषाढ | ११ |


## ओ


| | | |
|---|---|---|
| ओवाळणी | कार्तिक | १८ |
| ओळख | चैत्र | २३ |


## औ


| | | |
|---|---|---|
| औचित्य | कार्तिक | ३ |
| औदासिन्य | कार्तिक | ६ |
| औदार्य | | |
| औदुंबर यात्रा | फाल्गुन | ६ |


## अं


| | | |
|---|---|---|
| अंतःसाक्ष | माघ | २८ |
| अंतःसूचन | चैत्र | ५ |
| अंतःस्वरुप | श्रावण | ७ |
| अंतरंग | आषाढ | १८ |
| अंधश्रद्धा | श्रावण | १ |
| अंबर | पौष | १ |
| आंदण | माघ | १६ |
| आंबेडकर जयंति | वैशाख | १७ |


## क


| | | |
|---|---|---|
| कथन | माघ | २६ |
| कटकटी | कार्तिक | १ |
| कर्तबगारी | ज्येष्ठ | १८ |
| कर्तृत्व | श्रावण | १६ |
| | भाद्रपद | १ |
| कमकुवतपणा | वैशाख | २९ |

| | | |
|---|---|---|
| कर्मयोग | ज्येष्ठ | २२ |
| | आश्विन | १६ |
| | मार्गशीर्ष | २७ |
| कल्पकता | चैत्र | २७ |
| कल्याण | वैशाख | १९ |
| कल्याणवृत्ति | मार्गशीर्ष | १९ |
| कष्ट | पौष | २८ |
| कसोटी | ज्येष्ठ | १६ |
| | माघ | ४ |
| काटकसर | भाद्रपद | ६ |
| कार्तिकी एकादशी | कार्तिक | २७ |
| काबाडकष्ट | वैशाख | १९ |
| | ज्येष्ठ | २३ |
| काम | ज्येष्ठ | ९ |
| कार्य | श्रावण | ११ |
| | श्रावण | २६ |
| | आश्विन | १७ |
| | पौष | ३ |
| | पौष | ६ |
| | माघ | १९ |
| | फाल्गुन | ५ |
| कार्यकर्तृत्व | आश्विन | १७ |
| कार्यकक्षा | पौष | २६ |
| कार्यपरिणति | कार्तिक | ८ |
| कार्यपूर्ति | ज्येष्ठ | २७ |
| कार्यमग्नता | आषाढ | २१ |
| | आश्विन | ४ |
| | फाल्गुन | २७ |
| कार्यसागर | पौष | ६ |
| कार्यहीनता | भाद्रपद | ८ |
| कार्यसिद्धि | पौष | १० |
| कार्यसिद्धि | पौष | १४ |
| | फाल्गुन | ५ |
| कार्याकार्यनिबंध | माघ | १२ |
| कार्यासक्तता | श्रावण | ११ |
| कालव्यय | चैत्र | १४ |
| | ज्येष्ठ | १५ |
| | आषाढ | २८ |
| | फाल्गुन | १५ |
| कित्ता | वैशाख | १७ |
| | मार्गशीर्ष | १८ |
| | माघ | ५ |
| कुटुंब | फाल्गुन | २४ |
| कुठार | भाद्रपद | २३ |
| कुवत | आषाढ | ५ |
| कुसुम | पौष | ११ |
| कूर्मजयंति | वैशाख | ३१ |
| कोजागिरी पौर्णिमा | कार्तिक | १ |
| कोमलता | मार्गशीर्ष | २६ |
| | पौष | ९ |
| कृतज्ञता | आषाढ | ५ |
| कृतकृत्यता | पौष | ९ |
| कृतार्थता | पौष | १३ |
| कृति | पौष | १७ |
| कृतिप्रवणता | श्रावण | २६ |
| क्रोध | चैत्र | २५ |
| | वैशाख | २२ |


## ख


| | | |
|---|---|---|
| खटपट | आश्विन | २९ |
| खबरदारी | पौष | ९ |
| खवचटपणा | आषाढ | १९ |

खिलाडूवृत्ति मार्गशीर्ष २९
खेळ ज्येष्ठ ६
खोड आश्विन ८

## ग

गतकाल भाद्रपद २९
गठबंधन श्रावण २२
गणराज्यदिन माघ ६
गणेशचतुर्थी भाद्रपद २२
गाजावाजा कार्तिक २९
गांधीजयंति आश्विन १०
गीताजयंति मार्गशीर्ष २७
गीताव्यासंग आषाढ ८
गुढीपाडवा चैत्र १६
गुण चैत्र २
भाद्रपद १९
भाद्रपद २६
पौष २५
पौष २९
माघ १
गुणगौरव कार्तिक १६
गुणग्राहकता आषाढ ५
गुणजोपासना आश्विन २५
गुणदोषविश्लेषण श्रावण २९
गुणपरंपरा आश्विन ९
गुणमालिका कार्तिक ५
माघ २७
गुणवत्ता आषाढ १३
भाद्रपद १
गुणवैशिष्ठ्ये श्रावण २६
भाद्रपद ११
गुणसमुच्चय भाद्रपद २
गुणसाधना भाद्रपद २६
गुरुकिल्ली ज्येष्ठ १३
गुरुकृपा मार्गशीर्ष ३०
गुरुदक्षिणा श्रावण ४
गुरुप्रतिपदा फाल्गुन २
गुरुपौर्णिमा श्रावण ४
गुरुश्रेष्ठ भाद्रपद १४
गोकुळाष्टमी भाद्रपद ११
गोपालकाला भाद्रपद १२
ग्रंथ पौष ७
ग्रंथगुरु श्रावण २७
ग्रंथराज आषाढ ८
ग्रंथवाचन मार्गशीर्ष ८
गौरीतृतीया चैत्र १८
गौरीपूजन भाद्रपद २६
ग्रहणशीलता कार्तिक १३

## घ

घडी माघ २
घाई आषाढ १
घातकता वैशाख १८
माघ २०
घिसाडघाई फाल्गुन १५
घोर श्रावण २८
पौष ८

## च

चर्वण फाल्गुन २९
चंद्रशेखर
आझाद पुण्यतिथी फाल्गुन ४
चंपाषष्ठी मार्गशीर्ष २२

चाकोरी ज्येष्ठ १०
आषाढ ९
चातुर्मास आषाढ ३१
चारित्र्य चैत्र १६
आषाढ १५
आश्विन २२
चारित्र्यघडण फाल्गुन १
चालढकल ज्येष्ठ ५
चिकाटी आषाढ २१
श्रावण ३
पौष १८
चित्त ज्येष्ठ ११
चिंतन ज्येष्ठ २४
आषाढ ६
पौष २२
चिंता मार्गशीर्ष २०
पौष ८
चुटपुट भाद्रपद २३

## छ

छडा आश्विन ८
छत्रपति जयंति वैशाख १८
छत्रपति पुण्यतिथी वैशाख १
छाप आश्विन ९
छंद आषाढ ९

## ज

जगधारणा फाल्गुन १७
जगप्रशाला पौष १६
जन्मसार्थक्य पौष ४
जन्महेतु मार्गशीर्ष १५
जबाबदारी भाद्रपद ८
जलपान आश्विन ७
जवळीक श्रावण २२
जागरुकता ज्येष्ठ २८
आषाढ २७
जिद्द मार्गशीर्ष २९
जीव पौष १७
जीवन चैत्र ११
चैत्र २४
वैशाख १
वैशाख ११
श्रावण १८
आश्विन २२
मार्गशीर्ष १९
पौष ४
पौष २६
जीवनचर्चा पौष १५
जीवनदृष्टि फाल्गुन ७
जीवननौका भाद्रपद १६
जीवनपुस्तक मार्गशीर्ष १९
जीवनमार्ग आषाढ २३
जीवितध्येय कार्तिक ३
मार्गशीर्ष १२
जोखीम पौष १८
जोडी वैशाख २५

## झ

झगमगाट कार्तिक १५
झटापट ज्येष्ठ १९

| | | |
|---|---|---|
| झरा | फाल्गुन | २१ |
| झाड | पौष | १९ |
| झाडा | श्रावण | ७ |
| झालर | चैत्र | १ |

## ट

| | | |
|---|---|---|
| टकळी | मार्गशीर्ष | ७ |
| टाळाटाळ | ज्येष्ठ | ५ |
| टिमकी | श्रावण | ६ |
| टिळक जयंति | श्रावण | १ |
| टिळक पुण्यतिथी | श्रावण | ५ |
| टीका | कार्तिक | ७ |
| टेप्सरण | मार्गशीर्ष | १७ |
| टंगळमंगळ | ज्येष्ठ | ५ |

## ठ

| | | |
|---|---|---|
| ठकवणूक | वैशाख | ४ |
| ठपका | मार्गशीर्ष | १७ |
| ठामपणा | वैशाख | २९ |
| ठावठिकाणा | फाल्गुन | ६ |
| ठेच | ज्येष्ठ | २१ |
| ठेवण | कार्तिक | १६ |

## ड

| | | |
|---|---|---|
| डगमग | माघ | ५ |
| डबघाई | वैशाख | ६ |
| डांगोरा | माघ | १९ |
| डोंगर | श्रावण | ९ |

## ढ

| | | |
|---|---|---|
| ढग | चैत्र | १ |
| ढब | चैत्र | २२ |
| ढिलाई | श्रावण | २६ |
| ढाग | माघ | २१ |

## त

| | | |
|---|---|---|
| तड | आश्विन | १४ |
| तण | माघ | २० |
| तयारी | ज्येष्ठ | १४ |
| तरतूद | वैशाख | १० |
| ताठपणा | ज्येष्ठ | ६ |
| ताण | वैशाख | १८ |
| | ज्येष्ठ | ११ |
| तारतम्य | चैत्र | २८ |
| ताळेबंद | फाल्गुन | ३० |
| तुल्यबलता | आश्विन | १७ |
| तेल | ज्येष्ठ | २८ |
| तोल | आषाढ | १४ |

## त्र

| | | |
|---|---|---|
| त्रागा | आश्विन | २ |
| त्रिसूत्री | ज्येष्ठ | २३ |

## थ

| | | |
|---|---|---|
| थकवा | मार्गशीर्ष | ३ |
| थाट | आषाढ | ११ |
| थोतांड | मार्गशीर्ष | ३ |
| थोरपणा | ज्येष्ठ | १६ |

थोरपणा श्रावण ६
पौष १२

## द

दत्तजयंति मार्गशीर्ष ३०
दसरा आश्विन २७
दयाळूपणा मार्गशीर्ष २६
दातृत्व भाद्रपद ३
दातेपण पौष १३
दान भाद्रपद ३
दानत पौष १३
दिनचर्या आषाढ २६
दिलदारी कार्तिक १०
दीर्घश्वसन आश्विन ८
आश्विन ३०
दीर्घसूत्रीपणा ज्येष्ठ ८
दीर्घोद्योग पौष १८
दुःखविनाश माघ १९
दुर्गुण आषाढ १७
आश्विन ८
दुर्दम्यता ज्येष्ठ २७
दुर्विचार कार्तिक ११
दुष्टावा ज्येष्ठ ३
दूरदृष्टि ज्येष्ठ ८
देवघेव वैशाख ५
देवदीपावली मार्गशीर्ष १७
दोषदहन चैत्र २
दोषदिग्दर्शन कार्तिक ७
दोषनिर्मूलन आषाढ २०
दोषैकदृष्टि आषाढ २९
दौर्बल्य कार्तिक ११
दंभदुःख फाल्गुन १

## ध

धकाधकी आश्विन २२
धड पौष ६
धडाडी श्रावण ३०
भाद्रपद २०
धनत्रयोदशी कार्तिक १४
धर्म फाल्गुन ७
फाल्गुन ८
धर्मप्रवणता वैशाख २०
धर्माचरण पौष १२
धरसोड ज्येष्ठ २६
धिक्कार मार्गशीर्ष २२
ध्रुवदृष्टि फाल्गुन १०
ध्यानमग्नता श्रावण १४
ध्येय श्रावण २
कार्तिक ३
मार्गशीर्ष १३

## न

नजर मार्गशीर्ष १३
नरकचतुर्दशी कार्तिक १५
नरसिंह जयंती वैशाख ३०
नवे ज्ञान मार्गशीर्ष १४
नागपंचमी श्रावण २४
नामजप वैशाख ८
नारदजयंती ज्येष्ठ ४
नारळीपौर्णिमा भाद्रपद ३

निर्णय ज्येष्ठ २६
नित्यपाठ वैशाख १३
निंदात्याग भाद्रपद ११
निर्धार श्रावण १०
आश्विन १९
कार्तिक १७
पौष १७
फाल्गुन २२
निर्बंध माघ १२
निर्यात श्रावण १५
नियमीतपणा वैशाख २५
निराशा वैशाख ६
निरिच्छपणा वैशाख १९
निरुद्योग ज्येष्ठ १
निर्व्याजता कार्तिक २३
निवड वैशाख ९
कार्तिक ३
मार्गशीर्ष ११
निवाडा आषाढ १७
निष्क्रियता श्रावण २३
निश्चय आषाढ २
आषाढ ३१
आश्विन १९
निश्चयपालन फाल्गुन २
निश्चयपूर्ति श्रावण १०
निष्ठा कार्तिक २२
नीरवता भाद्रपद ७
नेताजी ज. (पु.) माघ ३
नेम आषाढ ३१
नेमस्तपणा वैशाख २५
नोंदवही ज्येष्ठ २२
न्याय चैत्र १७
माघ २४
न्यायाधीश आषाढ ३१

## प

पगडा आश्विन २४
पटवणुक पौष २०
पटवर्धन (अण्णा) पु. माघ २५
पत्र चैत्र २५
पवन फाल्गुन २६
परमतसहिष्णुता फाल्गुन २३
परमहंस (रामकृष्ण) कार्तिक १८
परमात्मा आश्विन २३
परमार्थसाधन वैशाख ८
पर्याय फाल्गुन १७
परमेश्वर चैत्र २०
मार्गशीर्ष १६
परलोक चैत्र १३
आश्विन १६
परशुराम जयंति वैशाख १९
परिणाम आषाढ २७
परिपक्वता माघ १५
परिश्रम मार्गशीर्ष ६
पौष १०
पहारा आषाढ २७
पाऊल आषाढ ७
पाणी आश्विन ७
पुढारी माघ ३
पुढारीपण वैशाख २१
पुण्य चैत्र १९

| | | |
|---|---|---|
| पुष्प | पौष | ११ |
| पूर्वग्रह | मार्गशीर्ष | ४ |
| पूर्वतयारी | ज्येष्ठ | १४ |
| प्रगति | आषाढ | २० |
| | भाद्रपद | २५ |
| | कार्तिक | २१ |
| प्रतिकूलता | ज्येष्ठ | ९ |
| प्रतिबिंब | आषाढ | १८ |
| | फाल्गुन | ६ |
| प्रतिज्ञा | कार्तिक | १७ |
| | फाल्गुन | २ |
| प्रभातफेरी | मार्गशीर्ष | ६ |
| प्रभु | फाल्गुन | ६ |
| प्रभुसेवा | फाल्गुन | २० |
| प्रयत्न | भाद्रपद | १२ |
| | भाद्रपद | ३० |
| प्रशंसामहिमा | भाद्रपद | ११ |
| प्रश्न | भाद्रपद | २४ |
| प्रार्थना | मार्गशीर्ष | २८ |
| | माघ | ५ |
| | माघ | ११ |
| | फाल्गुन | १६ |
| प्रामाणिकता | मार्गशीर्ष | २३ |
| प्रेमभाव | चैत्र | २३ |
| प्रेरणा | पौष | ३० |
| पृथ्वी | मार्गशीर्ष | २३ |

## फ

| | | |
|---|---|---|
| फजिती | श्रावण | ६ |
| फटकळपणा | श्रावण | २५ |
| फड | माघ | ९ |
| फलप्राप्ति | आश्विन | १७ |
| फलाशा | आश्विन | १६ |
| फसवणूक | वैशाख | ४ |

## ब

| | | |
|---|---|---|
| बचत | भाद्रपद | ६ |
| बडबड | ज्येष्ठ | ३० |
| | मार्गशीर्ष | ७ |
| बरोबर | आश्विन | ११ |
| बल | आषाढ | ३० |
| | भाद्रपद | २१ |
| बलसंचय | मार्गशीर्ष | ९ |
| बलिदान | माघ | १० |
| बलिप्रतिपदा | कार्तिक | १७ |
| बाऊ | मार्गशीर्ष | २५ |
| बाणा | फाल्गुन | ११ |
| बाबी | चैत्र | १४ |
| बालदिन | कार्तिक | २३ |
| बालसंगोपन | वैशाख | २४ |
| बाह्यांगमहत्त्व | फाल्गुन | २९ |
| बुद्धपौर्णिमा | ज्येष्ठ | १ |
| बुद्धिमत्ता | भाद्रपद | १७ |
| ब्रेत | ज्येष्ठ | १७ |
| | ज्येष्ठ | २४ |
| बोध | कार्तिक | २२ |
| बोधवचनें | श्रावण | ५ |
| | पौष | ५ |
| ब्राम्हण्य | मार्गशीर्ष | २४ |
| ब्रीद | पौष | १५ |

## भ

| | | |
|---|---|---|
| भक्तिभाव | मार्गशीर्ष | २८ |
| भगवंत | श्रावण | २२ |
| | कार्तिक | २५ |
| | माघ | ११ |
| | माघ | १६ |
| | फाल्गुन | ६ |
| भगवद्भजन | आश्विन | १३ |
| भला | कार्तिक | ९ |
| भलाई | ज्येष्ठ | ३ |
| | मार्गशीर्ष | १० |
| | मार्गशीर्ष | २३ |
| भविष्य | मार्गशीर्ष | ८ |
| भाऊबीज | कार्तिक | १८ |
| भारदस्तपणा | माघ | १५ |
| भावंडे | फाल्गुन | २ |
| भाषण | कार्तिक | २८ |
| | पौष | २ |
| | माघ | ९ |
| भूक | भाद्रपद | ११ |
| भूतकाल | भाद्रपद | २९ |

## म

| | | |
|---|---|---|
| मकरसंक्रमण | पौष | २४ |
| मत | माघ | २२ |
| मत्ता | भाद्रपद | १७ |
| मर्दानगी | ज्येष्ठ | ६ |
| मन | चैत्र | ११ |
| | वैशाख | ३१ |
| | आश्विन | ६ |
| मन | आश्विन | २१ |
| | कार्तिक | ११ |
| | कार्तिक | १२ |
| | कार्तिक | १३ |
| | कार्तिक | १६ |
| | कार्तिक | १८ |
| मनन | आषाढ | ६ |
| मनमिळाऊपणा | ज्येष्ठ | २ |
| मन:शक्ति | आषाढ | ३० |
| मन:स्थिती | वैशाख | ३१ |
| मनोगृह | कार्तिक | १२ |
| मनोदुर्गरक्षक | कार्तिक | १० |
| मनोद्यान | वैशाख | ३ |
| मनोधारणा | कार्तिक | १४ |
| मनोनियंत्रण | वैशाख | ४ |
| | आषाढ | १४ |
| मनोबलवर्धन | भाद्रपद | २१ |
| मनोभांडार | आश्विन | २१ |
| मनोमालिन्य | कार्तिक | १२ |
| मनोराज्य | आश्विन | २४ |
| मनोविकार | वैशाख | २२ |
| | श्रावण | २५ |
| | श्रावण | ३१ |
| | भाद्रपद | ९ |
| मनोवृत्ति | ज्येष्ठ | २ |
| मनोव्यापार | चैत्र | १८ |
| मरगळ | मार्गशीर्ष | ३ |
| मशागत | वैशाख | ३ |
| महात्माजी | माघ | २८ |
| महाप्रयत्न | भाद्रपद | ३० |
| महामानव | मार्गशीर्ष | १६ |

महाराष्ट्रराज्यदिन वैशाख ११
महालक्ष्मीपूजन आश्विन २४
मार्ग माघ २७
मार्गक्रमण ज्येष्ठ २१
मार्गदर्शन श्रावण २२
मानवधर्म फाल्गुन ८
मानसपूजा फाल्गुन ७
मानसमंदीर कार्तिक २१
माघ २३
मालमत्ता मार्गशीर्ष २१
मितव्यायाम आषाढ ३
मिळकत पौष ३
मुक्काम कार्तिक १५
मुहूर्त आश्विन १४
मूल्यांकन कार्तिक २७
मेहनत ज्येष्ठ १
ज्येष्ठ २७
मैत्री पौष २४
मोबदला फाल्गुन ५
मोहकता फाल्गुन ३
मोक्षसाधना श्रावण ९
मौन चैत्र ९
भाद्रपद ७
मौनसाधना आषाढ २४
मौलिकता आश्विन २६

# य

यमनियम फाल्गुन ८
यमद्वितीया कार्तिक १८
यश ज्येष्ठ १४
यश पौष १४
यशापयश पौष २८
यक्षप्रश्न चैत्र ६
यज्ञ फाल्गुन २६
यादी आश्विन २१
येशू ख्रिस्त पौष ४
योग्यता वैशाख १
भाद्रपद १२
योजना चैत्र १२

# र

रजतमसत्त्व माघ १८
रथसप्तमी माघ २२
रवींद्रनाथ जयंति ज्येष्ठ ९
रक्षाबंधन भाद्रपद ३
राबणूक वैशाख १९
रामनवमी चैत्र २४
रामबाण इलाज वैशाख २३
रामायण वैशाख १३
राष्ट्रवृत्ति मार्गशीर्ष २४
राष्ट्रसंवर्धन वैशाख २०
रुखरुख मार्गशीर्ष २५
रोखठोकपणा आषाढ १९

# ल

लाला लजपतराय पु. माघ ८
लवचिकपणा ज्येष्ठ २५
लक्ष्मीपूजन कार्तिक १६
लक्ष्मीबाई स्मृतिदिन ज्येष्ठ २४
लक्ष्य श्रावण

लालनपालन वैशाख २४
लीनता ज्येष्ठ २५
आश्विन ६
लोकमान्य जयंति श्रावण ९
( आंग्ल–३१ जु. )
लोकमान्य पुण्यतिथि श्रावण १०
( आंग्ल–१ ऑ. )
लोकसेवा कार्तिक २९

## व

वक्तृत्व कार्तिक २८
पौष २
माघ ९
वटपौर्णिमा आषाढ ३
वटवट मार्गशीर्ष ७
ज्येष्ठ ३०
वर्ण मार्गशीर्ष २४
वर्तमान आश्विन २०
वर्तणुक फाल्गुन २४
वर ज्येष्ठ १९
वरदहस्त चैत्र २०
वराहजयंति भाद्रपद २०
वाक्ताडन श्रावण २५
वाग्बाण आश्विन ५
वागणूक चैत्र २२
वाचन वैशाख २३
मार्गशीर्ष ८
माघ ८
वाचाळता ज्येष्ठ ३०
वाटचाल कार्तिक २४
पौष १०
वाणी आषाढ १९
वाणी आश्विन ५
वार्धक्य आश्विन २
वामनद्वादशी भाद्रपद ३०
वारसा कार्तिक २०
विकार श्रावण २५
विकास ज्येष्ठ १२
कार्तिक २१
विघ्न भाद्रपद २२
विघ्नविसर्जन आश्विन १
विचक्षणा पौष २१
विचार चैत्र २१
वैशाख ११
ज्येष्ठ ८
ज्येष्ठ २८
आषाढ २२
श्रावण १४
मार्गशीर्ष १
पौष १५
पौष २३
माघ १४
माघ २०
माघ २६
विचारधन मागशीर्ष २१
विचारवैभव आषाढ २२
विचारशक्ति भाद्रपद २१
विचारसामुग्री आश्विन २१
विचारसृष्टि श्रावण २७
विचारसूक्ते ज्येष्ठ ४
विजय भाद्रपद २२
विद्वत्ताप्राप्ति आषाढ १०
विधिनिषेध माघ २९

विरंगुळा माघ २१
विरोध कार्तिक ६
विवेक माघ २२
विवेकानंद पुण्यतिथि आषाढ १५
विवेकानंद जयंति माघ ५
विवंचना मार्गशीर्ष २०
विसर्जन आश्विन १
विश्वास फाल्गुन १९
वेळ माघ १३
वैगुण्य वैशाख १८
मार्गशीर्ष १७
वैफल्य भाद्रपद २३


## य


व्यग्रता ज्येष्ठ २०
व्यक्तिमत्व वैशाख २१
व्यक्तित्वपालट माघ २३
व्यत्यय ज्येष्ठ २०
व्यवसाय आषाढ ९
व्यवहारस्थगन श्रावण १४
व्यय फाल्गुन १५
व्यष्टि मार्गशीर्ष २२
व्यायाम वैशाख ७
ज्येष्ठ ६
व्यासंग श्रावण १७
श्रावण २७
वृत्ति ज्येष्ठ २६
आषाढ १४
श्रावण १९
फाल्गुन १४
वृत्त्यंतर भाद्रपद १३
वृक्षराज पौष १


## श


शक्ति फाल्गुन १
शक्तिकोष कार्तिक
शतक शब्दांचे श्रावण १
शपथ फाल्गुन
शब्द श्रावण १
श्रावण १
माघ २१
शब्दाध्ययन फाल्गुन १३
शब्दमाहात्म्य भाद्रपद ४
शब्दव्यवहार मार्गशीर्ष ७
शमन चैत्र १९
शय्याव्यायाम वैशाख ७
शरण कार्तिक २५
कार्तिक ३०
माघ ३०
शरीरबल पौष २३
शाबासकी आषाढ १३
शालीनता चैत्र १
शास्त्रीजयंति अश्विन १०
शिकवण आषाढ १५
शिथिलता आश्विन १२
शिल्पकार पौष २२
शिव चैत्र १९
शिशु कार्तिक २३
शिक्षक श्रावण ४
शिक्षकदिन भाद्रपद १४
शिक्षण ज्येष्ठ १२

| | | |
|---|---|---|
| शिक्षण | आश्विन | २८ |
| शील | आषाढ | १५ |
| शीलसामर्थ्य | फाल्गुन | ११ |
| शुचिर्भूतता | वैशाख | १५ |
| शुभचिंतन | वैशाख | २७ |
| शुभारंभ | कार्तिक | १९ |
| शोक | भाद्रपद | २९ |

## श्र

| | | |
|---|---|---|
| श्रद्धा | ज्येष्ठ | ७ |
| | श्रावण | २१ |
| | आश्विन | २३ |
| | माघ | २५ |
| श्रद्धानंद (हुतात्मा) | पौष | ३ |
| श्रवण | माघ | २६ |
| श्रवणभक्ति | कार्तिक | २६ |
| श्रीपादवल्लभ | मार्गशीर्ष | ३० |
| श्रीपती | पौष | १४ |
| श्वसन | आश्विन | ३० |
| श्वसन व्यायाम | आश्विन | १२ |

## स

| | | |
|---|---|---|
| सक्रीयता | श्रावण | २३ |
| सचोटी | ज्येष्ठ | १६ |
| | श्रावण | २८ |
| | मार्गशीर्ष | १५ |
| | माघ | २८ |
| सत्यधर्म | मार्गशीर्ष | १३ |
| सत्यप्रियता | मार्गशीर्ष | १० |
| सत्यशोधन | मार्गशीर्ष | १५ |
| सत्यशोधन | माघ | २२ |
| सत्यसाधना | फाल्गुन | १२ |
| सत्यस्वरुप | मार्गशीर्ष | १५ |
| सदानंद | श्रावण | १९ |
| सद्भाव | श्रावण | ३० |
| सद्विचार | श्रावण | ५ |
| समतोलपणा | ज्येष्ठ | ११ |
| | भाद्रपद | १८ |
| | फाल्गुन | १४ |
| समर्पण | वैशाख | ३० |
| समस्या | आश्विन | २५ |
| समष्टि | मार्गशीर्ष | २२ |
| समाजसेवा | कार्तिक | २९ |
| | फाल्गुन | २५ |
| समाधान | वैशाख | १४ |
| | ज्येष्ठ | २३ |
| सरोजिनी नायडू जयंति | माघ | २४ |
| सल्ला | चैत्र | २६ |
| | श्रावण | ५ |
| सवय | चैत्र | ८ |
| | वैशाख | १२ |
| | ज्येष्ठ | २२ |
| सहनशीलता | कार्तिक | ३ |
| | कार्तिक | १० |
| | फाल्गुन | ४ |
| सहानुभूति | मार्गशीर्ष | २६ |
| सहाय्य | माघ | ३० |
| सहिष्णुता | फाल्गुन | २३ |
| साकडे | मार्गशीर्ष | २८ |
| साडेसाती | ज्येष्ठ | २९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सार्थक | कार्तिक | २० | सुशब्द | श्रावण | १३ |
| साधकबाधकता | कार्तिक | ६ | सुसंस्कृतता | आश्विन | २८ |
| साधनशुचिता | •भाद्रपद | ३१ | सुसंस्कार | फाल्गुन | ३ |
| साधना | भाद्रपद | २५ | सुसंस्कारिता | आश्विन | १८ |
| साधेपणा | भाद्रपद | २७ | सूवितमौक्तिक | श्रावण | ८ |
| | कार्तिक | २ | | श्रावण | २९ |
| | मार्गशीर्ष | २ | सूचना | चैत्र | २६ |
| | फाल्गुन | ९ | सेवा | आषाढ | १६ |
| सान्निध्य | मार्गशीर्ष | १६ | सेवाकार्य | पौष | ३ |
| साफसफाई | आषाढ | १२ | सेवाधर्म | मार्गशीर्ष | १३ |
| सामर्थ्यसाधना | फाल्गुन | २१ | सेवावृत्ति | पौष | ४ |
| सामाजिकता | आश्विन | ३ | सोस | वैशाख | २६ |
| सावरकर जयंति | ज्येष्ठ | ७ | संकट | फाल्गुन | १ |
| सावित्री व्रत | आषाढ | १ | संकल्प | चैत्र | १ |
| साक्षात्कार | आषाढ | २४ | संतोष | भाद्रपद | १५ |
| सिद्धिदाता | भाद्रपद | २२ | संभाषण | आषाढ | १९ |
| सिंहावलोकन | चैत्र | १५ | | कार्तिक | २८ |
| सीमोल्लंघन | आश्विन | २७ | संस्करण | आश्विन | १८ |
| सुख | भाद्रपद | १४ | स्थानप्राप्ति | माघ | १ |
| सुखप्राप्ति | वैशाख | १४ | स्थिरता | पौष | २९ |
| | कार्तिक | १६ | स्नान | वैशाख | १५ |
| सुदैव | आषाढ | २९ | स्वकर्तृत्व | आषाढ | २५ |
| सुभाषित | आषाढ | ६ | स्वर्गप्राप्ति | चैत्र | ३ |
| सुमन | पौष | ११ | स्वमूल्यांकन | आषाढ | १७ |
| सुवर्णसंधि | माघ | २ | स्वत्व | चैत्र | १० |
| सुविचार | आषाढ | ७ | स्वप्न | पौष | ३० |
| | श्रावण | ८ | स्वयंसूचन | चैत्र | १८ |
| सुविचारसाधना | माघ | १४ | स्वयंशासन | श्रावण | २४ |
| सुवेळ | माघ | १३ | स्वविश्लेषण | आषाढ | २६ |
| सुशब्द | श्रावण | १२ | स्वातंत्र्य | माघ | ६ |

| | | |
|---|---|---|
| स्वातंत्र्यवीर पु. | फाल्गुन | ७ |
| स्वार्पण | मार्गशीर्ष | २७ |
| स्वीकार | माघ | ७ |
| स्वोदाहरण | मार्गशीर्ष | ५ |


## ह


| | | |
|---|---|---|
| हकालपट्टी | मार्गशीर्ष | ४ |
| हनुमान जयंति | चैत्र | ३० |
| हरिनाम | आश्विन | १३ |
| हाव | पौष | ५ |
| हास्यमुखता | ज्येष्ठ | २९ |
| | श्रावण | १९ |
| हिंदुत्व | फाल्गुन | ७ |
| | फाल्गुन | ८ |
| हुतात्मादिन | माघ | १० |
| हुताशनी पौर्णिमा | चैत्र | २ |
| हेकटपणा | ज्येष्ठ | २ |
| होमी भाभा पुण्य. | माघ | ४ |


## क्ष


| | | |
|---|---|---|
| क्षमता | मार्गशीर्ष | १२ |
| क्षमाशीलता | कार्तिक | १० |
| | कार्तिक | १४ |
| | माघ | १७ |
| क्षेमवृद्धि | श्रावण | ३० |


## ज्ञ


| | | |
|---|---|---|
| ज्ञान | चैत्र | ६ |
| ज्ञानदान | पौष | ७ |
| ज्ञानपिपासा | भाद्रपद | १७ |
| ज्ञानशाखा | श्रावण | २० |
| | मार्गशीर्ष | १४ |
| ज्ञानार्जन | आषाढ | १० |
| ज्ञानेश्वर पुण्यतिथि | मार्गशीर्ष | १४ |

# शुद्धिपत्रक

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| चैत्र | १ | २२ | तुमच्या | आपल्या |
| " | ५ | १४ | साथ्र्याचे | सामर्थ्याचे |
| " | १४ | १,२ | रा.चै. १४ (गुड् फ्रायडे) | (गुड फ्रायडे) April 4 |
| " | १५ | १ | वर्षाचा | शकाचा |
| " | १९ | १९ | शव | शिव |
| " | २४ | १९ | April 14 | डॉ. आंबेडकर जयंति April 14 |
| " | २८ | १९ | समस्या | समया |
| वैशाख | १ | ४ | अत्याअवश्यक | अत्यावश्यक |
| " | २ | ११ | अततोगत्वा | अंततोगत्वा |
| " | ४ | २२ | April 24 | (माताजी जयंति) April 24 |
| " | ७ | १२ | त्रयस्तवृत्तीने | त्रयस्थवृत्तीने |
| " | ८ | १८ | नी | ह्या |
| " | ८ | १९ | निधर्मपूर्ण | धर्मपूर्ण |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| वैशाख | १७ | २ | डॉ. आंबेडकर जयंति | परशुराम जयंति |
| " | १९ | २ | अक्षय्य तृतीया, परशुराम जयंति | अक्षय्य तृतीया |
| " | २० | १४ | वरान्निबोधन | वरान्निबोधत |
| " | २१ | १० | भारदास्तपणा | भारदस्तपणा |
| " | २४ | १७ | विश्वास | विश्वासू |
| " | २८ | ९ | कलापव्यय | कालापव्यय |
| " | २९ | ७ | चालचेच | चाललेत |
| ज्येष्ठ | ३ | १० | भालईची | भलाईची |
| " | ४ | १८ | टेवूनच | ठेवूनच |
| " | ८ | ८ | पळकुटेपणा | पळपुटेपणा |
| " | ९ | २० | कर्तुंत्त्वानिशी | कर्तृत्त्वानिशी |
| " | ११ | ६ | निस्तान | निस्ताण |
| " | १२ | ६ | प्रक्तींचा | प्रवृत्तींचा |
| " | १४ | ८ | जाणीपूर्वक | जाणीवपूर्वक |
| " | १४ | ८ | यदृच्छाया | यदृच्छया |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ज्येष्ठ | १५ | ४ | मानवम दीनी | मानवमेदिनी |
| " | १५ | ६ | दृष्यापासून | दृश्यापासून |
| " | १७ | २,३ | आधिक | अधिक |
| " | १८ | ११ | कुठे नि | कुठे कुठे नि |
| " | १९ | ८ | झटापट | झटपट |
| " | २४ | ७ | एर्कचितन | एक जे चिंतन |
| " | २६ | ४ | निपक्षपातीपणे | नि:पक्षपातीपणे |
| " | २६ | १६ | तत्सिद्धार्थ | तत्सिद्ध्यर्थ |
| " | ३० | २० | उययुक्त | उपयुक्त |
| आषाढ | २ | ७ | मनस्तिष्ठित | मनसि स्थित |
| " | ४ | ४ | सुप्त अशा | सुप्त आशा |
| " | १४ | ७ | उत्तेजनाही | उत्तेजना ही |
| " | १७ | ४ | अहकार | अहंकार |
| " | १८ | १ | अंतस्चे, | अंतस्चें |
| " | १८ | ८ | व | या |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| आषाढ | १८ | १७ | अंततः | अंतः |
| ” | २२ | ३ | ही ही | हीही |
| ” | २३ | ७ | यांनी | यांना |
| श्रावण | २ | ५ | जरी | तरी |
| ” | ३ | १५ | ही ही | हीही |
| ” | ७ | १६ | सभ्दाव | सद्भाव |
| ” | ७ | १७ | कुप्रवृत्तीचे झाड | कुप्रवृत्तीचा झाडा |
| ” | ७ | १८ | तिथे ते धर्म होऊन | होऊन तिथे ते धर्म |
| | ९ | ३ | हृदयशालीनता | हृदय शालीनता |
| ” | १४ | ६ | वावरता | वावरताना |
| ” | १६ | १३ | अंखडीतपणे | अखंडीतपणे |
| ” | १९ | १ | एकजण | असा एकजण |
| ” | २२ | १३ | सद्धर्म प्रवृत्त | सद्धर्मप्रवृत्त |
| ” | २५ | ९ | त्यावर | त्यांच्यावर |
| ” | २६ | १८ | कृति प्रवण | कृतिप्रवण |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| श्रावण | २८ | ७ | उभ्दवू | उद्भवू |
| " | ३० | १ | सभ्दावांनी | सद्भावांनी |
| " | ३० | १४ | सभ्दावांनी | सद्भावांनी |
| " | ३१ | ८ | सभ्दावांच्या | सद्भावांच्या |
| भाद्रपद | १० | १६ | यशाविहीन | यश विहीन |
| " | १४ | १८ | ज्ञान दानकरण्यासाठी | ज्ञानदान करण्यासाठी |
| " | १५ | १४ | समण्याइतकी | समजण्याइतकी |
| " | १८ | ४ | वाढतात | वाटतात |
| " | २० | ६ | आधिकाधिक | अधिकाधिक |
| " | २१ | २ | विचार कर्ते | विचारकर्ते |
| " | २२ | ११ | आशांच्या | अशांच्या |
| " | २५ | ४ | चतुष्टचा | चतुष्टया |
| " | २५ | १३ | आधिक | अधिक |
| " | २८ | १ | नीरवएकांतसेबन | नीरव एकांतसेवन |
| " | ३१ | ८ | निर्दोश | निर्दोष |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| आश्विन | ३ | १ | आश्विन | आश्विन |
| " | ३ | १४ | सर मिसळून | सरमिसळून |
| " | ४ | १ | आश्विन | आश्विन |
| " | ७ | १ | आश्विन | आश्विन |
| " | ८ | १७ | शकणारे ध्यानी | शकणारे नुकसान ध्यानी |
| " | ११ | ७ | होवो व | होवो वा |
| " | १२ | १५ | रक्तदोष नाश | रक्तदोषनाश |
| " | १७ | २ | फलप्रात्पि | फलप्राप्ति |
| " | १८ | ६ | सुसंस्कारिकेत | सुसंस्कारितेत |
| " | १८ | १६ | जखशलेले | जखडलेले |
| " | १८ | १७ | सुसंस्कारिता हीन | सुसंकारिताहीत |
| " | २१ | ३ | बुद्धिमत्ता ठेवी | बुद्धिमत्ताठेवी |
| " | २७ | २ | – – – | (आश्विन शु. १०, दसरा) |
| " | २८ | १० | करुन त्या जागी सुसंस्कृतता | करुन सुसंस्कृतता, त्या जागी, |
| " | ३० | १२ | अंग वळण | अंगवळण |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| आश्वीन | ३० | १२ | प्रयत्नाविनही | प्रयत्नाविनाही |
| कार्तिक | ७ | ८ | बाष्फळ | बाञ्कळ |
| " | ८ | २ | ईर्षा | ईर्ष्या |
| " | ९ | १६ | अशी या | अशी शक्ति या |
| " | १० | ९ | नितिमय | नीतिमय |
| " | १५ | ८ | अविर्भूत | आविर्भूत |
| " | १७ | ४ | पथक | अथक |
| " | १७ | ७ | टिकविन | टिकवीन |
| " | १९ | २ | शंकाखोर | शंकेखोरपणा |
| " | १९ | १० | एकदा | एखादा |
| " | २२ | ७ | दैनंदीन | दैनंदिन |
| " | २२ | ८ | साऱ्यांच्या त्या | साऱ्यांच्या |
| " | २३ | ५ | निर्वादयतेबद्दल | निर्व्याजतेबद्दल |
| " | २३ | १६ | व्यक्तिनिष्ट | व्यक्तिनिष्ठ |
| " | २३ | २० | | (बालदिन) |

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| कार्तिक | ३० | ११ | बांघा | बांधा |
| मार्गशीर्ष | १ | ३ | आधिकाधिक | अधिकाधिक |
| " | ३ | १३ | आधिकाधिक | अधिकाधिक |
| " | ४ | ४ | वाडते | वाटते |
| " | ४ | १७ | कूपमंडक प्रिय | कूपमंडूकप्रिय |
| " | ६ | ११ | मार्गक्रमित | मार्ग क्रमित |
| " | ७ | १३ | अर्धछटा | अर्थच्छटा |
| " | १२ | १३ | सामर्थे | सामर्थ्ये |
| " | १३ | ८ | ध्येय ध्रुव | ध्येयध्रुव |
| " | १४ | १३ | उभ्दव | उद्भव |
| " | १८ | ४ | का पण | कां होईना, पण |
| " | २० | १३ | धाडणीने | धाटणीने |
| " | २३ | २ | असेल | नसेल |
| " | २३ | १३ | घडते ही | घडते हे |
| " | २८ | १४ | आधिक | अधिक |

REFBK-0023968

| मास | दिन | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| मार्गशीर्ष | २९ | १ | इर्ष्येने | ईर्ष्येने |
| पौष | ३ | ७ | कार्यसक्ति | कार्यासक्ति |
| " | ४ | २ | रा. पौष ४ (मार्ग. व. ३, येशूजयंति) | (येशूजयंति) December 25 |
| " | ८ | ९ | आधीन | अधीन |
| " | ८ | ९ | व्यर्थ्य | व्यर्थ |
| " | ९ | ५ | अनुकल | अनुकूल |
| " | ९ | १३ | कोमलता ही | कोमलता हे |
| " | १२ | ११ | घर्माचरणी | धर्माचरणी |
| " | १२ | १७ | निरिच्छ्या | निरिच्छया |
| " | १३ | १२ | दातृत्वाची | दातृत्वाच्या |
| " | १६ | ३ | घेतेले | घेतले |
| " | १६ | १५ | ठरताच | ठरतात |
| " | १९ | ४ | पाळमुळे | पाळेमुळे |
| " | २० | ३ | निस्वार्थी | निःस्वार्थी |
| " | २४ | ५ | डोळे झाक | डोळेझांक |
| " | २४ | १० | दृगोचर | दृग्गोचर |

लौकरच सादर होणार

# ‘ताम्हणकरी’

भाग पहिला : बालकथा गीते

भाग दुसरा : उसनवारी

भाग तिसरा : अनुकरणे